
# THE ADVENTURES OF SHERLOCK HOLMES



# शेरलॉक होम्स ३

वृषाली जोशी

SIR ARTHUR CONAN DOYLE

# शेरलॉक होम्स-3

मूळ इंग्लीश लेखक – ऑर्थर कॉनन डॉयल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# शेरलॉक होम्स-3

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शेरलॉक होम्स-3


## लेखक : ऑर्थर कॉनन डॉयल

अनुवादिका : वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १ ऑगस्ट २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादिकेची ओळख



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व सात पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके


सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,


कविता करण्याचा

व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९

चलभाष ९९२१७४६२४५








http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf

वृषाली जोशी यांची ई साहित्यने प्रकाशित केलेली आजवरची पुस्तके.

काही काळासाठी विनामल्य







http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maugham_vrishali_joshi.pdf

# शेरलॉक होम्सविषयी



ब्रिटीश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल, यांच्या सिद्धहस्त लेखणीने निर्माण केलेले, शेरलॉक होम्स हे खासगी गुप्तहेराचे कपोलकल्पित पात्र आहे. निरीक्षणातील अचूकता, गुन्हेगारी शास्त्रातील जाणकारी व तर्कशास्त्रावरील हुकमत, ही त्याची गुन्हा अन्वेषणातील बलस्थाने आहेत. शेरलॉक होम्स हा, सतत तेवीस वर्षे गुप्तहेराचे काम करतो आहे. सतरा वर्षे त्याचा मदतनीस, डॉक्टर जॉन वॉटसन हा त्याच्या बरोबर काम करत असून, वॉटसनच्या लग्नापूर्वी व बायको वारल्यावर, तो आणि शेरलॉक हे दोघेही, २२१, ब, बेकर रस्ता येथे, मिसेस हडसन या मालकीणबाईंकडील सदनिकेत रहात असल्याचे दाखवले आहे. बहुतेक सगळ्या गोष्टी वॉटसनच्या तोंडून कथन केल्या गेल्या आहेत.

A Study In The Scarlet या आर्थर कॉनन डॉयल यांच्या पहिल्या पुस्तकातून हे पात्र उदयास आले व दिवसेदिवस त्याची लोकप्रियता वाढत गेली. काहीजण तर हे कल्पित पात्र नसून खराच माणूस असल्याचे समजू लागले व तो २२१, ब, बेकर रस्ता, येथे खरोखरंच रहातो, असे मानू लागले. रेडिओ व दूरदर्शनवरील नाटके, सिनेमे, शिवाय व्हिडीओ गेम्स, अशी सर्व ठिकाणे; सुमारे शंभर वर्षे, शेरलॉक होम्सने गाजवून सोडली. लंडनमध्ये शेरलॉक होम्स वस्तुसंग्रहालय आहे. सर आर्थर कॉनन डॉयल याच्या जन्मगावी, म्हणजे एडिंबरो येथील पिकार्डो येथे शेरलॉक होम्सचा पुतळाही आहे.

पहिला रहस्यकथा लेखक ॲलन पो याच्या गुप्तहेराची थोडीशी छाप, शेरलॉक होम्समध्ये भासत असली तरी, जोसेफ बेल नावाचा सर्जन, फ्रान्सिस टॅन्की स्मिथ हा पोलीस व सर हेन्री लिटील जॉन हा वैद्यकीय वकील; या खऱ्याखुऱ्या लोकांची छटाही, शेरलॉक या पात्रात कॉननने रंगवलेली दिसते. मॅक्समिलन हेलर हे फ्रेंच लेखक हेन्री कॉव्हेन निर्मित पात्रही शेरलॉक होम्स रंगवण्यासाठी त्याच्याकडून वापरले गेल्यासारखे वाटते. तरीही शेरलॉक होम्स हे अत्यंत गाजलेले, एकमेवाद्वितीय व्यक्तीचित्र असल्याचे मान्य करावेच लागेल.

## प्रस्तावना

पानागणिक उत्सुकता वाढवणाऱ्या रहस्यकथा वाचायला कोणाला आवडत नाहीत? त्याच कारणाने मीदेखील त्या वाचत गेले व मराठी लोकांसाठी त्या अनुवादित कराव्या, असे वाटले. यास्तव हा प्रपंच. या पूर्वी सहा-सहा कथांचे दोन संग्रह प्रकाशित केले. त्यांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. म्हणून हा सहा कथांचा तिसरा संग्रह!

डॉ. वृषाली जोशी

अर्पणपत्रिका

रहस्ये उकलणाऱ्या शेरलॉक होम्सच्या चातुर्यास

## कथानुक्रम

| कथानुक्रम | पृष्ठ क्र. |
| --- | --- |
| ॲबे शेतघर | १२ |
| इंजिनिअरचा अंगठा | ३८ |
| कॉपर बीच | ६० |
| ठिपक्यांचा पट्टा | ८७ |
| दुसरा डाग | ११४ |
| वाकड्या ओठाचा माणूस | १४४ |

# The Adventure Of The Abbey Grange

## अॅबे शेतघर




९७ सालातील हिवाळा संपत आला होता. थंडीचा कडाका असलेली, अशी ती धुके पडलेली, सकाळ होती. माझ्या खांद्याला हात धरून हलवल्याने, मी जागा झालो. तो होम्स होता. त्याच्या हातात असलेल्या मेणबत्तीच्या उजेडात मला त्याचा उत्सुक व माझ्यावर वाकलेला, चेहरा दिसला. क्षणार्धात मला काहीतरी गडबड असल्याचे कळले.

तो ओरडला, “वॉटसन, ये. लवकर ये. खेळ सुरु होतो आहे. काही बोलू नकोस. आहेस त्याच कपड्यात ये.”

दहा मिनिटानंतर आम्ही आवाज करणाऱ्या टॅक्सीत बसून, चेरिंग क्रॉस स्टेशनच्या दिशेने, शांत रस्त्यावरून चाललो होतो. हिवाळयातील पहाट उजाडत होती. ती लंडनमधील विचित्र वास येणारी, रंगीत सकाळ होती. आम्हाला अंधुक उजेडात, लवकर कामाला जाणाऱ्या एका माणसाची पुसट, अस्पष्ट आकृती दिसली. होम्स त्याचा मोठा कोट घालून, शांतपणे बसला होता. मी पण तसाच बसलो होतो. कारण थंडी फार होती आणि आमच्यापैकी कुणीच न्याहारी केली नव्हती.

स्टेशनवर गरम चहा घशाखाली उतरवल्यावर, केंटीश गाडीमध्ये आम्ही स्थानापन्न झालो. मग आम्ही पुरेसे उबदार झाल्यावर, त्याने बोलायला व मी ऐकायला सुरवात केली. होम्सने त्याच्या खिशातून एक चिठ्ठी काढून, वाचायला सुरवात केली.

ॲबे शेतघर, मारशॅम, केंट, पहाटेचे ३.३०, प्रिय मिस्टर होम्सः

एका उल्लेखनीय केसमध्ये, तुमची तत्काळ मदत मिळणार म्हणून, मी आनंदी झालो आहे. फक्त एक बाई सोडून, तुम्ही नेहमी करत असलेल्या कामासारखेच हे आहे. मी जसे आहे, तसेच सर्व काही ठेवले आहे. पण तुम्ही कृपया एक क्षणदेखील, फुकट घालवू नका. कारण, इथे सर युस्टॅसना एकट्याना सोडणे शक्य नाही.

तुमचा विश्वासू, स्टॅन्ले हॉपकिन्स

होम्स म्हणाला, “हॉपकिन्सने मला यापूर्वी, सात वेळा बोलावले होते. प्रत्येक वेळेस त्याच्या बोलावण्याला मी न्याय दिला होता. मला वाटते, ती प्रत्येक केस, तू शब्दबद्ध केली होतीस. आणि वॉटसन, मला कबूल केले पाहिजे, की तुझी निवडशक्ती चांगली आहे. मी तीव्र नाराजी व्यक्त केलेले तुझ्या वर्णनातील प्रसंग, तू सुधारून घेतोस. प्रत्येक बाब शास्त्रीय दृष्टीकोनातून बघण्यापेक्षा, गोष्टीच्या अंगाने बघण्याची, तुझी महत्वाची सवय आहे. त्यामुळे तू उपयोगी व दिशादर्शक असलेल्या, अभिजात साहित्याबद्दल गुळमुळीतपणे बोलतोस. ठळक भावनिक बाबींसाठी, तू टोकाचा डौलदारपणा व व्यामिश्रता असलेले काम एकमेकात मिसळून टाकतोस. त्यामुळे कदाचित वाचकाची उत्सुकता वाढत असेल, पण त्या गोष्टी मार्गदर्शन करत नाहीत."

मी कडवटपणे म्हणालो, “मग त्या गोष्टी, तू स्वतःच का लिहीत नाहीस?”

“वॉटसन, मी त्या लिहीन. नक्कीच लिहीन. पण तुला माहिती आहे, की सध्या मी बऱ्यापैकी व्यस्त आहे. काहीतरी अगम्य शोधून काढायच्या कलेवर, प्रयत्नपूर्वक लक्ष केंद्रित करून एक पुस्तक लिहिण्यासाठी, मी येत्या काही वर्षात वेळ देण्याचा विचार करतो आहे. आपले सध्याचे संशोधन, एक खुनाची केस दिसते आहे.

“म्हणजे, तू सर युस्टॅस मेले, असे समजतो आहेस का?”

“मला वाटते हो. हॉपकिन्सचे लिहिणे चिंता व काळजी दर्शवते आणि तो काही भावनाशील मनुष्य नाही. मला असे कळले आहे, की तिथे काही खूनखराबा झाला आहे व कलेवराची परीक्षा करण्यासाठी आपल्याला बोलावले गेले आहे. निव्वळ आत्महत्या असती तर त्याने मला बोलावले नसते. या दुर्घटनेच्या वेळी बाईसाहेबाना त्यांच्या खोलीत जखडून ठेवण्यात आले होते. त्यामुळे त्यांची सुटका करायच्या बाबतीतही, काही करावे लागेल, असे दिसते आहे. वॉटसन, आपण चुरचुरीत कागद, EB अशी सही, शस्त्रे लपवलेला कोट व घराचा सुंदर पत्ता, या उच्चवर्गीय रहाणीमानात अडकतो आहोत. मला वाटते आपला मित्र, हॉपकिन्स, त्याच्या थोर कीर्तीप्रमाणे आयुष्य जगत असेल व आपल्याला एक रुचीपूर्ण सकाळ, अनुभवायला मिळेल. कालच्या रात्री बारापूर्वी गुन्हा घडलेला आहे.”

“तू असे कसे काय, सांगू शकतोस?”

“गाड्यांचे निरीक्षण करून व वेळाची मोजदाद करून मी असे सांगतो. स्थानिक पोलिसांना बोलवायला हवे. त्यानी स्कॉटलंड यार्डबरोबर संवाद साधायला हवा. हॉपकिन्सला बाहेर पडायला हवे. आणि शेवटी त्याने मला बोलवायला हवे. हे एवढे करायला एक पूर्ण रात्र तर हवीच. हे चिसेलहर्ट स्टेशन आले. आता आपल्या सगळया शंका फिटतील.”

गावातील छोट्या गल्ल्यांमधून, काही मैलाचा प्रवास करून, आम्ही बागेच्या गेटपाशी आलो. जुन्या लॉजच्या मालकाने ते आमच्यासाठी उघडे ठेवले होते. चिंतेने व दमल्यामुळे होम्सचा चेहरा संकटाच्या छायेखाली असल्यासारखा दिसत होता. त्या शानदार बागेमधून, जुन्यापुराण्या वृक्षांच्या ओळींमधून, एक रस्ता जात होता. त्या रस्त्याच्या शेवटी एक बुटके पसरट घर होते. पुढील बाजूस खांब असलेले असे ते, पॅलॅडीओ वास्तुरचनाकाराच्या शैलीत बांधलेले, घर होते. घराचा मध्यभाग खूपच जुना असून सदाहरित युरेशियन झाडाच्या लाकडापासून बनवला गेलेला होता. पण मोठ्या खिडक्या मात्र आधुनिक प्रकारचे बदल केलेल्या वाटत होत्या. घराची एक बाजू

पूर्णपणे नवीन वाटत होती. उघड्या दारात आम्हाला इन्स्पेक्टर हॉपकिन्स स्टॅनलेची तरतरीत दक्ष आकृती व उत्सुक चेहरा दिसला.

“मिस्टर होम्स व डॉ वॉटसन, तुम्ही आल्याने मला आनंद झाला आहे. मला अजून थोडा वेळ मिळाला असता तर मी तुम्हाला इथे येण्याची तसदी दिली नसती. पण आत्ताच ती बाई शुद्धीवर आली व या प्रकरणात काय काय घडले, ते तिने सांगितले. त्यामुळे आता आम्हाला यात करण्यासारखे फारसे काही उरले नाही. तुम्हाला डाकूंची लेविशाम टोळी आठवत असेल.”

“काय, तीन रँडाल्स?”

“बरोबर. वडील व दोन मुलगे. हे त्यांचे काम आहे. मला याबद्दल, काहीच संशय नाही. पंधरवड्यापूर्वी ते सायडेनहॅमला चोरी करताना सापडले आणि इतक्या लगेच, इतक्या जवळ, पुन्हा चोरी करायला धजावले. पण नक्की, तेच ते आहेत. पण हे प्रकरण मात्र अजून लोंबकळते आहे.”

“सर युस्टॅस वारले तर?”

“हो. शेकोटी ढवळायच्या त्यांच्या स्वतःच्या काठीने, त्याचे डोके चेचले गेले.”

“सर युस्टॅसच्या गाडीचालकाने, मला हे सांगितले.”

“तेच -- केंटमधील सर्वात श्रीमंत माणसांपैकी एक -- लेडी ब्रॅकेनस्टॉल त्यांच्या खोलीत आहेत. बिचाऱ्या बाईसाहेबांसाठी, हा फार भयानक अनुभव होता. मी त्याना प्रथम पाहिले, तेव्हा त्या अर्धवट बेशुद्धावस्थेत होत्या. मला वाटते तुम्ही त्याना भेटून, त्यांच्याकडून वृतांत ऐकावा. मग आपण एकदम जेवणखोली तपासू.”

लेडी ब्रॅकेनस्टॉल काही सामान्य बाई नव्हती. मी क्वचितच, एवढी डौलदार व्यक्ती पाहिली असेल. बाईचा रुबाब व सुंदर चेहरा, काय वर्णावा! सोनेरी केसांची, निळया डोळयांची, नितळ तुकतुकीत कांतीची व मेकप केलेली, अशी ती नुकत्याच आलेल्या अनुभवाने हादरून जाऊन, चेहरा उतरलेली वाटली. तिचे दुखणे शारीरिक व मानसिक होते. एका डोळयावर जांभळट लालसर व कुरूप अशी सूज आली होती. त्यावर तिची उंच, कडक शिस्तीची नोकराणी, काळजी घेऊन व्हिनेगार व पाणी लावत होती. एका कोचावर बाईसाहेब, धापा टाकत पहुडल्या होत्या. सुंदर चेहऱ्यावरील त्यांची चपळ, निरीक्षण करणारी नजर, आम्ही खोलीत शिरताच दक्ष भाव दाखवत बदलली. तिला आलेल्या भयानक अनुभवाने तिचे धैर्य किंवा शूरता, मुळीच कमी झाली नव्हती.

निळसर, चंदेरी रंगाच्या सैलसर गाऊनमध्ये, तिने स्वतःला गुंडाळले होते. जेवायच्या वेळी घालायचा काळा ॲप्रन, तिच्या शेजारी कोचावर पडला होता.

ती क्षीणपणे म्हणाली, "मिस्टर हॉपकिन्स, कायकाय झाले ते सगळे, मी तुम्हाला सांगितले आहे. तुम्ही ते परत माझ्यासाठी, सांगू शकणार नाही का? ठीक आहे. तुम्हाला त्याची गरज वाटत असेल, तर या सभ्य गृहस्थाना, मी काय झाले ते सांगते. ते अजून जेवणघरात आहेत का?"

"मला वाटते, तुमची गोष्ट ते प्रथम ऐकतील."

'तुम्ही त्याची तयारी केलीत, तर बरे होईल. मला अजून तो तिथे पडलेला असल्याचे भयानक दृष्य आठवते आहे." तिने शहारून तिचा चेहरा, हातात लपवला. तिने असे करताच तिचा ढगळ गाऊन तिचा हाताच्या पुढच्या भागावरून मागे आला. होम्स एकदम काहीतरी उद्गारला.

"तुम्हाला अजून पण जखमा झाल्या आहेत, बाईसाहेब. काय हे?" गोऱ्या, गोल हातांवर दोन ठळक लाल खुणा होत्या. तिने, झटकन त्या लपवल्या.

"हे विशेष काही नाही. आजच्या कुरूप घटनेशी, त्याचे काही देणेघेणे नाही. जर तुम्ही व तुमचा मित्र खाली बसलात, तर मी घडलेले सर्व सांगते."

"मी सर युस्टॅसची पत्नी आहे. मी त्याच्याबरोबर, वर्षभरापूर्वी लग्न केले. मला वाटते मला हे लपवायचे काही कारण नाही, की आमचे दांपत्यजीवन, फारसे सुखी नव्हते. मी जरी हे नाकबूल केले, तरी आमचे शेजारी तुम्हाला हे सांगतील. कदाचित काही अंशी, माझी चूक असेल. मी दक्षिण ऑस्ट्रेलियात, मोकळ्या व कमी सनातनी वातावरणात वाढले. आणि नीतीमत्तेची पुरातन, जाचक तत्वे पाळणारे, हे इंग्लिश आयुष्य, मला काही रुचणारे नव्हते. पण मुख्य व सर्वांना माहिती असलेले कारण म्हणजे, सर युस्टॅस हे पक्के दारुडे होते. एखादा ताससुद्धा अशा माणसाबरोबर असणे, हे नकोसे होते. एखाद्या भावनाशील व उत्साही बाईचे दिवसरात्र त्याच्याबरोबर बांधून घेणे कसे असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता. हे पवित्र नात्याचे उल्लंघन आहे. गुन्हा आहे. हे विवाहबंधन क्रूर आहे. तुमचे हे राक्षसी नियम या भूमीला शाप ठरतील- देव असला दुष्टपणा नक्कीच सहन करायला लावणार नाही." ती क्षणभर उठून बसली. तिचे गाल चमकले. भुवईवरील भयानक खुणेखालून तिचे डोळे लकाकले. शिस्तशीर नोकराणीने तिच्या कणखर, शांत करणाऱ्या हातानी, तिचे डोके उशीवर ठेवले. मग रागाचा चढलेला पारा खाली येऊन, त्याचे रुपांतर भावनामय हुंदक्यात झाले. शेवटी ती पुढे बोलू लागलीः

“मी तुम्हाला काल रात्रीबद्दल सांगते. तुम्हाला कदाचित माहिती असेल, की या घरातील सर्व नोकरमंडळी, घराच्या दुसऱ्या आधुनिक बाजूला झोपतात. हा घराचा मध्यभाग, रहायच्या खोल्यांनी भरलेला आहे. इथे मागील बाजूस, स्वयंपाकघर आहे. आणि आमची झोपायची खोली वर आहे. माझी नोकराणी थेरेसा माझ्या खोलीच्या वर झोपते. बाकी दुसरे कुणी इथे नसते. पलीकडील बाजूस झोपणाऱ्या लोकाना इथून आवाज जात नाही. हे चोरांना पक्के ठाऊक असणार. नाहीतर ते असे वागले नसते.

सर युस्टॅस साडेदहाला वर जाऊन झोपले. नोकरमंडळी आधीच झोपायला गेली होती. माझ्या नोकराणीची मला गरज असेपर्यंत ती वर तिच्या खोलीत जागी होती. मी माझ्या खोलीत, पुस्तक वाचत बसले होते. अकरानंतर मग मी फेरी मारून, सर्व काही ठाकठीक असल्याची खात्री करून, वर झोपायला जात असे. हे मला स्वतःला, करायची सवय होती. कारण, मी जसे सांगितले, सर युस्टॅसवर माझा नेहमी यथातथाच, विश्वास होता. मी स्वयंपाकघरात गेले. स्वयंपाकाच्या छोट्या खोलीत, बंदुकीच्या खोलीत, बिलीयर्डच्या खोलीत, हॉलमध्ये व शेवटी जेवायच्या खोलीत गेले. मी जाड पडद्याने झाकलेल्या खिडकीजवळ गेले तर अचानक माझ्या चेहऱ्यावर वारा आला. त्यामुळे मला कळले की ती उघडी आहे. मी पडदा बाजूला केला आणि अचानक मी, एका रुंद खांद्याच्या, वयाने मोठ्या माणसासमोर, उभी होते. त्याने खोलीत पाऊल ठेवले. ती मोठी फ्रेंच खिडकी आहे. म्हणजे खरे तर, हिरवळीकडे जाणारे दार आहे. माझ्या हातात, झोपायच्या खोलीतील मेणबत्ती पेटवलेली होती. मला तिच्या प्रकाशात, त्याच्या मागे अजून दोन माणसे दिसली. ती आत शिरायच्या, पावित्र्यात होती. मी मागे झाले पण क्षणार्धात, त्याने माझ्यावर झडप घातली. त्याने प्रथम मला कंबरेला धरले, आणि मग मानेला. मी किंचाळण्यासाठी तोंड उघडले. पण त्याने रानटीपणे माझ्या डोळयावर, एक ठोसा लगावला. मला जमिनीवर पाडले. मी काही मिनिटे बेशुध्द असणार. कारण जेव्हा मी भानावर आले, तेव्हा त्यांनी घंटीचा दोर कापून मला जेवायच्या टेबलाजवळ ठेवलेल्या खुर्चीला, घट्ट बांधले होते. मला इतके आवळून बांधले होते, की मला हलता येत नव्हते. माझ्या तोंडाभोवती रुमाल बांधल्यामुळे, मी बोलू शकत नव्हते. त्या क्षणी माझा दुर्दैवी नवरा, तिथे अवतीर्ण झाला. त्याला अचानक काही संशयास्पद आवाज कानावर आल्याने, तो तशा प्रसंगासाठी तयारी करून, आला होता. त्याने रात्रीचा पोशाख केलेला होता. त्याची नेहमीची काळी काटेरी झुडूपापासून बनवलेली काठी, त्याच्या हातात होती. तो चोरांच्या अंगावर, धाऊन गेला पण -- खांदे व डोके पुढे झुकवलेल्या मोठ्या माणसाने, जाता जाता शेकोटी ढवळायच्या धातूच्या काठीच्या तुकड्याने त्याला जोरदार फटका मारला. तो दुःखाने किंकाळी मारून जो पडला, तो कधीच परत उठू शकला नाही. मला

परत काही मिनिटांकरता, चक्कर आली. तेव्हा मला काही कळत नव्हते. जेव्हा मी डोळे उघडले, तेव्हा त्यांनी काचेचे सामान ठेवायच्या कपाटातून, चांदीची भांडी काढली होती व तिथे असलेली एक वाईनची बाटली, बाहेर काढली होती. प्रत्येकाच्या हातात एक पेला होता. मी तुम्हाला आधीच सांगितले नाही का, की त्यांच्यातील एकजण थोडा वयस्क असून, त्याला दाढी होती. बाकीचे तरूण, दाढी मिशा नसलेले होते. ते बहुधा वडील व दोन मुले होती. ते कुजबुजून बोलत होते. नंतर त्यांनी येऊन, मला घट्ट बांधले असल्याची, खात्री केली. नंतर ते खिडकी लावून निघून गेले. त्यानंतर पाऊण तासाने, माझे तोंड मी मोकळे करु शकले. तेव्हा माझ्या ओरडण्याने, नोकराणी माझ्या मदतीला धावली. कसा कोणास ठाऊक, इतर नोकरांना पण आरडाओरडा ऐकू गेला. त्यांनी स्थानिक पोलिसाना बोलावून आणले. त्यांनी लगेच लंडनला कळवले. हे एवढेच, मी तुम्हाला सांगू शकते. आणि इतकी करूण गोष्ट, परत सांगायची पाळी माझ्यावर येणार नाही, अशी मी आशा करते.”

हॉपकिन्सने विचारले, “मिस्टर होम्स, काही प्रश्न आहेत का?”

होम्स म्हणाला, “लेडी ब्रॅकेनस्टॉलने जी सहनशीलता दाखवली आहे व जो वेळ दिला आहे, त्यात मी, अजून भर घालू इच्छीत नाही. तो नोकराणीला म्हणाला, ‘मी जेवणघरात जाण्यापूर्वी, तुझा अनुभव काय होता, ते ऐकेन.”

ती म्हणाली, “मी त्या चोरांना, ते घरात शिरण्यापूर्वीच पाहिले. मी माझ्या झोपायच्या खोलीच्या खिडकीजवळ बसले असताना, मी चंद्रप्रकाशात तीन माणसांना, गेटजवळ रेंगाळताना पाहिले. पण मला तेव्हा त्याचे, विशेष काही वाटले नाही. त्यानंतर सुमारे एक तासापेक्षा जास्त वेळाने, मी माझ्या मालकिणीला, किंचाळताना ऐकले. मग मी खाली धावले, तर ती म्हणाल्याप्रमाणे, ती गरीब बिचारी कोकरू झालेली व मालक, रक्ताळलेल्या डोक्याने खाली पडलेला, मी पाहिला. हे एवढे बाईसाहेबांचा शहाणपणा नष्ट करायला, पुरेसे होते. त्याना तिथे बांधलेले होते. आणि त्याच्या कपड्यांवर रक्ताचे डाग पडले होते. पण अडेलायडेची मिस मेरी फ्रॅझर आणि अॅबे शेतघरातील लेडी ब्रॅकेनस्टॉल यांनी धीर सोडला नाही. सभ्य गृहस्थहो, तुम्ही त्याना खूप प्रश्न विचारलेत, आणि आता वयस्क थेरेसाबरोबर, त्या त्यांच्या खोलीकडे चालल्या आहेत. त्याना झोपेची अगदी जरूर आहे.”

आईच्या मायेने, त्या दमलेल्या बाईने, तिच्या मालकिणीच्या कंबरेभोवती हात धरून, तिला तिच्या खोलीकडे नेले.

हॉपकिन्स म्हणाला, “सबंध आयुष्यभर, ती नोकराणी तिला साथ देते आहे. ती तिची एखाद्या बाळासारखी काळजी घेते. त्यांनी अठरा महिन्यांपूर्वी ऑस्ट्रेलिया सोडले व इंग्लंडला आल्या तेव्हापासून, ही थेरेसा राईट तिच्याबरोबर आहे. अशी नोकराणी, तुम्हाला हल्लीच्या दिवसात मिळणार नाही. मिस्टर होम्स, इकडून या.”

होम्सच्या बोलक्या चेहऱ्यावरून, त्याला या प्रकरणात निर्माण झालेली रुची निघून गेल्याचे जाणवत होते. या केसमधील गूढतेबद्दलचा गोडवा, निघून गेला असल्याचे मला कळले. अजून आता, फक्त अटक करायचे शिल्लक होते. पण सर्वसामान्य चोरांबरोबरच्या या प्रकरणात, होम्सने का म्हणून लक्ष घालावे? होम्ससारख्या मातब्बर गुप्तहेराला, अशा अगदी साध्या केससाठी बोलावल्याचे पाहून, त्याच्या डोळ्यात मला रागाची झलक दिसली. पण अॅबे शेतघराच्या जेवणघरातील परिस्थिती, होम्सचे लक्ष वेधून घ्यायला व रुची वाढवायला पुरेशी विचित्र होती. ती एक मोठी व उंच खोली होती. त्याचे छत व भिंती ओक वृक्षाच्या लाकडात कोरलेल्या होत्या. हरणाचे मुंडके व शस्त्रास्त्रे भिंतीवर कलात्मकतेने मांडली होती. दारापासून दुसऱ्या कोपऱ्याजवळ, आम्ही ज्याबद्दल ऐकले होते ती फ्रेंच खिडकी ( दारासारखी मोठी ) होती. उजवीकडे असलेल्या तीन खिडक्यातून, हिवाळयातील सूर्यप्रकाश आत येत होता. डावीकडे ओकच्या लाकडाची कलाकुसर वरील बाजूस केलेली अशी, खोल मोठी शेकोटीची जागा होती. शेकोटीशेजारी हातवाली जड ओकच्या लाकडाची खुर्ची होती. लाकूडकामातील भोकांमधून लाल जांभळट दोरी गुंतवून, बाईसाहेबाना जखडले होते. त्याना बांधलेली दोरी सोडवताना, ती तुटून खाली पडली. पण त्याला मारलेल्या गाठी तशाच राहिल्या. शेकोटीसमोरील गालीच्यावर व्याघ्राजिन पसरलेले होते. त्या भयंकर वस्तूमुळे आमचे लक्ष, इतर बारीकसारीक गोष्टींकडे, लगेच गेले नाही.

एका उंच, मजबूत, सुमारे चाळीस वर्षांच्या माणसाचे कलेवर, तिथे चेहरा वर करून, पाठीवर पडले होते. त्याच्या लहानशा काळया दाढीतून, त्याचे पांढरे शुभ्र दात चकाकत होते. त्याच्या डोक्यावरील घट्ट आवळलेल्या हातात, एक जड काटेरी काठी होती. त्याचे काळे रूप देखणे असून नाक गरुडासारखे होते. डोळे सूडाच्या भावनेने, आवळले गेल्यासारखे दिसत होते. त्याच्या मरणकळा असलेला चेहऱ्यावर, दुष्ट, राक्षसी भाव होते. जेव्हा घंटी वाजू लागली, तेव्हा तो त्याच्या अंथरुणात होता. त्याने त्याची आवड दाखवणारा, भरतकाम केलेला रात्रीचा शर्ट, घातला होता. त्याच्या पायजम्यातून, त्याचे उघडे पाय दिसत होते. त्याच्या डोक्याला खूपच मार लागला होता. त्याला ज्या रानटी पद्धतीने काठीचे दणके लगावून, खाली पाडण्यात आले होते, त्याचे पडसाद खोलीभर उमटले होते. त्याच्या शेजारी एक शेकोटीतील लाकडे खालीवर

करायची, जड काठी पडली होती. ती वाकवली गेली होती. होम्सने ती काठी व तिच्या अमानुष माराने मेलेला माणूस, दोन्हीचे निरीक्षण करून, काळजीपूर्वक तपासले.

त्याने शेरा मारला, "हा महाकाय रँडॉल, नक्की एक शक्तिशाली मनुष्य असणार."

हॉपकिन्स उत्तरला, "हो. माझ्याकडे, त्याचे काही रेकॉर्ड आहे. तो धसमुसळा आहे."

"त्याला मिळवायला, तुम्हाला त्रास पडला नसेल."

अजिबात नाही. आम्ही त्याला शोधत होतो. आणि आम्हाला असे वाटू लागले की तो अमेरिकेला निघून गेला. पण त्याची टोळी इथे असल्याचे, माहिती होते. ते कसे काय सुटून जातील, असा विचार मी करत होतो. आम्ही आधीच प्रत्येक बंदरावर, बातमी कळवून ठेवली होती आणि आता संध्याकाळपूर्वी काहीतरी चांगली बातमी आपल्याला मिळेल. माझे डोके खाणारा प्रश्न म्हणजे, बाईसाहेब त्यांचे वर्णन करतील व आम्ही वर्णनावरून त्याना शोधून काढू, हे माहिती असून, इतकी वेड्यासारखी गोष्ट, त्यांनी केलीच कशी?"

"तेच तर. एखाद्याने अशी अपेक्षा केली असती, की त्यांनी लेडी ब्रॅकेनस्टॉलला पण कायमचे शांत केले असते."

मी सुचवले, "त्यांच्या लक्षात आले नसेल, की ती बेशुद्धावस्थेतून बाहेर आली आहे."

"असे देखील झाले असेल. ती बेशुध्द असल्यामुळे, त्यांनी तिला ठार मारायचा त्रास, घेतला नसेल. हॉपकिन्स, या गरीब बिचाऱ्या, मेलेल्या माणसाचे काय? मला त्याच्याबद्दल, काही विचित्र गोष्टी कानावर आल्या."

"तो प्यायलेला नसेल तर, स्वभावाने चांगला मनुष्य होता. पण एकदा त्याला दारू चढली, किंवा अर्धवट प्यायला असेल तर, तो म्हणजे जणू एखादा राक्षसच! पण तो प्यायला नाही, असा सबंध दिवस क्वचितच जाई. जेव्हा त्याच्यात राक्षस संचारे, तेव्हा तो काहीही करे. मी ऐकल्याप्रमाणे त्याच्याकडे एवढी संपत्ती व मानमरातब असून, आमच्यावर त्याच्याशी सामना करायची वेळ एकदोनदा आली. एका कुत्र्याला पेट्रोलमध्ये पूर्ण भिजवून आग लावल्याचे प्रकरण, त्याच्या बाबतीत ऐकले होते -- बाईसाहेबांचा कुत्रा! आणि कहर म्हणजे -- ते प्रकरण कसेबसे दाबून टाकले. मग एकदा त्याने दारूचा पेला, त्या नोकराणीच्या, थेरेसाच्या, अंगावर फेकला. त्याचेही प्रकरण झाले. एकूण काय तर, म्हणजे आपल्याआपल्यात सांगतो, त्याच्याशिवाय घर जास्त चांगले झाले असते. आता तू काय बघतो आहेस?"

होम्स गुडघ्यावर वाकला होता. खुर्चीवरील बाईसाहेबाना ज्या लाल दोरीने बांधले गेले होते, त्यावरच्या गाठी तो तपासत होता. मग त्याने धसमुसळेपणाने ओढला गेलेला, दोरीचा झिजून तुटायला आलेला, शेवट पाहिला.

त्याने विधान केले, “जेव्हा ती दोरी खेचली गेली तेव्हा स्वयंपाकघरातील घंटीचा जोरात आवाज आला असणार.”

“पण तो कुणालाच ऐकू येऊ शकला नाही. स्वयंपाकघर घराच्या एकदम मागील बाजूस आहे.”

“पण आवाज कुणाला ऐकू येणार नाही, हे चोरांना कसे कळले? त्याने अशी कशी धसमुसळेपणाने, दोरी ओढली?”

“बरोबर. मिस्टर होम्स, तुम्ही तोच प्रश्न विचारलात, जो मी पुन्हापुन्हा स्वतःला विचारत होतो. नक्की या चोरांना घराचा कोपरानकोपरा माहिती असला पाहिजे. त्याना हे पक्के माहिती असणार की, यावेळी सर्व नोकरमंडळी झोपलेली असणार. आणि स्वयंपाकघरातील घंटी कुणीच ऐकणार नाही. त्यामुळे ते कुणातरी नोकराच्या, संपर्कात असले पाहिजेत, हे अगदी स्पष्टपणे कळते आहे. पण इथे आठ नोकर असून सर्व चांगल्या चारित्र्याचे आहेत.”

“बाकी सर्व गोष्टी समान असताना, मालकाने जिच्या डोक्यात दारूचा पेला मारला, तिचा मला संशय येतो. तरी यात मालकिणीवर तिच्या विश्वासू नोकराणीकडून, काहीतरी चाल खेळलेली दिसते. हो. हो. हा गौण मुद्दा आहे. आणि एकदा तुम्ही रँडाल्सना पकडले, की मग त्याचा हेतू शोधून काढण्यास, काही अडचण येणार नाही. बाईसाहेबांची गोष्ट पण, याला पाठींबा देणारीच वाटते. आपल्या समोरच आपण पुरावा बघतो आहोत.” तो फ्रेंच खिडकीकडे चालत गेला व ती उघडली.

“इथे काही खुणा नाहीत. पण घटनेची प्राथमिकता भक्कम वाटते. त्यामुळे काही खुणा कुणाला दिसण्याची, अपेक्षाही नाही. मला असे दिसते आहे की शेकोटीच्या वरच्या बाजूस असलेल्या जागेवरील मेणबत्त्या पेटवल्या गेल्या होत्या.”

“हो. त्यामुळे व बाईसाहेबांच्या झोपायच्या खोलीतील मेणबत्त्यांमुळे, चोरांना त्यांचा मार्ग दिसला असावा.”

“आणि त्यांनी काय चोरले?”

“खरे तर, त्यांनी फार काही चोरले नाही -- काचेचा सामानाच्या कपाटातील काही सामान.”

लेडी ब्रॅकेनस्टॉलच्या मते, सर युस्टॅस मेल्यामुळे, ते स्वतःच गांगरून गेले होते. काही नुकसान करून घर धुंडाळून काही चोरावे, असे त्यांनी केले असते. पण ते राहून गेले.”

“ते खरे आहे, पण मी ऐकले, की त्यांनी दारू प्यायली.”

“त्याचे अवसान, गोळा करण्यासाठी.”

“बरोबर. पण टेबलावरचे ते तीन पेले, हात लावलेले वाटत नव्हते.”

“आणि बाटली पण त्यांनी, जशी ठेवली, तशीच होती.”

“आपण त्यावर, एक नजर टाकू. अरे बापरे! ओहो, हे काय आहे?”

तीन पेले एकत्र होते. त्यापैकी दोनमध्ये, थोडीशी दारू होती व तिसऱ्यात तळाशी बहुतेक ज्यापासून मेणबत्त्या तयार करतात व लाकडाला पॉलिश केले जाते तो, मधमाशीने पोळे बांधण्याकरता वापरलेला चिकट द्राव होता,. तिथे दोन त्रितियांश भरलेली बाटली, पडली आहे. बाजूला एक मोठे डागाळलेले बूच पडले आहे. ते एकंदर दृष्य व बाटलीवरील धूळ, असे सुचवत होते की ही काही खुन्यांनी मौजमजा करायला वापरलेली, दारू प्यायची सर्वसाधारण केस नव्हती.

होम्सचा चेहरामोहरा बदलला. तो त्याचे उत्साही हावभाव हरवून बसला. आणि परत मला त्याच्या डोळयात, रुचीपूर्णतेचे व दक्षतेचे भाव दिसले. त्याने बूच उचलून त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले.

त्याने विचारले, “त्यांनी ते बूच कसे काय काढले?”

हॉपकिन्सने एका अर्धवट उघडलेल्या खणाकडे निर्देश केला. त्यात टेबलाचे आच्छादन व बूच उघडायचे मोठे अवजार पडले होते.

“ते वापरले गेल्याचा काही उल्लेख, लेडी ब्रॅकेनस्टॉलने केला होता का?’

‘नाही. बाटली उघडली गेली, तेव्हा ती बेशुध्द होती.”

“तसेच असेल. खरे तर, ते अवजार वापरले गेले नव्हते. दीड इंचापेक्षा जास्त लांब नसलेल्या, चाकू व बूच उघडायचा स्क्रू, असे एकत्रित असलेल्या खिशातील साधनाने, बहुधा

बाटली उघडली गेली असावी. जर तुम्ही बूचाच्या वरच्या बाजूचे निरीक्षण केलेत तर, बूच निघण्यापूर्वी तीन वेळा ते साधन फिरवले गेले. ते परत बसवले गेले नाही. मोठे साधन असते तर एका फटक्यात काम झाले असते. जेव्हा तुम्ही या चोराला पकडाल, तेव्हा तुम्हाला असे दिसेल की ते दीड इंची साधन त्याच्या खिशात आहे.

हॉपकिन्स ओरडला, “उत्तम!”

पण हे तीन पेले मला गोंधळवत आहेत, हे मी कबूल करतो. लेडी ब्रॅकेनस्टॉल म्हणाली की तिने तिघाना, पिताना पाहिले. नाही का?”

“हो. ती स्पष्टपणे तसे म्हणाली.”

“मग विषय संपला. अजून काय बोलण्यासारखे उरले? आणि तरीही तुम्ही कबूल केले पाहिजे, की तिन्ही पेले अगदी वैशिष्ट्यपूर्ण होते. काय, हॉपकिन्स? तुला काही उल्लेखनीय दिसले नाही? बर. बर. ते जाउदे. कदाचित जेव्हा मनुष्याला, माझ्यासारखे विशेष ज्ञान व विशेष शक्ती असते, तेव्हा तो साधे स्पष्टीकरण हाताशी असताना, जरा गुंतागुंतीचे स्पष्टीकरण शोधत बसतो. अर्थात पेल्यांच्या बाबतीत, तशी एक शक्यता असू शकते. ठीक आहे हॉपकिन्स, शुभ सकाळ. मला वाटत नाही, की माझा तुला काही उपयोग होईल आणि तुझ्या मते, ही केस अगदी स्पष्ट आहे. रँडाल्सना अटक झाल्यावर किंवा अजून काही गोष्टी उजेडात आल्यास, तू मला कळवशीलच. मला विश्वास वाटतो की मला तू यशस्वीपणे योग्य निदान केल्याबद्दल, लवकरच तुझे अभिनंदन करायची संधी देशील. चल वॉटसन, मला वाटते की आपण घरी गेलेले बरे.”

आम्ही परतत असताना, मला होम्सच्या चेहऱ्यावरून दिसत होते की त्याने केलेल्या काही निरीक्षणामुळे तो गोंधळात पडलेला आहे. तो प्रयत्नपूर्वक सारखे, तसे काही नसल्याचे व सर्व काही सुरळीत असल्याचे भासवत होता. त्याच्या आक्रसलेल्या भुवया व नजर हरवलेले डोळे, त्याला कसला तरी संशय आलेला असल्याचे, सांगत होते. जिथे हा दुर्दैवी प्रकार झाला त्या ॲबे शेतघराच्या जेवणघरात, त्याचे विचार परत जाऊन पोचले असावेत. शेवटी आमची गाडी, एका उपनगरीय स्टेशनमधून बाहेर पडतापडता, झटका मिळाल्यासारखा तो उडी मारून फलाटावर उतरला व त्याच्याबरोबर मलाही खेचले.

आमच्या गाडीचे शेवटचे डबे, दूर जाताना तो बोलला, “मला माफ कर मित्रा. माझ्या बदललेल्या मनाच्या अवस्थेत तुझा बळी घेतल्याबद्दल, वॉटसन, मी दिलगीर आहे. पण माझ्या आयुष्यात, मी ही केस, अशा स्थितीत सोडू शकत नाही. माझ्यातील प्रत्येक कण, या निघून

जाण्याविरुद्ध ओरडतो आहे. हे चुकीचे आहे -- पूर्णपणे चुकीचे आहे -- मी शपथ घेउन सांगतो, की हे चुकीचे आहे. आणि तरीही बाईसाहेबांची गोष्ट पूर्ण झाली आहे. नोकराणीचे म्हणणे त्याला दुजोरा देत आहे. सर्व बारीकसारीक गोष्टी बऱ्यापैकी जमत आहेत. मला त्याविरुध्द काय म्हणता आले असते? तीन दारूचे पेले. एवढेच. मी जर गोष्टी गृहीत धरल्या नसत्या व प्रत्येक गोष्टीची काळजीपूर्वक शहानिशा केली असती तर! आपण या केसचा अगदी सुरवातीपासून, विचार करू. त्याच त्याच अर्धवट गोष्टीने, माझे मन झाकोळायला नको. असे केल्यावर मला नक्की काहीतरी ठोस सापडेल. त्यामुळे मला हे केलेच पाहीजे. वॉटसन, चिसेलहर्टची गाडी येईपर्यंत, या बाकावर बस. आणि मला तुझ्यासमोर, पुरावा मांडू दे. पहिल्या प्रथम, तू मनातून हे काढून टाक की त्या नोकराणीने किंवा मालकिणीने सांगितलेले खरे असेल. आपल्या तर्कसंगतीवर, त्या बाईच्या मोहक व्यक्तीमत्वाचा परिणाम होता कामा नये.

तिच्या सांगण्यातील बाबींचा, आपण थंड डोक्याने विचार केला तर, आपला संशय जागा होईल. पंधरा दिवसांपूर्वी या चोरांनी, सिडेनहॅम येथे मोठा छापा टाकला होता. त्यांच्याबद्दल वर्तमानपत्रात, माहिती छापून आली होती. ते कसे दिसतात व त्यांनी काय केले इत्यादि. काल्पनिक चोर कशी चोरी करतील, अशी गोष्ट कुणी त्यावरून शोधून काढू शकले असते. खरे तर चोरांनी, चांगले घसघशीत पैसे मिळवले असतील, तर धोका पत्करून दुसरी चोरी करण्यापेक्षा, आनंदाने व शांततेने मजेत वेळ घालवावा. लगेच पुन्हा दुसरी चोरी करणे, हे चोरांसाठी वेगळेच वाटते. एखाद्या बाईला ती ओरडू नये म्हणून, मुद्दाम ठोसे मारून पाडणे, बांधून ठेवणे, एक खून करणे, हे त्यांच्यासाठी नेहमीपेक्षा वेगळेच, काहीतरी झाले. ते एकाहून जास्त लोक असल्यामुळे, त्याना मालकाला न मारता, सहज त्यांच्या वाटेतून बाजूला करता आले असते. त्यांच्या आवाक्यात असताना, फक्त थोडासा माल चोरणे, दारूची बाटली अर्धी भरलेली टाकून देणे हे देखील काही वेगळेच सुचवते. वॉटसन, तुला या नेहमीपेक्षा वेगळया गोष्टी, काही सुचवतात का?”

“त्यांचा एकत्र परिणाम, नक्कीच विचार करण्यासारखा आहे. तरी प्रत्येकाचा वेगवेगळा विचार करणेही शक्य आहे. बाईला खुर्चीला बांधणे, हे मला सर्वात धक्कादायक वाटते.”

“वॉटसन, खरे तर त्याबाबत, देखील माझ्याकडे समाधानकारक उत्तर नाही. हे सरळ आहे, की त्यांनी तिचा खून तरी करायला हवा नाहीतर, तिला असे काहीतरी करायला हवे की ती, ते निसटल्याचे लगेच कुणाला सांगू शकणार नाही. त्यामुळे काही झाले तरी त्या बाईच्या सांगण्यात, ज्याची शक्यता नाही, असे काही तिने घुसडल्यासारखे, वाटते आहे. आणि असे मला वाटत असल्याचे, मी तुला बोललो होतो, नाही का? आणि सर्वात कहर म्हणजे, दारुच्या पेल्यांचा प्रसंग.”

"दारुच्या पेल्यांचे काय?"

ते तुला तुझ्या मनात, दिसतात का?"

"अगदी स्पष्टपणे दिसतात."

"आपल्याला असे सांगितले गेले की, तीन माणसांनी दारू प्यायली. असे झाले असेल असे तुला वाटते का?"

"का नाही? प्रत्येक पेल्यात, दारू होती.'

"तेच तर. पण चिकट द्राव फक्त एका पेल्यात होता. हे तुझ्या लक्षात आले असेल. त्यामुळे तुझ्या मनात काय विचार येतो?"

"शेवटी भरलेला पेल्यात बहुधा, चिकट द्राव असावा."

"मुळीच नाही. बाटली पूर्ण भरलेली होती. आपण अशी कल्पना करू शकणार नाही की, पहिले दोन पेले रिकामे होते व तिसरा त्याने पूर्ण भरलेला होता. याची दोन आणि दोनच स्पष्टीकरणे असू शकतात. पहिले असे की दुसरा पेला भरला गेल्यावर बाटली त्यातील द्रावण ओतायला त्रास देऊ लागली. म्हणून मग तिसरा पेला चिकट द्रावणाने भरला गेला. पण हे घडले असण्याची शक्यता वाटत नाही. नाही. नाही. मी खात्रीने सांगतो, माझे बरोबर आहे."

"मग, तू काय कल्पना करतोस?"

"की फक्त दोन पेलेच वापरले गेले. आणि दोन्हीमधले उरलेले तिसऱ्यात घातले गेले. हे असे भासवण्यासाठी केले गेले की तिथे तीन माणसे आहेत असे वाटावे म्हणून. अशा तऱ्हेने सगळे चिकट द्रावण त्या तिसऱ्या पेल्यात असणार, नाही का? मला खात्रीपूर्वक वाटते की असेच असावे. पण या एका लहानशा घटनेवर, मी खरे स्पष्टीकरण द्यायचे म्हटले तर, ही केस सर्वसाधारणपणापासून एकदम वेगळी उठून दिसते. याचा अर्थ एवढाच होतो की नोकराणी व मालकीण दोघीही मुद्दाम होऊन, आपल्याशी खोटे बोलत आहेत. त्यांच्या एकाही शब्दावर विश्वास ठेवता कामा नये. खऱ्या गुन्हेगारांना, त्या कुठल्यातरी कारणाने, पाठीशी घालत आहेत. त्यांच्याकडून काही मदत न घेता, आपण आपली केस तयार केली पाहीजे. आता आपल्यासमोर, हे आव्हान आहे. वॉटसन, सिडेनहॅमची गाडी आली."

अॅबे शेतघरातील मंडळी, आम्ही परत आलेले बघून, आश्चर्यचकित झाली. पण हॉपकिन्स पोलिसांच्या मुख्य ठाण्यात, अहवाल देण्यासाठी गेला होता, असे होम्सला आढळले. मग त्याने

जेवणघराचा ताबा घेतला. आतून दार लाऊन घेतले. दोन तास कष्टप्रद तपास करून, त्याच्या तर्कबुद्धीला आवाहन करत राहिला. प्रोफेसर करत असलेल्या प्रयोगाच्या अभ्यासात रुची घेणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे, मी त्या उल्लेखनीय संशोधनातील, प्रत्येक पायरी बघत गेलो. खिडकी, गालीचा, पडदे, खुर्ची व दोरी हे सगळे, सूक्ष्मपणे तपासले गेले. नीट विचार केला गेला. दुर्दैवी सर युस्टॅसचे प्रेत हलवले गेले. बाकी सर्व, आम्ही सकाळी पाहिले, तसेच होते. शेवटी मला आश्चर्यचकित करून, होम्स शेकोटीच्या वर चढला. त्याच्या डोक्याच्या बरेच वर, काही इंचांची वायरला बांधलेली लाल दोरी तरंगत होती. बराच वेळ तो मान वर करून त्याकडे बघत राहिला. आणि मग त्याच्या जवळ जायच्या प्रयत्नात, त्याने त्याचा गुडघा भिंतीवरील एका लाकडी खुंटीवर ठेवला. त्यामुळे त्याचा हात, तुटलेल्या दोरीच्या टोकापासून काही इंचांवर जाऊन पोचला. पण त्याचे लक्ष खुंटीवर होते. शेवटी तो समाधान दाखवत खाली उतरला.

तो म्हणाला, “वॉटसन, ठीक आहे. या केसचा छडा लागला, आपल्या संग्रहातील उल्लेखनीय केसपैकी एक! पण प्रिय मित्रा, मी किती संथपणे काम केले! मी काळजी न घेतल्यामुळे, माझ्या आयुष्यातील मूर्खपणाची चूक करत होतो. आता मला वाटते, काही कच्चे दुवे सोडले, तर ही तर्कशास्त्रीय साखळी पुरी होत आली आहे.”

“तुला ती माणसे मिळाली का?”

“एक माणूस. वॉटसन, एकच माणूस. एकच, पण पूर्ण क्षमता असलेला दमदार माणूस. सिंहासारखा शूर -- त्याची ती वाकलेली काठी आठव. या नावीन्यपूर्ण गोष्टीसाठी, सहा फूट उंचीचा, खारीसारखा चपळ, हाताच्या बोटांमध्ये जादू असलेला, तल्लख बुद्धीचा, असा तो होता. हो वॉटसन, या हुशार माणसाने हे सगळे केले आहे. आणि तरीही त्या दोरीच्या घंटी प्रकरणात त्याने आपल्याला, काय झाले असावे याबद्दल काही संशय उरणार नाही, असा एक पुरावा सोडून दिलेला आहे.”

“कुठला पुरावा?”

“असे बघ. तू जर घंटीची दोरी ओढली असतीस, तर ती कुठे तुटणे तुला अपेक्षित होते? नक्कीच अशा ठिकाणी, जिथे ती वायरला जोडली गेली होती. ती या प्रकरणात, सिलींगपासून तीन इंचांवर का तुटली?”

“कारण ती तिथे कमकुवत बनली होती म्हणून?”

"बरोबर. आपण जे टोक तपासू ते कमकुवत बनवले गेले. तो लबाड असल्याने त्याने ते त्याच्याकडील चाकूने केले. पण दुसरे टोक तसे केलेले नाही. कारण ते इथून दिसत नाही. शेकोटीवर चढलात, तर तुम्हाला दिसेल की ते कमकुवत न करता, जवळजवळ कापलेच गेले आहे. पण काय झाले असेल, त्याची तुम्ही सहज कल्पना करू शकता. त्या माणसाला दोरीची गरज होती. पण तो इथून ती कापू शकत नव्हता, कारण मग घंटी वाजली असती. मग त्याने काय केले? तो शेकोटीवर चढला. त्याचा गुडघा खुंटीवर ठेवला -- तुम्हाला धुळीत त्याच्या खुणा दिसतील -- दोरी कापण्यासाठी म्हणून, त्याने चाकू काढला. मला त्या जागी पोचायला तीन इंच कमी पडत होते -- त्यावरून मी निष्कर्ष काढला की तो माझ्यापेक्षा निदान तीन इंच तरी उंच असणार. त्या ओकच्या खुर्चीवरील खूण बघ. ती काय आहे?"

"रक्त."

"संशयातीतपणे रक्त आहे. हा एकच पुरावा, बाईसाहेबाना त्यांची गोष्ट खोटी ठरवायला, पुरेसा आहे. जर ती खुर्चीत बसलेली असती, तर गुन्ह्याच्या वेळी ती खूण कशी उमटली असती? नाही. नाही. तिचा नवरा मेल्यावर, मग ती खुर्चीवर बसली. मी पैजेवर सांगतो की काळा ड्रेस या खुणेसारखीच एक खूण दाखवतो. वॉटसन, आपण अजूनही हरलेलो नाही. आपण पराभवापासून सुरवात केली व शेवटी विजय प्राप्त केला. आता मला नर्स थेरेसाशी, काही बोलायचे आहे. काही धोके टाळण्यासाठी व आपल्याला हवी असलेली माहिती मिळवण्यासाठी, आता आपण थोडी काळजी घेतली पाहिजे.

ती कडक ऑस्ट्रेलीयन नर्स, रुचीपूर्ण व्यक्ती होती -- अबोल, संशय येईल अशी आणि उद्धट होती. होम्सच्या प्रसन्न पद्धतीने व मोकळेपणे ती म्हणेल ते मान्य केल्याने, ती विरघळून मित्रत्वाने बोलू लागली. तिच्या मृत मालकाविषयीचा, पराकोटीचा द्वेषभाव व्यक्त करायला, ती अजिबात कचरली नाही.

"हो सर, हे खरे आहे, की त्याने दारूचा पेला, माझ्याकडे फेकला. त्याने माझ्या मालकिणीला नावाने हाक मारलेली मी ऐकली. आणि मी त्याला खडसावले, की तिचा भाऊ इथे असता तर, तो असे बोलू शकला नसता. मग त्याने काय केले, तर माझ्या अंगावर पेला फेकला. जर त्याच्याकडे डझनभर असते, तर त्याने ते सर्व फेकले असते. पण माझ्या सुंदर पक्ष्याला, त्याने सोडले. तो नेहमीच तिच्याशी वाईट वागत होता. आणि तक्रार करायला ती फार अहंकारी होती. त्याने तिला कायकाय केले ते, ती मलादेखील सांगत नसे. तुम्ही आज सकाळी पाहिलेल्या, तिच्या हातावरचा वळांबद्दल, तिने मला कधीच काही सांगितले नाही. पण मला नक्की माहिती होते, की

तिच्या टोपीच्या पिनेने, त्याने तिला भोसकले होते. लबाड राक्षस -- मी त्याच्याबद्दल असे बोलते आहे. पण आता तो मेल्यामुळे, देव मला क्षमा करेल. पण खरेच, तो पृथ्वीवरील राक्षसच होता. फक्त आठ महिन्यांपूर्वी, आम्ही त्याला पहिल्यांदा भेटलो, तेव्हा तो अगदी गोडगोड बोलला. आणि आम्हाला, ती जणू अठरा वर्षे वाटली. ती नुकतीच लंडनमध्ये आली होती. हो. तिचा तो पहिला प्रवास होता -- तिने यापूर्वी, कधीच प्रवास केला नव्हता. त्याने त्याच्या पैशाने, मानमरातबाने व लंडनच्या खोट्या युक्त्यांनी, तिला जिंकले. तिने चूक केली असेल, तर त्यासाठी तिने किंमत मोजली आहे. आम्ही त्याला, कोणत्या महिन्यात बरं भेटलो? बरोबर, मी तुम्हाला सांगते. मागील वर्षी जानेवारीत त्यांनी लग्न केले. हो. ती परत खाली हॉलमध्ये आली आहे. आणि मी नक्की सांगते की ती तुम्हाला भेटेल. पण तुम्ही तिला जास्त प्रश्न विचारू नका. कारण मग तिला, त्या दुर्दैवी आठवणी परत छळतील."

लेडी ब्रॅकेनस्टॉल त्याच खुर्चीवर रेलून बसली होती. पण पूर्वीपेक्षा टवटवीत दिसत होती. आमच्याबरोबर नोकराणीने प्रवेश केला. ती परत मालकिणीच्या भुवईवरील जखमेवर, मायेने हात फिरवू कागली.

बाईसाहेब म्हणाल्या, "मला अशी आशा आहे, की तुम्ही पुन्हा मला उलटसुलट प्रश्न विचारायला, आलेले नसाल."

होम्स त्याच्या अदबशीर आवाजात उत्तरला, "नाही. बाईसाहेब, मी तुम्हाला निष्कारण, त्रास देणार नाही. आणि माझी इच्छा आहे, की तुमच्यासाठी सर्व गोष्टी, सोप्या कराव्यात. कारण माझी खात्री झाली आहे, की तुम्ही आधीच खूप त्रासलेल्या आहात. जर तुम्ही माझ्यावर विश्वास टाकून, मला मित्र समजलात, तर तुमच्या लक्षात येईल, की मी त्याला पुरेपूर न्याय देईन."

"तुम्हाला, मी काय करायला हवे आहे?"

"तुम्ही मला, खरे बोलायला हवे आहे."

"मिस्टर होम्स!"

"नाही. नाही. लेडी ब्रॅकेनस्टॉल, त्याचा काही उपयोग नाही. तुम्ही माझी थोडीफार तरी किर्ती ऐकली असेल. जर तुमची गोष्ट, नव्याने काही शोधून काढणारी असेल, तर मी त्याला पूर्णपणे पाठींबा देईन."

मालकीण व नोकराणी दोघीही उतरलेल्या चेहऱ्याने, घाबरलेले डोळे विस्फारून, होम्सकडे बघत होत्या.

थेरेसा ओरडली, “तुमचे हे वर्तन अपमानकारक आहे. तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की माझ्या मालकीणबाई खोटे बोलल्या आहेत.”

होम्स त्याच्या खुर्चीवरून उठला.

“तुम्हाला मला, काहीच सांगायचे नाही आहे का?”

“मी तुम्हाला, सर्व काही सांगितले आहे.”

“लेडी ब्रॅकेनस्टॉल, परत एकदा विचार करा. तुम्ही मोकळेपणे बोललात, तर बरे होईल, नाही का?”

तिच्या सुंदर चेहऱ्यावर क्षणभर, हो नाहीचे भाव रेंगाळले. नंतर एखाद्या नवीन बळकट विचाराने, जणू तिच्या चेहऱ्यावर एक मुखवटा चढवला.

“मला जेवढे माहिती आहे तेवढे सगळे, मी सांगितले.”

होम्सने त्याची टोपी काढून खांदे उडवले. तो म्हणाला, “मी दिलगीर आहे.” आणि अजून एकही शब्द न बोलता, आम्ही खोलीबाहेर व घराबाहेर पडलो. बाहेरील आवारात एक तळे होते. त्याकडे माझा मित्र चालू लागला. ते थिजले होते. पण एका हंसाकरता, एक पाण्याचे भोक शिल्लक राहिले होते. होम्स त्याकडे टक लाऊन पहात राहिला. आणि मग गेटच्या दिशेने जाऊ लागला. तिथे त्याने तेथील दरवानाकडे हॉपकिन्ससाठी एक चिठ्ठी, देऊन ठेवली.

आमच्या येथील दुसऱ्या भेटीला न्याय देण्यासाठी तो म्हणाला, “आपला टोला लागेल किंवा नाही लागणार, पण आपल्याला आपला मित्र हॉपकिन्ससाठी, काहीतरी करायलाच हवे. मी त्याला एवढ्यात काही विश्वासात घेणार नाही. मला वाटते आपली पुढची चाल अडेलाइड सदनम्टन शिपिंग कार्यालय असेल. जर मी चुकत नसेन, तर ते पॉल मॉलच्या टोकाला आहे. तिथे दक्षिण ऑस्ट्रेलिया व इंग्लंड याना जोडणाऱ्या बोटी, उभ्या असतात. पण पहिल्यांदा आपण त्या दोघी ऑस्ट्रेलियाहून नक्की आल्या का, हे तपासून बघू.

होम्सने स्वतःचे कार्ड व्यवस्थापकाकडे पाठवले. त्याची लगेच दखल घेतली जाईल, अशी आशा तो करत होता. त्याला हवी असलेली माहिती लवकरच मिळाली. १८९५ च्या जूनमध्ये, त्यांची एकच लाईन इंग्लंडच्या बंदराला पोचली होती. त्यातील उतारूंची यादी बघता, अडेलाइडची मिस फ्रेझर व तिची नोकराणी, यांनी त्यातून प्रवास केला होता. ती बोट आता सुवेझ कॅनॉलच्या दक्षिणेला होती व ऑस्ट्रेलियाला चालली होती. एक सोडून, त्यातील ऑफिसर्स तेच

होते. मिस्टर जॅक क्रॉकर याला कॅप्टन करण्यात आले होते. आणि त्याला बास रॉक या नव्या जहाजाचा, ताबा घ्यायचा होता. दोन दिवसात ते सदनम्टनहून सुटणार होते. तो सिडनेहॅमला रहात होता. त्या सकाळी त्याला काही सूचना मिळवण्यासाठी, हजर रहायचे होते. आम्ही त्याची वाट बघत थांबलो होतो. खरे तर, मिस्टर होम्सला, त्याला भेटायची इच्छा नव्हती. पण त्याचे आतापर्यंतचे काम व चारित्र्य जाणून घेण्यात, त्याला रस होता. त्याने केलेल्या कामांची यादी, भली मोठी होती. त्याची बरोबरी करू शकेल असे कोणीच नव्हते. तो कामावर एकदम विश्वासू म्हणून, प्रसिध्द होता. पण रागीट, निष्कारण घाई करणारा, भडक डोक्याचा, जास्त उद्दीपित होणारा, नेक, प्रामाणिक व दयाळू होता. एवढी माहिती मिळाली. मग होम्सने ते अडेलाइड सदनम्टनचे कार्यालय सोडले. मग तो स्कॉटलंड यार्ड कार्यालयात गेला. पण आत जाण्याऐवजी, तो त्याच्या गाडीत भुवया ताणून, विचारात बुडून जाऊन, बसून राहिला. मग त्याने चेरिंग क्रॉस तार कार्यालयात चक्कर मारली. एक निरोप पाठवला आणि शेवटी आम्ही बेकर रस्त्याला जाण्यासाठी निघालो.

आम्ही आमच्या खोलीत शिरताना तो बोलला, “वॉटसन, नाही. मी हे करू शकत नाही. एकदा ते वॉरंट निघाले, की मग कुणीच त्याला वाचवू शकत नाही. माझ्या करियरमध्ये मला वाटते, फक्त एकदोन वेळाच गुन्हेगाराला ओळखून, खरा त्रास दिला होता. तेवढा त्याने गुन्हा करूनही, त्याला मिळाला नसेल. मी आता काळजी घ्यायला शिकलो आहे. मी इंग्लंडच्या कायद्याशी, खेळ करतो आहे. पण त्यापेक्षा जास्त, मी माझ्या सद्सद्विवेकबुद्धीशी मी खेळ करतो आहे. आपण काही कारवाई करण्यापूर्वी, थोडे जास्त जाणून घेऊया.”

संध्याकाळपूर्वी, इन्स्पेक्टर हॉपकिन्स आम्हाला भेटायला आला. त्याचे काहीतरी बिनसले होते.

“मला वाटते, मिस्टर होम्स, तुम्ही जादुगार आहात. मला कधीकधी असे वाटते, की तुमच्यात काही माणसांपेक्षा जास्त, अनैसर्गिक अशा शक्ती आहेत. तुम्हाला हे कसे कळले की चोरलेली चांदी त्या तळयाच्या तळाशी आहे?”

“मला ते माहिती नाही.”

पण तुम्ही मला त्याची, तपासणी करायला सांगितलीत.”

“तुम्हाला तिथे ती सापडली का?”

“हो. मला ती सापडली.”

“मी तुम्हाला मदत केली असेल, तर मला त्याचा आनंद आहे.”

“तुम्ही मला मदत केली नाही. तुम्ही ती बाब अजून अवघड करून ठेवलीत. चांदी चोरुन ती जवळच्या तळयात बुडवणारे, ते कुठल्या प्रकारचे चोर होते?”

“हे जरा मूर्खपणाचे वर्तन होते. मला असे वाटतच होते, की त्याना नको असताना, त्यांनी चांदी चोरली -- केवळ आंधळेपणे चोरली. असे असताना ते नक्कीच त्यापासून मुक्ती मिळवायचा प्रयत्न करणार.”

“पण अशी कल्पना तुमच्या डोक्यात, आली तरी कशी?”

“हो. मला असे वाटले. जेव्हा ते फ्रेंच खिडकीतून बाहेर आले, तिथे एक तळे होते. त्यात बाकी सगळा बर्फ असला, तरी एक पाण्याचे मोहक भोक होते. अगदी त्यांच्या नाकासमोरच होते. याहून दुसरी कुठली चांगली जागा ती चांदी लपवण्यासाठी सापडणार होती?”

हॉपकिन्स ओरडला, “ओहो, लपायची जागा -- हे चांगले आहे! हो. हो, आता मला सर्व कळले. ती लवकरची वेळ होती. रस्त्यावर लोक होते. आपल्याला कोणी चांदी घेऊन जाताना पाहिले तर, अशी त्याना भीती वाटत होती. म्हणून त्यांनी ती तळयात फेकून दिली. आणि नंतर जेव्हा तिथे कोणी नसेल, तेव्हा ती काढून घ्यायची असा त्यांचा बेत असणार. वा वा मिस्टर होम्स, ही तुमची  कल्पना पडद्याच्या कल्पनेपेक्षा चांगली आहे.”

“असेलही. तुमची ही विचारसरणी कौतुक करण्याजोगी आहे. मला वाटते, माझ्या कल्पना, जरा रानटीच होत्या. पण तुम्हाला हे कबूल केले पाहिजे, की त्याचा शेवट चांदी सापडण्यात झाला.”

“हो सर – हो. हे सर्व तुम्ही केले. पण माझी, थोडी अधोगती झाली आहे.”

“अधोगती?”

“हो मिस्टर होम्स. आज सकाळी रँडाल्स टोळीला, न्यूयॉर्कमध्ये अटक झाली.”

“ओहो! प्रिय हॉपकिन्स, पण हे तर तुमच्या अंदाजाच्या विरुद्ध आहे, की त्यांनी काल रात्री केंटमध्ये खून केला.”

“पण हे होणारच होते, मिस्टर होम्स, हे अटळ होते. तरीही रँडाल्सशिवाय अजून काही, पोलिसांनी न ऐकलेल्या, नवीन टोळया आहेत.”

“असेल. हे अगदी शक्य आहे. तुम्ही निघालात का?”

“हो, मिस्टर होम्स, मी या प्रकरणाच्या तळाशी पोचल्याशिवाय, मला विश्रांती नाही. मला वाटते तुम्हाला, मला काही सुचवायचे तर नाही ना?”

“मी तुम्हाला काही सुचवले आहे.”

“काय?”

“ओहो, मी पडद्यासंबंधी सुचवले आहे.’

“पण का, मिस्टर होम्स, का?”

“अर्थात, तो प्रश्न आहेच. पण मी तुम्हाला अशी कल्पना सुचवली आहे. तुम्हाला कदाचित त्यात काही तथ्य सापडेल. तुम्ही जेवायला थांबणार नाही का?” ठीक आहे. अच्छा. आणि काय प्रगती होते आहे, ते कळवा.”

जेवण झाले व होम्स पुन्हा कामाला लागण्यापूर्वी, टेबल स्वच्छ करूनही झाले. त्याने पाईप पेटवला. आणि त्याचे स्लीपर घातलेले पाय, शेकोटीची धग लागेल असे ठेवले. अचानक त्याने त्याच्या घड्याळात पाहिले.

“वॉटसन, मी काही प्रगती झाली असेल, अशी अपेक्षा करतो.”

“कधी?”

‘आत्ता -- काही मिनिटात. तुला बहुतेक असे वाटते आहे, की मी हॉपकिन्सबरोबर थोडे वाईट वागलो?

“मी तुझ्या अंदाजावर, विश्वास ठेवतो.”

“वॉटसन, खूप चांगले उत्तर! तू याकडे अशा दृष्टीने पाहिले पाहिजेस. मला हे पक्के ठाऊक नाही. त्याला जे माहिती आहे, ते पक्के आहे. मला खासगीपणे अंदाज करायचा हक्क आहे, पण त्याला नाही. त्याला, सर्व शोधून काढायला हवे. नाहीतर तो देशाला, मित्राला व स्वतःच्या कर्तव्याला फसवणारा, ठरेल. अशा संशय असलेल्या केसमध्ये, मी त्याला त्रासदायक अवस्थेत ठेवणार नाही. त्यामुळे माझ्या मनाशी माझी खात्री झाल्याशिवाय, मी मला काय माहिती आहे, ते सांगणार नाही.”

“पण ती कधी होईल?”

ती वेळ आलेली आहे. आता उल्लेखनीय अशा लहानशा नाटकातील, शेवटचे दृष्य तू बघशील.”

जिन्यातून पदरव आला. आणि दार उघडून माणसाचा एक सुंदर नमुना, आत आला. तो एक उंच तरुण मनुष्य होता. सोनेरी मिशा, निळे डोळे, विषुववृत्तीय उन्हाच्या कातडी भाजल्याच्या खुणा, चपळपणा व मजबुती दाखवणारे उड्या मारत चालणे, असी त्याची वैशिष्ट्ये होती. त्याने त्याच्यामागे दार लाऊन घेतले. तो हाताच्या मुठी वळून, छाती फुगवून, जादा अधिकारभावना दाबत, उभा राहिला.

“कॅप्टन क्रॉकर, बसा. तुम्हाला माझी तार मिळाली का?”

आमचा पाहुणा आरामखुर्चीत रेलून बसला व आम्हा दोघांकडे आळीपाळीने बघू लागला.

“मला तार मिळाली आणि मी तुम्ही सांगितलेल्या वेळेला आलो आहे. मी असे ऐकले, की तुम्ही माझ्या कार्यालयात थांबला आहात. तुमच्यापासून, काही सुटका नव्हती. काय सर्वात वाईट आहे, ते मला ऐकू दे.”

"तुम्ही माझे काय करणार आहात? मला अटक करणार? बोला. अरे तुम्ही बोला. तुम्ही तिथे नुसते बसून माझ्याशी, मांजर उंदराशी खेळते, तसे खेळू शकत नाही”

होम्स म्हणाला, “त्याला एक सिगार दे. कॅप्टन क्रॉकर, ती ओढा. आणि तुमचा रागाचा पारा चढू देऊ नका. तुम्ही जर मला सामान्य गुन्हेगार वाटला असतात तर, तुमच्याबरोबर मी सिगरेट ओढत बसलो नसतो, याची खात्री बाळगा. माझ्याशी मोकळेपणे बोला. आणि आपण, काही चांगले करू शकू. माझ्याशी काही चलाखी केलीत, तर मी तुम्हाला चिरडून टाकीन.”

“तुम्हाला, मी काय करायला हवे आहे?”

“ॲबे शेतघरात काल रात्री, काय झाले त्याचा खराखरा वृत्तांत, मला हवा आहे. याद राखा, काहीही पदरचे घालायचे नाही व काहीही वगळायचे नाही. मला आधीच इतके माहिती आहे की, तुम्ही खऱ्यापासून इंचभर जरी ढळलात, तरी मी पोलिसांसाठी, शिट्टी वाजवेन व मग ती गोष्ट कधीच, माझ्या हातात रहाणार नाही.’

त्या खलाशाने, थोडा वेळ विचार केला. मग त्याने उन्हाने भाजलेल्या हाताने पाय खाजवला.

तो ओरडला, "मी प्रयत्न करतो. मी असे धरून चालतो, की तू गोरा मनुष्य असून, वचनाचा पक्का आहेस. मी तुला, सगळी गोष्ट सांगतो. पण आधी, एक बाब स्पष्ट करतो. माझा संबंध आहे तोपर्यंत, मला कसलाही खेद नाही आणि कसली भीतीही नाही. मी ते परतही करेन, मी माझ्या कामातील सच्चेपणाला स्मरून सांगतो, त्या नरपशूचा धिक्कार असो. त्याला मांजरासारखे जितके जन्म असतील, तितके सर्व, तो माझा ऋणी राहील. पण ती बाई -- लेडी फ्रॅझर -- तिला मी कधीच, त्या शापित नावाने हाक मारणार नाही. जेव्हा मला ती संकटात सापडेल असे वाटते, तेव्हा माझ्या काळजाचे पाणीपाणी होते. मी, तिच्या प्रिय चेहऱ्यावर एक स्मित झळकावे म्हणून, तिला जीवन बहाल केले आहे. आणि तरीही -- आणि तरीही, मी अजून काय करू शकतो? सभ्य गृहस्थहो, मी तुम्हाला माझी गोष्ट सांगतो. आणि मग तुम्हाला विचारतो, मी अजून काय करू शकतो?"

"मला थोडे मागे गेले पाहिजे. तुम्हाला सर्व माहिती आहे. तेव्हा तुम्हाला हेदेखील माहिती आहे, की जेव्हा ती प्रवासी होती व मी रॉक ऑफ जिब्राल्टर या बोटीवरील ऑफिसर होतो, तेव्हापासून तिला ओळखतो. तिला भेटल्याच्या पहिल्या दिवसापासून, ती माझे सर्वस्व होती. प्रवासाच्या प्रत्येक दिवशी, मी तिच्या जास्त जास्त प्रेमात पडत गेलो. तिचे प्यारे पाय त्या डेकला लागत म्हणून, दर दिवशी मी त्या डेकचे गुडघ्यावर बसून चुंबन घेत असे. तिने माझ्याकडे, कधीच लक्ष दिले नाही. एखादी बाई माणसाशी ज्या अदबीने वागेल, तसेच ती माझ्याशी वागे. माझी काही तक्रार नव्हती. ते फक्त माझ्या बाजूने, एकतर्फी प्रेम होते. आणि तिच्या बाजूने फक्त मैत्री व प्रवासातील ओळख! आम्ही जेव्हा प्रवास संपवला तेव्हा, ती स्वतंत्र बाई होती. पण माझी स्वतंत्रता कायमची संपली होती.

"पुढच्या वेळी मी समुद्रावरून परतलो, तेव्हा मी तिच्या लग्नाबद्दल ऐकले. तिला जो आवडला होता, त्याच्याशी तिने लग्न का नाही केले? पैसा आणि मानमरातब -- तिच्यापेक्षा जास्त कुणाचा त्यावर हक्क होता? जे जे सुंदर, नाजूक व सुबक आहे, त्यासाठी ती जन्मली होती. मी तिच्या लग्नामुळे, दुःख केले नाही. मी तितका, स्वार्थी कुत्रा नव्हतो. तिचे नशीब फळफळले आणि तिने एका कफल्लक खलाशावर, तिचे आयुष्य कुर्बान केले नाही, म्हणून मी आनंद साजरा केला. असे मी मेरी फ्रॅझरवर प्रेम केले.

मी तिला परत कधी बघेन, अशी आशा करत नव्हतो. पण माझ्या मागच्या सफरीत, मला बढती मिळाली. नवीन बोट अजून पाण्यात उतरवली नव्हती, म्हणून मी काही महिने माझ्या कुटुंबाबरोबर सिडनेहॅमला रहात होतो. एक दिवस गावातील एका गल्लीत, मला थेरेसा भेटली, तिची एकनिष्ठ नोकराणी. तिने मला तिच्या मालकिणीबद्दल सर्व काही सांगितले. तिच्या

नवऱ्याबद्दल सर्व काही. आणि तुम्हाला सांगतो, मी खरोखर वेडा झालो. तिचे बूट चाटायची देखील लायकी नसलेल्या त्या दारुड्या हलकटाने, तिच्यासाठी स्वतःचा हात पुढे केलाच कसा? मी थेरेसाला परत भेटलो. मग मी प्रत्यक्ष मेरीला भेटलो -- आणि परत भेटलो. मग ती मला, परत भेटली नाही. पण दुसऱ्या दिवशी मला आठवड्याभरात, बोटीवर रुजू होण्याचा निरोप मिळाला. मी जाण्यापूर्वी तिला एकदा भेटायचे ठरवले. थेरेसा माझी कायमची मैत्रीण होती. कारण ती मेरीवर प्रेम करे व माझ्यासारखाच, तिच्या नवऱ्याचा द्वेष करे. तिच्याकडून मला घराची माहिती मिळाली. मेरी खालच्या मजल्यावर तिच्या छोट्याशा खोलीत वाचत बसे. मी काल तिथे हळूच गेलो व खिडकीवर टकटक केले. पहील्यांदा ती माझ्याशी मोकळेपणे वागत नव्हती. पण मला माहिती होते, की आता ती माझ्यावर प्रेम करत होती आणि बर्फाळ रात्री ती मला तसेच, जाऊ देणार नव्हती. तिने मला कुजबुजत सांगितले, की फेरी मारून पुढील बाजूस असलेल्या ( फ्रेंच ) मोठ्या खिडकीत ये. आणि मी ती जेवणघरात येण्यासाठी, उघडी पाहिली. हे मी तिच्या ओठांनी ऐकले व माझे मन नाचू लागले. मग मी जिच्यावर प्रेम करतो, अशा बाईचा वाटेल तसा वापर करणाऱ्याला, मी परत शिव्या दिल्या. तर सभ्य गृहस्थहो, मी तिच्याबरोबर खिडकीच्या आत निरागसपणे उभा होतो. देव सर्वसाक्षी आहे. तेवढ्यात तो एखाद्या वेड्यासारखा, खोलीत घुसला. तिला अत्यंत वाईट भाषेत शिव्या दिल्या. त्याच्या हातात असलेल्या काठीने, तिला चेहऱ्यावर सपासप मारले. मी काठी काढून घेण्यासाठी धावलो. आणि आमच्यात चांगलीच मारामारी झाली. जिथे त्याचा पहला फटका बसला, त्या माझ्या हाताकडे बघा. मग माझी पाळी होती. तो नासका भोपळा असल्यासारखा, मी त्याच्यावर तुटून पडलो. मला त्याबद्दल पश्चात्ताप होतो आहे, असे तुम्हाला वाटते का? तर तसे मुळीच नाही. एकतर त्याला तरी आयुष्य मिळेल किंवा मला तरी. पण त्याहीपेक्षा जास्त, त्याला तरी आयुष्य मिळेल किंवा तिला तरी. तिला त्या वेड्याच्या हातात, मी कसा काय सोपवणार होतो? अशा तऱ्हेने, मी त्याला ठार मारले. माझे काय चुकले? तुम्ही माझ्या जागी असतात, तर तुम्ही काय केले असते?"

"त्याने तिच्यावर वार केले, तेव्हा ती किंचाळली. त्यामुळे म्हातारी थेरेसा वरील खोलीतून, खाली आली. तिथे कट्ट्यावर दारूची बाटली पडली होती. मी ती उघडून थोडीशी मेरीच्या ओठात घातली. कारण ती धक्का बसून अर्धमेली झाली होती. नंतर थोडी मीही घेतली. थेरेसा बर्फाप्रमाणे थंड होती. तिने व मी मिळून, हा तुम्हाला सांगितला गेलेला, बेत रचला. चोरांनी हे केले असा देखावा आम्ही निर्माण केला. थेरेसा ती गोष्ट, पुन्हापुन्हा तिच्या मालकिणीला सांगत राहिली. मी कीटक गोळा केले व घंटीची दोरी कापली. मग मी तिला खुर्चीत बसवून बांधले. दोरीचे टोक नैसर्गिकपणे जवळजवळ तुटलेले दिसेल असे करून ठेवले. नाहीतर बघणाऱ्याला

संशय आला असता, की चोरांना अशी दोरी करायचे जमले तरी कसे? नंतर मी चोरी झाली आहे असे दाखवण्यासाठी, काही काचेच्या ताटल्या व चांदीची भांडी काढली. आणि प्रथम ती तिथेच ती ठेऊन दिली. मग, पाऊण तासाने ती चांदीची भांडी घेऊन मी निघालो. तत्पूर्वी थेरेसाला आरडाओरडा करायला सांगायला, मी विसरलो नाही. मी चांदीची भांडी, तळयात टाकून दिली. आणि सिडनेहॅमला निघून गेलो. मला असे वाटले की आयुष्यात एका रात्री तरी, मी खरेच चांगले काम केले. तर असे हे सत्य आहे, मिस्टर होम्स, निखळ सत्य! जरी ते माझी मान, लटकवणारे असले तरी!"

होम्सने काही वेळ शांतपणे पाईप ओढला. मग त्याने खोली ओलांडून आमच्या अशीलाला बाहेर बोलावले.

तो बोलला, "मला असेच काहीसे, वाटत होते. मला माहिती आहे, की यातील प्रत्येक शब्द खरा आहे. पण तू जे सांगितलेस, ते मला आधीच माहिती होते. फक्त खलाशीच, अशा तऱ्हेने घंटी दोरीचा प्रकार करू शकतो. आणि खुर्चीला जखडलेल्या दोरीच्या गाठी, फक्त एक खलाशीच मारू शकतो." त्याने विचार केला, "ती बाई एकदाच प्रवासात, त्या खलाशाच्या संपर्कात आली होती. तो तिच्या आर्थिक, सामाजिक स्तरातील होता. ती त्याचा बचाव करायचा, प्रयत्न करत होती. आणि त्यावरून कळत होते की तिचे त्याच्यावर प्रेम होते. मग होम्स उघडपणे बोलला, "एकदा मला योग्य दिशा सापडल्यावर, तुम्हाला पकडणे माझ्यासाठी, अगदी सोपे होते."

"मला वाटले, पोलीस आम्हाला आमच्या चाणाक्षपणामुळे, कधीच पकडू शकणार नाहीत."

"पोलिसाना तुम्ही सापडलेले नाही आणि माझा विश्वास आहे, की यापुढेही सापडणार नाही. कॅप्टन क्रॉकर, आता असे बघा, हे फार गंभीर प्रकरण आहे. तरीही मी हे कबूल करायला तयार आहे, की माणसाला जितक्या टोकाची चीड आणणाऱ्या परिस्थितीत पाडले जाईल, तेवढे तुम्हाला पाडले गेले. स्वतःचा बचाव करण्यासाठी केलेली कृती, असा तुमचा बचाव करता येईल का, याबद्दल मी साशंक आहे. ब्रिटीश ज्युरी ते ठरवेल. मध्यंतरीच्या काळात, मला तुमच्याबद्दल इतकी सहानुभूती आहे, की जर तुम्ही पुढच्या चोवीस तासात नाहीसे व्हायचे ठरवले, तर मी खात्रीने सांगतो की, तुम्हाला कोणीही त्रास देणार नाही."

"आणि मग सर्व बाहेर येईल?"

"नक्कीच. सर्व बाहेर येईल."

खलाशाचा, रागाने जळफळाट झाला.

“काय रसायनाने तुम्हाला बनवले आहे? मला कायद्याची पुरेशी माहिती आहे. मेरीला, गुन्हेगाराला मदत केल्याबद्दल, दोषी ठरवले आईल. तुम्हाला असे वाटते का, की तिला एकटीला इथे सर्व गोष्टीना तोंड द्यायला ठेऊन, मी निघून जाईन? नाही सर, त्याना माझे काय करायचे असेल ते करु दे. पण कृपा करून, मिस्टर होम्स, माझ्या गरीब बिचाऱ्या मेरीला, कोर्टाची पायरी चढायला लागणार नाही, असे काहीतरी बघा.”

होम्सने दुसऱ्यांदा, त्या खलाशाच्या पाठीवर हात ठेवला.

“मी फक्त तुमची परीक्षा बघत होतो. आणि तुम्ही ती प्रत्येक वेळी, पास झालात. मी माझ्यावर, एक महत्वाची जबाबदारी घेतो आहे. पण मी हॉपकिन्सला एक चांगली सूचना दिली आहे आणि त्याने त्याचा फायदा करुन घेतला नाही, तर मग मी अजून काही करणार नाही. हे बघा कॅप्टन क्रॉकर, आपण हे कायद्याने, योग्य प्रकारे करू. तू कैदी आहेस. वॉटसन, तू ब्रिटीश ज्युरी आहेस, कारण तुझ्याहून जास्त योग्य माणूस, मला या जागेसाठी सापडला नसता. मी न्यायाधीश आहे. तू आता सर्व युक्तिवाद, ऐकला आहेस. तुला कैदी गुन्हेगार वाटतो, की वाटत नाही?”

“न्यायाधीश महाराज, नाही.” मी म्हणालो.

“ज्युरीचे मत विचारात घेता, कॅप्टन क्रॉकर, तुम्हाला निर्दोषी असे जाहीर करण्यात येत आहे. जोपर्यंत कायद्याला दुसरा कुणी बळी सापडत नाही, तोपर्यंत तुम्हाला माझ्यापासून अभय आहे. तुम्ही या बाईकडे एका वर्षात या. तुमचे आणि तिचे भविष्य, आम्ही आत्ता दिलेल्या निकालाशी सुसंगत असे राहो.”

# The Adventure Of The Engineer's Thumb

## इंजिनिअरचा अंगठा



माझा मित्र शेरलॉक होम्स याच्याबरोबर काम करत असताना, त्याच्याकडे सोडवण्यासाठी आलेल्या समस्यांपैकी, फक्त दोन समस्या, मी त्याच्या लक्षात आणून दिल्या. त्यापैकी एक मिस्टर हॅथरलेंचा अंगठा आणि दुसरी कर्नल वॉरबर्टनचा वेडेपणा. यापैकी दुसऱ्यासाठी सूक्ष्म स्वरूपाच्या व खोलात जाऊन केलेल्या निरीक्षणाची गरज होती. पण पहिली जाणून घ्यायला इतकी विचित्र होती, की ती जतन करून ठेवण्यास योग्य, अशी होती. माझा मित्र

ज्या उल्लेखनीय अवगामी तर्कशास्त्रीय पद्धतीने ती सोडवे, त्यासाठी शिरकाव करता येईल अशा अगदी कमी जागा त्यात होत्या. मला वाटते वर्तमानपत्रात ही गोष्ट, एकपेक्षा जास्त वेळा, येऊन गेली होती. पण अशा अर्ध्या रकान्यात घाईगर्दीत छापलेल्या, वर्णनात्मक गोष्टींचा, फारसा परिणाम होत नाही. जेव्हा एकेक मुद्दे तुमच्या डोळयासमोर उघडत जातात, हळूहळू गूढ उकलत जाते व पायरीपायरीने शेवटी पूर्ण सत्याचा शोध लागतो, तेव्हा ते वाचायला खरी मजा येते. कधीकधी एखाद्या केसचा माझ्यावर इतका परिणाम होतो, की दोन वर्षे झाली, तरी तो कमी होत नाही.

तो माझ्या लग्नानंतरचा ८९ मधील उन्हाळा होता. तेव्हा ज्या घटना घडल्या त्या मी आता सांगणार आहे. मी होम्सचे बेकर रस्त्यावरील घर सोडून माझा डॉक्टरकीचा व्यवसाय सुरु केला होता. तरी मी सतत त्याला भेटत असे व प्रसंगापरत्वे जेव्हा तो भेटायला येई तेव्हा त्याच्या बोहेमियन सवयी सोडून देण्याबद्दल त्याचे मन वळवत असे. हळूहळू माझा व्यवसाय वाढत होता. मी पॅडिंग्टन स्टेशनपासून जवळ रहात असल्यामुळे, त्याच्या आसपासचे रुग्ण माझ्याकडे येत. खूप यातना देणारा व बरेच दिवस टिकलेला असा ज्याचा आजार मी बरा केला तो रुग्ण, नेहमी माझे गुणगान करत असे. त्याच्या ओळखीच्या बऱ्याच आजारी मंडळीना तो शिफारस करून माझ्याकडे पाठवत असे.

एका सकाळी सात वाजायच्या थोडे आधी, मला नोकराणीने दारावर टकटक करून उठवले. पॅडिंग्टनहून दोन माणसे आली आहेत व खाली दवाखान्यात थांबली आहेत असे ती म्हणाली. रेल्वे अपघाताच्या केसेस फार तातडीच्या असतात असा विचार करून मी घाईघाईने कपडे करून खाली आलो. मी उतरल्याबरोबर माझा दरवान खोलीबाहेर आला व व त्याच्यामागे त्याने दार घट्ट ओढून घेतले. “मी त्याला आत बसवले आहे. तसा तो बरा आहे.” तो कुजबुजला. माझ्या खोलीत बंदिस्त केलेला रुग्ण विचित्र असल्याचे त्याच्या हावभावांवरून वाटत असल्याने मी विचारले, “काय झाले आहे?”

तो हळू आवाजात बोलला, “ हा नवीन रुग्ण आहे. मला वाटले, की मी त्याला इथे आणावे. आणि मग मी त्यात अडकलो. तो बघा. आता, तो ठीक आहे. डॉक्टर, आता मला गेले पाहिजे. तुम्हाला जसे काम असते, तसेच मलाही आहे.” आणि तो निघून गेला. मी त्याचे आभार मानायच्या आत, तो निघूनही गेला. मी, माझ्या खोलीत आलो, तोपर्यंत तो माणूस उठून, माझ्या टेबलाशेजारी बसला होता. त्याने जांभळया फुलांचा ट्विड कोट घातला होता. डोक्यावरची टोपी त्याने माझ्या पुस्तकांवर ठेवली होती. रक्ताने डागाळलेला एक रुमाल त्याने एका हाताभोवती बांधला होता.

तो तरूण होता. मला वाटते, पंचवीसहून जास्त नसावा. पुरुषी चेहरा असलेला, मजबूत, पण फिकट दिसत होता. काहीतरी जोरात खुपत असल्यासारखा, तो मला वाटला. ते सहन करायला त्याला. सर्व शक्तीनिशी प्रयत्न करावे लागत होते.

तो म्हणाला, “डॉक्टर, इतक्या लवकर तुम्हाला उठवल्याबद्दल, माफी मागतो. पण मला रात्री, भयानक अपघात झाला. मी इथे सकाळी, गाडीने आलो. पॅडीग्टन स्टेशनवर, मी चौकशी केली की मला इथे जवळपास डॉक्टर कुठे सापडेल. एका भल्या माणसाने मला इथे आणून सोडले. मी नोकराणीला, माझे कार्ड दिले पण तिने, ते टेबलावर ठेऊन दिले.”

मी ते घेऊन, त्यावर नजर टाकली. ‘मिस्टर हॅथरले, जलशक्तिशास्त्र इंजिनिअर, १६ अ , व्हिक्टोरिया रस्ता ( तिसरा मजला ). तर असे माझ्या सकाळच्या पाहुण्याचे नाव, गाव आणि पेशा होता. मी माझ्या वाचनालयातील, खुर्चीवर बसत म्हणालो, “तुम्हाला ताटकळत ठेवल्याबद्दल, मला खेद होतो आहे. तुम्ही नुकतेच रात्रीच्या प्रवासाहून आला आहात, हे मी समजू शकतो. हा रात्रीचा प्रवास तसा एकसुरीच असतो.”

“ओहो, माझी रात्र अजिबातच एकसुरी नव्हती.” असे म्हणून तो हसला. खुर्चीच्या पाठीवर टेकत, तिच्या बाजू हलवत, तो अगदी मनापासून, जोरजोरात हसला. त्या हसण्याविरुध्द माझ्या वैद्यकीय सहजप्रवृत्ती उफाळून उठल्या.

मी ओरडलो, “पुरे करा. स्वतःला भानावर आणा.” आणि मी एका भांड्यातून, त्याच्यावर पाणी ओतले.

परंतु, त्याचा काही परिणाम झाला नाही. जेव्हा एखादी हादरवून टाकणारी घटना घडून जाते, तेव्हा असे हसणे व वेड्यासारखा भावनांचा उद्रेक होणे, घडते. काही वेळाने तो खूप दमलेला व अशक्त दिसणाऱ्या अवतारात, शुद्धीवर आला.

धापा टाकत तो बोलला, “मी मलाच फसवत होतो.”

“मुळीच नाही. हे पी.” मी थोडी ब्रँडी पाण्यात मिसळून त्याला दिल्यावर, त्याचे पांढरे पडलेले गाल परत लाल दिसू लागले.

तो उद्गारला, ‘हे चांगले झाले. आणि डॉक्टर, आता तुम्ही कृपया, माझा अंगठा, किंवा जिथे माझा अंगठा असायचा ती जागा, बघाल का?” मी त्याच्या हाताला बांधलेला रुमाल सोडला. माझ्या सराईत नजरेला सुद्धा, ते बघून शहारे आले. तेथे चार बोटे होती व अंगठा जिथून सुरु होतो, तिथे भयंकर लाल खडबडीत जागा फक्त होती. अंगठा मुळापासून, उपटला गेला होता.

मी ओरडलो, “अरे बापरे, ही भयानक जखम आहे. यातून खूप रक्त वाहून गेले असणार.”

“हो. हे झाले तेव्हा मी चक्कर येऊन पडलो. आणि मला वाटते, बराच वेळ मी बेशुध्द होतो. मी शुद्धीवर आलो तेव्हाही रक्त वहात होते. म्हणून मी ती जागा, माझ्या मनगटाभोवती रुमालाने घट्ट बांधून ठेवली व आधारासाठी त्याला एक कडक डहाळी लावली.”

“छान! तू तर शल्यविशारद असायला हवा होतास.”

“हा जलशास्त्रातील प्रश्न आहे. आणि तो माझ्या कार्यक्षेत्रात येतो.”

मी जखम पहात म्हणालो, “हे खूप मोठ्या व धारदार उपकरणाने झालेले आहे.”

ती म्हणाला, खाटकाच्या सुऱ्यासारखे काहीतरी.”

“मला वाटते तो अपघात होता.”

“अजिबात नाही.”

“मग काय, खुनी हल्ला?”

“खरंच, भयाण असा, खुनी हल्ला.”

“तू मला, घाबरवतो आहेस.”

मी जखम टिपून घेतली, स्वच्छ केली व कापूस घालून त्यावर पट्टी लाऊन टाकली. तो हुं की चुं न करता पाठीवर पडून राहिला होता. फक्त मध्ये मध्ये सारखे ओठ चावत होता.

माझे सर्व काही करून झाल्यावर मी विचारले, “आता कसे वाटते आहे?”

“मस्त!  तुमच्या ब्रँडी व मलमपट्टीमुळे, मला नवीन मनुष्य झाल्यासारखे वाटते आहे. मी अशक्त झालो होतो, पण कशीबशी तग धरली.’

“कदाचित तुम्ही याबद्दल अजून काही, बोलू नका. त्यामुळे नक्कीच, तुम्हाला त्रास होतो आहे.”

‘ओहो, नाही. आता नाही. मला माझी कहाणी पोलिसाना सांगितली पाहिजे. पण आपल्यात म्हणून सांगतो, जर माझ्याकडे हा जखमेचा ठळक पुरावा नसता, तर माझ्या सांगण्यावर त्यांनी विश्वास ठेवला असता, की नाही कुणास ठाऊक? कारण हे जगावेगळे आहे.

आणि माझ्याकडे त्याला बळकटी देईल, असे भक्कम काही नाही. मी जे पुरावे देऊ शकतो, ते इतके तकलादू आहेत की त्याने न्याय मिळेलच, याची शाश्वती नाही."

मी ओरडलो, "अरेच्च्या! मग जर तुम्हाला ही समस्या सुटायला हवी असेल, तर पोलिसांकडे जाण्यापेक्षा, मी माझा मित्र शेरलॉक होम्स याचे नाव, तुम्हाला सुचवेन."

माझा पाहुणा म्हणाला, "मी त्याचे नाव ऐकले आहे. त्याने माझी केस हातात घेतली, तर मला फार आनंद होईल. अर्थात मला पोलिसांची मदत, घ्यावीच लागेल. तुम्ही माझी त्याच्याशी, ओळख करून द्याल का?"

"त्यापेक्षा, मीच तुला त्याच्याकडे घेऊन जाईन."

"मी तुमचा खरंच, आभारी होईन."

"आपण गाडी बोलावू व बरोबर जाऊ. आपण बरोबर त्याच्या न्याहारी घ्यायच्या वेळी पोचू. तुम्हाला असे चालेल ना?"

"हो. पण मी त्याना माझी गोष्ट सांगत नाही, तोपर्यंत, मला चैन पडणार नाही."

"मग माझा नोकर, गाडी बोलावेल. मी पाच मिनिटात येतोच."

मी घाईने वरती गेलो. माझ्या बायकोला सर्व समजावून सांगितले. आणि नंतर आम्ही दोघे टांग्यातून बेकर रस्त्याकडे निघालो. माझ्या अपेक्षेप्रमाणे, शेरलॉक होम्स हॉलमध्ये, गाऊन घालून आरामात बसला होता. टाईम्स वर्तमानपत्रातील दुःखाचा रकाना वाचत, त्याचा न्याहारीपूर्वीचा पाईप ओढत बसला होता. त्याने नेहमीच्या मित्रत्वाच्या थाटात आमचे स्वागत केले व न्याहारीची मागणी नोंदवली. आम्ही त्यावर ताव मारला. ते झाल्यावर, त्याने पाहुण्याला सोफ्यावर बसवले. स्वतःच्या डोक्यामागे उशी ठेवली आणि ब्रँडी व पाणी त्याच्या जवळ ठेऊन बसला.

तो बोलला, "मिस्टर हॅथरले, तुमचा अनुभव जगावेगळा असल्याचे लक्षात येते आहे. तुम्ही तिथे पडा. अगदी घरच्यासारखे मोकळेपणे पडा व तुम्हाला काय सांगायचे आहे, ते सांगा. तुम्ही दमलात, की थांबा. मग थोडे पेय घेऊन, तुमची शक्ती शाबूत ठेवा."

माझ्या रुग्णाने आभार मानले व बोलला, "डॉक्टरानी, मला आधीच माणसात आणले होते. तुमच्या न्याहारीने आता मी पूर्णपणे बरा झालो आहे. मी तुमचा फार मूल्यवान वेळ घेत नाही. तर मग मी माझ्या विशेष अशा, अनुभवकथनाला सुरवात करतो."

काळजीचा व डोक्यावर ओझे दिल्याचा भाव घेऊन, होम्स त्याच्या आरामखुर्चीत बसला. मी त्याच्या समोर बसलो व शांतपणे हॅथरलेची, विचित्र गोष्ट ऐकू लागलो.

तो म्हणाला, "तुम्हाला माहिती असेल की, मी अनाथ व अविवाहित असून, एकटा लंडनमध्ये रहातो. व्यवसायाने मी जलशक्तीशास्त्रातील, इंजिनिअर असून, मला या क्षेत्रातील, गेल्या सात वर्षांचा अनुभव आहे. मी वेन्नर आणि मॅथेसन या ग्रीनविचच्या प्रसिध्द कंपनी बरोबर शिकाऊ उमेदवार म्हणून काम करत होतो. माझ्या गरीब वडीलांच्या मृत्युनंतर दोन वर्षांपूर्वी, माझ्या कामातून बरेच पैसे घेऊन, मी माझा व्यवसाय चालू करण्याचे ठरवले. व्हिक्टोरिया रस्त्यावर माझ्या व्यवसायासाठी कार्यालय घेतले.

मला वाटते प्रत्येकालाच, स्वतंत्र व्यवसायातील सुरवात, थोडी नाउमेद करणारी वाटते. माझ्या बाबतीतही तसेच झाले. दोन वर्षात मला, तीन सल्ल्याची कामे मिळाली व अजून एक छोटेसे काम मी केले. तेवढेच फक्त मी माझ्या व्यवसायात करू शकलो. माझी दिवसाची कमाई फक्त २७ डॉलर १० शिलींग एवढीच होती. रोज सकाळी नऊ ते संध्याकाळी चारपर्यंत, मी माझ्या छोट्याशा कार्यालयात बसलेला असायचो. शेवटी मी निराश होऊ लागलो व सगळे बंद करावे, असे मला वाटू लागले.

काल मात्र मी असा विचार करत कार्यालय सोडत असताना, माझा कारकून सांगत आला, की मला भेटायला एक सभ्य गृहस्थ आला आहे. त्याने कार्ड आणले होते. कार्डावरील त्याचे नाव होते, कर्नल लायसॅंडर स्टार्क. तो कर्नल आत आला. साधारण मध्यम आकाराचा, पण फारच बारीक असलेला, असा तो होता. मी तोपर्यंत एवढा बारीक माणूस, पाहिला नव्हता. त्याचा सर्व चेहरा नाक व हनुवटीच्या धारदारपणामुळे चमकत होता. त्याच्या अस्थिपंजर हाडांवर, त्याच्या गालांचे कातडे ताणून बसवल्यासारखे दिसत होते. पण तरीही हे त्याच्या सरावाचे दिसत होते. तो काही आजारी वगैरे नव्हता. त्याचे डोळे तेजस्वी व चाल जलद होती. तो एकंदर, ठीकठाक वाटत होता. त्याचे कपडे साधे पण नीटनेटके होते. मला वाटते त्याचे वय, तीसपेक्षा चाळीसच्या जवळ असावे.

तो जर्मन उच्चार करत म्हणाला, "मिस्टर हॅथरले, तुमची कोणीतरी माझ्याजवळ शिफारस केल्यामुळे, मी येथे आलो आहे. तुम्ही केवळ व्यवसायातच अग्रगण्य नसून, तुम्ही काळजीपूर्वक बोलणारे व गुपिते राखू शकणारे असे असल्याचे मला सांगण्यात आले आहे."

असे म्हणल्यावर कोणाही तरुण माणसाला वाटेल, तसा आनंद मलाही वाटला. "माझी अशी भलावण करणारा कोण आहे, ते मी विचारू शकतो का?" मी विचारले.

“या क्षणी कदाचित, मी तुम्हाला ते न सांगितलेले बरे ठरेल. आपण दोघेही अनाथ व अविवाहित आहोत आणि लंडनमध्ये रहात आहोत, एवढे मी सांगतो.”

मी उत्तरलो, “ते बरोबर आहे. पण या सर्वाचा माझ्या व्यवसायाशी काय संबंध आहे? तुम्ही माझ्याकडे काही व्यवसायिक कामासाठी आला आहात, असे मी समजतो, बरोबर ना?”

निःसंशय ते खरे आहे. पण मी जे बोलतो आहे, ते मुद्द्याला धरूनच आहे. माझ्याकडे तुमच्यासाठी, एक व्यावसायिक सूचना आहे. मी सांगेन त्यासाठी पूर्णपणे गुप्तता पाळणे जरुरीचे आहे -- पूर्ण गुप्तता, समजले का? कुटुंबात रहाणाऱ्या माणसापेक्षा, एकट्या रहाणाऱ्या माणसाकडून याचे पालन होणे जास्त गरजेचे आहे.”

“मी तुम्हाला गुप्तता पाळण्याचे वचन देतो. ते पाळले जाईल, याबद्दल खात्री बाळगा.”

मी बोलल्यावर, त्याने कठोरपणे माझ्याकडे पाहिले. मी इतके संशयी व प्रश्नार्थक डोळे आजपर्यंत पाहिले नव्हते.”

शेवटी तो म्हणाला, “तू वचन देतोस तर?”

“हो. मी वचन देतो.”

“मी बोलण्यापूर्वी, बोलताना व बोलल्यावरदेखील, पूर्ण शांतता हवी. मी शब्दात सांगेन किंवा ते लिखित स्वरूपात असेल.”

“मी तुम्हाला आधीच, वचन दिलेले आहे.”

त्याने विजेच्या चपळाईने एकदम उडी मारून खोलीचे दार सताड उघडले व बोलला, “छान” बाहेरचा पॅसेज रिकामा होता.

तो पुढे म्हणाला, “ ठीक आहे. कारकून मंडळी कधीकधी मालकाच्या बाबतीत, नको इतकी चौकस असतात. बाहेर कोणी नसल्याने, आता आपण सुरक्षितपणे बोलू शकू.” त्याने त्याची खुर्ची माझ्या जवळ आणली व त्याच विचारी व प्रश्नार्थक नजरेने, माझ्याकडे रोखून बघू लागला.

त्या लुकड्या माणसाच्या मूर्खपणामुळे, त्याच्यापासून दूर जावे, अशा तऱ्हेचे काही भीतीदायक भाव, माझ्यात वाढू लागले. माझ्या अधीरपणामुळे, माझा अशील निघून जाण्याची भीतीदेखील मला वाटली नाही. मी म्हणालो, “तुमचे काम काय आहे ते सांगा. माझा वेळ महत्वाचा आहे.” मी ते दुसरे वाक्य उगीच बोललो. पण ते आपोआप माझ्या ओठांवर आले.

"एका रात्रीच्या कामाकरता, पन्नास गिनीज ठीक राहतील?"

"ठीक वाटतात."

"मी एक रात्र म्हणतो आहे, पण काही तास पुरेसे आहेत. एका जलशास्त्रीय स्टँपिंग मशीनचा गिअर बिघडला आहे. त्याबाबतीत मला तुमचा सल्ला हवा आहे. त्यात काय बिघडले आहे ते तुम्ही आम्हाला सांगितलेत, तर आम्ही ते दुरुस्त करू शकू. अशा कामाबद्दल तुम्ही काय म्हणाल?"

"हे काम तसे सोपे वाटते आहे. पण त्यासाठीचे पैसे, जरा जास्त वाटतात."

"ते तसेच आहे. तुम्ही आज शेवटच्या गाडीने, येऊ शकाल का?"

"कुठे?"

"बर्कशायरमध्ये आयफोर्ड येथे. ऑक्सफोर्डच्या सीमेजवळ, ती एक लहानशी जागा आहे. साधारण सात मैलांवर. पॅडीग्टन स्टेशनपासून गाडी आहे, ती तुम्हाला ११.१५ ला तिथे आणेल."

"ठीक आहे."

मी गाडी घेऊन, तुम्हाला न्यायला येतो."

"तिथून रस्ता आहे तर?"

"हो. आमची जागा तशी गावापासून दूर आहे. आयफोर्ड स्टेशनपासून सात मैल आहे."

"मग आपल्याला तिथे पोचायला, मध्यरात्र होईल. मला वाटते तिथून परतीची गाडी नसेल. मला रात्रभर, तिथे रहावे लागेल."

हो. आम्ही तुमची, रहायची व्यवस्था करू."

"पण ते जरा, विचित्र वाटते. मी त्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या सोयीस्कर वेळी, येऊ शकत नाही का?"

आमच्या विचाराप्रमाणे, तुम्ही उशिरा यावे ते बरे. तुम्हाला काही त्रास किंवा गैरसोय झाल्यास, आम्ही तुम्हाला पैसे देऊ. तुमच्यासारख्या बिनओळखीच्या तरुण मनुष्याकडून मिळणाऱ्या व्यावसायिक सल्ल्याबद्दल, आम्ही तुम्हाला योग्य वाटेल ती फी देऊ. तरीही तुम्हाला जर हे काम करायचे नसेल, तर अजून खूप वेळ आहे."

“मी पन्नास गीनिजचा व मला ते पैसे किती उपयुक्त ठरू शकतील याचा विचार केला आणि म्हटले, “नाही. तसे काही नाही. तुम्हाला जसे हवे आहे, तसेच मी करेन. पण मला अजून हे स्पष्टपणे कळले नाही, की तुम्हाला मी काय करायला हवे आहे?”

“असे बघा. तुमच्याकडून आम्ही गुप्ततेचे जे वचन घेतले आहे, त्यामुळे अगदी सहज तुम्हाला कुतूहल वाटत असणार. तुमच्यासमोर सर्व काय ते खुले केल्याशिवाय, तुमच्याकडून काय हवे आहे हे मी सांगू शकत नाही. मला वाटते की चोरून संभाषण ऐकणाऱ्यांपासून, आपण पूर्णपणे सुरक्षित आहोत.”

“पूर्णपणे.”

“तर मग मला असे सांगायचे आहे. तुम्हाला कदाचित माहिती असेल की फुलर्स अर्थ ( एक प्रकारची माती ) ही खूप किंमती वस्तू आहे व इंग्लंडमध्ये ती एकदोन ठिकाणीच सापडते.”

“मी असे ऐकले आहे.”

"काही काळापूर्वी, मी एक लहान जागा विकत घेतली -- अगदी लहानशी -- दहा मैलाच्या आतलीच. तिथे एका ठिकाणी, मी सुदैवी असल्याने फुलर्स अर्थचे थर सापडले. परंतु त्याची तपासणी केल्यावर, मला असे कळले की हे थर तुलनात्मक दृष्ट्या फार कमी होते. मोठे थर त्याचा दोन्ही बाजूंच्या जागांवर म्हणजे माझ्या शेजारील उजव्या व डाव्या बाजूच्या जमिनींमध्ये होते. त्या जागांचे मालक मात्र, त्यांच्याकडे एवढा सोन्यासारखा मूल्यवान साठा असल्याच्या बाबतीत, अनभिज्ञच होते. तेव्हा त्याना त्यांच्या जागेची किंमत लक्षात येण्यापूर्वी, मला त्यात रुची होती. पण माझ्याकडे ती जमीन विकत घेण्याइतके, पैसे नव्हते. मी माझ्या काही मित्रांना गुप्तपणे, विश्वासात घेतले. आम्ही मिळून असे ठरवले, की माझ्या जागेतील ते थर गुपचूप खणून काढून, संपत्ती मिळवायची. आणि मग त्या संपत्तीच्या योगे, शेजारील जमीन विकत घ्यायची. गेले काही दिवस, आम्ही ते करत आहोत. यात आम्हाला मदत म्हणून आम्ही जलशास्त्रीय दबावयंत्र बसवले आहे. पण ते मोडल्यामुळे नीट चालत नाही. त्या बाबतीत आम्हाला तुमचा सल्ला हवा आहे. आम्ही आमची गुप्तता अगदी हेतूपूर्वक पाळतो. पण आमच्याकडे या बाबतीतील तज्ञ इंजिनिअर आला आहे, ही बातमी जर लोकाना कळली तर, मग चौकशी सुरु होईल. याचा बोभाटा झाल्यास, आमच्या पुढील सर्व बेतांवर पाणी फिरेल. त्यामुळे तुम्ही कुणाला न सांगता, आज रात्री आयफोर्डला यावे. मला वाटते मी सगळे काही स्वच्छपणे, तुम्हाला सांगितले आहे.”

मी म्हणालो, “माझ्या लक्षात आले. फक्त एकच गोष्ट मला कळली नाही की फुलर्स अर्थ खणून काढण्यासाठी, जलशास्त्रीय दबावयंत्राचा काय उपयोग आहे? ते तर खड्ड्यातील दगड, माती इत्यादी बाहेर काढते.”

तो निष्काळजीपणे म्हणाला, “आमची स्वतःची पद्धत आहे. आम्ही माती दाबून विटा तयार करतो म्हणजे कुणाला संशय न येता, आम्ही त्या बाहेर नेऊ शकतो. पण ती तर फक्त, एक खुबी आहे. मिस्टर हॅथरले, आता मी तुमचा विश्वास, पूर्णपणे जिंकलेला आहे. आणि मी तुमच्यावर किती विश्वास टाकतो, हे दाखवून दिले आहे.” एवढे बोलून तो उठला. “मग मी तुमची आयफोर्डला ११. १५ वाजता वाट बघतो.”

“मी तेव्हा, नक्की तिथे येतो.”

“आणि कुणाला एक अक्षरही बोलायचे नाही.” त्याने माझ्याकडे शेवटचे लांब, प्रश्नार्थक नजरेने पाहिले. मग थंड, ओलसर हाताने, माझा हात दाबत तो घाईने निघून गेला.

नंतर मी जेव्हा याबद्दल, शांतपणे विचार केला, तेव्हा मला माझ्यावर अचानकपणे सोपवलेल्या या कामगिरीचे आश्चर्य वाटले. ते तुम्हाला दोघानाही वाटले असेल. एका बाजूने मी अर्थात, आनंदी होतो, कारण बाहेर कुठे मी हे काम केले असते, तर मला याच्या एक दशांश, एवढेच पैसे मिळाले असते. या कामामुळे अजून असलीच कामे, मिळण्याची शक्यता होती. तर दुसरीकडे माझ्याकडे आलेल्या माणसाचा चेहरा व पद्धत, याबद्दल माझे फारसे बरे मत, बनले नव्हते. जरी फुलर्स अर्थचे काम असले तरी, त्यासाठी रात्री येण्याचे, त्याचे स्पष्टीकरण मला पटले नव्हते. मी तिथे जाण्यासाठी करणार असलेल्या प्रवासाबद्दल, मौन बाळगण्यासाठी तो दाखवत असलेली अति काळजीदेखील, मला अवाजवी वाटत होती. तरीही सर्व शंका दूर सारून, मी जेवण करून पॅडीग्टनला पोचून ठरल्याप्रमाणे, त्यांनी अरेरावीने सांगितल्याप्रमाणे कुठेही वाच्यता न करता, मार्गस्थ झालो.

रीडिंगला मला डबाच नव्हे तर स्टेशनदेखील बदलावे लागले. पण मी आयफोर्डसाठीची शेवटची गाडी पकडली व अत्यंत मिणमिणता उजेड असलेल्या स्टेशनवर, पोचलो. तिथे उतरणारा, मी एकटाच उतारू होतो. फलाटावर कंदील घेतलेला, एक झोपाळू हमाल होता. मी छोट्या दारातून बाहेर पडलो आणि सकाळी माझ्याकडे आलेला माणूस, तिथे दुसऱ्या बाजूला उभा राहून, माझी वाट बघताना मला दिसला. एकही शब्द न बोलता, त्याने माझा दंड पकडून, घाईने मला दार उघडे असेल्या गाडीत बसवले. त्याने दोन्ही बाजूंच्या खिडक्या उघडल्या. लाकडावर थाप मारली व घोडे जितके जलद पळतील, तितक्या वेगाने आम्ही निघालो.”

होम्सने मध्येच विचारले, “एक घोडा?’

“हो एकच घोडा.”

“घोड्याचा रंग तू पाहिलास का?”

“हो. मी टांग्यात बसताना, बाजूच्या उजेडात तो पाहिला. तो चकचकीत विटकरी रंगाचा होता.”

"दमलेला दिसत होता, की ताजातवाना?”

“ओहो, तो उत्साही व झगमगता दिसत होता.”

“आभारी आहे. तुमच्या बोलण्यात खंड पाडल्याबद्दल क्षमस्व. तुमचे दिलचस्प सांगणे चालू ठेवा.”

“आम्ही बरेच दूर गेलो. तासभर तरी आम्ही चाललो होतो. कर्नल लायसँडर स्टार्क म्हणाला होता, की अंतर फक्त सात मैल आहे पण आम्ही ज्या वेगाने चाललो होतो व जितका वेळ चाललो होतो, त्यावरून असे वाटले, की ते सुमारे बारा मैल असावे. सर्व वेळ तो माझ्या शेजारी मुकाट्याने बसून होता. माझ्या लक्षात आले, की मी त्याच्या दिशेने बरेचदा नजर टाकली तेव्हा तो माझ्याकडे खूप ताण घेऊन बघत होता. त्या गावठी भागातील रस्ते, काही चांगले नव्हते. कारण आम्ही वेडेवाकडे धक्के, खात होतो. मी खिडकीतून बाहेर बघून, आम्ही कुठे आलो आहोत, ते बघत होतो पण खिडकीच्या अपारदर्शक काचांमुळे, फक्त मधूनमधून सरकणारा थोडासा प्रकाश सोडून, काही दिसत नव्हते. प्रवासातील एकसुरीपणा घालवण्यासाठी, मी काही ताशेरे झाडत होतो पण कर्नल एखाद्या शब्दात उत्तर देऊन, माझी बोळवण करत होता. शेवटी खाबडखुबड रस्ता संपून, थोडा गुळगुळीत रस्ता चालू झाला. घोडागाडी थांबली. कर्नल लायसँडर स्टार्कने, बाहेर उडी मारली. मी देखील त्याच्या पाठोपाठ उतरलो व आमच्यापुढील पोर्चच्या दिशेने, निघालो. आम्ही गाडीतून उतरून, लगेच हॉलमध्ये प्रवेश केला. त्यामुळे मला घरासमोर, एक ओझरता कटाक्ष टाकता आला नाही. मी आत शिरल्याबरोबर, धाडकन दरवाजा बंद झाला. मला घोडागाडी दूर गेल्याचा, अस्पष्ट आवाज आला. घरात मिट्ट काळोख होता. कर्नल काडेपेटीसाठी चाचपडत होता आणि काही पुटपुटत होता. अचानक पॅसेजच्या दुसऱ्या टोकाचे दार उघडले व आमच्या दिशेने लांब प्रकाशाची तिरीप पडली. ती जास्त रुंद होत गेली आणि त्यापाठोपाठ हातात दिवा घेतलेली एक बाई, अवतीर्ण झाली. तो दिवा तिने डोक्यावर धरला होता. ती चेहरा पुढे काढून आमच्याकडे बघत होती. तिचा चेहरा सुंदर असलेला, मला दिसत होता आणि तिची वस्त्रप्रावरणे उंची होती.

ती परदेशी भाषेत, प्रश्नार्थक असे काही बोलली, तेव्हा कर्नलने एका शब्दात, काही असंबद्ध उत्तर दिले. तिने अशी काही हालचाल केली, की तिच्या डोक्यावरून दिवा जवळजवळ पडणारच होता.

तो दार उघडत म्हणाला, “काही मिनिटे तुम्ही इथे थांबा. ती एक लहानशी, शांत व मोजके फर्निचर असलेली खोली होती. मधोमध एक गोल टेबल होते. त्यावर बरीच जर्मन पुस्तके वेडीवाकडी पडली होती. दाराशेजारील बाजाच्या पेटीवर कर्नल स्टार्कने दिवा ठेवला. ”मी तुम्हाला क्षणभरसुद्धा, ताटकळत ठेवणार नाही.’ असे म्हणून, तो अंधारात अदृश्य झाला. मी टेबलावरील पुस्तकांवर नजर फिरवली. आणि मला जर्मन येत नसले तरी, त्यातील दोन पुस्तके, पद्धतशीरपणे  लिहिलेली शास्त्राची, पुस्तके होती. इतर पुस्तके कवितांची होती. मग मी खिडकीपाशी गेलो. मला गावाचा काही भाग दिसेल, असे वाटले. पण एक जाड गज बसवलेले ओकचे शटर तिथे मध्ये येत होते. नवल वाटेल इतके, ते घर शांत होते. पॅसेजमध्ये कुठेतरी जुने घड्याळ, टिकटिक करत होते. पण बाकी सगळीकडे, स्मशानशांतता होती. माझ्यात अस्वस्थपणाची भावना वाढू लागली. हे कोण जर्मन लोक होते आणि अशा विचित्र, आडगावी राहून, ते काय करत होते? आणि ही जागा नक्की आहे तरी कुठे? आयफोर्डपासून मी दहा मैलांवर होतो, एवढेच मी जाणत होतो. पण कुठल्या दिशेला, उत्तर, दक्षिण, पूर्व की पश्चिम ते मला माहिती नव्हते. तसे पाहिले तर रीडिंग व इतर मोठी शहरे, कदाचित जवळ होती. हे गाव, तसे एकाकी नसेलही. पण हे नक्की होते, की हा भाग इतका शांत होता, की आम्ही नक्की आडगावात होतो. मी एक गाणे गुणगुणत, खोलीत फेऱ्या मारल्या. मला पन्नास गिनीज मिळणार आहेत हे आठवून, माझे मनोबल मी वाढवले. अचानक सुनसान शांततेतून, करकर आवाज करत खोलीचे दार उघडले. फटीत ती बाई उभी होती. तिच्यामागे अंधार होता आणि माझ्या खोलीतील टेबलावरील दिव्याचा प्रकाश तिच्या उत्सुक, सुंदर चेहऱ्यावर पडला होता. ती भीतीने थरथर कापत असल्याचे, मी पाहिले. आणि ते दृष्य माझे हृदय चिरत गेले. तिने तोंडावर बोट ठेऊन, मला गप्प बसण्यास सुचवले. नंतर ती काही, मोडकेतोडके इंग्लिश शब्द पुटपुटली. तिचे घाबरलेले डोळे, मागे अंधारात बघत होते.

“मी जाते.” खूप प्रयत्न करून ती शांतपणे म्हणाली, “मी जाते. मी इथे रहायला नको. तुम्ही पण इथे राहिलेले चांगले नाही.”

मी म्हणालो, “पण बाईसाहेब, मी ज्यासाठी इथे आलो, ते काम तर अजून, झालेले नाही. मी मशीन पाहिल्याशिवाय, इथून निघू शकत नाही.”

ती बोलत राहिली, “इथे तुम्ही थांबणे, ठीक नाही. तुम्ही दारातून निघून जाऊ शकता. कोणी तुम्हाला काही बोलणार नाही.” नंतर मी हसून डोके हलवलेले पाहून, तिने तिचे बंधन दूर सारले व हातात हात घालून, एक पायरी पुढे आली व कुजबुजली, “देव तुमच्यावर दया करो. खूप उशीर होण्यापूर्वी इथून निघून जा.”

“पण मी स्वभावतः डोक्याने मजबूत असल्याने, माझ्या बाबतीत काही अडथळा आला, तर उलट मी चवताळून, त्याचा सामना करायला सज्ज होतो. मी माझ्या कष्टप्रद प्रवासाचा व मला मिळणाऱ्या पन्नास गिनीजचा, विचार केला. माझ्यासमोरील सुखावह नसलेल्या, रात्रीचाही विचार केला. काही न करता, निघून जावे का? मी काम न करता व मोबदला न घेता, पळून का जावे? ही बाई काहीतरी फुगवून सांगत असेल. मला जरी त्या बाईने घाबरवले असले, तरी ठाम निर्धाराने, शरण जाण्यापेक्षा, इथे रहाण्याच्या माझ्या निश्चयावर, मी शिक्कामोर्तब केले. ती परत विनवणी करायच्या बेतात असताना, दार थोडे उघडले गेले व जिन्यावर बराच पदरव ऐकू आला. तिने क्षणभर तो ऐकला आणि नंतर निराशा दाखवत, हात वर केले व जशी आली, तशीच अचानक अदृश्य झाली.

नव्याने आलेले लोक कर्नल लायसँडर स्टार्क व एक बुटका, जाड व हनुवटीच्या वळयांवर दाढी उगवलेला मिस्टर फर्ग्युसन होता, त्याची माझ्याबरोबर ओळख करून दिली गेली. कर्नल बोलला, “हा माझा सचिव आणि व्यवस्थापक आहे. तसेही मला असे वाटत होते, मी आत्ताच हे दार लावले होते. बहुधा तुम्हाला उकडत असावे.”

मी म्हणालो, “मी स्वतः दार उघडले, कारण मला ही खोली जरा बंदिस्त वाटली.”

त्याने माझ्याकडे एक संशयी नजर फेकली व म्हणाला, “कदाचित आपण कामाला लागावे ते बरे. मिस्टर फर्ग्युसन व मी तुम्हाला मशीन दाखवायला, घेऊन जातो.”

“मला वाटते, मी माझी टोपी घातलेली बरी.”

“नको. आपण घरात, जाणार आहोत.”

“काय? तुम्ही फुलर्स अर्थ, घरात खणले आहे?”

“नाही. नाही. तिथे आम्ही ते दाबून ठेवले आहे. पण त्याचा फार विचार, करू नका. तुम्ही मशीन बघून, त्यात काय बिघाड झाला आहे, तेवढे फक्त सांगा.”

आम्ही तिघेही, बरोबर वरती गेलो. प्रथम हातात दिवा घेऊन कर्नल, जाडा व्यवस्थापक आणि नंतर त्याच्या मागे मी, असे वर गेलो. ते गुंतागुंतीचे बोळ, पॅसेजेस, सज्जे, लहान व बुटके दरवाजे आणि अरुंद गोलाकार जिने असलेले, घर होते. घराचे उंबरठे अनेक पिढ्यांच्या वावराने खोलगट झाले होते. तळमजल्याच्या वरील मजल्यावर, गालिचा व फर्निचर नव्हते. भिंतीचा गिलावा, निघू लागला होता व ओलसर डाग पडले होते. मी माझे लक्ष नसल्याचे, दाखवत होतो पण त्या बाईने सांगितलेले काहीही, मी विसरलो नव्हतो. मी माझ्या दोन सहकाऱ्यांवर, लक्ष ठेऊन होतो. मिस्टर फर्ग्युसन हा शांत, पण स्वभावाने वाईट मनुष्य दिसत होता. पण तो जे काही बोलत होता, त्यावरून तो खास गावाकडचा माणूस वाटत होता.

कर्नल लायसँडर स्टार्क, शेवटी एका बुटक्या दारासमोर थांबला व ते त्याने उघडले. आत एक लहान चोकोनी खोली होती. त्यात आम्ही तिघे कसेबसे मावत होतो. फर्ग्युसन बाहेर उभा राहिला व कर्नलने मला आत नेले.

तो बोलला, “आता आपण, जलशास्त्रीय प्रेसजवळ आलो आहोत. जर कुणी तो सुरु केला असेल, तर ते आपल्यासाठी चांगले नाही. या खोलीचे छत म्हणजे खरे तर खाली येणाऱ्या तरफेचा शेवट आहे. ते काही ताणांच्या जोराने, खालच्या धातूच्या जमिनीवर येते. बाहेरून जोरात पाणी येणारे जमिनीला समांतर असे लहान पाईप आहेत. त्याना जोर मिळतो, तो तुम्हाला माहिती असलेल्या पध्दतीने, वाढवला जातो. मशीन अजूनही चालते. पण ते जड झाले आहे पूर्वीसारखे योग्य रीतीने, चालत नाही. त्याचा जोर, कमी झाला आहे. कदाचित तुम्ही ते बघून, नीट सुरु करू शकाल किंवा निदान त्यासाठी काय दुरुस्ती करावी लागेल ते सांगाल, अशी आम्ही आशा करतो.

मी त्याच्याकडून दिवा घेतला. व मशीन निरीक्षणपूर्वक, बघू लागलो. ते खूपच मोठे होते. आणि बराच दाब निर्माण करू शकत होते. मी बाहेर जाऊन, नियंत्रण करणारा खटका दाबला, तेव्हा मला काही आवाजांवरून लगेच कळले, की जिथून पाणी सिलिंडरच्या बाजूने वेगात परत वर येते, तिथे थोडी गळती होत होती. एका रॉडचा वॉशर ( रबरी चकती ) खराब झाला होता व त्यामुळे तो खोबणीत योग्य रीतीने बसत नव्हता. त्यामुळे मशीनचा शक्तिपात होत होता, हे नक्की. ते मी माझ्या सहकाऱ्यांना, सांगितले. त्यांनी ते लक्षपूर्वक ऐकून घेतले व ते नीट करण्यासाठी त्याना काय करावे लागेल, याबद्दल त्यांनी बरेच प्रात्यक्षिक प्रश्न विचारले. जेव्हा मी त्याना, ते सगळे खुलासेवार सांगितले, तेव्हा मी मशिनच्या मुख्य खोलीकडे आलो. त्याकडे माझे कुतूहल शमेपर्यंत, बघितले. एका दृष्टीक्षेपात, हे कळत होते की फुलर्स अर्थसाठी, एवढे शक्तिमान मशीन वापरणे, योग्य नव्हते. भिंती लाकडाच्या होत्या. पण जमीन लोखंडी होती. मी तिची पहाणी केल्यावर, मला त्यावर, सगळीकडे धातूचा थर दिसला. मी थांबून ती नक्की कशाची बनली आहे,

हे खरवडून बघत असताना, मी जर्मनमध्ये काही कुजबुज ऐकली. उतरलेल्या चेहऱ्याने कर्नल माझ्याकडे बघत होता.

“तुम्ही तिकडे काय करत आहात?” त्याने विचारले.

मला एवढी लांबलचक गोष्ट सांगून, फसवल्याबद्दल राग आला. मी म्हणालो, “मी तुमच्या फुलर्स अर्थच्या प्रकल्पाची स्तुती करत होतो. नक्की कुठल्या उद्देशाने हे मशीन बसवले गेले आहे, हे मला समजले, तर मी तुम्हाला अधिक योग्य तऱ्हेने सल्ला देऊ शकेन.”

मी ते शब्द उच्चारताच, मला त्यातील रांगडेपणा लक्षात आला व मी चुटपुटलो. त्याचा चेहरा कठोर झाला व धमकीयुक्त रागाने, त्याचे करडे डोळे चकाकू लागले.

तो म्हणाला, “फार छान! तुम्हाला मशीनबद्दल आम्ही सगळे काही सांगतो.” तो एक पाऊल मागे गेला. लहान दार जोरात ढकलून करून कुलुपबंद केले. मी जोरात तिथे धावत गेलो व ते उघडण्याचा प्रयत्न केला. पण ते जाम झाले होते. मी जोरात लाथा व धक्के मारले. “हॅलो! हॅलो, कर्नल! मला बाहेर काढा.” मी ओरडत सुटलो.

आणि त्या शांततेत मी एक आवाज ऐकला, ज्यामुळे माझे काळीज गोठून गेले. तो त्या खटक्याचा व पाण्याचा जोरदार प्रवाह सिलिंडरमधून निघाल्याचा, कानठळ्या बसवणारा आवाज होता. मी जिथे निरीक्षण करून, दिवा ठेवला होता, तिथेच तो अजून होता. त्याच्या उजेडात मी पाहिले की काळे छत हळूहळू धक्के देत, माझ्या अंगावर येत होते. ते इतक्या जोराने येऊन माझ्यावर आदळले असते, की माझे चिपाडच झाले असते. मी किंचाळत, नखांनी कुलूप ओरबाडत, दार ढकलत राहिलो. मी कर्नलकडे मला बाहेर काढून, दया दाखवण्याविषयी, भीक मागत राहिलो, पण त्या बेमुर्वतखोर मशीनच्या घरघराटापुढे, माझा आवाज येत नव्हता. छत माझ्या डोक्यापासून फक्त एकदोन फुटावर होते. माझ्या वर केलेल्या हाताला तो खडबडीत स्पर्श होत होता. नंतर मला जाणवले की माझ्या मृत्यूची वेदना मी कसा झोपलो आहे त्यावर ठरणार होती. जर मी माझ्या चेहऱ्यावर झोपलो असतो तर, तर माझ्या कण्यावर भार आला असता आणि त्या भयानक विचाराने मी हादरलो. कदाचित दुसऱ्या तऱ्हेने झोपून बघावे का? मला ते काळे छत माझ्या डोळयादेखत माझ्यावर कोसळताना बघवले असते का? आधीच मला ताठ उभे रहाणे, शक्य नव्हते. पण मला असे काही दिसले, की माझ्या मनाच्या कोपऱ्यात आशेचा किरण चकाकून गेला.

जमीन व छत लोखंडी असल्याचे मी जरी म्हटले होते तरी, भिंती लाकडाच्या होत्या. मी आसपास एक झटपट दृष्टीक्षेप टाकला आणि मला लाकडामधून एका फटीतून, पिवळसर उजेड येताना दिसला. ती फट मी फाकवली, तसा तो उजेड वाढू लागला. आणि एक फळी बाहेरच्या बाजूस तुटून पडली. माझी मरणातून सुटका करणारे दार उघडले आहे, यावर माझा क्षणभर विश्वासच बसेना. पुढच्याच क्षणी मी मला त्यातून बाहेर लोटून दिले. मी दुसऱ्या बाजूला अर्धवट बेशुद्धावस्थेत पडलो. माझ्यामागे ती झापड बंद झाली. पण दिवा चेचला गेला आणि छत व फरशी एकमेकांवर आदळले. मी अगदी थोडक्यात बचावलो होतो.

माझ्या मनगटाला बसलेल्या एका रानटी चिमट्याने मी शुद्धीवर आलो. मी एका अरुंद पॅसेजच्या दगडी राशीवर पडलो होतो. एक बाई माझ्यावर ओणवून, मला तिच्या डाव्या हाताने, ओढत होती.  तिच्या उजव्या हातात, मेणबत्ती होती. ही तीच चांगली व्यक्ती होती, जिचे सांगणे मी मूर्खपणाने धुडकावून लावले होते.

ती धापा टाकत ओरडली, “इकडे ये. तू तिकडे खोलीत नाहीस, हे बघून ते क्षणार्धात इथे येतील. ओहो, इतका मूल्यवान वेळ दवडू नकोस. लगेच ये.”

यावेळेस निदान मी तिचे ऐकले. मी लडखडत तिच्याबरोबर पळू लागलो. वळसेदार जिन्याने खाली आलो. नंतर अजून एक पॅसेज लागला. आणि तिथे पोचताच आम्हाला धावणाऱ्या पायांचा व दोघांचा ओरडण्याचा आवाज येऊ लागला. एकजण आतून बोलत होता व दुसरा उत्तर देत होता. माझी मार्गदर्शक थांबली व तिच्या बुद्धीचे टोक गाठत, इकडेतिकडे बघू लागली. मग तिने एक दार उघडले. ते झोपायच्या खोलीकडे, जात होते. त्या खोलीच्या खिडकीतून, चंद्र चमकताना दिसत होता.

ती ओरडली, “ही एवढीच संधी आहे. ती खिडकी जरा उंच आहे. पण कदाचित, तू उडी मारू शकशील.”

ती बोलत असताना, पॅसेजच्या दुसऱ्या टोकाकडून, प्रकाशाची तिरीप पडली. आणि चालत येणारी कर्नल लायसँडर स्टार्कची वेगाने पुढे येणारी आकृती मला दिसली. त्याच्या एका हातात, कंदील होता तर दुसऱ्या हातात खाटकाचा सुरा होता. मी जोरात, खिडकीच्या दिशेने धावलो. ती उघडून बाहेर पाहिले. चंद्रप्रकाशात, बाग किती शांत, गोड व शुभशकुनाची दिसत होती. ती तीस फुटापेक्षा खोल नसावी. मी खिडकीबाहेरील पॅरापिटवर चढलो. पण उडी मारायचा धीर होईना. माझी जीवरक्षक बाई व माझा पाठलाग करणारे हैवान, हे मी एकमेकांसमोर पाहिले. जर तिला काही दगाफटका झाला असता, तर तिच्या मदतीला जाण्याचे, मी ठरवले. असा विचार

मी करतो न करतो तोच, तो दाराशी आला. तिला ओलांडून, तो पुढे येणार तोच तिने दोन्ही हात त्याच्याभोवती टाकून, त्याला मागे ढकलायचा प्रयत्न केला.

“फ्रीत्झ! फ्रीत्झ! मागच्या वेळेनंतर तू दिलेले वचन आठव. हे परत होणार नाही, असे तू म्हणाला होतास. तो काही बोलणार नाही. तो शांत राहील.” ती इंग्लिशमध्ये ओरडली.

तो किंचाळून तिला विरोध करत म्हणाला, “तू वेडी झाली आहेस, इलीस. तू आमचा नाश करशील. तो अति करतो आहे. मला जाऊदे, चल बाजूला हो. त्याने तिला एका बाजूला फेकले. आणि खिडकीत येऊन माझ्यावर त्याच्या जड शस्त्राने, वार करायचा प्रयत्न केला. तो मला चाटून गेला. मी उडी मारायच्या प्रयत्नात पॅरापिटला लोंबकाळू लागलो व त्याचा नेम चुकला. मला थोडे दुखत असल्याचे जाणवले. माझी पकड सैल झाली आणि मी खालील बागेत पडलो.

मी हादरलो, पण मला फार काही लागले नाही. त्यामुळे मी उठून झुडूपांमधून, जितक्या जोरात पळता येईल, तितक्या जोरात पळू लागलो. मला वाटले, की आता मला काही धोका नाही. तरी अचानक, मी पळत असताना मला एकदम आजारी असून डोळयापुढे अंधारी आल्यासारखे, वाटू लागले. मी माझ्या हाताकडे पाहिले तर, तो भयानक रित्या दुखत होता. आणि मग, पहिल्यांदा मी, माझा अंगठा कापला गेलेला पाहिला. त्या जखमेतून रक्त वहात होते. मी माझा रुमाल, त्याभोवती बांधायचा प्रयत्न केला. पण माझ्या कानातून गुणगुणल्यासारखे, काही आवाज येऊ लागले. दुसऱ्याच क्षणी, मी गुलाबांच्या झुडुपांमध्ये, मेल्यासारखा कोसळलो.

मी किती वेळ बेशुद्ध होतो, कुणास ठाऊक? खूप वेळ असणार. कारण मी भानावर आलो तेव्हा चंद्र मावळला होता. आणि पहाट होत होती. माझे कपडे दंवाने भिजले होते. माझ्या अंगठ्याच्या जखमेमधून वाहणाऱ्या रक्ताने, कोटाची बाही पूर्ण ओली झाली होती. क्षणार्धात, मला रात्री मी केलेले साहस आठवले. आणि मी ताडकन माझ्या पायांवर उठून उभा राहिलो. मी माझ्या पाठलाग करणाऱ्यांपासून, सुरक्षित आहे की नाही, मला कळत नव्हते. पण आश्चर्य म्हणजे मी माझ्या भोवती पाहिले, तेव्हा मला घर किंवा बाग, यापैकी काहीच दिसत नव्हते. मी हायवेच्या कुंपणालगत पडलो होतो. आणि खाली थोड्याच अंतरावर एक इमारत होती. नशिबाने मी आदल्या रात्री जिथे उतरलो, तेच ते स्टेशन होते. माझ्या हातावरची ती कुरूप जखम, मी यापूर्वी घालवलेले भयानक तास, बहुधा एक दुःस्वप्न असावे.

अर्धवट जागृतावस्थेत मी स्टेशनवर गेलो आणि सकाळच्या गाडीबद्दल विचारले. रीडिंगसाठीची गाडी एक तासाच्या आत होती. मी आलो तेव्हा जो हमाल तिथे होता, तोच हमाल तिथे काम करत होता. मी त्याने कधी कर्नल लायसँडर स्टार्कचे नाव ऐकले आहे का, असे विचारले.

ते नाव त्याला माहिती नव्हते. त्याने काल रात्री माझ्यासाठी थांबलेली घोडागाडी पाहिली होती का असे विचारल्यावर, तो नाही म्हणाला. इथे जवळपास पोलीस स्टेशन आहे का, असे मी विचारले. तीन मैलावर एक असल्याचे कळले.

मी अशक्त व आजारी असल्याने, ते अंतर, मला जाण्यासाठी फारच लांब होते. माझी गोष्ट पोलिसाना सांगण्यापूर्वी मी परत माझ्या गावात जाण्याचे ठरवले. मी तिथे आलो तेव्हा सहा वाजून गेले होते. म्हणून मी पहिल्यांदा, माझ्या जखमेवर मलमपट्टी करण्यासाठी हालचाल करायचे, ठरवले. नंतर तो डॉक्टर दयाळू निघाल्याने मी इथे पोचलो. मी माझी केस तुमच्यावर सोपवतो. तुम्ही द्याल तो सल्ला मला मान्य असेल."

त्याची जगावेगळी गोष्ट ऐकून, आम्ही काही वेळ सुन्न होऊन बसलो. नंतर शेरलॉक होम्सने शेजारील मांडणीवरुन जडपणे एक पुस्तक काढले. त्यात त्याने एक कात्रण ठेवले होते.

तो म्हणाला, "ही एक जाहिरात आहे. ही बहुधा, तुला रुची वाटेल अशी आहे. सुमारे एक वर्षापूर्वी, सर्व वर्तमानपत्रातून ती आली होती. तर ऐकः '९ तारखेला, मिस्टर जेरेमिआ हेलिंग हरवले आहेत. वय २६, जलशक्तीशास्त्र इंजिनिअर. रात्री दहा वाजता त्यांचे रहाण्याचे लॉज सोडले. आणि त्यानंतर कुठे दिसले नाहीत. त्यांच्या अंगावर अमुक तमुक कपडे होते. इत्यादी.' मला वाटते तेव्हा कर्नलला मशीन दुरुस्तीची गरज असावी."

माझा रुग्ण ओरडला, "अरे बापरे! म्हणजे ती बाई म्हणाली, ते स्पष्ट होते आहे."

"नक्कीच. हे स्पष्ट आहे की कर्नल थंड व हताश मनुष्य होता. त्याला खात्रीपूर्वक वाटत होते की त्याच्या दुष्ट बेताचा कुणाला सुगावा लागणार नाही. पकडलेल्या माणसाला त्या दुष्ट लबाडांनी काय केले, त्याचा काही मागमूस कुणाला लागणार नाही. हे बघ, आता प्रत्येक क्षण मोलाचा आहे, असे जर तुला वाटत असेल, तर आपण ताबडतोब, स्कॉटलंड यार्ड पोलीस स्टेशनला जाऊ व आयफोर्डची केस सुरु करू."

साधारण तीन तासांनंतर आम्ही सगळे, रीडिंग पासून लहानशा बर्कशायर गावाला जाणाऱ्या गाडीत एकत्र होतो. शेरलॉक होम्स, स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर ब्रॅडस्ट्रीट, मी, एक साध्या वेषातील माणूस व तो जलशास्त्र इंजिनिअर असे सगळे. ब्रॅडस्ट्रीटने त्या गावात बंदुकधारी पोलीस तैनात करून ठेवले होते. त्याच्याकडील नकाशात त्या लबाड लोकांचे आयफोर्डमधील ठिकाण खूण करून ठेवण्याच्या कामात, तो दंग होता. तो ओरडला, "सापडले. आयफोर्डपासून दहा मैलांवर ते ठिकाण सापडले असून, मी नकाशात मी त्यावर, गोल काढून ठेवला आहे.

आपल्याला हवी असलेली जागा तिथेच जवळपास असणार. सर, मला वाटते, तुम्ही दहा मैल म्हणालात, नाही का?"

"ते जवळजवळ एक तासाचे अंतर होते.

"आणि तुम्हाला वाटते, की बेशुद्ध असताना त्यांनी तुला, त्या रस्त्याने आणले?"

"त्यांनी नक्कीच असे केले असले पाहिजे. मला नीट आठवत नाही. मला उचलून कुठेतरी नेले एवढेच मला आठवते आहे."

मी म्हणालो, "मला हे कळत नाही की तू त्याना बागेत चक्कर येऊन पडलेला दिसलास, तेव्हा त्यांनी तुला पकडले का नाही? बहुधा त्या बाईचा विनवणीचा तो परिणाम असावा."

"मला नाही वाटत, की असे झाले असेल. दुष्ट कृत्य करण्यापासून थांबवता न येणारा असा चेहरा, मी माझ्या आयुष्यात पाहिलेला नाही."

ब्रॅडस्ट्रीट म्हणाला, "लवकरच आपण ही भानगड निस्तरू. आता मी आपल्याला जायच्या जागेभोवती गोल तर केला आहे. पण यातील नेमक्या कोणत्या ठिकाणी हे लोक आपल्याला सापडतील?"

होम्स शांतपणे बोलला, "मला वाटते मी माझे बोट त्यावर ठेऊ शकतो."

इन्स्पेक्टर ओरडला, "खरंच का? मग ठेव. तू तुझे मत सांगितलेस. आता आपण असे बघू, तुझ्याशी कोण सहमत आहे .मला वाटते दक्षिण, कारण तिथे जास्त ओसाड भाग आहे."

माझा रुग्ण म्हणाला, "मी म्हणतो पूर्व."

साधे कपडे घातलेला माणूस बोलला, "मी पश्चिम दिशा म्हणेन. तिथे खूप लहान, शांत गावे आहेत."

मी म्हणालो, "मी उत्तर म्हणेन. कारण तिथे टेकड्या नाहीत. आपला मित्र म्हणाला की गाडीला चढ जाणवला नाही."

इन्स्पेक्टर हसत ओरडला, "वा! काय मतमतांतरे आहेत. आपली दिशा ठरलीच नाही. होम्स, आता तू कोणाच्या बाजूने मत देतोस?"

"तुम्ही सगळे चूक आहात."

“पण सगळे चूक असणे शक्य नाही.”

“ओहो, शक्य आहे. हे माझे म्हणणे आहे.” होम्सने गोलाच्या मध्यभागी बोट ठेवले. “इथे आपल्याला ते सापडतील.”

हॅथरले धापा टाकत बोलला, “पण बारा मैल कुठल्या दिशेने जायचे?”

“सहा पुढे व सहा मागे. याहून सोपे काही नाही. तू म्हणालास, तू आत बसलास तेव्हा, घोडे तुकतुकीत व ताजेतवाने दिसत होते. जर खराब रस्त्यांनी घोडा बारा मैल आला असेल, तर तो तसा कसा दिसेल?”

“खरंच, मग हे खोटे वाटते आहे. अर्थात, त्या टोळीच्या गैरकृत्यांबद्दल, काही वाद नाही.”

होम्स म्हणाला, “काहीच वाद नाही. खोटी नाणी पाडणाऱ्या, टांकसाळी चालवणारे अनेक लोक आहेत.”

हे लोक चांदीसारखा एक मिश्रधातू बनवण्यासाठी मशीन वापरतात.”

इन्स्पेक्टर म्हणाला, “अशी एक टोळी आम्हाला माहिती होती. ते अशी हजारो नाणी बनवत असत. आम्ही रीडिंगमध्ये त्यांचा शोध घेतला होता. पण काही सापडले नाही. कारण त्यांनी त्यांचे बेत इतके गुप्त ठेवले होते व सर्वजण म्हातारे असल्याचे भासवले होते. पण आता ही चांगली संधी आली आहे. मला वाटते, ते आपल्याला नक्की सापडतील.”

पण इन्स्पेक्टरचा तो गैरसमज होता. कारण त्या गुन्हेगारांचे नशीब, पोलिसांच्या हाती लागण्याचे नव्हते. आम्ही आयफोर्ड स्टेशनला पोचलो, तेव्हा आम्हाला काही झाडांच्या दाटीमागे, एक भला मोठा धूर ओकणारा पोकळ खांब दिसला. त्या माळरानावर तो एखाद्या महाकाय शहामृगासारखा दिसत होता.

गाडी परत चालू झाल्यावर ब्रँडस्ट्रीटने विचारले, “घराला आग लागली आहे की काय?”

स्टेशनमास्तर बोलला, “हो, सर.”

“कधी लागली?”

“सर, मी असे ऐकले, की आग रात्री लागली. पण ती भडकली व आता ती सर्व जागा, आगीने धुमसते आहे.”

“ते कुणाचे घर आहे?”

"डॉ बेचर यांचे."

इंजिनिअर मध्येच बोलला, "मला सांगा, डॉ बेचर जर्मन आहे का? अगदी बारीक व मोठे धारदार नाक असलेला?"

स्टेशनमास्तर मनापासून हसला. "नाही सर, तो इंग्लिश आहे. आणि त्याच्यापेक्षा चांगला कोट घालणारा या भागात कुणी नाही. पण माझ्या माहितीप्रमाणे, त्याच्याबरोबर एक रुग्ण रहात होता. तो परदेशी होता आणि तो कुणाला त्रास न देणारा, बर्कशायरचा चांगला छोटा माणूस वाटे.'

स्टेशनमास्तरचे बोलणे संपण्यापूर्वीच, आम्ही आगीच्या दिशेने निघण्याची घाई करू लागलो. रस्त्यावर एक छोटीशी टेकडी होती आणि आमच्या समोर एक पांढऱ्या रंगाची, इमारत होती. त्यातील प्रत्येक फटीतून व खिडकीतून, आग भडकलेली दिसत होती. त्यासमोरील बागेत तीन आगीचे बंब आग विझवण्याचा, निष्फळ प्रयत्न करत होते.

हॅथरले उद्दीपित होऊन ओरडला, "हेच ते! तिथे सुट्या दगडांची वाट आहे आणि मी पडलो होतो ती गुलाबाची झुडुपे आहेत. ती दुसरी खिडकी दिसते आहे, त्यातून मी उडी मारली.'

होम्स म्हणाला, "म्हणजे शेवटी, तू त्यांच्यावर सूड घेतलास. तुझा तेलाचा दिवा चिरडला जाताना, लाकडी भिंतीना आग लावून गेला असणार, यात काही संशय नाही. ते तुझा पाठलाग करताना फार पिसाटले होते, त्यामुळे तेव्हा, आगीचे त्यांच्या लक्षात आले नसणार, हे देखील आपण खात्रीपूर्वक सांगू शकतो. आता तुझ्या काल रात्रीच्या मित्रांसाठी, या गर्दीत तुझे डोळे उघडे ठेव. तरीही मला वाटते की ते एव्हाना, शेकडो मैल दूर गेले असतील."

आणि होम्सची भीती, खरी ठरली. कारण त्या दिवसापासून, त्या सुंदर बाईबद्दल, काहीतरी वाईट होणार आहे असे ज्याच्याकडे बघून वाटत होते, त्या जर्मनाबद्दल किंवा दुष्ट इंग्लिश माणसाबद्दल, एकही शब्द ऐकू आला नाही. एका शेतकऱ्याला, भल्या सकाळी गाडीतून खूप लोक अवजड पेट्या घेऊन, रीडिंगच्या दिशेने वेगात जाताना दिसले. ते अटक टाळण्यासाठी, काही मागमूस न ठेवता, नाहीसे झाले. होम्सच्या शोधक, हुशार नजरेलाही, त्यांचा काही माग काढता आला नाही.

त्या घरामधील विचित्र, आडवळणांची रचना पाहून सगळे आग विझवणारे चक्रावून गेले. आणि अजून म्हणजे दुसऱ्या मजल्याच्या खिडकीवर, एक नुकताच कापलेला मानवी अंगठा पडलेला बघून तर ते जास्तच घाबरले. शेवटी सूर्यास्ताच्या सुमारास, त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊन,

आग शमत आली. पण छत कोसळून सर्व वास्तू नाश पावली. फक्त काही लोखंडी पाईप व वेडेवाकडे झालेले सिलिंडर तिथे आढळले. आमचा पाहुण्याला भलतीच महागात पडलेली ती मशिनरी! तिचे मात्र काहीही अवशेष, राहिले नव्हते. घराबाहेरील गॅरेजमध्ये निकेल व टीनचे ढीगच्या ढीग, साठवून ठेवलेले आढळले. पण नाणी मिळाली नाहीत. आधी उल्लेख केले मोठे पेटारे, नक्कीच नाण्यांनी भरलेले असणार. आपला जलशक्तीशास्त्र इंजिनिअर बागेपासून, तो जिथे शुद्धीवर आला, त्या जागेपर्यंत कसा पोचला, हे एक कायमस्वरूपी गूढच राहिले. आपल्याला फक्त एक सरळसोट गोष्ट कळली. त्याला ज्या दोघांनी उचलून नेले त्यापैकी एकाचे पाय अगदी लहान होते, तर दुसऱ्याचे फार मोठे होते. एकंदर पहाता, इंग्लिश माणूस शांत व त्याच्या जर्मन सहकाऱ्यापेक्षा कमी धीट आणि कमी खुनी प्रवृत्तीचा असल्याने, बहुधा त्या बाईची मदत घेऊन, बेशुद्ध माणसाच्या सहाय्याला व त्याला धोकादायक स्थितीपासून वाचवायला, धावला असावा.

आम्ही लंडनला परत यायला निघालो, तेव्हा आमचा इंजिनिअर खंत करत, पण हसऱ्या चेहऱ्याने म्हणाला, “हा माझ्यासाठी मोठाच उद्योग झाला. मी माझा अंगठा आणि पन्नास गिनीज दोन्ही गमावले. आणि मला मिळाले काय?”

होम्स हसत बोलला, “अनुभव मिळाला. अदृष्य अशी त्याची काही किंमत असेल. असे बघ, हे शब्दांकित करून, तुला आयुष्यभर चांगली किर्ती मिळेल.”

# कॉपर बीच



दैनिक टेलेग्राफचे जाहिरातीचे पान बाजूला टाकत शेरलॉक होम्स बोलला, “स्वांतसुखाय जो कलेवर प्रेम करतो, त्याच्यासाठी सामाजिक दर्जा वगैरे, खूप कमी महत्वाचा असतो. त्याच्या प्रतिभेच्या साध्या आविष्कारातून त्याला, उच्च कोटीचा आनंद मिळतो. वॉटसन, मला आनंद वाटतो की तुला आतापर्यंत हे सत्य उमगले आहे की, आपल्या केसेसच्या तू अगदी चांगल्या पद्धतीने लिहिलेल्या लहानशा गोष्टी, या तू प्रसंगानुरूप त्यात रंजकता आणून लिहितोस. पण काही केसेस, ज्यात घटना फारशा महत्वाच्या नाहीत, पण ज्यात तर्क लढवून चार गोष्टींचा साकल्याने विचार करायला खूप वाव आहे, अशा केसेसच्या कामात मी माझा ठसा उमटवला आहे. अशा केसेसना, तू फारसे महत्व दिलेले नाहीस.”

मी हसत म्हणालो, “आणि तरीही, माझ्या लिखाणातून, माझ्यावरील भावनाशीलतेचा पगडा मी नाकारू शकत नाही.”

त्याने चिमट्याने एक विझत आलेला निखारा उचलून, त्याचा पाईप पेटवत, सवयीप्रमाणे पाईपमधील माती झटकली. जेव्हा तो शांतपणे विचार करायच्या मनस्थितीत नसून, वाद घालायच्या मनस्थितीत असतो तेव्हा तो नेहमी असेच करतो. "तू चुकतो आहेस. कदाचित, कारणापासून परिणामापर्यंतची तर्कशास्त्रीय संगती दाखवताना, तुझ्या प्रत्येक वाक्यात, रंग व जिवंतपणा भरायला तू विसरला आहेस. आणि तोच तर खरा, कुठल्याही गोष्टीचा, लक्षात घेण्यासारखा गुण आहे."

माझ्या मित्राच्या निर्विवादपणे उल्लेखनीय स्वभावातील, अहंमन्यता या प्रमुख गुणाचा, मला बरेच वेळा फटकारा बसलेला असल्याने, मी थंडपणे बोललो, "मला तरी वाटते, की मी या बाबतीत, पूर्ण न्याय दिलेला आहे."

नेहमीच्या सवयीप्रमाणे, तो माझ्या शब्दांपेक्षा, माझ्या विचारांना अनुलक्षून उत्तरादाखल म्हणाला, "नाही. तो स्वार्थ किंवा अहंमन्यता नाही. जी खासगी गोष्ट नाही अशी, माझी रहस्य उकलण्याची कला, -- माझ्या पलीकडची आहे, तिला पूर्ण न्याय द्यायचा असेल तर काय? गुन्हा करणे सर्वसामान्य आहे, पण त्याला तर्कशास्त्रीय दृष्टीने बघणे, हे क्वचित आढळणारे आहे. त्यामुळे लिहिताना, तुम्ही गुन्ह्यापेक्षा तर्कशास्त्राला जास्त महत्व द्यायला हवे. खूपशा गोष्टींमध्ये तू तर्कशास्त्रीय विधानांना डावलले आहेस."

ती वसंत ऋतुतील सुरवातीच्या दिवसांपैकी एक गारवा असलेली सकाळ होती. बेकर रस्त्यावरील आमच्या जुन्या खोलीत, आम्ही न्याहारीनंतर शेकोटीच्या बाजूला बसलो होतो. फिकट करड्या रंगांच्या घरांवर, धुक्याचा जाड थर पसरला होता. पूर्ण पिवळया पानाफुलांच्या पसाऱ्यातून समोरासमोरच्या खिडक्या गडद, आकारहीन व पुसट दिसत होत्या. आमचा दिवा चालू होता. टेबलावरील पांढऱ्या आच्छादनावर, बोन चायनाच्या कपबशांवर व धातूच्या भांड्यावर उजेड पडून चकाकत होता, कारण टेबल अजून, स्वच्छ केले नव्हते. शेरलॉक होम्स, सकाळभर गप्प होता. एकामागून एक वर्तमानपत्रांच्या जाहिरातींच्या रकान्यात पूर्ण बुडाला होता. शेवटी त्याने त्याचा शोध सोडून दिला व फारशा चांगल्या नसलेल्या मनोवस्थेत, मला माझ्या लिखाणातील दोषांबद्दल सांगू लागला. थोडा वेळ थांबून, पाईपमधून वलये सोडत व शेकोटीतील विस्तवाकडे निरखून बघत, त्याने पुढे चालू केले, "तू अगदी क्वचितच भावुकतेला तुझ्या लिखाणात स्थान देऊ शकतोस. कारण तू रस घेत असलेल्या इतक्या केसेसमध्ये तू गुन्ह्याकडे कायदेशीर दृष्टीकोनातून मुळीच बघत नाहीस. मी ज्यांना मदत केली असा बोहेमियाचा राजा,

मिस मेरी सुदरलँडचा वेगळाच अनुभव, वाकड्या ओठांच्या माणसाची समस्या, आणि उमद्या अविवाहिताचा प्रसंग; हा सर्व भाग कायद्याच्या फिकट छायेखाली अजिबात नव्हता. पण त्यातला भावनामय भाग टाळून, कमी महत्वाच्या भागावर तू जास्त लक्ष दिले आहेस, असे मला वाटते."

मी उत्तरलो, "शेवट कदाचित तसा झाला असेल, पण कादंबरीतील माझी लेखनशैली नक्कीच उत्सुकता वाढवणारी आहे."

"अरे, माझ्या प्रिय मित्रा, सर्वसामान्य लोक, ज्याना नीट निरीक्षण करता येत नाही असे सर्वसामान्य लोक, गवळण पक्ष्याला त्याच्या चोचीविषयी, किंवा मुद्रकाला त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याविषयी, विश्लेषणाच्या व निष्कर्ष काढायच्या जास्त चांगल्या पद्धतींबद्दल सांगू लागले तर! पण खरंच, तू जर तर्कशास्त्राला फार महत्व देत नसलास आणि कमी महत्वाच्या गोष्टींवरच लक्ष केंद्रीत करत असलास तरी, मी तुला दोष देऊ शकत नाही. कारण महान केसेसचे, दिवस संपले आहेत. माणूस, किंवा निदान गुन्हेगार माणूस, आव्हानात्मकता व नावीन्य हरवून बसला आहे. माझी थोडीफार जी काही कारकिर्द झाली, ती आता उताराला लागली असून ती म्हणजे, जुन्या शिसपेन्सिलींचे पुनरुज्जीवन करण्याचे व बोर्डिंग शाळेतील तरुण मुलीना उपदेश करण्याचे, कार्यालय राहिले आहे. मला वाटते, बहुतेक मी आता, तळ गाठला आहे. ही सकाळी मला आलेली चिठ्ठी, मला वाटते, शून्य आकडा दर्शवत आहे. ही वाच." त्याने एक चुरगळलेले पत्र माझ्याकडे फेकले.

ते मॉन्टेग्यु येथून, आदल्या संध्याकाळी लिहिले गेले होते. आणि असे होतेः

प्रिय मिस्टर होम्स, मी मला देण्यात आलेली गृहशिक्षिकेची नोकरी, मी स्विकारावी की नाही, याबद्दल तुमचा सल्ला मागण्यासाठी, मी फार उत्सुक आहे. तुम्हाला सोयीस्कर असल्यास, मी उद्या साडेदहा वाजता तुम्हाला भेटते. तुमची विश्वासू,

व्हायोलेट हंटर

मी विचारले, 'ही तरुण स्त्री कोण आहे, हे तुला माहिती आहे का?"

"नाही,"

"आता साडेदहा झाले आहेत."

"हो. आणि मला खात्री आहे, की तिनेच घंटी वाजवली आहे."

“तुझ्या अपेक्षेपेक्षा जास्त रुचीपूर्ण, अशी ही केस असू शकते. ते निळया गळवाचे प्रकरण, जे पहिल्यांदा केवळ अनाकलनीय असा, मानसिक बदल आहे असे वाटले, पण पुढे ते गंभीर अशा तपासात बदलले. तसेच या केसमध्येही असू शकेल.

“ठीक आहे. आपण तशी आशा करू. पण आपले प्रश्न लवकरच सुटतील, कारण जर मी चुकत नसेन, तर ती स्वतः आली आहे.”

तो असे बोलत असताना, दार उघडून एक तरुण स्त्री आत शिरली. तिचे कपडे व्यवस्थित होते. चेहरा उजळलेला व चलाख होता. पण उन्हाने त्यावर पक्ष्याच्या अंड्याच्या रंगाचे डाग पडले होते. ती स्वतंत्र्य वृत्तीची व घाईत असलेली वाटत होती. माझा मित्र तिला अभिवादन करण्यासाठी उठला, तेव्हा ती बोलली, “माझी खात्री आहे की तुम्हाला त्रास दिल्याबद्दल, तुम्ही मला क्षमा कराल. मला फार विचित्र अनुभव आला आहे. आणि मला सल्ला द्यायला, पालक किंवा कोणी नातेवाईक नसल्यामुळे, मला वाटले की तुम्ही दयाळूपणे, मी काय करावे ते सांगाल.”

“मिस हंटर, तुम्ही बसा. मी तुम्हाला मदत करू शकत असेन, तर नक्की करेन.”

या नव्या अशीलाच्या वागण्याबोलण्याने, होम्स चांगला प्रभावित झालेला, मला वाटला. त्याने तिला, त्याच्या शोधक पद्धतीने न्याहाळले व मग डोळे खाली वळवून, बोटे एकमेकात गुंतवून, तिची गोष्ट ऐकायला, तयार झाला.

ती म्हणाली, ”कर्नल मन्रो याच्या कुटुंबात, मी पाच वर्षे गृहशिक्षिका होते. पण दोन महिन्यांपूर्वी कर्नलची बदली, नोव्हा स्कॉटियाला, हॅलीफॅक्सला झाली. तो त्याच्या मुलाना बरोबर घेऊन, अमेरिकेला गेला. त्यामुळे मी बेकार झाले. मी जाहिरातीद्वारे, नोकरी मिळवायचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. मी साठवलेले पैसे शेवटी संपू लागले. आणि मला काय करावे ते कळेना. पश्चिमेच्या टोकाला, वेस्टावे नावाची एक गृहशिक्षिका पुरवणारी संस्था आहे. तिथे मी आठवड्यातून एकदा जाऊन मला मिळू शकेल, अशी एखादी नोकरी आहे का, हे बघत असे. ही संस्था स्थापन करणाऱ्या माणसाचे नाव वेस्टावे आहे. तेथील व्यवस्थापिका मिस स्टॉपर आहे. ती तिच्या स्वतःच्या लहानशा कार्यालयात बसते. नोकरी शोधणाऱ्या महिला, एका खोलीत बसलेल्या असतात. आणि मग एक एक करून, त्या आत जातात. मग ती तिच्याकडील माहिती बघून, त्यांच्यायोग्य अशी नोकरी आहे का, ते शोधते. जेव्हा मागच्या वेळी मी गेले, तेव्हा मला मिस स्टॉपर एकटीच असल्याचे दिसले. एक हसऱ्या चेहऱ्याचा व मोठ्या हनुवटीचे थरच्या थर असलेला धिप्पाड मनुष्य, तिच्या शेजारी बसून, नाकावर चष्मा लाऊन, आत येणाऱ्या महिलांकडे

बारकाईने बघत बसला होता. मी आत शिरल्याबरोबर त्याने खुर्चीत उडी मारली व घाईने मिस स्टॉपरकडे वळला.

तो बोलला, “चालेल. मी याहून जास्त चांगले काही मागू शकत नाही. छान! छान!” तो फार उत्साही दिसत होता. व त्याचे हात आनंदाने चोळत होता. तो इतका स्वस्थचित्त माणूस दिसत होता, की त्याच्याकडे बघायला, मजा येत होती.

त्याने विचारले, “मिस, तुम्ही नोकरी शोधत आहात?’

“हो, सर.”

“गृहशिक्षिका म्हणून?”

“हो, सर.”

“आणि तुमची पगाराची काय अपेक्षा आहे?”

“मी कर्नल मन्रो यांच्याकडे महिना ४ पौंडावर काम करत होते.”

उकळत्या हवेत असल्यासारखे हावभाव करत, तो ओरडला, “ओहो! मी घामाघूम झालो. इतक्या आकर्षक व सुशिक्षित बाईला, इतका दयनीय वाटेल असा पगार, कोणी कसा काय देऊ शकतो?”

मी म्हणाले, “सर माझे शिक्षण तुम्ही समजता, तेवढे नाही. थोडे फ्रेंच, थोडे जर्मन, संगीत आणि चित्रकला –"

तो ओरडला, “हे सर्व प्रश्नाच्या बाहेरचे आहे. सांगायची बाब ही आहे की, तुम्हाला प्रतिष्ठित स्त्रीप्रमाणे रीतभात व चाणाक्षपणा आहे की नाही. पुढे जाऊन कदाचित देशाचे भवितव्य घडवू शकेल अशा मुलाला वळण लावून, संस्कार करून शिकवणे, हे तुम्हाला जमत नसेल; तर तुम्ही या नोकरीकरता लायक नाही. आणि जमत असेल तर एखादा मनुष्य तुम्हाला तीन आकड्यांपेक्षा कमी पगारावर, कसे काय नेमू शकतो? माझ्याकडे तुमचा पगार वर्षाला १०० पौंड असेल.”

मिस्टर होम्स, तुम्ही कल्पना करू शकता की इतकी चांगली नोकरी खरंच मला मिळते आहे, यावर माझा विश्वासच बसेना. मात्र माझ्या चेहऱ्यावरील अनिश्चितता बघून, त्या गृहस्थाने, खिशातून एक वही काढून, एक चिठ्ठी लिहिली.

मोठ्या आनंदाने तो इतका हसत होता, की त्याच्या चेहऱ्यावरील सुरकुत्यांमधून त्याचे डोळे म्हणजे, फक्त दोन चकाकणाऱ्या फटी दिसत होत्या. तो म्हणाला, “माझी अशी पद्धत आहे की, या तरुण स्त्रियांना प्रवासासाठी व कपड्यांसाठी जो काही थोडाफार खर्च करावा लागेल, त्यासाठी अर्धा पगार आधीच द्यायचा.”

मला असे वाटले, की इतका विलक्षण व विचारी माणूस, मला आजपर्यंत कधी भेटलेला नाही. आधीच मी, मला नोकरी मिळवून देणाऱ्यांच्या ॠणात होते, त्यात या आगाऊ रकमेने, अजून भर पडली. तरीही या सबंध मामल्यामध्ये, काहीतरी अनैसर्गिक होते. त्यामुळे मी ते काम स्विकारण्यापूर्वी, थोडीबहुत माहिती काढावी, असे माझ्या मनाशी ठरवले.

मी म्हणाले, “सर, तुम्ही कुठे रहाता, असे मी तुम्हाला विचारू शकते का?”

“हँपशायर या सुंदर खेडेगावात, कॉपर बीच येथे, विंचेस्टरपासून पाच मैलांवर. अग माझ्या तरुण बाई, ती सुंदर जागा आहे व जुने खेडेगावातील घर, पण ते देखणे आहे.”

“आणि माझे काम, सर? ते काय असेल, ते मला जाणून घ्यायला आवडेल.”

“एक मूल -- एक सहा वर्षाचे मूल! ओहो, तुम्ही त्याला त्याच्या स्लीपरने, झुरळाला चिरडताना पाहिले, तर! ठो. ठो. ठो. तुमची पापणी लवण्यापूर्वी तीन मेलेली असतील. तो खुर्चीत मागे रेलून बसला व पुन्हा तोंडभरून हसू लागला.

मी त्या मुलाचा पराक्रम ऐकून, थोडी चमकले. पण वडिलांचे हास्य बघून मला वाटले, की ते विनोद करत असतील.

मी विचारले, “माझे मुख्य काम, फक्त एका मुलाचा ताबा घेणे?”

तो किंचाळला, “नाही. नाही. तेवढेच नाही. तेवढेच नाही. तुझे काम म्हणजे माझी बायको, काही छोटीमोठी कामे सांगेल, ती करणे. आणि नेहमीच अशा आज्ञा, तुझ्यासारखी नेक स्त्री, ऐकेलच. याला तुझी काही हरकत नसेल ना?”

“मी तुमच्या उपयोगी ठरले, तर मला आनंद होईल.”

“छान. छान. आता कपड्यांचेच बघ. आम्ही जरा कपड्यांचे शौकीन आहोत. पण मनाने चांगले आहोत. आम्ही जर तुला एखाद्या प्रकारचे कपडे घालायला सांगितले, तर तू तयार असले पाहिजेस. थोडी आमची शिस्त, काय?”

त्यांच्या या बोलण्याने, आश्चर्यचकित होऊन, मी म्हटले, “हो.”

“किंवा इथे बस. तिथे बस. असे सांगितले तर तुला, त्याचे काही वाटता कामा नये.”

“ओहो. नाही. तसे काही वाटणार नाही.”

“किंवा तू आमच्याकडे येण्यापूर्वी, केस खूप कमी करून यावेस.”

“माझा माझ्या कानांवर विश्वासच बसला नाही. मिस्टर होम्स, असे बघा, माझे केस जरा चमकदार व भरभर वाढणारे आहेत आणि त्याना बदामाच्या रंगाची झाक आहे. ते कलापूर्ण समजले जातात. मी ते कापायची, कल्पनाही करू शकत नाही.”

त्यामुळे मी त्याना म्हणाले, “हे केवळ अशक्य आहे.” तो त्याच्या बारीक डोळयांनी, माझ्याकडे उत्सुकतेने बघत होता. आणि त्याच्या चेहऱ्यावरून एक छाया सरकलेली मी पाहिली.

तो म्हणाला, “मला वाटते, ते फार महत्वाचे आहे. तशी माझ्या बायकोची इच्छा आहे. आणि तुम्हाला माहिती आहे बाईसाहेब, बायकांची इच्छा म्हणजे, पूर्ण करायलाच पाहिजे. तर मग तुम्ही तुमचे केस कापायला तयार नाही?”

“नाही, सर. मी ते करू शकणार नाही.”

“ओके. ठीक आहे. मग विषय संपला. हे दयनीय आहे. कारण इतर सर्व बाबतीत, तुम्ही खूप चांगली उत्तरे दिली होतीत. मग अशा बाबतीत मिस स्टॉपर, मी अजून कुणा महिलांशी बोलतो.” ती व्यवस्थापिका इतका वेळ तिचे काही कागद बघत, आमच्यापैकी कोणाशी एकही अक्षर न बोलता, शांत बसली होती. पण तिने माझ्याकडे, इतक्या रागारागाने पाहिले की मला असा संशय आला, की माझ्या नकारामुळे, तिचे घसघशीत कमिशन बहुधा गेले असावे.”

तिने विचारले, “तुला तुझे नाव माझ्याकडील बेकार तरुणींच्या यादीत, ठेवायचे आहे की नाही?”

“हो, मिस स्टॉपर.”

ती थोड्या रागाने म्हणाली, “ठीक आहे. पण हे निरुपयोगी वाटते आहे कारण, एवढी छान संधी तू अशा तऱ्हेने गमावलीस. आमच्यासाठी आता तुला, अजून फारसे काही -- एखादी नोकरी मिळवून देणे, शक्य दिसत नाही. मिस हंटर, अच्छा.” तिने टेबलावरची घंटी वाजवली व मला फुटवले.

“मिस्टर होम्स, मी माझ्या रहाण्याच्या ठिकाणी आले, तर फक्त दोनतीन दिवस पुरेल इतकेच अन्न कपाटात होते व टेबलावर दोनतीन बिले पडली होती. मी स्वतःलाच विचारू लागले, की मी मूर्खपणा तर केला नाही? ठीक आहे. शेवटी या लोकांचे काही खूळ असेल तर, आणि ते माझ्याकडून काही वेगळयाच गोष्टींसाठी, आज्ञाधारकपणाची अपेक्षा करत असतील, तर निदान ते त्याबद्दल मला पैसे द्यायला तयार आहेत. इंग्लंडमधील अगदी कमी गृहशिक्षिकाना वर्षाला १०० पौंड पगार मिळतो. शिवाय माझ्या केसांचा मला काय उपयोग आहे? खूप लोकाना कमी केसांमुळे फायदा झालेला आहे. त्यातच मी असेन. दुसऱ्या दिवशी, मला असे वाटू लागले, की मी चूक केली आहे. आणि तिसऱ्या दिवशी, माझी याबद्दल खात्रीच झाली. मी माझा स्वाभिमान, गमावून बसले व परत वेस्टावेमध्ये जाऊन, अजून ती नोकरी मिळणे शक्य आहे का, याची चौकशी करायचा विचार करू लागले. मी तसे करायच्या आत, मला त्या सभ्य गृहस्थाकडून पत्र आले. ते मी इथे आणले आहे व तुम्हाला वाचून दाखवतेः

कॉपर बीच, विंचेस्टर जवळ

प्रिय मिस हंटर,

मिस स्टॉपरने मला मोठ्या दयाळूपणे, तुमचा पत्ता दिला. मी इथून लिहून तुम्हाला विचारतो आहे, की तुम्ही तुमचा निर्णय बदलला आहे का? माझी बायको तुम्ही येण्यासाठी, अधीर झाली आहे. कारण मी केलेल्या तुमच्या वर्णनामुळे, ती तुमच्याकडे आकृष्ट झालेली आहे. आम्ही तुम्हाला दर तीन महीन्याना ३० पौंड द्यायला तयार आहोत. म्हणजे वर्षाला १२० पौंड. तुम्हाला आमच्या काही हेक्यांमुळे, जो त्रास सहन करावा लागेल, त्यासाठी. आमचे हेके तसे काही, फार जगावेगळे नाहीत. माझ्या बायकोला निळया रंगाची छटा आवडते, म्हणून सकाळी घरात तुम्ही तसे कपडे घालावेत, असे तिचे म्हणणे आहे. तुम्ही ते कपडे विकत आणायची, जरुरी नाही. कारण आमच्याकडे माझ्या लाडक्या मुलीचा, ॲलीसचा, तसा ड्रेस आहे. ( आता ती फिलाडेल्फियाला आहे.) आणि मला वाटते की तो तुम्हाला, अगदी बरोबर होईल. इकडेतिकडे बसण्यासाठी, कुठल्याही प्रकारे स्वतःचे मनोरंजन करण्यासाठी, तुम्हाला काहीही त्रास होणार नाही.

केसांच्या बाबतीत, खरे पहाता हे दयनीय आहे. पण आपल्या थोड्या काळाच्या मुलाखतीत सुद्धा, मी असे म्हणू शकतो, की ते सुंदर आहेत. पण मी तुम्हाला जे सांगितले, त्यावर मी ठाम आहे. मी अशी आशा करतो, की वाढवलेला पगार, ती हानी भरून काढेल. मुलाच्या बाबतीत तुमची कामे फार नाहीत. आता इथे येण्याचे नक्की करा. आणि मी कुत्र्याची गाडी घेऊन तुम्हाला विंचेस्टरला भेटेन. मला तुम्ही कुठल्या गाडीने येत आहात, ते कळवा.

तुमचा विश्वासू,

जेफ्रो रुकास्टल

“हे मला, आत्ता आलेले पत्र आहे. मिस्टर होम्स, मला वाटते आहे, की मी ही नोकरी स्विकारावी. पण तरीही, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी, मला हे सगळे तुम्हाला सांगायचे होते.”

होम्स हसत म्हणाला, “हे बघा मिस हंटर, तुम्ही तसे मनात पक्के केले असेल, तर मग काय प्रश्न उरतो?’

“पण तुम्ही मला नकार द्यायला, सांगणार नाही ना?"

"माझी बहीण हा निर्णय घेते आहे, असे मला समजता येत नाही, हे मी कबूल करतो.”

“मिस्टर होम्स, याचा अर्थ काय?"

“ओहो, माझ्याकडे काही माहिती नाही. मी सांगू शकत नाही. कदाचित तुमचे तुम्ही काहीतरी मत बनवले आहे, नाही का?”

“ठीक आहे. मला यात, एकच उपाय दिसतो आहे. मिस्टर रुकास्टल मला दयाळू वाटतात, चांगल्या स्वभावाचे वाटतात. असे असू शकेल की त्यांची बायको वेडी असेल. पण तिला वेड्यांच्या दवाखान्यात ठेवायला लागू नये म्हणून, ते हे गुप्त ठेवू इच्छितात. आणि जेणेकरून, तिचा मनक्षोभ होऊ नये म्हणून, तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करतात.”

“असे असू शकेल -- खरे तर हे प्रकरण बघता, असेच असावे असे वाटते. पण तरीही एका तरुण स्त्रीसाठी, हे घर काही ठीक वाटत नाही.”

“पण मिस्टर होम्स, पैसे! मला पैशांची जरुरी आहे.”

“हो. खरे आहे. पगार चांगला आहे -- फारच चांगला आहे. त्यामुळेच मी अस्वस्थ झालो आहे. त्यांनी तुला वर्षाला १२० पौंड का द्यावेत? त्यामागे काहीतरी ठोस कारण असले पाहिजे.”

“मला वाटते, मी तुम्हाला सगळी हकीगत सांगितली, की तुम्ही मला नंतर काही मदत लागली, तर कराल. तुम्ही माझ्या पाठीशी असाल, तर मला फार सुरक्षित व मी शक्तिवान असल्यासारखे वाटेल.”

“ओहो, तसे तू वाटून घेऊ शकतेस. मी तुला आश्वासन देऊ शकतो, की तुझी समस्या लहान दिसत असली तरी, ती मला रस घेण्यासारखी वाटते आहे. अनेक महिन्यांनी, अशी केस मला

मिळाली आहे. त्यात काहीतरी अगदी वेगळे असावे, असे वाटते आहे. तुम्हाला जर काही शंका आली किंवा धोका वाटला, तर -- "

"धोका? तुम्हाला काय धोका दिसतो आहे?"

होम्सने त्याची मान हलवली व म्हणाला, "आपण आत्ताच जर त्याची वाच्यता केली, तर तो कदाचित धोका उरणारच नाही. पण दिवसा, रात्री कधीही, मला एक तार पाठवलीत, तर मी तुमच्या मदतीला येईन."

"इतके पुरेसे आहे." एवढे बोलून ती चटकन खुर्चीतून उठली. तिच्या चेहऱ्यावरील काळजी दूर झाली होती. "आता मी अगदी निष्काळजीपणे, हँपशायरला जाते. मी मिस्टर रुकास्टल याना तसे लिहिते. आज माझे केस शेवटचे बघून घेते व उद्या विंचेस्टरसाठी निघते."

अजून काही आभारदर्शक शब्दानी, होम्सचा निरोप घेत, तिने आम्हाला दोघाना अच्छा केला व तिच्या वाटेने निघाली.

तिची झटपट टाकलेली, आत्मविश्वासपूर्ण पाऊले जिन्यावर वाजली तेव्हा मी म्हटले, "शेवटी, ती स्वतःची काळजी घेऊ शकेल, अशी तरुण स्त्री आहे."

होम्स थंडपणे म्हणाला, "आणि तिला घ्यावीच लागेल. थोडेच दिवसात, तिच्याकडून काही कळले नाही, तर मला नवल वाटेल."

आणि खरंच, माझ्या मित्राची अटकळ, खरी ठरली. पंधरवडा गेला. माझ्या मनात सारखे तिच्याबद्दलचे विचार येत होते. कुठे कोपऱ्यात बिचारी ती एकटी मुलगी, जाऊन पडली आहे, आणि तिला, माणसांचे कसले विचित्र अनुभव येत असतील, असे मी मनाशी म्हणत होतो. जास्त पगार, विचित्र अटी, फार नसलेले काम, हे सर्व काहीतरी नेहमीच्या परिस्थितीपेक्षा वेगळे असल्याचे, सुचवत होते. हे काही खूळ आहे, की कसला कट आहे, की हा मनुष्य जास्त पैसे देऊन, दुवा घ्यायचा प्रयत्न करतो आहे, की तो दुष्ट खलनायक आहे; हे ठरवणे माझ्या शक्तीबाहेरील होते. होम्सला मी बरेच वेळा, दोन्ही भुवया जवळ आणून आणि शून्यात नजर लावून, अर्धा अर्धा तास बसलेले पाहिले. पण मी त्याला काही विचारले, तर तो मला उडवून लावे. तो अधीरपणे ओरडे, "माहिती! माहिती! माहिती! मी चिखलाशिवाय विटा बनवू शकत नाही. आणि तरीही तो शेवटी असे वाक्य पुटपुटे, की त्याने त्याच्या बहिणीला, अशा परिस्थितीतील नोकरी घ्यायला सांगायला, नको होते.

आम्ही अपेक्षा करत असलेली तार, एका रात्री उशिरा आली. मी झोपायला निघालो होतो. होम्स त्याच्या रात्रभर चालणाऱ्या रासायनिक संशोधनात, मग्न होता. मी सकाळी न्याहारीसाठी खाली उतरलो, तेव्हादेखील तो त्याच अवस्थेत होता. त्याने पिवळे पाकीट फोडले आणि मग मजकुराकडे नजर टाकत, ते माझ्याकडे फेकले.

तो बोलला, "ब्रॅडशॉच्या गाड्या बघ." आणि परत त्याच्या कामाला लागला.

बोलावणे थोडक्यात, पण घाईने जावे लागेल, असे होते. मजकूर असा होताः

*"उद्या दुपारी विंचेस्टरला काळा हंस हॉटेलात कृपया या. नक्की या. माझी मती गुंग झाली आहे."*

*हंटर.*

माझ्याकडे बघत, होम्सने विचारले, "तू माझ्याबरोबर येशील का?"

"हो. मला यायला आवडेल."

"तर मग ते गाडीचे बघ."

मी म्हणालो, "साडेनऊ वाजता, एक गाडी आहे. ती विंचेस्टरला साडेअकराला पोचते."

"मग ती आपल्याला चालेल. मग मी माझे संशोधन, आता थांबवलेले बरे. सकाळी आपल्याला तयार व्हावे लागेल."

दुसऱ्या दिवशी अकरा वाजता, आम्ही जुन्या इंग्लिश राजधानीच्या वाटेवर होतो. सर्व वेळ होम्स वर्तमानपत्राच्या वाचनात, बुडाला होता. पण आम्ही हँपशायरची सीमा ओलांडल्यावर, त्याने ती बाजूला सारली आणि बाहेरचं दृष्य बघू लागला. तो वसंत ऋतुतील छान दिवस होता.

आकाश निळे होते. पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या, कापसासारख्या फिकट पांढऱ्या ढगांनी, ते भरले होते. सूर्य तळपत होता. हवा छान होती. माणसेही त्यामुळे उत्साही वाटत होती. लहानशा लाल व करड्या रंगांच्या शेतघरांच्या छप्परावरून व अल्डेरशॉट येथील डोंगरांमधून, नवीन पालवी फुटलेली झाडे, डोकावत होती. सगळीकडे असे सुंदर दृष्य होते.

“बेकर रस्त्यावरील धुक्यातून आलेला व उत्साहाने भरलेला माझ्यासारखा माणूस ओरडला, “ते किती ताजेतवाने आणि सुंदर आहे, नाही का?”

पण होम्सने डोके हलवून, थंड प्रतिसाद दिला.

तो म्हणाला, वॉटसन, तुला माहिती आहे का, की मला असा शाप आहे, की माझ्या खास विषयाच्या अनुषंगानेच, माझे मन सगळयाकडे बघते. तू या विखुरलेल्या घरांकडे बघून, एकंदर सृष्टीसौदर्याने भारावून गेला आहेस. मी त्यांच्याकडे बघितल्यावर मला वाटते, की ती किती अलग पडली आहेत. तिथे काय गुन्हा घडला असेल व काय विपरीत आपल्यासमोर वाढून ठेवले असेल, हा विचार डोक्यातून जात नाही.”

मी ओरडली, “अरे, या सुंदरशा घरांमध्ये काय गुन्हा घडणार आहे?”

“मला सतत एक प्रकारची भीती वाटते. वॉटसन, माझ्या अनुभवावरून, माझा विश्वास आहे की, बुटकी आणि फारशी सुखकारक नसलेली लंडन मधील घरे, या हसऱ्या, सुंदर गावांकडील घरांपेक्षा जास्त दुःखदायक व पापांचे पाढे वाचणारी नसतील.”

“तू मला घाबरवतो आहेस.”

“पण कारण अगदी उघड आहे. जे कायद्याला शक्य नाही, ते गावामध्ये लोकांच्या दबावाने, केले जाऊ शकते. गावात अशी एकही गल्ली नसते, की जिथे छळ होणाऱ्या मुलाच्या किंकाळया, किंवा दारुड्याच्या गुद्द्यांचे आवाज, लोकांच्या मनात सहानुभूती व शेजाऱ्यांच्या मनात चीड उत्पन्न करत नाहीत. मग न्याययंत्रणा इतकी लगेच कार्यान्वित होते आणि तक्रारीचा एक एक शब्द, ती पुढे नेत रहाते. शेवटी अशी एक वेळ येते की गुन्हा आणि न्याय यांच्यात एका पायरीचेच अंतर उरते.

पण या आपापल्या शेतात उभ्या असलेल्या, एकांड्या घरांकडे बघ. बहुतेकांमध्ये अडाणी, कायद्याचे ज्ञान नसलेले, अशिक्षित लोक भरलेले आहेत. त्यांची भयानक दुष्टपणाची कृत्ये आठव. तिथे असा छुपा दुष्टपणा, वर्षानुवर्षे तसाच चालू रहातो. आणि त्याबाबत कोणीच शहाणपणा दाखवत नाही. ही आपल्याकडे मदत मागणारी बाई, विंचेस्टरला रहायला गेली की काय? मला तिच्याबद्दल, कधीच भीती वाटली नाही. ती चांगली खमकी आहे. पण विंचेस्टरपासून ते घर पाच मैलच दूर आहे. त्यामुळे धोका आहेच. पण तिला व्यक्तिशः धमकावले गेलेले नाही, हे स्पष्ट आहे.”

“ती आपल्याला भेटायला म्हणून, तिथे येत असेल व नंतर परत जाईल.”

“असेलही. तिला तिचे स्वातंत्र्य आहे.”

“पण, काय झाले असेल? तुला काही स्पष्टीकरण, सुचत नाही का?”

“आपल्याला माहिती आहेत, तेवढ्या गोष्टींच्या अनुषंगाने मी सात वेगवेगळी स्पष्टीकरणे, तयार केली आहेत. पण मिळालेल्या ताज्या माहितीनंतरच कळेल, की त्यातले कुठले बरोबर आहे. आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, कुणास ठाऊक? आता घोडेमैदान जवळच आहे. लवकरच आपल्याला कळेल, की मिस हंटर आपल्याला, काय सांगणार आहे.”

मुख्य रस्त्यावर स्टेशनजवळ काळा हंस, ही प्रसिध्द खानावळ आहे. आणि तिथे एक तरूण स्त्री आमची वाट बघत थांबली होती. तिने एक खोली घेतली होती व टेबलावर मांडलेले जेवण, आमची वाट बघत होते.

ती नम्रपणे म्हणाली, “तुम्हाला आलेले बघून, मला खूप आनंद झाला आहे. हा तुमचा, खरंच दयाळूपणा आहे. मला कळत नाही आहे, की मी काय करू. तुमचा सल्ला, मला अगदी अमूल्य वाटेल.”

“कृपया आम्हाला सांग, की तुला काय झाले आहे.”

“ते मी करीनच. आणि ते पटपट केले पाहिजे. कारण मी मिस्टर रुकास्टलना सांगितले आहे, की मी तीनच्या आत परत येते. जरी त्याना हे माहिती नाही की मी इथे कशाकरता आले आहे, तरी मी इथे येण्याची परवानगी मिळवली आहे.”

होम्सने त्याचे पाय शेकोटीच्या दिशेने सरकवले व ती काय सांगते ते ऐकण्यासाठी, सज्ज झाला.

“पहिल्यांदा मला हे सांगितले पाहीजे, की मला मिस्टर व मिसेस रुकास्टलकडून, खरे तर वाईट वागवले गेले नाही. हे सांगणे, त्यांच्या दृष्टीने योग्य ठरेल. पण मी त्याना, समजून घेऊ शकत नाही. मी मनातून त्यांच्याबद्दल, अस्वस्थ असते.”

“तुला काय कळत नाही?”

“ते असे का वागतात, ते कळत नाही. पण जसे सर्व घडले, तसे मी तुम्हाला सांगते. जेव्हा मी आले तेव्हा मिस्टर रुकास्टल, मला कॉपर बीच येथे, भेटले. आणि त्यांच्या कुत्र्यांच्या गाडीतून मला घेऊन गेले. ते म्हणाले होते, त्याप्रमाणे, ते घर छान ठिकाणी होते, पण ते घर स्वतः मात्र छान नव्हते. ते एक पांढरा रंग दिलेले, चौकोनी घर होते. पण डागाळलेले व आजूबाजूच्या वाईट,

दमट हवेने खराब झालेले होते. त्या घराच्या तिन्ही बाजूला जंगल आहे व एका बाजूला शेत आहे, तिथून उताराचा रस्ता, सथमटनकडे जातो. पुढच्या दारापासून साधारण शंभर यार्डावर ते असेल. घरापुढचे अंगण आपल्या मालकीचे आहे. पण, जंगल हा सथमटनने जतन केलेला, भाग आहे. हॉलच्या दारासमोर लगेच असलेला कॉपर बीच, त्या भागाला ते नाव पडण्यास, कारणीभूत ठरला आहे. मला माझ्या खेळीमेळीने वागणाऱ्या व प्रसन्न असणाऱ्या मालकाने, इथे आणले व त्याच्या बायको, मुलाशी ओळख करून दिली. मिस्टर होम्स, तुमच्या बेकर रस्त्यावरील खोलीत आपण ज्या शक्यतेबद्दल बोललो, तसे काही नव्हते. मिसेस रुकास्टल वेडी नाही. मला ती अबोल व फिकट चेहऱ्याची व तिच्या नवऱ्यापेक्षा खूपच लहान, तिशीच्या आतली बाई वाटली. मिस्टर रुकास्टल पंचेचाळीसच्या वरचेच असतील. त्यांच्या बोलण्यावरून मला कळले की त्यांचे सात वर्षांपूर्वी लग्न झाले. ते विधुर होते. आणि पहिल्या बायकोपासून त्याना एक मुलगी आहे. पण ती फिलाडेल्फियाला असते. मिस्टर रुकास्टलनी मला खासगीपणे हे सांगितले, की ती तिथे रहाते, कारण तिला सावत्र आईबद्दल, प्रचंड नावड आहे. ती मुलगी विशीची तरी असेल. तिच्या वडीलांच्या तरुण बायकोबरोबर तिचे अस्वस्थ असणे, मी समजू शकते. मिसेस रुकास्टल मला मनाने व शरीरानेही एकदम रंगहीन वाटली. तिने माझ्यावर चांगला किंवा वाईट, काहीच प्रभाव टाकला नाही. तिचे जणू काही आस्तित्वच नव्हते. हे अगदी सहज कळत होते की ती भावनिक दृष्ट्या तिच्या नवऱ्याशी व मुलाशी एकनिष्ठ होती.

तिचे करडे छोटे डोळे, सतत एकीकडून दुसरीकडे फिरत असत व आपली प्रत्येक इच्छा पुरी केली जाते आहे की नाही, यावर लक्ष ठेवत. मिस्टर रुकास्टल तिच्याशी प्रेमळपणे वागत, पण आरडाओरडा करून लबाडीही करत. सर्वसाधारणपणे, ते एक आनंदी जोडपे होते. आणि तरीही या बाईला, काहीतरी गुप्त दुःख होते. ती नेहमी दुःखी चेहऱ्याने, गूढ विचारात, बुडालेली असे. एकदोनदा मी तिच्या डोळ्यात, अश्रूही पाहिले. मला वाटते तिच्या मुलाच्या अवगुणांमुळे, तिच्या मनावर भार येत असावा. कारण तो मुलगा, पूर्णपणे बिघडलेला व वाईट स्वभावाचा आहे. त्याच्या वयाच्या मानाने, त्याचे डोके फारच चालते. त्याचे सर्व आयुष्य, एकतर रानटी लालसा किंवा चिडून दाखवलेली नाराजी, यातच निघून चाललेले वाटते. त्याच्यापेक्षा अशक्त प्राण्याला त्रास देण्यात, त्याला एक प्रकारचा, आनंद मिळतो. उंदीर, छोटे पक्षी व किडे पकडण्याची, तयारी करण्यात, तो कमालीची हुशारी दाखवतो. पण मी त्याच्याबद्दल, फारसे बोलत नाही, मिस्टर होम्स. खरे तर माझ्या गोष्टीशी, त्याचा फारसा संबंध नाही."

माझा मित्र म्हणाला, "तुला ती विषयाशी संबंधित वाटो, अथवा न वाटो, पण तू सर्व हकीगत सांगितल्यामुळे, मला बरे वाटले."

मी शक्यतो माझ्याकडून, काही महत्वाचे सांगायचे रहाणार नाही, असा प्रयत्न करते. घरासंबंधी एक फारशी चांगली नसलेली गोष्ट, जी माझ्या अचानक लक्षात आली, ती म्हणजे नोकरांचे वागणे व दिसणे. तिथे फक्त दोघेच आहेत. एक मनुष्य व त्याची बायको. टॉलर नावाचा तो मनुष्य गावढळ व रीतभात नसलेला, करड्या रंगाच्या दाढीमिशा असलेला असून, त्याच्या तोंडाला सतत दारूचा वास येत असतो. दोनदा मी त्याच्याबरोबर असताना, तो खूप प्यायलेला होता. आणि तरीही मिस्टर रुकास्टल त्याच्याकडे काहीही लक्ष देत नाहीत. त्याची बायको उंच व मजबूत बाई आहे. तिचा चेहरा सुजलेला असून, ती तुटक वागणारी आहे. ती तिच्या मालकिणीइतकीच, गप्पगप्प असते. ती जोडी अजिबात सुखकारक नाही. पण सुदैवाने, मी जास्त वेळ त्या मुलाबरोबर किंवा त्यांच्या खोलीसमोर असलेल्या, इमारतीच्या कोपऱ्यात असलेल्या, माझ्या खोलीत घालवते.  कॉपर बीचला माझे आगमन झाल्यावर दोन दिवसांनी, माझे आयुष्य अगदी शांत होते. तिसऱ्या दिवशी मिसेस रुकास्टल न्याहारीनंतर खाली आली आणि तिच्या नवऱ्याच्या कानात काहीतरी कुजबुजली.

तो माझ्याकडे वळून म्हणाला, “हो. हो. मिस हंटर, आमच्या लहरी सांभाळल्याबद्दल व केस कापल्याबद्दल, आम्ही तुझे आभार मानतो. त्यामुळे तू काहीही वाईट दिसत नाहीस. आता तुला निळा ड्रेस कसा दिसतो, ते आम्ही पाहू. तो तुझ्या खोलीतील अंथरुणावर ठेवलेला, तुला सापडेल. आणि जर तू तो घातलास, तर आम्हाला दोघानाही, बरे वाटेल.”

माझ्या खोलीतील तो ड्रेस, एका विशिष्ट निळ्या रंगाचा होता. तो एकदम भारी कापडाचा होता. पण तो पूर्वी वापरलेला, अगदी कळत होते व तो मला नीट बसतही नव्हता. मिस्टर व मिसेस रुकास्टलनी तो बघून, खूप ख़ुशी दाखवली. ती मला जरा जास्तच वाटली. ते माझ्यासाठी हॉलमध्ये थांबले होते. ती एक मोठी खोली आहे. घराचा पुढचा सर्व भाग त्या हॉलने व्यापलेला आहे. त्याला खाली जमिनीपर्यंत टेकलेल्या मोठ्या खिडक्या आहेत. त्यातील मधल्या खिडकीजवळ पाठ करून एक खुर्ची ठेवलेली आहे. त्यात मला बसायला सांगण्यात आले. मग मिस्टर रुकास्टल हॉलच्या दुसऱ्या टोकाला चालत जाऊन मला, मी कधी न ऐकलेल्या खूपशा विनोदी गोष्टी सांगू लागले. मी अगदी दमेपर्यंत हसले. विनोदाचे जराही अंग नसलेल्या मिसेस रुकास्टल सुद्धा एवढ्या कधीही हसलेल्या, मी पाहिल्या नव्हत्या. पण मांडीवर हात ठेऊन त्या, दुःखी पण उद्दीपित भाव चेहऱ्यावर घेऊन बसल्या होत्या. एखाद्या तासानंतर, मिस्टर रुकास्टल अचानक बोलले, की आता त्यांची, दिवसभरातील कामे करण्याची वेळ झाली. आणि मी आता कपडे बदलून, छोट्या एडवर्डकडे नर्सरीमध्ये जावे. दोन दिवसांनी हाच कार्यक्रम, पुन्हा झाला. परत मी कपडे बदलून खिडकीशी बसले व नव्यानव्या विनोदी गोष्टी ऐकून, अगदी मनापासून

हसले. माझ्या मालकाकडे अशा गोष्टींचा भरपूर साठा होता व त्या सांगायची खुबी, पण होती. मग त्याने मला, एक पिवळी कादंबरी दिली व माझी सावली पुस्तकावर पडू नये म्हणून माझी खुर्ची, थोडी बाजूला हलवत, मला ती मोठ्याने वाचायला सांगितली. मी पहिल्या प्रकरणातील काही भाग सुमारे दहा मिनिटे वाचला आणि अचानक अर्ध्या वाक्याच्या मध्ये, त्यानी मला थांबायची व कपडे बदलायची आज्ञा केली.

मिस्टर होम्स, तुम्हाला कल्पना करता येईल, की या विचित्र गोष्टीचा अर्थ काय आहे, हे जाणून घ्यायला मी फारच उत्सुक आहे. मी पाहीले की दरवेळी ते खूप काळजीपूर्वक पद्धतीने, माझा चेहरा खिडकीपासून बाजूला वळवत. त्यामुळे माझ्यामागे काय चालले आहे, हे बघण्यासाठी मी फार उत्सुक झाले. प्रथम मला ते अशक्य वाटले, पण मी एक युक्ती शोधून काढली. माझा हातातला छोटा आरसा फुटला होता. त्यामुळे मला एका, आनंदी गोष्टीने झपाटले. मी आरशाचा एक तुकडा, माझ्या रुमालात लपवून ठेवला. पुढच्या वेळी, ह्सताहसता मध्येच, मी माझा रुमाल माझ्या डोळयांसमोर धरला. आणि थोडी कसरत करून, माझ्यामागे काय चालले आहे, ते बघितले. मी कबूल करते, की माझी निराशा झाली. तिथे काहीच नव्हते. निदान पहिल्यांदा तरी मला असे वाटले. पण दुसऱ्यांदा बघितल्यावर, मला कळले की एक मनुष्य, सथमटन रस्त्यावर उभा होता, छोटी दाढी असलेला व करड्या सुटातला तो माणूस, माझ्याकडे बघत होता. तो रस्ता म्हणजे मोठा हमरस्ता आहे. तिथे नेहमीच लोक असतात. तरीही हा मनुष्य आमच्या शेतापलीकडे असलेल्या कुंपणावर रेलून, गंभीरपणे बघत होता. मी माझा रुमाल खाली केला व मिसेस रुकास्टलकडे पाहिले. तिचे डोळे शोधक नजरेने, माझ्यावर खिळलेले होते. ती काहीच बोलली नाही. पण माझी खात्री पटली, की तिला माझ्या हातात आरसा असल्याचे व माझ्यामागे काय चालले आहे हे मला समजल्याचे कळले. ती ताडकन उठून उभी राहिली.

ती म्हणाली, ‘जेफ्रो, रस्त्यावर कोणीतरी सोम्यागोम्या मनुष्य उभा आहे व तो मिस ह्ंटरकडे टक लाऊन बघतो आहे.”

त्यानी विचारले, “मिस हंटर, तो तुझा मित्र आहे का?”

“नाही, मला इथले कुणीच, माहिती नाही.”

“डार्लिंग, किती हा आगाऊपणा! कृपया बाहेर जाऊन, त्याला निघून जायला सांगा.”

“नको. नको. तो इथे नेहमीच रेंगाळत असतो. मिस हंटर, मागे वळ व त्याला हाताने निघून जायला सांग.”

“मला जसे करायला सांगितले, तसे मी केले. आणि तेव्हाच मिसेस रुकास्टलने पडदे खाली केले. हे साधारण आठवड्यापूर्वी घडले. तेव्हापासून मी खिडकीत बसले नाही. निळा ड्रेस घातला नाही. आणि त्या माणसालाही परत रस्त्यावर पाहिले नाही.’

होम्स म्हणाला, “पुढे चालू ठेव. तुझे सांगणे फारच रुचीपूर्ण होत चालले आहे.”

“तुम्हाला कदाचित ते थोडे असंबध्द वाटेल. मी सांगते आहे त्या घटनांचा एकमेकांशी अगदी थोडाच संबंध आहे असेही वाटेल. अगदी पहिल्या दिवशी मिस्टर रुकास्टल मला घेऊन स्वयंपाकघराच्या दारासमोर असलेल्या एका लहानशा गॅरेजमध्ये, घेऊन गेले. जसजसे आम्ही त्या गॅरेजच्या जवळ येऊ लागलो, तसे मला साखळी जोरात घसपटल्याचा आणि एखादे मोठे जनावर तिथे वावरत असल्याचा आवाज येऊ लागला.

मिस्टर रुकास्टल, मला दोन प्लायवूडमधील फट दाखवत म्हणाले, “तो किती सुंदर आहे, बघ.”

“मी आत बघितले, तर मला दोन जागे असलेले डोळे दिसले. एक पुसट आकृती अंधारात हलताना दिसली.

मी प्रथम हसताना बघून, माझा मालकही हसून म्हणाला, “घाबरू नकोस. हा कार्लो, माझा मोठा कुत्रा आहे. त्याला मी माझा म्हणतो आहे. पण खरे तर म्हातारा टॉलर, माझा नोकर, त्याच्या बरोबर काहीही करू शकतो. आम्ही त्याला दिवसातून एकदा खायला देतो आणि मग काही नाही. त्यामुळे तो, सदैव सजग असतो. टॉलर त्याला रोज रात्री मोकळे सोडतो व जाणाऱ्या येणाऱ्यांवर तो वचक ठेवतो. तुला तुझा जीव प्यारा असेल तर, रात्री कधीही घराबाहेर पडू नकोस.

ती धमकी काही खोटी नव्हती. कारण दोन दिवसांनी मी माझ्या झोपायच्या खोलीतून रात्री दोन वाजता, खिडकीतून बाहेर पहात होते. छान चंद्रप्रकाश पडला होता. आणि घरासमोरील हिरवळवर चंदेरी प्रकाश पडला होता, दिवसासारखाच उजेड होता. मी उभी राहून, त्या शांत सौदर्यात, हरवून गेले होते. तेव्हा कॉपर बीचजवळ, मला एक सावली दिसली. चंद्रप्रकाशांत आल्यावर, ती काय होती ते मला दिसले. पिवळसर चॉकलेटी ठिपके असलेला, एखाद्या वासराइतका उंच, लोंबकळणाऱ्या जबड्याचा, काळया नाकातोंडाचा आणि बाहेर आलेल्या मोठ्या हाडांचा, असा तो एक मोठा कुत्रा होता. तो सावकाश हिरवळीवरून चालत

गेला व दुसऱ्या बाजूच्या सावलीत, अदृष्य झाला. त्या घराच्या भयानक राखणदाराने, माझ्या हृदयात भीतीची थंड लहर उठवली. एखाद्या चोराला इथे प्रवेश मिळणे, फारच दुरापास्त होते.

'आणि आता मला तुम्हाला, एक विचित्र अनुभव सांगायचा आहे. तुम्हाला माहिती आहे, की मी लंडनमध्ये माझे केस कापले, आणि ते गुंडाळून, माझ्या बॅगेच्या तळाशी ठेवले. एका संध्याकाळी छोटा मुलगा झोपल्यावर, मी माझ्या खोलीतील फर्निचर बघत, माझ्या वस्तु इकडून तिकडे हलवत, लावत होते. तिथे एक जुने कपाट होते. त्यातील वरचे दोन खण उघडे व रिकामे होते. सर्वात खालचा, कुलुपबंद होता. पहिल्या दोन खणात मी माझे कपडे ठेवले होते. आणि अजून माझे बरेचसे सामान असेच इकडेतिकडे पडले होते. तिसऱ्या खणाचा उपयोग मला करता येईना, म्हणून मी रागावले होते. मला वाटले कदाचित तो वापर नसल्याने, जाम घट्ट होऊन चुकून बंद राहिला असेल. मी माझा किल्ल्यांचा जुडगा घेऊन तो उघडण्याचा प्रयत्न केला. पहिलीच किल्ली त्याला बरोबर लागली. मी तो खण उघडला. त्यात फक्त एकच वस्तु होती, पण मला खात्री आहे, की तुम्ही कधीच काय होते त्याची, कल्पना करू शकणार नाही. ती एक केसांची गुंडाळी होती.

मी ती उचलली व निरखून बघू लागले. ती माझ्या केसांच्याच रंगाची व त्याच जाडीची होती. ते बघून मी चक्रावून गेले. माझे केस, कसे काय त्या खणात गेले? थरथरणाऱ्या हातांनी, मी माझ्या बॅगेतील सामान काढले व ते थोडे हलवून तळाच्या बाजूने, माझे स्वतःचे केस काढले. मी ते दोन्ही जवळजवळ ठेऊन पाहिले, तर ते अगदी सारखे होते. हे काहीतरी, विचित्र नव्हते का? मी कोड्यात पडले. याचा अर्थ काय, ते मला समजेना. मी ते केस परत खणात ठेऊन दिले. आणि मी रुकास्टलना, काही बोलले नाही. कारण मला वाटले, की त्यांनी कुलुपबंद केलेला खण उघडून, मी काही चूक केली होती.

मिस्टर होम्स, तुम्ही शेरा दिल्याप्रमाणे, मी नैसर्गिकपणे चांगली निरीक्षक आहे. आणि लवकरच सर्व घराचा नकाशा, माझ्या डोक्यात फिट बसला. पण वापरात नसलेला, असा घराचा एक भाग होता. टॉलर जिथे रहायचा, त्या खोलीचा दरवाजा, त्या भागासमोर उघडत असे. पण तो भाग नेहमी कुलुपबंद असे. तरीही एक दिवस मी जिना चढत असताना, मला त्या भागातून येणारे मिस्टर रुकास्टल भेटले. त्यांच्या हातात चाव्यांचा जुडगा होता व चेहऱ्यावर काही वेगळेच भाव होते. ते नेहमीसारखे आनंदी व मैत्रीपूर्ण दिसत नव्हते, तर एखादा वेगळाच माणूस वाटत होते.

त्यांचे गाल, लाल झाले होते. भुवया, रागाने आक्रसल्या होत्या. भावनातिरेकाने, शिरा तटतटल्या होत्या. त्यांनी कुलूप लावले व माझ्याकडे न बघता, एकही शब्द न बोलता, निघून गेले.

यामुळे, माझी चौकसबुद्धी जागृत झाली. मी चक्कर मारायला बाहेर पडले, तेव्हा जिथून घराच्या त्या बाजूच्या खिडक्या दिसतात, तेथे फिरत राहिले. एका ओळीत तिथे चार खिडक्या होत्या. त्यापैकी तीन, खूपच घाणेरड्या होत्या. चौथ्या खिडकीचे शटर उघडे होते. त्या सगळयाच ओसाड होत्या. मी त्यांच्याकडे मधूनमधून बघत, फिरत असताना, मिस्टर रुकास्टल माझ्या जवळ आले. ते नेहमीसारखेच आनंदी व मैत्रीपूर्ण दिसत होते.

ते म्हणाले, “ओहो, मी मगाशी तुझ्याशी काही न बोलता गेलो, म्हणून मला शिष्ट समजू नकोस. मी काही व्यावसायिक कामात मग्न होतो.”

मी त्यांची खात्री पटवली, की असे काही नाही. मी म्हणाले, “तसेही तुमच्याकडे तिथे वापर नसलेली, खूपच जागा दिसते आहे. आणि त्यातील एका खिडकीचे शटर, वर केलेले आहे.”

माझ्या उद्गारांनी, ते थोडे चमकले व त्याना आश्चर्य वाटलेले दिसले.

ते म्हणाले, मला फोटो काढायची हौस आहे. मी तिथे डार्क रूम तयार केली आहे. पण माझ्या प्रिय मुली, तुझे किती बारीक लक्ष आहे! कुणाचा यावर विश्वास बसेल? बसेल कुणाचा विश्वास? त्याच्या बोलण्यात खेळकरपणा होता, पण माझ्याकडे बघणाऱ्या त्यांच्या डोळयात, तो नव्हता.

“मिस्टर होम्स, त्या दिवसापासून मी समजले, की मला ज्याबद्दल काही कळणे अपेक्षित नव्हते, असा घराचा तो भाग असून, त्याबद्दल मी काही बोलणे अपेक्षित नाही. ती फक्त उत्सुकता नव्हती. मला का कुणास ठाऊक, पण असे वाटत होते, की ते माझे कर्तव्य आहे व त्या जागेच्या शोधाने, काहीतरी चांगले निष्पन्न होणार आहे. बायकांच्या सहजप्रवृत्तींविषयी बोलले जाते, तर ती माझी सहजप्रवृत्ती होती. तसेही ती होती, एवढे खरे. आणि मी त्या मनाई केलेल्या दारातून, आत जाण्याची संधी शोधू लागले.

काल तशी संधी, चालून आली. मी तुम्हाला सांगू शकते, की मिस्टर रुकास्टल, मिस्टर व मिसेस  टॉलर, याना त्या सुनसान भागात काही काम होते. एकदा मी टॉलरला मोठी काळी बॅग त्या दारातून आत नेताना पाहिले. अलीकडे तो फारच पिऊ लागला होता. आणि काल संध्याकाळी तर तो पिऊन तर् झाला होता. मी वर आले तेव्हा, तिथे दाराला किल्ली लावलेली होती. मला

तिथे त्याने ती मुद्दाम ठेवल्याचा, संशय सुद्धा आला नाही. मिस्टर व मिसेस रुकास्टल, दोघेही खाली होते. आणि मुलगा त्यांच्या बरोबर होता. त्यामुळे मला छान संधी होती. मी हळूच कुलुपात किल्ली घातली, दार उघडले व हळूच आत शिरले.

माझ्यासमोर एक गालिचा न घातलेला, जुनाट पॅसेज होता. तो उजवीकडे पुढेपर्यंत जाऊन, वळत होता. त्या कोपऱ्यात एका ओळीत तीन दारे होती. ती उघडी होती. त्यातून गेल्यावर, एक धुळीने भरलेली उदास अशी रिकामी खोली होती. तिथे एका खोलीत दोन व दुसऱ्या खोलीत एक खिडकी होती. त्या धुळीच्या थरातून संध्याकाळचा थोडा उजेड चकाकत होता. मधले दार बंद होते. आणि त्याच्या बाहेर लोखंडी कॉटचा एक मजबूत दांडा, जाड दोरीने घट्ट बांधला होता. व त्याचे टोक दुसऱ्या बाजूला भिंतीत असलेल्या घंटीच्या टोकाला बांधलेले होते. शिवाय दार कुलुपबंद होतेच. तिथे किल्ली नव्हती. हे अडथळयाचे दार, बाहेरील शटर उघडे असलेल्या खिडकीशी संबंधित होते. त्या मंद प्रकाशात मला दिसले, की खोली अंधारलेली नव्हती. सुदैवाने वरून थोडा प्रकाश येत होता. मी पॅसेजमध्ये उभी राहून, त्यात काय गुपित दडले असेल, असा विचार करत त्या त्रासदायक, पापी दाराकडे बघत होते. मला खोलीतून अचानक पायरव आला. दाराच्या फटीतून आलेल्या उजेडाच्या तिरीपीतून, मागे पुढे सावल्या हलताना दिसल्या. त्या दृष्याने माझ्या मनात अनाम भीती दाटून आली. मिस्टर होम्स, माझे ताणलेल्या मज्जातंतूनी, मला तत्काळ आज्ञा दिली व मी पाठ वळवून पळत सुटले. मी पळाले -- पळाले. जसे काही एक हात, माझा स्कर्ट ओढायला बघतो आहे. मी पॅसेजमधून, दारामधून सटकून, थेट बाहेर उभ्या असलेल्या मिस्टर रुकास्टलच्या बाहूत जाऊन पडले.

ते हसत म्हणाले, “म्हणजे, ती तू होतीस तर! मी दार उघडे पाहिले, तेव्हा मला वाटलेच.”

मी धापा टाकत म्हणाले, “ओहो, मी इतकी घाबरले!”

“माझ्या प्रिय तरुण मुली, अग, कशाला इतकी घाबरलीस?” तुम्हाला कल्पना करता येणार नाही, की त्यांचा आवाज, किती काळजीचा आणि शांत करणारा होता.

पण त्यांचा आवाज, थोडा घोगरा होता. त्यांनी तो बदलला. मी स्वतःला सावरले.

मी बोलले, “मी त्या ओसाड बाजूला जाण्याचा मूर्खपणा केला. पण तिथे मिणमिणत्या उजेडात इतके एकाकी व विचित्रपणे भीतीदायक आहे, की मी भयंकर घाबरून मागे पळत सुटले. अरे बापरे, अजूनही मी भीतीने थरथरते आहे.”

ते माझ्याकडे नीट बघत म्हणाले, “फक्त एवढेच?”

मी विचारले, “का? तुम्हाला काय वाटले?”

“मी ते दार कुलुपबंद का केले असेल, तुला काय वाटते?”

“मला माहिती नाही.”

“ज्यांचे तिथे काही काम नाही, त्याना लांब ठेवण्यासाठी. कळले का?” ते अजून त्यांच्या मिस्कील स्वभावानुसार हसत होते.

“मला खात्री आहे, जर मला माहिती असते तर --“

“ठीक आहे. मग, आता कळले ना? आणि जर परत तू तुझे पाऊल तिथे ठेवलेस तर,” -- इथे ते हसू, एकदम कडक रागात बदलले. आणि ते माझ्याकडे, एखाद्या राक्षसासारखे बघू लागले. – “तर मी तुला त्या कुत्र्याच्या गॅरेजमध्ये, फेकून देईन.”

मी इतकी घाबरले, की मी एवढे काय केले, ते मला कळेना. मला वाटते त्याना टाळून, मी माझ्या खोलीकडे पळ काढला. मी थरथर कापत, माझ्या अंथरुणावर पडले, हे सोडून मला बाकी काही आठवत नाही. मग मिस्टर होम्स, मला तुमची आठवण आली. मी तिथे आता तुमच्या सल्ल्याशिवाय, राहू शकत नाही. मी त्या घराला, त्या माणसाला, त्या बाईला, त्या नोकरांना आणि त्या मुलालासुद्धा घाबरते. ते सर्वजण माझ्यासाठी भयंकर आहेत. अर्थात मी घरातून पळून, गेले असते. पण माझी उत्कंठा, माझ्या भीतीइतकीच जोरदार आहे. माझे मन लवकरच तयार झाले. मी तुम्हाला तार पाठवू शकते. मी माझी टोपी व जाकीट घातले आणि घरापासून अर्ध्या मैलावर असलेल्या पोस्टात गेले. तार करून घरी आले, तेव्हा कुठे माझ्या जीवात जीव आला. जेव्हा मी दाराशी आले, तेव्हा मला भलतीच शंका आली की, कदाचित कुत्रा सुटा असेल. पण मग मला आठवले, की त्या संध्याकाळी टॉलर त्याच्या सगळ्या संवेदना बधीर होईपर्यंत, प्यायला होता. आणि तो घरात एकटाच होता, की ज्याचा त्या रानटी प्राण्यावर काबू होता. इतर कोण त्याला मोकळे सोडू शकणार? मी सुरक्षितपणे, झोपायला गेले व तुम्हाला भेटायचे ठरल्याने, आनंदाने अर्धी रात्र जागीच राहिले. आज सकाळी रजा घेऊन, विंचेस्टरला येण्यात मला काही अडचण आली नाही. पण मला तीन वाजण्यापूर्वी घरी परत गेले पाहिजे. कारण मिस्टर आणि मिसेस रुकास्टलना, कुणाच्या तरी भेटीसाठी संध्याकाळभर, बाहेर जायचे आहे. त्यामुळे मुलाकडे मला बघायचे आहे. मी आता तुम्हाला माझी सर्व साहसे, सांगितली आहेत. मिस्टर होम्स, या सर्वाचा अर्थ काय आहे, ते तुम्ही मला सांगितलेत तर बरे होईल व सर्वात महत्वाचे म्हणजे अशा परिस्थितीत मी काय करावे.”

ही असामान्य गोष्ट, आम्ही अगदी स्तब्धतेने ऐकली. माझा मित्र उठला आणि खोलीत येरझऱ्या घालू लागला. त्याचे हात खिशात होते व चेहरा गंभीर दिसत होता.

त्याने विचारले, “टॉलरला अजून दारू चढलेलीच आहे का?”

“हो. मी त्याच्या बायकोला, मिसेस रुकास्टलशी बोलताना ऐकले, की ती त्याच्या बाबतीत, काही करू शकत नाही.”

“ते ठीक आहे. आणि रुकास्टल बाहेर चालले आहेत?”

“हो.”

“तिथे तळघरात, एखादी कुलुपबंद मजबूत खोली आहे का?”

“हो. वाईन ठेवायची खोली.”

मिस हंटर, तेथील सर्व वेळ, तू एखाद्या शूर आणि विचारी मुलीसारखे, वर्तन ठेवले आहेस. तुला मी अजून एक गोष्ट करायला सांगितली, तर तू करू शकशील का? मला तू कमालीची असामान्य मुलगी वाटतेस आणि म्हणूनच मी तुला, हे करायला सांगतो आहे.’

“मी प्रयत्न करीन. ते काय आहे?”

“माझा मित्र आणि मी, असे आम्ही दोघे कॉपर बीचला, सातपर्यंत येऊ. रुकास्टल, तोपर्यंत गेलेले असतील. आणि दारुडा टॉलर, आम्हाला वाटते काही क्षमता नसलेला असेल. पण कदाचित मिसेस टॉलर धोकादायक ठरू शकेल. तू तिला काही कामाकरता त्या तळघरातील खोलीत पाठव व तेथे तिला कोंडून ठेव. ओसाड भागाची किल्ली, तिच्याकडून हस्तगत करून घे. तुला ते नक्की जमेल.”

“मी ते करते.”

“छान! मग काय ते, आम्ही बघून घेतो. अर्थात याबाबतीत एकच, योग्य असे स्पष्टीकरण आहे. तुला तिथे काही उद्देशाने, आणले गेले आहे. आणि खरी व्यक्ती, तिथे तुरुंगात बंद आहे, हे नक्की आहे. आता हा कैदी कोण आहे, तर मला तरी नक्की, ती त्याची मुलगीच असणार, असे वाटते आहे. मिस ॲलीस रुकास्टल. जर मला बरोबर आठवत असेल तर, ती अमेरिकेला गेल्याचे, सांगण्यात आले आहे. साधारण तिच्या उंचीची, शरीरयष्टीची, आणि केसांच्या रंगाची तू असल्यामुळे, तुला निवडले गेले असावे. बहुधा एखाद्या आजारपणामुळे, तिचे केस कापलेले

असल्याने, अर्थात तुलाही केस कापायला सांगण्यात आले. तुझ्या चौकस स्वभावामुळे, तुला तिचे केस सापडले. रस्त्यात उभा असलेला माणूस, नक्की तिचा कोणीतरी मित्र असणार, बहुधा प्रियकर. आणि नक्कीच तू निळा ड्रेस घातल्यावर, तू अगदी तिच्यासारखी दिसत असणार. तुझे हसणे ऐकून, तो तुला मिस रुकास्टल समजला असणार. तुला पाहिल्यावर, तुझ्या हालचालीवरून व तुझ्या हसण्यावरून, तू खूपच आनंदी असणार व आता तुला, त्याची काही गरज नसल्याचे, त्याला कळले असणार. त्याला तुझ्याशी काही संपर्क साधता येऊ नये म्हणून, कुत्र्याला रात्री मोकळे सोडले जात असणार. इतके तरी, मला नक्की कळल्यासारखे वाटते आहे. या बाबतीतील सर्वात गंभीर बाब म्हणजे, त्या मुलीचे नाहीसे होणे."

मी किंचाळलो, "त्याच्याशी या गोष्टीचा काय संबंध?"

"माझ्या प्रिय वॉटसन, तू वैद्यकीय क्षेत्रातील माणूस आहेस आणि तुला नेहमीच मुलांच्या प्रवृत्तींसंबंधी, पालकांकडून माहिती मिळत असते. तुला असे वाटत नाही का, की याचा व्यत्यासदेखील खरा आहे? मला मुलांचा अभ्यास करून नेहमी पालकांबद्दल खरी अंतर्दृष्टी मिळालेली आहे. त्या सहा वर्षाच्या मुलाचा स्वभाव फार दुष्ट आहे, केवळ दुष्टपणासाठी दुष्ट! त्या मुलाने हा गुण ( ? ) त्याच्या हसऱ्या वडीलांकडून घेतला असावा, असा मला तरी संशय येतो. किंवा त्याच्या आईकडून त्याने त्या बिचाऱ्या मुलीबद्दलचा द्वेष घेतला असावा. ती गरीब बिचारी मुलगी त्यांच्या अरेरावीखाली. दडपली गेलेली आहे.

आमची अशील ओरडली, "मिस्टर होम्स, मला खात्रीने तुमचे बरोबर वाटते. मी हजारो गोष्टी बघितल्या व त्या आठवल्यावर, तुमचे म्हणणे मला एकदम पटते आहे. ओहो, आपण त्या बिचाऱ्या मुलीला मदत करण्यासाठी, आता एक क्षण सुद्धा, वाया घालवायला नको."

"आपण धोका पत्करायला नको, कारण आपण एका अत्यंत लबाड माणसाशी, सामना करत आहोत. आपण सात वाजेपर्यंत, तर काही करू शकत नाही. नंतर आम्ही, तुझ्याबरोबर असू. पण गूढ उकलायला, खूप वेळ लागेल."

तिला शब्द दिल्याप्रमाणे, आम्ही जेव्हा कॉपर बीचला पोचलो, तेव्हा बाजूच्या एका मोकळया घरात, दबा धरून बसलो. एखादे चकचकीत धातूचे भांडे उन्हात चमकावे तशी गडद चकाकणाऱ्या पानांच्या झाडांची तिथे दाटी होती. त्यामुळे जरी मिस हंटर हसत, त्या घराच्या दारात उभी नसली, तरी ते घर आम्हाला स्पष्ट दिसत होते. आम्ही हळूच घरात शिरलो.

होम्सने मिस हंटरला विचारले, "तुला आपल्या बेताप्रमाणे करणे, जमले का?'

खालून कुठून तरी काहीतरी पडल्याचा / हलल्याचा आवाज आला. ती म्हणाली, ”मिसेस टॉलर खाली तळघरात आहे. तिचा नवरा स्वयंपाकघरातील फरशीवर रग घालून झोपला आहे. आणि या मिसेस रुकास्टलच्या चाव्यांच्यावरून बनवलेल्या चाव्या.”

होम्स उत्साहाने म्हणाला, “तू छान काम केलेस. आता आम्हाला वाट दाखव आणि आपण लगेचच, या काळया धंद्याचा खातमा करू.”

आम्ही जिना चढून गेलो, दार उघडले. पॅसेज ओलांडून गेलो. आम्ही मिस हंटरने वर्णन केलेले अडथळयाचे दार पाहिले. होम्सने दोऱ्या कापल्या. लोखंडी बार दूर केला. मग त्याने कुलुपात अनेक किल्ल्या घालून पाहिल्या. आतून काही आवाज आला नाही. शांततेमुळे, होम्सचा चेहरा उतरला.

तो म्हणाला, “मला विश्वास वाटतो, की आपल्याला फार उशीर झालेला नाही. मिस हंटर, मला वाटते, तुला इथेच थांबवून, आम्ही आत गेलेले बरे. वॉटसन, तू तुझ्या खांद्याचा जरा, जोर लाव व मीही लावतो. आणि आपण बघू, की आपल्याला आत जाता येईल का.”

ते एक मोडकळीला आलेले दार होते. आम्ही एकत्रित दिलेल्या धक्क्याने, ते कोलमडून पडले. आम्ही खोलीत घुसलो. तिथे फर्निचर नव्हते. एक चटई, लहान टेबल व एक पिशवीभर कपडे होते. वर खुले आकाश होते व कैदी गायब होता.

होम्स म्हणाला, “इथे काहीतरी दुष्ट, खलनायकी बेत शिजलेला दिसतो आहे. मिस हंटरची, नको ती लक्षणे दिसल्यामुळे, त्याच्या बळीला, त्यांनी हलवलेले दिसते.”

“पण कसे?”

वरून उघड्या छपरातून. आपण लवकरच शोधून काढू, की त्याने हे कसे केले. तो छपरावर चढला व ओरडला, “अरे हो, इथे एक शिडी लावलेली, दिसते आहे. त्याने ते, असे केले तर!”

मिस हंटर म्हणाली, ‘पण हे अशक्य आहे. रुकास्टल इथून गेले तेव्हा, इथे शिडी नव्हती.”

“त्याने परत येऊन हे केले. मी तुला सांगतो, तो हुशार व धोकादायक मनुष्य आहे. मला त्याचा पदरव पायऱ्यांवरून येतो आहे व त्याचे मला काही नवल वाटत नाही. वॉटसन, तुझे पिस्तुलदेखील तयार ठेव.”

तो हे शब्द उच्चारतो आहे तोच, दारात एक मनुष्य अवतीर्ण झाला. तो महाकाय, जाडा माणूस मिस्टर रुकास्टल होता.

त्याच्या हातात एक जड काठी होती. त्याला बघून मिस हंटर, एक किंकाळी फोडून भिंतीवर आदळली. पण होम्सने पुढे होऊन, त्याला प्रतिकार केला.

तो म्हणाला, “अरे दुष्टा, तुझी मुलगी कुठे आहे?”

त्या दुष्ट माणसाने गरागरा डोळे फिरवले. तो वरच्या पट्टीत ओरडला, “अरे चोरानो, हेर आणि चोर! मी तुम्हाला पकडले आहे, काय समजलात? तुम्ही आता, माझ्या ताब्यात आहात. मी तुमच्याकडे बघतो.” तो वळला व धाडधाड जिना उतरून गेला.

मिस हंटर ओरडली, “तो कुत्र्याला आणायला गेला.”

मी म्हणालो, “माझ्याकडे माझे पिस्तुल आहे.”

होम्स ओरडला, पुढचे दार लावलेले बरे. आम्ही एकदम खाली धावलो. आम्ही हॉलमध्ये पोचतो न पोचतो तोच, आम्ही त्या महाभयानक कुत्र्याचा आवाज ऐकला. आणि नंतर पिळवटून टाकणाऱ्या आवाजात एक मोठी आरोळी! ती ऐकायलाही भयानक होती. लाल चेहऱ्याचा एक वयाने मोठा मनुष्य, त्याचे हात उगारून, लटपटत कडेच्या दाराने आला.

तो ओरडला, “अरे बापरे, कोणीतरी कुत्र्याला मोकळे सोडले आहे. त्याला दोन दिवसात, खाणे दिलेले नाही. लवकर. लवकर. नाहीतर उशीर होईल.”

होम्स व मी बाहेर धावलो. घराभोवती फिरताना, टॉलर आमच्या मागे घाईने येत होता. तिथे तो मोठा, भुकेलेला, हिंस्त्र प्राणी होता. त्याच्या काळया तोंडाने त्याने, रुकास्टलचा घसा पकडला होता. रुकास्टल सुटायचा प्रयत्न करत असताना, किंचाळत जमिनीवर पडला. धावत जाऊन मी गोळी मारून त्या कुत्र्याचा कोथळा बाहेर काढला. तो कुत्रा त्याचे दात अजूनही रुकास्टलच्या घशात असलेल्या अवस्थेत, खाली पडला. खूप जोर लाऊन, आम्ही दोघाना एकमेकांपासून बाजूला केले व जिवंत पण भयंकर रित्या जखमी अवस्थेत, रुकास्टलला आम्ही घरात आणले. त्याला हॉलच्या सोफ्यावर झोपवले. भानावर आलेल्या टॉलरला, त्याच्या बायकोला बातमी सांगण्यासाठी, पाठवले. रुकास्टलच्या वेदना कमी करण्यासाठी, मला जे काही करता येईल, ते मी केले. आम्ही सगळे, त्याच्याभोवती जमा झालो. तेव्हा दार उघडून, एक उंच, त्रासलेली बाई, खोलीत शिरली. मिस हंटर ओरडली, “मिसेस टॉलर!”

“हो. मिस्टर रुकास्टलने मला, तो आल्यावर तळघरातील खोलीतून बाहेर काढले व मग तो तुमच्या मागावर वरती गेला. ओहो, मिस हंटर, तुम्ही काय बेत करत आहात, हे मला सांगितले नाहीत. मी तुम्हाला सांगितले असते, की तुमचे श्रम फुकट जाणार आहेत.”

होम्स तिच्याकडे नीट बघत म्हणाला, “मिसेस टॉलरला या बाबतीत, नक्कीच कुणाहीपेक्षा जास्त माहिती असणार.”

“हो सर, मला माहिती आहे. आणि मला जे माहिती आहे, ते सांगायला मी तयार आहे.”

“ठीक आहे. मग खाली बस. बऱ्याच गोष्टी अशा आहेत, की ज्याबाबत मी अजून अंधारात आहे. त्यामुळे आपण ऐकूया.”

ती म्हणाली, “लवकरच मी तुम्हाला सर्व काही स्पष्ट करते. पण, जर मी या तळघरातून बाहेर पडले असते, तर मी आधीच तुम्हाला हे सांगितले असते. जर हे प्रकरण कोर्टात गेले, तर तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल, की मी तुमच्या बाजूने, उभी राहीन. मी मिस ॲलीसची सुद्धा मैत्रिण होते.

तिच्या वडीलांनी, दुसरे लग्न केल्यापासून, मिस ॲलीस या घरात, कधीच सुखी नव्हती. ती घरात नसल्यासारखीच असे. तिला घरात, काही स्थान नव्हते. पण तिच्या मैत्रिणीकडे तिला, मिस्टर फॉउलर भेटेपर्यंत, खरे तर त्यांचे संबंध, इतके वाईट नव्हते. मला वाटते त्याप्रमाणे, मिस ॲलीसला, तिच्या इच्छेप्रमाणे वागायचा हक्क होता. पण ती इतकी शांत व धीराची मुलगी होती, की ती कधीही त्याना, उलटून काही बोलली नाही. ती सगळे काही, मिस्टर रुकास्टलच्या हातात सोपवून मोकळी होई. त्याला माहिती होते, की ती आपल्या घरी सुरक्षित आहे. पण नवऱ्याचा विषय आला तेव्हा रुकास्टलच्या लक्षात आले, की लग्नानंतर जावयाने कायद्याप्रमाणे, संपत्तीत त्याचा हक्क मागितला, तर मग काय? म्हणून त्याने विचार केला, की हे सर्व थांबवले पाहिजे. त्याला मुलीने एका कागदावर सही करायला हवी होती, ज्यात असे लिहिले होते, की तिने लग्न केलेले असो वा नसो, तो तिचे पैसे वापरू शकतो. जेव्हा तिने हे नाकारले, तेव्हा तो तिला त्रास देऊ लागला. मग तिला मेंदू ज्वर झाला. सहा आठवडे ती, अंथरुणाला खिळून होती. जवळजवळ, मरायला टेकली होती. मग शेवटी, ती बरी झाली. पण अगदी जणू तिची सावलीच राहिली होती. तिचे सुंदर केस कापले होते. पण त्यामुळे त्या प्रियकरामध्ये, काही फरक पडला नाही. तो तिच्याशी एकनिष्ठ राहिला.”

होम्स उद्गारला, “अरे वा! तुम्ही हे सांगून, आम्हाला बऱ्याचशा बाबी, स्पष्ट केल्या आहेत. आणि आता उरलेले मी अंदाजाने जाणू शकतो. मिस्टर रुकास्टलने, मला वाटते, तिला घराच्या ओसाड भागात डांबून ठेवले.”

“हो, सर.”

“आणि मिस्टर फॉउलरचा, अमान्य असलेला ससेमिरा चुकवण्यासाठी, मिस हंटरला लंडनहून आणले.”

“हो. बरोबर, सर.”

यशाची खात्री नसताना, अडचणीच्या काळातदेखील तो प्रियकर, एखाद्या चांगल्या खलाशाप्रमाणे, घरावर लक्ष ठेवून राहिला. तुम्हाला भेटून, बोलून, या ना त्या पद्धतीने त्याला पण, तुमच्यासारखाच तिच्यात रस असल्याचे, सांगत राहिला.”

मिसेस टॉलर शांत स्वरात म्हणाली, “मिस्टर फॉउलर हा दयाळू व दिलखुलास सभ्य गृहस्थ आहे.”

“आणि अशा तऱ्हेने तुमच्या नवऱ्याला दारू कमी पडणार नाही व तुमचा मालक जेव्हा बाहेर जाईल, तेव्हा तुम्हाला शिडी मिळायची व्यवस्था होईल, असे त्याने पाहिले.”


सर, तुम्ही जसे घडले, तसे बरोबर सांगितलेत.”

होम्स म्हणाला, “मिसेस टॉलर, आम्हाला तुमची माफी मागितली पाहिजे. मला पडलेले सगळे प्रश्न, तुम्ही सोडवले आहेत. आता इथे गावातील डॉक्टर व मिसेस रुकास्टल येत आहेत. वॉटसन, मला वाटते, आपण मिस हंटरला, परत विंचेस्टरला सोडावे. कारण आता आपले इथे रहाणे, बरोबर वाटत नाही.’

तर अशा तऱ्हेने, पुढच्या दारासमोर कॉपर बीच असलेल्या त्या पापी घराचे गूढ सोडवले गेले. त्यांच्या एकनिष्ठ पत्नीने घेतलेल्या काळजीमुळे, मिस्टर रुकास्टल जगले, पण नेहमी त्यांची तब्येत खराबच राहिली. ज्याना त्यांचे सगळे आयुष्य माहिती आहे, अशा त्यांच्या जुन्या नोकरांबरोबर, ते अजूनही रहातात. त्यांच्यापासून अलग रहाणे, त्याना अवघड जाते. सथमटन मधील खास परवान्याने, मिस्टर फॉउलर व मिस रुकास्टलचे लग्न झाले. आणि तो आता मॉरीशस सरकारमध्ये नोकरी करतो. दुर्दैवाने, एकदा मिस हंटरची समस्या सुटल्यावर, होम्सने तिची फारशी दखल घेतली नाही. ती आता वाल्साल येथे, एका खासगी शाळेची, मुख्य आहे. मला वाटते, तिथे तिने चांगले यश मिळवले असणार.

# The Adventure of the Speckled Band

# ठिपक्यांचा पट्टा



गेल्या आठ वर्षात माझा जुना मित्र शेरलॉक होम्स याच्या सत्तर विचित्र केसेसमधील गुन्ह्याच्या तपासाच्या पद्धतींचा अभ्यास करताना व माझ्या टिपणांवर नजर टाकताना, मला खूपशा दुःखांत, काही विनोदी अशा केसेस आढळल्या. त्यापैकी एकही सर्वसामान्य अशी म्हणता आली नसती. तो पैशांपेक्षा, त्याच्या शोधकलेवरील प्रेमाला जास्त महत्व देत असे. एखादी वेगळी केस असल्याशिवाय, तो त्याला हात लावत नसे. पण या सर्व केसेसची आठवण काढताना, मी स्टोक मोरान येथील प्रसिध्द सरे कुटुंबातील रॉयलॉटच्या, अगदी वेगळया प्रकारच्या केसचा उल्लेख केल्याशिवाय, राहू शकत नाही. आम्ही दोघे अविवाहित असून, बेकर रस्त्यावर रहात होतो व मी होम्ससाठी, नुकताच काम करू लागलो होतो, तेव्हाची ही गोष्ट आहे. मी गुप्तता पाळण्याचे वचन दिल्याने या केसबद्दल काही बोलू शकत नव्हतो. पण ज्या महिलेला हे वचन दिले होते ती, मागील महिन्यात वारल्यामुळे, आता मी त्याबद्दल बोलायला मोकळा झालो आहे.

डॉक्टर ग्रीम्सबाय रॉयलॉटच्या मृत्युबद्दल चोहीकडे पसरलेल्या अफवांकडे पहाता, खरे काय ते लोकांसमोर येणे मला, कदाचित आवश्यक वाटत होते.

८३ सालातील एप्रिलच्या सुरवातीच्या दिवसातील, ती एक घटना होती. माझ्या अंथरुणाशेजारी बाहेर जायच्या कपड्यात, शेरलॉक होम्स उभा होता. तो, नेहमी उशीरा उठत असे व शेकोटीच्या भिंतीवरील घड्याळ, फक्त पावणेआठ वाजल्याचे दाखवत होते. त्यामुळे मी डोळे चोळत त्याच्याकडे आश्चर्याने व थोडे रागाने बघितले. कारण मी माझ्या सवयींचा पक्का होतो.

तो बोलला, "वॉटसन, मला माफ कर. पण आजकाल असे वारंवार होऊ लागले आहे. मिसेस हडसननी मला उठवले व मी तुला."

"पण असे झाले काय? आग लागली का?"

'नाही. एक अशील. फार प्रक्षोभक अवस्थेत, एक तरुणी आलेली दिसते आहे. तिला मला भेटायचे आहे. ती आत्ता, हॉलमध्ये बसली आहे. आता जेव्हा शहरात सकाळच्या वेळी, तरुणी अशा भटकतात व झोपलेल्यांना अंथरुणातून बाहेर काढतात, तेव्हा मला वाटते की त्याना, फार तणावपूर्वक असे काहीतरी सांगायचे असते. मला वाटते की ते रुचीपूर्ण असेल व तुला ऐकायला नक्कीच आवडेल. काही झाले तरी, मला वाटते, की तुला ते ऐकायची संधी द्यावी."

"माझ्या प्रिय माणसा, मी काही झाले तरी, ही संधी सोडणार नाही."

होम्सने त्याच्याकडे आलेल्या समस्यांच्या बाबतीत, झटपट तर्कबुद्धीने व अंतर्गत जाणीवा वापरून केलेल्या व्यवसायिक तपासामध्ये, त्याला साथ देण्याइतके आनंददायी दुसरे काही नव्हते. मी काही मिनिटात, झटपट कपडे करून, माझ्या मित्राबरोबर जाण्यासाठी तयार झालो. काळे कपडे व चेहऱ्यावर अवगुंठन अशा स्वरूपातील एक महिला, आम्ही आत शिरलो तेव्हा खिडकीजवळ बसली होती. होम्सने तिला आनंदाने अभिवादन केले व तिच्याबरोबर माझी ओळख करून दिली. तो बोलला, "तुम्ही अगदी मोकळेपणे कायकाय घडले ते सांगा. मिसेस हडसननी तुम्हाला आमच्याकडे पाठवून, चांगले मार्गदर्शन केले आहे. तुम्ही कुडकुडत आहात, तेव्हा मी तुम्हाला कॉफी मागवतो."

विनंती केल्याप्रमाणे शेकोटीजवळ सरकत, ती हळू आवाजात बोलली. "मला थंडी लागून शहारा येत नाही आहे."

"मग कशामुळे?"

“मिस्टर होम्स. भीतीमुळे येतो आहे. ही दहशत आहे. तिचे अवगुंठन काढत, ती म्हणाली. ती खरंच काळजीत पडल्यासारखी, दयनीय दिसत होती. तिचा चेहरा उतरून पांढराफटक पडला होता. शिकारीसाठीचे भक्ष्य असलेल्या जनावरासारखे तिचे डोळे घाबरून विस्फारलेले होते. ती तिशीची वाटत होती, पण केस आत्ताच करडे झालेले दिसत होते. ती आजारी व दमल्यासारखी दिसत होती.

शेरलॉक होम्सने तिच्याकडे, घाईघाईने पण तरीही सर्वसमावेशक असा दृष्टीक्षेप टाकला. पुढे वाकून तिच्या हातावर थोपटत, तो हळूवार आवाजात म्हणाला, “तुम्ही अजिबात घाबरू नका. आपण लवकरच सर्व काही सुरळीत करू, यात काही शंका नाही. मला वाटते, तुम्ही आज सकाळच्या गाडीने आलात का?”

“तुम्हाला माहिती दिसते आहे.”

“नाही. पण मी तुमच्या मोजे घातलेल्या डाव्या हातात तिकीट बघितले. तुम्ही घरातून लवकर निघालेल्या असणार. पुढे कुत्र्यांच्या गाडीने रस्ते तुडवत, स्टेशन गाठले असणार.”

त्या महिलेने माझ्या मित्राकडे घाबरून बघितले.

तो हसत म्हणाला, “यात गूढ काही नाही, बाईसाहेब तुमच्या जाकीटाचा डाव्या हातावर जवळजवळ सात ठिकाणी चिखल उडाला आहे. खुणा तशा ताज्या वाटत आहेत. अशा तऱ्हेने चिखल फक्त कुत्र्यांच्या गाडीनेच उडतो. आणि तुम्ही चालकाच्या डाव्या हाताला बसला असाल तरच उडतो.”

ती म्हणाली, “तुमचे तर्कशास्त्र काही असो. पण तुम्ही, एकदम बरोबर आहात. मी घरातून, सहापूर्वी निघाले. वीस मिनिटांनी, लेदरहेडला पोचले. मग पहिल्या गाडीने, वॉटरलूला आले. आता हा ताण, मला सहन होत नाही. अजून हे असेच चालू राहिले तर मी वेडी होईन. फक्त एकजण सोडून मला जवळचे, काळजी घेणारे, असे कुणी नाही. आणि तो गरीब बिचारा, मला काय मदत करणार! मिसेस फारींतोषला तुम्ही गरज असताना मदत केल्याचे, मी तिच्याकडून तुमच्याबद्दल ऐकले होते. तिच्याकडून मी तुमचा पत्ता घेतला. ओहो सर, तुम्हाला असे वाटत नाही का, की तुम्ही मला मदत करू शकाल? माझ्याभोवती पसरलेल्या दाट अंधारातून, मला थोडासा तरी प्रकाश तुम्ही दाखवू शकाल का? तुमच्या कामाबद्दल तुम्हाला पैसे देणे, मला आत्ता जमणार नाही. पण महिन्या दीड महिन्यात, माझे लग्न झाले, की माझ्या पैशानी मी तुमची फी देईन.”

होम्स त्याच्या टेबलाकडे वळला. त्याचा खण उघडून, त्याने त्याचे केस बुक काढले. त्यात त्याने पूर्वी केलेल्या केसेसची यादी होती.

तो म्हणाला, “फारींतोष. हो. हो. मला ती केस आठवली. ती केसांच्या रत्नजडीत बिंदीसंबंधी होती. मला वाटते वॉटसन, ती तू येण्यापूर्वीची होती. बाईसाहेब, मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो, की मी तुमची केसदेखील, त्याच काळजीने हाताळीन. हे काम करायला मिळणे, हेच माझे बक्षिस आहे. पण त्यासाठी जो काही खर्च होईल, तो तुम्ही मला तुमच्या सवडीने देऊ शकता. आता मी तुम्हाला अशी विनंती करेन, की तुम्ही आमच्यासमोर सर्व हकीगत विस्ताराने मांडा, जेणेकरून आम्हाला या केसबद्दल आमचे मत बनवता येईल.’

आमची पाहुणी उद्गारली, “अरेरे! माझी अशी भयानक परिस्थिती आहे, की माझी भीती व संशय चुकीचा असू शकेल. कारण तो अगदी सर्वस्वी, लहानसहान गोष्टींवर अवलंबून आहे व तो दुसऱ्याना फालतू वाटू शकतो. जो माझ्या अगदी जवळचा आहे व ज्याची मदत मी घेऊ शकते, त्यालाही हे सर्व, एका उदास व निराश महिलेचे मनाचे खेळ वाटतात. तो असे बोलून दाखवत नाही, पण ते मला त्याच्या समजूतदार उत्तरांवरून व नजरेला नजर न देण्यावरून, लक्षात येऊ शकते. पण मिस्टर होम्स, मी असे ऐकले आहे की तुम्हाला मनुष्याच्या मनात खोल रुजलेला दुष्टपणा, जाणून घेता येऊ शकतो. माझ्याभोवतीच्या धोक्यांमधून मी कशी वाट काढावी, याबद्दल तुम्ही मला मार्गदर्शन करू शकता.”

“बाईसाहेब, मी लक्षपूर्वक ऐकतो आहे.”

“माझे नाव हेलन स्टोनर आहे. मी माझ्या सावत्र वडीलांबरोबर रहाते. इंग्लंडमधील सर्वात जुन्या सॅक्सॉन कुटुंबातील, ते शेवटचे वारस आहेत. ते सुरेच्या पश्चिम सीमेवरील स्टोक मोरान येथील, रॉयलॉट नावाचे गृहस्थ आहेत. “

होम्सने त्याची मान डोलावली व बोलला, “हे नाव मला ओळखीचे वाटते आहे.”

“एके काळी ते इंग्लंडमधील सर्वात श्रीमंत कुटुंब होते. उत्तरेकडील बर्कशायरपासून पश्चिमेकडील हँपशायरपर्यंत त्यांची इस्टेट पसरलेली होती. पण तरीही मागील शतकातील चार पिढ्या ढासळलेल्या नीतिमत्तेच्या व खर्चिक निघाल्याने, कुटुंबाची परिस्थिती वाईट झाली. यथावकाश राजेशाहीच्या काळात, कुटुंबातील एका जुगाऱ्यामुळे, पूर्ण कुटुंब गाळातच गेले. काही एकर जमीन व दोनशे वर्षे जुने घर सोडून, काही शिल्लक राहिले नाही व तेही जबरदस्त कराच्या ओझ्याखाली होते. तेथील कुटुंबातील शेवटचा जमीनदार, उमरावाचे पोकळ आयुष्य जगत

कसेबसे आयुष्य ढकलत होता. पण त्याचा एकुलता एक मुलगा, म्हणजे माझे सावत्र वडील, याना काहीतरी हातपाय हलवले पाहिजेत हे कळले. त्यांनी एका नातेवाइकाकडून थोडेफार पैसे उसने घेऊन, वैद्यकीय शिक्षणक्रम पूर्ण केला. कलकत्त्याला येऊन, स्वतःच्या स्वच्छ चारित्र्याच्या व व्यावसायिक कसबाच्या जोरावर, डॉक्टर म्हणून जम बसवला. एकदा घरातील किरकोळ चोरीच्या संदर्भात, त्यांनी संबंधित स्वयंपाक्याला बेदम मारले व तो मेल्यामुळे, तिथून पळ काढला. पण तरीही त्याना, अनेक वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्यानंतर, ते इंग्लंडला परतले. तेव्हा ते खूप निराश व चिडके झाले होते.

डॉक्टर रॉयलॉट भारतात असताना त्यांनी माझ्या आईशी, मिसेस स्टोनरशी लग्न केले. बंगालच्या सैन्याच्या शस्त्रविभागात माझे दिवंगत वडील, मिस्टर स्टोनर काम करत असत. माझी बहीण ज्युलिया व मी जुळया बहिणी होतो आणि तेव्हा आम्ही फक्त दोन वर्षांच्या होतो. माझ्या आईकडे बराच पैसा होता. वर्षाला १००० पौंडांपेक्षा कमी नाही. ते सर्व पैसे तिने, डॉक्टर रॉयलॉट यांच्या नावे केले. पण त्यात अशी अट घातली, की आमच्या लग्नानंतर, आम्हाला दरवर्षी ठराविक रक्कम मिळाली पाहिजे. आम्ही इंग्लंडला परत आल्यावर लगेचच, माझी आई वारली -- आठ वर्षांपूर्वी एका रेल्वे अपघातात, ती ठार झाली. नंतर माझ्या सावत्र वडीलांनी, डॉक्टरकी सोडून दिली व आम्ही स्टोक मोरान येथील, पूर्वजांच्या जुन्या घरात रहायला गेलो. आमच्या आईने ठेवलेला पैसा, आमच्यासाठी पुरेसा होता व आम्ही आनंदात रहात होतो.

पण आमच्या सावत्र वडीलांच्या आयुष्यात एक भयानक बदल घडून आला. आमच्या शेजाऱ्यांबरोबर जाणेयेणे व चांगले संबंध ठेवण्याऐवजी, वडीलांनी स्वतःला घरात कोंडून घेतले. खरे तर तेथील लोक प्रथमतः रॉयलॉट कुटुंब त्यांच्या घरी परतल्यामुळे, फार आनंदित झाले होते. पण वडीलांच्या वाटेत येणाऱ्या प्रत्येकाशी, त्यांची जोरदार भांडणे होऊ लागली. रॉयलॉट घराण्यात, मला वाटते, टोकाच्या हिंसाचाराचे भूत वंशपरंपरेने त्यांच्यावर स्वार झाले असावे. आणि ते दीर्घ काळ आफ्रिकेसारख्या उष्ण देशात राहिल्यामुळे की काय, पण त्यांचा तसा स्वभाव दिवसेंदिवस वाढू लागला असावा. शिव्यागाळी, भांडणे यांनी, मारामाऱ्यांपर्यंत मजल गाठली. त्यापैकी दोन प्रकरणे पोलीस व कोर्टापर्यंत गेली. शेवटी गावातील लोक, त्याना वचकून राहू लागले. ते येताना दिसल्यास, लोक पळून जाऊ लागले. कारण तो आडदांड व राग आवरण्यास कठीण असा मनुष्य होता.

मागील आठवड्यात त्याने, गावातील लोहाराला वरून ओढ्यात फेकून दिले. तेव्हा, माझ्याजवळ होते नव्हते तेवढे सर्व पैसे देऊनच, मी परत गावात तोंड दाखवू शकले. भटकणारे जिप्सी सोडून, त्याना कुणी मित्र नव्हते. खुरटलेली झाडे झुडुपे उगवलेल्या त्यांच्या मालकीच्या

काही एकर जमिनीवर, ते त्याना रहायची परवानगी देत. त्याबदल्यात ते त्यांच्या तंबूत, त्यांचा पाहुणचार घेत. त्याना सर्व भारतीय प्राण्यांची आवड होती व ते प्राणी जिप्सी त्याना भेट देत. त्यांच्याकडे आत्ता एक बबून माकड व एक चित्ता असे दोन प्राणी आहेत. त्यांचा सर्वत्र मुक्त संचार असतो. त्यांच्या मालकाइतकेच, गावकरी त्या प्राण्यानाही घाबरतात. जिप्सींबरोबर ते कधीकधी आठवडेच्या आठवडे भटकतात.

माझ्या वर्णनावरून तुमच्या लक्षात आले असेल, की मी व माझी बहीण ज्युलिया यांच्या आयुष्यात काही आनंद उरला नव्हता. आमच्याबरोबर नोकर रहात नसत. खूप काळापासून घरातील सर्व काम, आम्हीच करत असू. ज्युलिया तिच्या मृत्युसमयी, तीस वर्षांची होती. त्या वयात तिचे केस, पिकून पांढरे होऊ लागले होते व माझेही.

“काय, तुझी बहीण वारली?”

“दोन वर्षांपूर्वी ती वारली. तिच्या मृत्युबद्दल मला तुमच्याशी बोलायचे आहे. तुमच्या लक्षात आले असेल, की अशा स्वरूपाचे आयुष्य जगताना आम्हाला, आमच्या बरोबरीचे कुणी भेटत नसे. तरी आम्हाला मिस होनोरिया वेस्टफेल नावाची, एक मावशी होती. ती हॅरोजवळ रहात असे आणि प्रसंगापरत्वे, आम्हाला तिच्याकडे जायची परवानगी होती. दोन वर्षांपूर्वी ज्युलिया नाताळमध्ये तिथे गेली असताना, तिला नौदलातील एक मेजर भेटला व तिने त्याच्याबरोबर लग्न ठरवले. माझी बहीण घरी परतल्यावर, माझ्या सावत्र वडीलाना ते कळले. त्यांनी काही हरकत घेतली नाही. पण तिच्या लग्नाआधी पंधरा दिवस, एक भयंकर घटना घडली व मी माझ्या बहिणीला उर्फ मैत्रिणीला, गमावून बसले.

शेरलॉक होम्स खुर्चीत मागे टेकून, डोळे मिटून व त्याचे डोके उशीत खुपसून बसला होता. पण आता त्याने पापण्या उचलून, आमच्या पाहुणीकडे बघितले.

“अगदी खोलात जाऊन, घडलेली प्रत्येक गोष्ट सांगा.”

“ते मला सहज शक्य आहे, कारण त्या भयंकर प्रसंगाची मला, पक्की आठवण आहे. आमचे घर मी आधी म्हतल्याप्रमाणे खूप जुने आहे. आता घराच्या फक्त एका भागात आम्ही रहातो. आमच्या झोपायच्या खोल्या, तळमजल्यावर आहेत. उठाबसायच्या खोल्या, इमारतीच्या मध्यभागी आहेत. झोपायच्या खोल्यांपैकी पहिली डॉ रॉयलॉट यांची आहे. दुसरी माझ्या बहिणीची व तिसरी माझी आहे. त्यांचात एकमेकात काही जोडलेले नाही पण तिन्ही खोल्या एका पॅसेजमध्ये उघडतात. इथपर्यंत तुम्हाला कळले?”

“अगदी सर्व काही.”

“तिन्ही खोल्यांच्या खिडक्या, हिरवळीवर उघडतात. त्या भयाण रात्री डॉ रॉयलॉट त्यांच्या खोलीत लवकर गेले. तरी ते झोपी गेले नाहीत, हे माझ्या बहिणीला कळले कारण त्याना सिगरेट ओढायची सवय होती व तिला त्या धुराचा त्रास होत होता. त्यामुळे तिने तिची खोली सोडली व माझ्या खोलीत आली. तिच्या जवळ आलेल्या लग्नाबद्दल गप्पा मारत, ती काही वेळ बसली. अकरा वाजता, ती जाण्यासाठी उठली. पण दाराशी जाऊन मागे वळून म्हणाली, “हेलन, मला सांग, रात्रीच्या अंधारात तुला शिट्टीचा आवाज ऐकू येतो का?”

“कधीच नाही.” मी म्हणाले.

“मला वाटते तू झोपेत नक्कीच शिट्टी वाजवत नसणार.”

“नक्कीच नाही. पण का?’

“कारण गेले काही रात्री, साधारण तीनच्या सुमारास, हलक्या आवाजातील पण स्पष्ट, असा शिट्टीचा आवाज, मला ऐकू येतो. माझी झोप सावध आहे. त्या आवाजाने मला जाग येते. तो आवाज कुठून येतो, ते मला कळत नाही, पण बहुधा -- पुढच्या खोलीतून – कदाचित हिरवळीवरुन येत असेल. म्हणून मला वाटले, की तुला विचारावे.”

“नाही. मो नाही शिट्टी ऐकली. त्या भिकार जिप्सींचे ते काम असेल.”

“बरोबर. तसेच असेल. पण ती जर हिरवळीवरुन ऐकू आली असेल, तर ती तुलाही ऐकू यायला हवी.”

“पण मी तुझ्यापेक्षा, जास्त ढाराढूर झोपते.”

“पण तसेही, त्याचे इतके काही नाही.” ती माझ्याकडे बघून हसली. माझे दार लावले व क्षणार्धात मी तिच्या खोलीच्या कुलुपात, किल्ली फिरवल्याचा आवाज ऐकला.

होम्सने विचारले, “खरंच, तुमची अशी सवय होती का, की रात्री झोपताना दार कुलुपबंद करायचे?”

“नेहमीच.”

‘आणि का?”

“मला वाटते मी तुम्हाला सांगितले, की डॉक्टरांनी एक माकड व चित्ता पाळला होता. त्यामुळे दार कुलुपबंद केल्याशिवाय, आम्हाला सुरक्षित वाटत नसे.”

“बरोबर आहे. तुमचे कथन पुढे चालू ठेवा.”

“मी त्या रात्री झोपू शकले नाही. पुढे घडणाऱ्या अशुभाची चाहूल, मला लागली असावी. तुम्हाला माहिती आहे, की मी व माझी बहीण, जुळया होतो. आम्ही एकमेकीना इतक्या जवळ होतो, की आमची मनेदेखील, जोडली गेली होती. ती रानटी रात्र होती. बाहेर जोरदार वारा, वहात होता. पाऊस, खिडक्याना झोडपून काढत होता. अचानक सोसाट्याच्या वाऱ्यात, एका घाबरलेल्या बाईची  भयानक रानटी किंकाळी, कानावर पडली. माझ्या लक्षात आले, की तो आवाज माझ्या बहिणीचा होता. मी अंथरुणातून, तातडीने उठले. एक शाल गुंडाळून, पॅसेजमध्ये धावले. मी दार उघडल्यावर मला माझ्या बहिणीनी वर्णन केल्याप्रमाणे, हळू आवाजातील शिट्टी ऐकू आली आणि नंतर जड धातूचे काही पडल्यासारखा, आवाज आला. मी धावत सुटले. माझ्या बहिणीच्या खोलीचे दार उघडे होते व बिजागऱ्यांवर झुलत होते. यावरून काय समजावे, असा विचार करत मी घाबरून त्याकडे बघत राहिले. पॅसेजमधील दिव्याच्या उजेडात, मी माझ्या बहिणीला पाहिले. तिचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला होता. पसरलेले हात, मदतीची याचना करत होते. मी धावत जाऊन तिला गळामिठी घातली .पण त्याच वेळेस, तिचे गुडघे वाकले व ती कोलमडून जमिनीवर पडली. दारू चढलेल्या माणसासारखी, ती मागेपुढे झुलत होती. भयंकर वेदना होत असल्यासारखी, ती शरीराला आचके देत होती व हात आखडल्यासारखे करत होती. प्रथम मला वाटले, की तिने मला ओळखले नाही पण मी तिच्यावर वाकले तेव्हा, तिने किंकाळी मारून, असे काही शब्द तोंडातून काढले, की मी ते कधीच विसरू शकणार नाही. ती ओरडली, “अरे देवा हेलन, तो पट्टा होता -- ठिपक्यांचा पट्टा!” तिला अजूनही काही बोलायचे असावे. तिने हवेमध्ये बोट उंचावून डॉक्टरांच्या खोलीकडे निर्देश केला. अजून एक जोरदार फीट येऊन, तिच्या तोंडून शब्द फुटू शकला नाही. मी धावत माझ्या सावत्र वडीलाना, जोरात हाका मारू लागले. ते त्यांच्या रात्रीच्या गाऊनमध्ये, घाईने इकडेच येताना मला दिसले. ते माझ्या बहिणीशेजारी पोचले, तेव्हा ती बेशुध्द झालेली होती. आणि जरी त्यांनी तिच्या घशात ब्रँडी ओतली, तरी ती काही शुद्धीवर आली नाही. तिला गावात वैद्यकीय मदत मिळण्यासाठी पाठवले गेले. पण सगळे प्रयत्न फुकट गेले कारण ती परत शुद्धीवर यायच्या आत, ती मेली. अशा तऱ्हेने, माझ्या प्रिय बहिणीचा मृत्यू झाला.”

होम्स बोलला, “एक मिनिट, तू शिट्टी व धातूचा आवाज नक्की ऐकलास? शपथ घेऊन तू ते सांगू शकतेस?”

“मला गावच्या पोलीस इन्स्पेक्टरने देखील हेच विचारले. मी खात्रीने सांगू शकते की मी ते आवाज ऐकले. परंतु, वाऱ्याच्या जोरदार आवाजात व एखादे घर कोसळल्याच्या आवाजात, कदाचित मी फसले असेन.”

“तुझ्या बहिणीच्या अंगात, कपडे होते?”

“नाही. ती रात्रीच्या गाऊनमध्ये होती. तिच्या डाव्या हातात काडेपेटी व उजव्या हातात ओढलेली काडी होती.”

“असे वाटते आहे, की आवाज झाला तेव्हा तिने काडी ओढून, भोवताली पाहिले. ते महत्वाचे आहे. आणि इन्स्पेक्टरने काय निष्कर्ष काढला?”

“त्याने खूप काळजीपूर्वक, तपास केला कारण डॉ रॉयलॉट यांची किर्ती फारशी चांगली नव्हती. पण मरणाचे काहीही समाधानकारक कारण, तो शोधू शकला नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे, दार आतल्या बाजूने आवळून ठेवलेले होते व खिडक्या दर रात्री जुन्या पद्धतीप्रमाणे लोखंडी बारनी कडेकोट बंद केल्या जात. भिंतीतून आवाज येत नसे. त्या चांगल्या मजबूत होत्या. जमीन नीट तपासली गेली, पण काही पुरावा सापडला नाही. धुराडे मोठे व रुंद आहे पण तेही बंदिस्त केलेले आहे. त्यामुळे तिचा शेवट आला, तेव्हा माझी बहीण सर्वस्वी एकटी होती. त्याशिवाय तिच्या अंगावर, मारहाणीच्या काही खुणा नव्हत्या.”

“विष, दिले गेले असेल का?”

“डॉक्टरनी त्यासाठी तपासणी केली. पण त्यातही यश आले नाही.”

“मग ही दुर्दैवी बाई कशामुळे मेली असेल, असे तुम्हाला वाटते?”

“मला वाटते, की ती निव्वळ घाबरल्यामुळे व उदासीच्या धक्क्याने मेली असावी. तरीपण एवढे घाबरण्यासारखे, तिला काय दिसले होते, त्याची मी कल्पना करू शकत नाही.”

“त्या वेळी तिथे, जिप्सी रहात होते का?’

“हो. ते तिथे कायमच असतात.”

“आणि तिने उच्चारलेले शब्द -- पट्टा – ठिपक्यांचा पट्टा, त्याचे काय?’

“कधीकधी मला वाटते की ते तिच्या वाईट मनस्थितीत उच्चारलेले, काहीबाही शब्द होते. तर कधीकधी वाटते, की जिप्सी लोक बांधत, त्या प्रकारच्या पट्ट्याबद्दल ती बोलली की काय?

त्यांच्यापैकी बरेच लोक असे ठिपक्यांचे पट्टे डोक्याभोवती बांधतात, त्याबद्दल तिने तो विचित्र शब्द वापरला असेल का?"

असमाधानी माणसासारखी, होम्सने मान हलवली.

तो म्हणाला, "हे बरेच खोल पाणी दिसते आहे. तुमचे कथन चालू ठेवा."

या घटनेला दोन वर्षे झाली. माझे आयुष्य पूर्वीपेक्षा फार सुनेसुने झाले आहे. एक महिन्यापूर्वी माझ्या एका प्रिय मित्राने मला लग्नाबद्दल विचारले. त्याचे नाव पर्सी आर्मिटेज आहे -- रीडिंगजवळ असलेल्या क्रेन वॉटर येथील, मिस्टर आर्मिटेज यांचा तो दुसरा मुलगा आहे. माझ्या सावत्र वडीलांनी, यला काही विरोध केला नाही. आणि आम्ही आता, येत्या वसंत ऋतूत लग्न करणार आहोत. आमच्या इमारतीचा पश्चिम भागात दोन दिवसापूर्वी, काही दुरुस्ती सुरु झाली आहे. माझ्या झोपायच्या खोलीला लहानसे खिंडार पडले आहे. म्हणून मी हल्ली माझी बहीण जिथे वारली, त्या अंथरुणात झोपते. काल रात्री मी तिच्या भयानक नशीबाबद्दल, विचार करत जागी राहिले व मध्यरात्री मला हलक्या आवाजातील शिट्टीचा आवाज आला, तेव्हा माझी भीतीने बोबडीच वळली. तिच्या मृत्यूची पूर्वसूचना ठरली, तीच ती शिट्टी! मी ताडकन उठून, दिवा लावला. पण खोलीत काहीच दिसत नव्हते. मी परत त्या अंथरुणावर झोपायला, फारच हादरून गेले होते. तरी उजाडल्याबरोबर उठून, मी कपडे केले व क्राउन खानावळीजवळील कुत्र्याच्या गाडीने लेदरहेडला गेले. तिथून तुम्हाला भेटून सल्ला घ्यायला, इथे आले."

"माझा मित्र बोलला, "तू अगदी शहाणपणाने वागलेली आहेस. पण, तू मला सगळे सांगितलेस का?"

"हो. सगळे सांगितले."

"मिस रॉयलॉट, तुम्ही सगळे सांगितले नाही. तुम्ही तुमच्या सावत्र वडीलाना, पाठीशी घालत आहात."

"का? तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

तिच्या गुडघ्यावर तिने ठेवलेल्या शर्टाच्या हाताला लावलेली काळी झालर बाजूला करत, होम्सने उत्तर द्यायचा प्रयत्न केला. चार बोटे व अंगठ्याचा ठसा, तिथे गोऱ्या मनगटावर उठलेला होता "तुला दुष्टपणे वागवले गेलेले दिसते आहे."

ती महिला वरमली व तिने तिचे जखमी मनगट, झाकून घेतले. ती म्हणाली, “तो फार कडक माणूस आहे. कदाचित त्याला स्वतःच्या जोमदारपणाचा अंदाज नाही.”

तिथे बराच वेळ शांतता पसरली. होम्स त्याची हनुवटी हातावर दाबून, शेकोटीतील विस्तवाकडे बघत राहिला.

शेवटी तो म्हणाला, “हा क्रूर धंदा फार खोलवर पोचलेला दिसतो. मी काही ठोस कृती करण्यापूर्वी, मला अनेक बारीकसारीक गोष्टी, जाणून घ्याव्या लागतील. आता आपल्याला, एक पळभरदेखील उशीर करून चालणार नाही. आम्ही आज स्टोक मोरानला आलो तर, तुमच्या सावत्र वडीलांच्या नकळत, आम्हाला खोल्या तपासता येतील का?”

“तसेही त्याना आज काही महत्वाच्या कामासाठी, गावात जायचे असल्याचे, ते म्हणाले होते. त्यामुळे ते दिवसभर घरी नसण्याची शक्यता आहे. मग तुम्हाला, निवांतपणे तपास करता येईल. आमच्याकडे एक मूर्ख व म्हातारी नोकराणी आहे. मी तिला, वाटेतून सहज बाजूला करू शकेन.”

“छान. वॉटसन, तुला माझ्याबरोबर यायला, आवडेल ना?”

“नक्कीच.”

“मग आम्ही दोघे येतो. तुम्ही आता, काय करणार आहात?’

“मी आता गावात आले आहे तर, मला एकदोन कामे करायची आहेत. पण मी बाराच्या गाडीने परत जाईन, म्हणजे तुम्ही तिथे यायच्या आत, मी घरी पोचेन.”

“आम्ही दुपारी लवकरच पोचू. मला पण थोडी कामे उरकायची आहेत. तुम्ही न्याहारीसाठी थांबणार नाही का?”

“नाही. मला गेले पाहिजे. मी माझी कहाणी तुम्हाला सांगितल्याने मला हलकेहलके वाटत आहे. आता दुपारी मी तुमची वाट पहाते.” तिने तिचे अवगुंठन चेहऱ्यावर ओढून घेतले व खोलीबाहेर पडली.

त्याच्या खुर्चीवर रेलून बसत, शेरलॉक होम्स बोलला, “वॉटसन, तुला या सर्व प्रकाराबद्दल काय वाटते?’

“मला हा काही गुप्त पापी व्यवहार, वाटतो आहे.”

“बरोबर. गुप्तही व पापीही”

“पण भिंती, जमीन, धुराडे व खिडक्या हे सर्व जर चोख बंदोबस्तात होते, तर मग संशयातीतपणे ज्युलियाचा गूढ रित्या अंत झाला, तेव्हा ती एकटीच असली पाहिजे.”

“मग त्या रात्री वाजणाऱ्या शिट्टीचे व त्या मरणाऱ्या बाईने उच्चारलेल्या विशिष्ट शब्दांचे काय?”

“मी विचार करू शकत नाही.”

“या म्हाताऱ्या डॉक्टरचे फार जवळचे संबंध असणाऱ्या जिप्सींचा, तो ठिपक्यांचा पट्टा व शिट्टीचा आवाज, या दोन गोष्टींवरून असा विश्वास ठेवायला जागा आहे की, त्याला त्याच्या सावत्र मुलींची लग्ने न होण्यात रुची होती. मरताना ज्युलियाने केलेला पट्ट्याचा उल्लेख आणि शेवटी मिस स्टोनरने ऐकलेला धातूच्या आवाजाचा मुद्दा, या सर्व गोष्टी लक्षात घेता, असे वाटते की तो आवाज खिडक्याना ठोकलेल्या बारचा असावा. त्या दृष्टीने तपासाला सुरवात करायला हरकत नाही.

“पण मग जिप्सीनी काय केले?”

“कुणास ठाऊक?

“मला यात काही दम, वाटत नाही.”

“मलाही. आणि त्यासाठीच आपण आज स्टोक मोरानला जातो आहोत. तिथे निरीक्षण करून, आपल्याला बऱ्याच गोष्टी कळतील. पण त्या राक्षसाचे काय?”

माझा मित्र एवढे बोलतो आहे तोच आमचे दार जोरात ढकलले गेले व अचानक एक आडदांड माणूस, आत घुसला. त्याचे कपडे व्यवसायिक व शेती असे दोन्हीशी, जुळणारे होते. त्याने काळी टोपी, पँट व ढगळ कोट, घातला होता. त्याच्या हातात शिकारी चाबुकासारखे काहीतरी झुलत होते. तो इतका उंच होता, की त्याची टोपी दाराच्या वरच्या चौकटीला लागत होती आणि रुंदी इतकी होती, की दार भरून गेले होते. खूप आठ्या पडलेला, सूर्याने थोडाफार भाजलेला, दुष्ट भाव दर्शवणारा पिवळसर मोठा चेहरा, एखाद्या शिकारीचे भक्ष्य असलेल्या सावजासारखे हिरवट तपकिरी डोळे व उंच, बारीक चोचीसारखे नाक असलेल्या त्याची नजर, आळीपाळीने आम्हा दोघांवर फिरत होती.

त्याने विचारले, “तुमच्यापैकी होम्स कोण आहे?”

माझा मित्र शांतपणे म्हणाला, “ते माझे नाव आहे. पण आपली ओळख, द्याल का?”

“मी स्टोक मोरानचा, डॉक्टर ग्रीम्सबाय रॉयलॉट.”

“खरंच की काय! आपण बसा.” होम्स निर्विकारपणे बोलला.

“मी तसे काहीही करणार नाही. माझी सावत्र मुलगी, इथे आली होती. मी तिचा माग काढला आहे. ती तुम्हाला, काय म्हणत होती?”

होम्स म्हणाला, “यावेळी जरा थंड हवा, पडली आहे.”

म्हातारा रागाने ओरडला, “ती काय सांगत होती?”

माझा मित्र न चिडता व न निराश होता बोलला, “यावर्षी फुलांचा बहर, छान येणार आहे.”

त्याच्या हातातील शिकारीचा चाबूक उगारत, आमचा पाहुणा एक पाउल पुढे येत म्हणाला, “ओहो, तुम्ही मला नाराज करत आहात. मी तुम्हाला ओळखून आहे, चोरानो. मी तुमच्याबद्दल पूर्वी ऐकले आहे. तू दुसऱ्यांच्यात लुडबुड करणारा चमचा, होम्स, आहेस.

माझा मित्र हसला.

“कामसू होम्स!”

त्याचे हास्य रुंदावले.

“स्कॉटलंड यार्डचा हरकाम्या नोकर!”

होम्स मनापासून गालातल्या गालात हसून म्हणाला, “तुमचे संभाषण फार मनोरंजक आहे .तुम्ही बाहेर गेलात, की दार लाऊन घ्या, कारण आम्हाला एक पत्र लिहायचे आहे.”

“मला जे सांगायचे आहे ते सांगून झाल्यावरच, मी जाईन. तुम्ही माझ्या भानगडीत पडू नका. मिस स्टोनर इथे आली होती, हे मला माहिती आहे. मी तिचा माग काढलेला आहे. माझ्या वाटेला गेलात, तर मी धोकादायक मनुष्य आहे.” त्याने जोरात पुढे येऊन शेकोटी ढवळायचा चिमटा त्याच्या दणकट विटकरी हातांनी वाकवला.

तो वाकडा चिमटा परत शेकोटीत फेकत तो गुरगुरला, “तुम्ही माझ्या संतापापासून दूर रहा. माझ्या पकडीत आलात, तर तुमचे वाटोळे होईल.” एवढे बोलून तो खोलीबाहेर पडला.

होम्स हसत बोलला, “हा फारच थोर मनुष्य वाटतो. मी त्याच्याइतका महाकाय नसलो तरी, जर तो अजून काही काळ इथे राहिला असता, तर माझी पकडदेखील त्याच्याहून कमी नाही, हे मी त्याला दाखवून दिले असते. असे बोलताना त्याने तो चिमटा जोर लाऊन परत होता तसा, सरळ केला.

“माझ्या गुप्तहेराच्या व्यवसायाबद्दल वाटेल तसे बोलून, त्याने त्याचा उद्धट शिरजोरपणा दाखवून दिलेला आहे .या घटनेमुळे या तपासाला, आणखीच जोर मिळाला आहे. मला एवढेच वाटते, की आपल्या छोट्याशा अशीलाने, त्या हलकटाला स्वतःचा माग काढण्याची संधी देऊन, स्वतःला त्रास होऊन देऊ नये. आणि वॉटसन, आता आपण आपल्यासाठी न्याहारी आणायला सांगू. मग मी डॉक्टरांच्या जेवणघरात जाऊन, मला त्या डॉक्टरबद्दल, काही माहिती मिळते का, ते बघतो. ती मिळाली तर, त्याचा आपल्याला काही उपयोग होऊ शकेल.”

होम्स त्याच्या मोहिमेवरून परत आला, तेव्हा जवळजवळएक वाजला होता. काही लिहिलेला व आकृत्या काढलेला एक निळा कागद त्याच्या हातात होता.

मी मिसेस स्टोनरचे मृत्युपत्र बघितले. त्याचा नेमका अर्थ जाणून घेण्यासाठी, मला त्या गुंतवणुकीची आजची किंमत काढली पाहिजे. त्या मुलींची आई वारली, तेव्हा एकूण उत्पन्न साधारण ११०० पौंड होते. पण शेतमालाच्या किमती कमी झाल्याने, आता त्याची किंमत ७५० पौंडाहून अधिक नसावी. प्रत्येक मुलीला लग्नात, २५० पौंड द्यायचे म्हटल्यावर, जर दोन्ही मुलीना पैसे द्यायची पाळी आली – खरे तर एकीलाही -- तर, तो हलकट पैशांच्या बाबतीत फारच गरीब होऊन जाईल, हे अगदी स्पष्ट आहे. माझे सकाळचे काम फुकट गेले नाही. त्यामुळे आपल्या हे लक्षात आले, की मुलींची लग्ने होऊ नयेत असे त्याला वाटण्यासाठी मजबूत कारण आहे. आणि वॉटसन, हे इतके गंभीर प्रकरण आहे की आपल्याला उशीर करून चालणार नाही. विशेषतः आता त्या म्हाताऱ्याला हे माहिती झाले आहे, की आपण या प्रकरणात लक्ष घालतो आहोत, त्यामुळे जास्तच! तू तयार असशील, तर आपण टॅक्सी बोलावून, वॉटरलूला जाण्यासाठी निघूया. तू तुझे पिस्तुल बरोबर घेतलेस, तर बरे होईल. स्टीलचा चिमटा वाकवणाऱ्यासाठी, पिस्तुल आवश्यक आहे. ते आणि टूथब्रश एवढे आपल्याबरोबर असले, की बास होईल.”

वॉटरलूला पोचल्यावर आमच्या चांगल्या नशिबाने, आम्हाला लगेच लेदरहेडची गाडी मिळाली. तिथे जाऊन आम्हाला, एक कुत्र्यांची गाडी मिळाली. त्याने आम्ही सरेच्या रम्य परिसरातून, चार पाच मैल गेलो. तो छान सूर्यप्रकाशाचा दिवस होता. आकाशात, थोडे गुबगुबीत ढग होते. झाडाना व रस्त्याच्या कडेच्या झुडुपाना, नुकतीच पालवी फुटू लागली होती. चोहीकडे,

ओलसर मातीचा सुगंध पसरला होता. माझ्यासाठी, हा मोठा विरोधाभास होता – एकीकडे इतके छान वसंत ऋतूचे आगमन तर दुसरीकडे अशुभ चाहूल देणारी, आमची मोहीम! माझा मित्र गाडीत पुढे हात दुमडून, व हनुवटी छातीत रुतवून, बसला होता. खोल विचार करण्यात तो तल्लीन झाला होता. अचानक त्याने माझ्या खांद्याला हलवून म्हटले, “तिकडे बघ.” व एका कुरणाच्या पलीकडे, उतारावर झाडांनी वेढलेल्या घराकडे लक्ष वेधले. झाडांच्या फांद्यांमधून त्या जुन्या घराचे करड्या रंगाचे छप्पर दिसत होते.

त्याने विचारले, “स्टोक मोरान?”

गाडीचालक म्हणाला, “हो सर, ते डॉकटर ग्रीम्सबाय रॉयलॉट यांचे घर आहे.”

होम्स बोलला, “आम्हाला तिथेच जायचे आहे.”

बऱ्याचशा घरांच्या छपरांकडे निर्देश करत, चालक बोलला, “ते गाव आहे पण तुम्हाला त्या घरी जायचे असेल तर, त्या पायऱ्यांच्या रस्त्याने शेतातून गेल्यास, जवळ पडेल. ती बाई चालली आहे, तिथून ती वाट आहे.”

होम्स निरीक्षण करत बोलला, “आणि ती बाई मिस स्टोनर आहे. तू म्हणतो आहेस, तसेच आम्ही करतो.”

आम्ही उतरलो, पैसे दिले. ती गाडी परत लेदरहेडला गेली.

पायऱ्या चढताना होम्स बोलला, “त्या गाडीवानाला बहुधा असे वाटले असेल, की आपण वास्तुरचनाकार म्हणून काही कामानिमित्त, इथे आलो आहोत. त्यामुळे गावगप्पाना प्रतिबंध होईल. मिस स्टोनर, शुभ दुपार. आम्ही तुम्हाला म्हटल्याप्रमाणे, येऊन हजर झालो आहोत.”

आमची सकाळची अशील, हसऱ्या चेहऱ्याने आम्हाला भेटली. आमच्याबरोबर हस्तांदोलन करत, ती ओरडली, “मी तुमची वाट पहात होते. सर्व काही मनासारखे, जुळून आले आहे. डॉक्टर रॉयलॉट गावात गेले आहेत व संध्याकाळपूर्वी घरी येणार नाहीत.”

होम्स म्हणाला, “आम्हाला डॉक्टर भेटले होते. थोडक्या शब्दात त्याने भेटीचा वृतांत, कथन केला. मिस स्टोनर, तो ऐकून अवाक झाली.

ती किंचाळली, “अरे बापरे, म्हणजे ते, माझा पाठलाग करत होते तर!”

“असे दिसते आहे.”

“ते इतके लबाड आहेत, की मी त्यांच्यापासून कधीतरी सुरक्षित असते, की नाही कोण जाणे? आता परत आल्यावर, ते काय म्हणतील?”

“त्यांनी आता सावध राहिले पाहिजे. कारण आता या प्रकरणात, त्यांच्याहून लबाड लोकांशी, त्यांची गाठ आहे. आज तुम्ही त्याच्यापासून, सावध राहिले पाहिजे. जर तो आक्रमक झाला, तर आम्ही तुम्हाला, हॅरोला तुमच्या मावशीकडे सोडू. आता उपलब्ध वेळाचा, आपल्याला सदुपयोग करायला हवा. तर आम्हाला तपासायच्या असलेल्या खोल्यांकडे घेऊन चला.”

ती इमारत करड्या ओबडधोबड दगडांनी बनवली होती. तिचा मधला भाग उंच होता आणि दोन्ही कडांनी ती गोलाकार होती. त्यापैकी एका बाजूच्या खिडक्या, मोडलेल्या होत्या. त्या लाकडी फळ्या ठोकून, बंद केल्या होत्या. छप्पर वाकून, मोडायला आले होते. मधला भाग जरा बरा होता. उजव्या बाजूचा भाग थोडा आधुनिक वाटत होता.  तेथील खिडक्याना पडदे होते. घुराड्यातून निळा धूर येत होता. म्हणजे मुख्य कुटुंबाचा वावर, तिथे होता. इमारतीबाहेर लोखंडी खांब व लाकडी छप्पर घालून, काही आसरा उभारला होता. तेथील दगडी बांधकाम निखळले होते. पण आत्ता तिथे, कुणी कामगार दिसत नव्हते. वेड्यावाकड्या वाढलेल्या गवतातून, होम्स सावकाशीने चालला व सगळया खिडक्यांची, बाहेरून काळजीपूर्वक तपासणी केली.

“ही मला वाटते तुमच्या खोलीची खिडकी आहे. मधली तुमचा बहिणीची व त्याच्यापुढील डॉकटरांची असावी. बरोबर?”

“बरोबर. पण आता मी, मधल्या खोलीत झोपते.”

“काही बदल केले आहेत. त्याबद्दल मला वाटते -- जसे की -- तुमच्या खोलीची फोडलेली भिंत -- त्याची काही तातडीने दुरुस्ती करायची जरुरी होती, असे मला वाटत नाही.”

“ते तसेच आहे. मला माझ्या बहिणीच्या खोलीत हलवण्यासाठी, ते केले गेले आहे, असे मला वाटते.”

“हं. हे काही सुचवते आहे. आता या खोल्यांच्या दुसऱ्या बाजूला पॅसेज आहे. तेथून खोल्यांमध्ये शिरायला दार आहे. तिथे खिडक्याही आहेत का?”

“हो. पण अगदी लहान आहेत. कोणालाही त्यातून आत येता येणार नाही.”

“तुम्ही दोघी रात्री दार आतून कुलुपबंद करत होतात, त्यामुळे त्या बाजूने कोणी आत शिरायची काही शक्यता नाही. तुम्ही तुमच्या खोलीत जाऊन, खिडक्यांचा बंदोबस्त कराल का?”

मिस स्टोनरने तसे केले. आणि मग होम्सने ती बाहेरून उघडण्याचा प्रयत्न केला. पण ते जमले नाही. सुरी घालून उचकटण्याइतकीसुद्धा फट तिथे नव्हती. मग त्याने भिंगाने बिजागरींचे निरीक्षण केले. त्या पण पक्क्या लोखंडी होत्या व घट्ट बसवलेल्या होत्या. तो उद्गारला, “हं, मला वाटत होते, तसे काही दिसत नाही. इथून कोणी आत जाऊ शकणार नाही. आता आपण आतून तपासणी करून, काही सुगावा लागतो का ते पाहू.” त्याने कोड्यात पडल्यासारखी हनुवटी खाजवली.

कडेचे लहानसे दार, पांढरा रंग दिलेल्या पॅसेजमध्ये, उघडत होते. तिथूनच तिन्ही झोपायच्या खोल्यांकडे जायला, वाट होती. होम्सने तिसरी खोली तपासायला नकार दिला. त्यामुळे आम्ही जिथे आता मिस स्टोनर झोपत होती, त्या दुसऱ्या खोलीत शिरलो. तिथेच तिच्या बहिणीचा अंत झाला होता. ती एक घरगुती, लहानशी खोली होती. छत, फार उंच नव्हते. गावाकडील जुन्या घरांप्रमाणे, एका फटीत शेकोटी होती. एका कोपऱ्यात तपकिरी टेबलाचे खण होते. दुसऱ्या कोपऱ्यात पलंग होता आणि खिडकीच्या डाव्या हाताला, ड्रेसिंग टेबल होते. या वस्तू, दोन लाकडी खुर्चा व मध्यभागी घातलेला गालिचा, एवढेच सामान त्या खोलीत होते. भिंतींचे ओक वृक्षापासून बनवलेले तपकिरी प्लायवूड इतके जुने झाले होते, की त्याच्या ढलप्या निघू लागल्या होत्या. होम्सने एक खुर्ची ओढून घेतली व त्यावर शांतपणे बसला. त्याची नजर खोलीतील प्रत्येक भागात चौकसपणे फिरत होती. पलंगाजवळून जाणारी व उशीजवळ तिचे सुटे टोक लोंबणारी दोरी बघून होम्सने विचार केला व तो बोलला, “ही घंटी कुठे वाजत असेल?”

“ती घराची व्यवस्था बघणारीच्या, खोलीत जात असावी.”

“ही इतर वस्तूंच्या मानाने, नवी दिसते आहे.”

“हो. ही काही वर्षांपूर्वी बसवली गेली.”

“मला वाटते तुमच्या बहिणीने, त्याची मागणी केली असावी का?”

“नाही. मी तर ती वापरली गेल्याचे, कधीच ऐकले नाही.”

“तसेही इथे ही घंटी बसवायचे, काही कारण दिसत नाही. आता मी येथील जमीनीचे, निरीक्षण करतो.” त्याने पोटावर झोपून, भिंगाने जमीन तपासायला सुरवात केली. नंतर सर्व फर्निचरची, अशीच कसून तपासणी केली. मग तो पलंगावरून चालला. मग घंटीची दोरी हलवून बघितली. पण काही आवाज आला नाही.

“ही तर खोटी आहे.”

“त्याचा आवाज होत नाही का?”

“नाही. ती वायरला जोडलेली नाही. हे फार रुचीपूर्ण दिसते आहे. ही दोरी, दोन खोल्यांमधील अगदी लहानशा खिडकीवरील हुकाला, टांगलेली आहे.”

“किती विचित्र! माझ्या हे पूर्वी कधी, लक्षात आले नव्हते.”

होम्स पुटपुटला, “फारच विचित्र! या खोलीतील एकदोन गोष्टी अतिशय वेगळ्या वाटतात. उदाहरणार्थ, हे घर बांधणारा इतका मूर्ख कसा, की त्याने हिरवळीच्या बाजूस उघडणारी, हवा आत येईल अशी, दुसरी खिडकी बांधायचे सोडून, ही तुझ्या सावत्र वडीलांच्या खोलीत उघडणारी छोटी खिडकी का बरे बांधली आहे?”

“ती पण अलीकडीलच, वाटते आहे.”

होम्सने ताशेरा झाडला, “घंटी बसवली, तेव्हाच का?”

“हो. तेव्हा बरेच किरकोळ बदल, केले गेले.”

“या फार दिलचस्प गोष्टी वाटतात. वात ( वारा ) न येणारे वातयान! मिस स्टोनर, आता तुमच्या परवानगीने, आपण डॉक्टर ग्रीम्सबाय रॉयलॉट, यांची खोली बघू.

त्यांची खोली, त्यांच्या सावत्र मुलींपेक्षा मोठी होती. त्यात एक पलंग, तांत्रिक पुस्तकांनी भरलेले कपाट, पलंगाशेजारी एक हातवाली खुर्ची, भिंतीशेजारी एक लाकडी खुर्ची व एक मोठी लोखंडी तिजोरी; एवढे सामान होते. त्यापैकी प्रत्येक वस्तू होम्सने बारकाईने पाहिली.

तिजोरीवर हात ठेवत त्याने विचारले, “यात काय आहे?”

“माझ्या सावत्र वडिलांचे कामाचे कागद.”

“ओहो, म्हणजे तुम्ही ही तिजोरी आतून पाहिली आहे?”

“काही वर्षांपूर्वी एकदाच. मला आठवते त्याप्रमाणे ती कागदांनी भरलेली होती.”

“उदाहरणार्थ, त्यात मांजर नाही?”

“नाही. काहीतरीच काय?”

“तर मग इकडे बघा.” त्याने तिजोरीवरील छोट्या दुधाच्या बशीकडे लक्ष वेधले..

“आता इथे मांजर तर नाही. पण चित्ता व एक बबून माकड आहे.”

"ओहो, चित्ता म्हणजे मोठे मांजरच की! पण त्याला एवढेसे दूध पुरणार नाही." त्याने गुडघ्यात वाकून, भिंतीजवळील खुर्चीसमोर, बसकण मारली व खुर्चीच्या बैठकीचे सूक्ष्म निरीक्षण केले.

उठून, त्याचे भिंग खिशात टाकत, तो म्हणाला, “आभारी आहे. इथे अजून काहीतरी दिलचस्प दिसते आहे.”

त्याच्या दृष्टीस पडलेले काय होते, तर पलंगाच्या एका कोपऱ्यात ठेवलेला चाबूक! त्याच्या काठीला दोरी गुंडाळून ठेवलेली होती.

“वॉटसन,याचा काय उपयोग असेल?”

“हा साधा चाबूक आहे, पण तो गुंडाळून का ठेवला आहे कुणास ठाऊक?”

“हे सर्वसामान्य वाटत नाही. हे जग दुष्ट आहे. हुशार माणूस जेव्हा गुन्ह्याकडे वळतो, तेव्हा तर ते सर्वात भयंकर असते. मिस स्टोनर, आता मी पुरेसे पाहिले आहे. तुमच्या परवानगीने आम्ही हिरवळीवर फिरतो.”

तपास संपल्यावर, मी माझ्या मित्राचा चेहरा, इतका उतरलेला कधीच पाहिला नव्हता. आम्ही हिरवळीवर, वरखाली बराच वेळ फिरलो. मी किंवा मिस स्टोनर, कुणीच त्याची विचारात गढलेली मनस्थिती मोडायचा, धीर केला नाही.

तो बोलला, “मिस स्टोनर, तुम्ही प्रत्येक बाबतीत, मी सांगितलेले ऐका.”

“मी नक्कीच, ते करेन.”

“हो नाही करायला, हे प्रकरण फारच गंभीर आहे. तुमचे आयुष्य, पणाला लागलेले आहे.”

“मी मला, सर्वस्वी तुमच्या हातात सोपवलेले आहे.”

“मी व माझा मित्र दोघानाही तुम्ही झोपता, त्याखोलीत रात्र काढणे, जरुरीचे आहे.”

मिस स्टोनर व मी दोघांनी त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले.

“हो. असेच करायला हवे. मला स्पष्ट करू दे. माझा विश्वास आहे की ती समोर दिसते आहे ती क्राउन खानावळ आहे.”

“हो.”

“छान. तुमचा घराच्या खिडक्या, तिथून दिसू शकतील?”

“नक्की.”

जेव्हा तुमचे सावत्र वडील परत येतील, तेव्हा डोके दुखत असल्याचे सांगून, तुम्ही तुमच्या, म्हणजे तुमच्या बहिणीच्या, खोलीत प्रथम रहा. नंतर जेव्हा ते त्यांच्या खोलीत झोपण्यासाठी जातील, तेव्हा तुम्ही त्या खोलीची खिडकी उघडा व ती मोकळी करून आम्हाला कळेल अशी खूण म्हणून, दिवा लावा. नंतर त्या खोलीतील जरुरीचे सामान घेऊन तुम्ही, तुमच्या आधीच्या खोलीत झोपायला जा. मला वाटते, की तिथे दुरुस्ती चालली असली, तरी तुम्ही एक रात्र तिथे काढू शकाल.”

“हो. अगदी सहज.”

“बाकी सर्व, तुम्ही आमच्या हातात सोपवा.”

“पण तुम्ही काय करणार?”

“आम्ही रात्र त्या खोलीत काढणार आणि तुम्हाला त्रासदायक वाटणारा, तो शिट्टीचा आवाज कुठून येतो, त्याचा शोध घेणार. “

“मला वाटते मिस्टर होम्स, तुम्ही आधीच हे सर्व ठरवले आहे.” माझ्या मित्राच्या शर्टाच्या बाहीवर हात ठेऊन मिस स्टोनर म्हणाली.

“कदाचित तसेच असावे.”

“मग माझ्यावर दया दाखवून, कृपया मला सांगा की माझ्या बहिणीच्या मृत्यूचे कारण, काय होते?”

“मी काही बोलण्यापूर्वी, मला पक्के पुरावे, माझ्या हातात हवेत.”

“तुम्ही मला एवढे तरी सांगा, की माझे विचार बरोबर होते का, की ती अचानक घाबरल्याने धक्का बसून मेली.”

नाही. मला असे वाटत नाही. यामागे अजून काहीतरी छुपे कारण असणार. मिस स्टोनर, आता आम्हाला येथून निघाले पाहिजे. जर डॉक्टर रॉयलॉट परत आले व त्यांनी आम्हाला इथे बघितले, तर सगळेच ओम फस होईल. अच्छा. धीटपणे रहा. जर तुम्ही मी सांगितल्याप्रमाणे

वागलात, तर तुम्हाला त्रासदायक व धोकादायक ठरणाऱ्या गोष्टींचा, आम्ही लवकरच बिमोड करू.”

मी व शेरलॉक होम्स दोघे क्राउन खानावळीत गेलो. तिथे आम्हाला वरच्या मजल्यावरील दोन खोल्या सहजपणे मिळाल्या. आमच्या खिडकीतून आम्हाला डॉक्टर रॉयलॉट यांच्या बंगल्याचे दृष्य सहजपणे दिसत होते. अंधारून आल्यावर, आम्ही डॉक्टर रॉयलॉटना परतलेले पाहिले. जड लोखंडी दार उघडायला गाडीच्या चालकाला वेळ लागल्याने, त्याच्या अंगावर त्याना खेकसताना व मुठी वळतानादेखील आम्ही ऐकले व पाहिले. नंतर हॉलचा दिवा लागल्याचेही, आमच्या लक्षात आले. आम्ही अंधारात बसलेलो असताना होम्स म्हणाला, “वॉटसन, आज रात्री तिथे काय प्रकार होईल, कुणास ठाऊक! त्यामुळे मला तुला तिथे, त्या धोकादायक जागी, न्यायची काळजी वाटते आहे.”

“माझी काही मदत होईल का?”

तू तिथे असणे, माझ्या दृष्टीने फार किमती आहे.”

“मग मी नक्की येईन.”

“हा तुझा, चांगुलपणा आहे.”

“तू धोक्याबद्दल बोलतो आहेस. तू त्या खोल्यांमध्ये, माझ्यापेक्षा नक्कीच काहीतरी जास्त पाहिलेले दिसते आहे.”

‘नाही. पण मला वाटते, मी काहीतरी जास्त अंदाज बांधला आहे. मला वाटते मी पाहिले ते सगळे, तूही पाहिले आहेस.”

“मी घंटीची दोरी सोडून, काहीही वेगळे असे पाहिले नाही.”

“तू उंचावरील छोटी खिडकी, पाहिलीस?”

‘हो. पण जेमतेम उंदीर जाऊ शकेल, एवढीच ती खिडकी दोन खोल्यांमध्ये असणे, ही काही फार कधी न दिसणारी गोष्ट नाही.”

“आपण स्टोक मोरानला येण्यापूर्वीच, मला अशी खिडकी असणार, असे वाटत होते.”

“माझ्या प्रिय होम्स!”

“अरे बाबा, खरंच. तुला आठवते का, ती म्हणाली होती, की तिच्या बहिणीला डॉक्टर रॉयलॉटच्या सिगरेटच्या धुराचा, त्रास झाला होता. आता यावरून माझ्या लगेच लक्षात आले, की दोन खोल्यात काही देवाणघेवाण असणार. ती खिडकी काय किंवा झरोका काय, लहान असणार कारण त्या गावाचा इन्स्पेक्टरच्या चौकशीत त्याचा काही उल्लेख झालेला, मी ऐकला नाही. पण खिडकी असल्याचा अंदाज, मी केला होता.”

‘पण त्याचे काय मोठेसे?”

“या गोष्टी कधी केल्या गेल्या हे तू बघ. खिडकी पाडली गेली, दोरी टांगली गेली व खोलीत झोपलेली महिला मेली. याने, तू चक्रावून जात नाहीस का?”

“मला अजून तरी, त्यातील संबंध लक्षात येत नाही.”

“तुला त्या पलंगाबद्दल, काही विशेष आढळून आले का?”

“नाही.”

‘तो जमिनीला बांधून ठेवलेला होता. असा जमिनीला बांधलेला पलंग, यापूर्वी तू कधी पाहिला होतास का?”

“मी पाहिला होता, असे म्हणू शकत नाही.”

त्या महिलेला तो पलंग हलविणे शक्य नव्हते. तो नेहमी छोट्या खिडकीपासून व दोरीपासून, त्याच जागी राहिला पाहिजे -- असेच म्हणावे लागते आहे कारण ती दोरी घंटीसाठी नव्हतीच.” मी ओरडलो, “होम्स, तू काय म्हणतो आहेस ते माझ्या थोडेथोडे लक्षात येते आहे. इथे काही भयंकर मोठा गुन्हा घडण्याआधी जेमतेम, आपण येऊन पोचलो आहोत."

“भयंकर पण व मोठा पण. जेव्हा एक डॉकटर चुकीचे वागतो, तेव्हा तो मोठाच गुन्हा करतो, त्याला माहिती आहे व धैर्यही आहे. पाल्मर आणि प्रिटचार्ड हे त्यांच्या व्यवसायात अग्रगण्य होते. पण हा माणूस तर त्यांच्याहून अधिक खोल पोचला आहे. पण रात्रीपूर्वी हे अघोरी प्रकार बंद व्हायलाच हवेत. पण वॉटसन, मला वाटते, आपण या प्रकरणाचा छडा लाऊ शकू. पण आपल्याला रात्र संपण्यापूर्वी, कदाचित भयानक गोष्टीना तोंड द्यावे लागेल. देवाच्या दयेनी, आपण थोडा वेळ शांत बसू व काही तास आनंदात घालवू."

नऊ वाजता त्या घरातील सर्व दिवे मालवले गेले व ते घर पूर्ण अंधारात बुडून गेले. दोन तास मंदपणे सरले. मग अकरा वाजता आम्हाला, खोलीत उजेड दिसला.

होम्स उभा रहात म्हणाला, "ही आपल्यासाठीची खूण आहे. ती मधल्या खिडकीतून येते आहे."

आम्ही बाहेर पडताना, होम्स क्राउन खानावळीच्या मालकाशी बोलला, की आम्ही एका ओळखीच्यांकडे जात आहोत व कदाचित रात्रभर तिथे राहू. पुढच्या क्षणी आम्ही अंधारी रस्त्यावर होतो. आमच्या चेहऱ्याला बोचरा वारा झोंबत होता. आमच्या अंधारी मोहिमेत, एक पिवळसर दिवा लुकलुकून, आम्हाला मार्ग दाखवत होता. त्या घराच्या आवारात शिरताना, थोडा त्रास झाला. झाडांमधून व हिरवळीतून जाताना, एका झुडुपामधून एका छोट्या हिडीस चेहऱ्याच्या मुलाने क्षेपणास्त्रासारखी गवतावर उडी मारली व सुळकन हिरवळीतून अंधारात अदृष्य झाला.

मी कुजबुजलो. "अरे बापरे, तू ते पाहिलेस?" होम्स एक क्षण दचकला. रागाने त्याने त्याचा हात माझ्या मनगटावर घरला. मग तो दबलेले हसू हसला व माझ्या कानात बोलला, "हे घर छान आहे. ते बबून माकड होते."

डॉक्टरांचे प्राणीप्रेम आम्ही विसरलोच होतो. त्यांनी चित्तादेखील पाळला होता. कुठल्याही क्षणी कदाचित तो आमच्या खांद्यावर बसलेला आम्हाला सापडला असता. होम्सप्रमाणे मीदेखील बूट काढले व चोरपावलांनी झोपायच्या खोलीत प्रवेश केला. माझ्या मित्राने खिडकी बंद केली व दिवा टेबलावर ठेवला. त्याने खोलीभर नजर फिरवली. आम्ही दिवसा बघितले, तसेच सर्व काही होते. नंतर आवाज न करता माझ्याकडे येऊन, त्याने हाताचा कर्णा केला व माझ्या कानात इतक्या हळू आवाजात कुजबुजला की मला जेमतेम ऐकू आले. "आपल्या बेतासाठी कमीत कमी आवाज केलेला बरा."

मला ऐकू आले असे दर्शवण्यासाठी मी मान हलवली.

"आपण अंधारात बसले पाहिजे. नाहीतर त्या छोट्या खिडकीतून त्याला आपण दिसू."

मी परत मान डोलवली.

"झोपू नकोस. तुझे आयुष्य इथे पणाला लागलेले आहे. आपल्याला गरज पडल्यास, तुझे पिस्तुल तयार ठेव. मी पलंगाच्या कडेला बसतो व तू खुर्चीत बस."

मी माझे पिस्तुल काढून, टेबलाच्या कोपऱ्यात ठेवले.

होम्सने एक लांब बारीक चाबूक आणला होता. तो त्याने पलंगावर त्याच्या बाजूला ठेवला. त्याशेजारी काडेपेटी व मेणबत्ती ठेवली.

एरवी आपण झोपतो, त्यावेळी केलेले जागरण, मी कसे विसरेन? मला आमचे श्वाससुद्धा ऐकू येत नव्हते. निरव शांतता होती. मला माहिती होते, की माझा मित्र माझ्यापासून काही फुटांवर डोळे उघडे ठेऊन, माझ्याप्रमाणेच ताण घेऊन, बसलेला आहे. खिडकीतून अगदी पुसट प्रकाशकिरण येत होते. बाहेरून रात्रीच्या पक्ष्यांचे ओरडणे ऐकू येत होते. हिरवळीच्या बाजूच्या खिडकीवर एकदा लांबलचक, मांजरासारखी आरोळी ऐकू आली. आम्ही समजलो की चित्ता सुटा हिंडतो आहे. लांबवर आम्हाला पॅरिश घड्याळाचे धीरगंभीर टोले ऐकू येत होते. ते किती वेळानी पडत आहेत, असे वाटत होते. बारा वाजले. मग एक, दोन व तीनही वाजून गेले. आम्ही अजून काय होईल, असा विचार करत चुपचाप बसून होतो. अचानक छोट्या खिडकीच्या दिशेने, एक प्रकाशशलाका चमकली व लगेच लुप्त झाली. लगेच तेल जळाल्याचा व धातू तापवल्याचा उग्र वास आला. शेजारील खोलीत कंदील लावला गेला. मला, थोडी हालचाल जाणवली. मग परत सर्व शांत झाले. वास जास्त तीव्र झाला. मी अर्धा तास कानात प्राण आणून, बसलो होतो. मग अजून एक आवाज आला – अगदी हळूवार हलकासा आवाज -- चहाच्या किटलीतून वाफ बाहेर पडावी, तसा. आम्ही तो आवाज ऐकल्याबरोबर होम्स पलंगावरून उठला. काडी ओढली व रागाने डोळे ताणून, घंटीच्या दोरीजवळ चाबूक घेऊन उभा राहिला.

तो ओरडला, “तू ते पाहिलेस? वॉटसन, तू ते पाहिलेस?”

पण मला तर, काहीच दिसले नाही. होम्सने दिवा लावला, तेव्हा मी हलकीशी पण स्पष्ट शिट्टी ऐकली. पण तेवढ्यात माझ्या डोळयांवर प्रकाशझोत पडल्याने होम्स रानटीपणे ओरडून काय दाखवत होता, ते काही मला दिसले नाही. मला एवढे मात्र दिसले, की त्याचा चेहरा, भीतीने व बहुधा किळस आल्याने, पांढराफटक पडला होता. त्याने काही कृती करणे थांबवले होते. तो खिडकीकडे लक्ष देऊन, बघत होता. अचानक रात्रीच्या शांततेचा भंग करत, एक जोरदार किंकाळी ऐकू आली. अशी किंकाळी मी यापूर्वी कधी ऐकली नव्हती. तिचा आवाज अजून अजून वाढत गेला. भीती, वेदना व राग यांनी भरलेली अशी, ती कर्कश किंकाळी होती. लांबवरील चर्च व गावात झोपलेली माणसे देखील ती ऐकून, उठून बसली. आमची हृदये थंडगार पडली. शेवटी त्या किंकाळयांचा प्रतिध्वनी उमटून, त्या शांत होईपर्यंत, मी होम्सकडे, व होम्स माझ्याकडे, बघत उभे राहिलो.

मी धापा टाकत म्हणालो, “याचा अर्थ काय?”

होम्स उत्तरला, “म्हणजे आता, हे सर्व संपले. आणि कदाचित, हे सर्व चांगल्यासाठीच झाले. तुझे पिस्तुल घे. आपण डॉकटर रॉयलॉटच्या खोलीत जाऊ.”

भावनाशून्य चेहऱ्याने त्याने दिवा हातात घेतला व आम्ही पॅसेजमधून त्या खोलीकडे निघालो. दोनदा त्याने दारावर टकटक केले. पण आतून काही उत्तर मिळाले नाही .मग त्याने दार उघडून खोलीत प्रवेश केला. मी दबक्या पाऊलानी पिस्तुल सरसावून, आत शिरलो.

आतील दृश्य अफलातून होते. टेबलावर कंदील होता. त्याचा प्रकाश दार थोडे उघडे असलेल्या तिजोरीवर पडला होता. टेबलाशेजारील खुर्चीवर, डॉक्टर ग्रीम्सबाय रॉयलॉट त्याच्या लांब, करड्या गाऊनमध्ये बसला होता. त्याच्या पायात टर्किश सपाता होत्या, गुडघे आत वळलेले होते. त्याच्या मांडीवर, चाबकासकट काही सामान पडले होते. ते आम्ही दिवसा तिथे पाहिले होते. त्याचे डोळे भकासपणे शून्यवत दृष्टीने, छताच्या कोपऱ्याकडे, लागलेले होते व हनुवटी वर उचलली गेली होती. त्याच्या कपाळाभोवती विशिष्ट प्रकारचा तपकिरी ठिपके असलेला पिवळा पट्टा, घट्ट बसलेला होता. आम्ही आत शिरल्यावर डॉकटर रॉयलॉटने हुं की चुं केले नाही.

होम्स कुजबुजला, “पट्टा! ठिपक्यांचा पट्टा!”

मी एक पाऊल पुढे झालो. क्षणार्धात त्याच्या डोक्याची काही हालचाल झाली. त्याच्या केसांमधून हिऱ्याच्या आकाराचे डोके व फुगीर मान असलेल्या, उबग येईल अशा, सापाचे दर्शन झाले.

होम्स किंचाळला, “हा पाण्यात रहाणारा, युरेशिअन जातीचा, साप आहे. भारतातील एक भयानक साप! हा चावल्यापासून दहा सेकंदात माणूस मरतो. खरेच हिंसाचार करणारा, स्वतःच्याच हिंसाचाराला बळी पडतो. दुसऱ्यासाठी खणलेल्या खड्ड्यात तो स्वतःच पडतो. या प्राण्याला आपण परत त्याच्या गुहेत टाकू. मग मिस स्टोनरला आपण कुठेतरी आश्रय देऊ आणि गावातील पोलिसाना काय झाले ते सांगू.”

त्याने म्हटल्याप्रमाणे, त्याने मृत माणसाच्या मांडीवरून, हळूच चाबूक काढला. त्याच्या दोरीचा फास, सापाच्या मानेभोवती टाकून, त्याच्या भयानक जागेवरून त्याला ओढले व हाताच्या अंतरावर धरून, लोखंडी तिजोरीत टाकून, ती बंद केली.

तर स्टोक मोरानच्या डॉकटर ग्रीम्सबाय रॉयलॉटच्या मरणाची, अशी खरीखुरी गोष्ट होती. आता ही आधीच लांबलेली गोष्ट अधिक लांबवून, आम्ही ती भयानक बातमी त्या घाबरलेल्या मुलीला कशी सांगितली, सकाळच्या गाडीने आम्ही तिला कसे तिच्या मावशीकडे हॅरोला पोचवले आणि कसे धोकादायक पाळीव प्राण्याबरोबर लपून छपून खेळताना, डॉक्टरने

स्वतःचे मरण ओढवून घेतले; हे सांगण्याची काही गरज नाही. अजून मला या केसमधील जो भाग कळला नव्हता, तो मला शेरलॉक होम्सने दुसऱ्या दिवशी सकाळी गाडीने जाताना सांगितला.

तो म्हणाला, “माझ्या प्रिय वॉटसन, मी पहिल्यांदा चुकीच्या निष्कर्षाप्रत चाललो होतो. अपुऱ्या माहितीवरून निष्कर्ष काढणे, नेहमीच धोकादायक असते. जिप्सींचे आस्तित्व आणि बिचाऱ्या मृत महिलेने वापरलेला पट्टा हा शब्द, हे संशयातीतपणे तिने काडी ओढल्यावर तिला क्षणभर दिसलेल्या दृष्याचे स्पष्टीकरण देत होते. पण ते पुरेसे नसल्याने, मला चुकीच्या मार्गाने न्यायला बघत होते. नंतर माझ्या असे लक्षात आले, की मृत महिलेला मरणाप्रत नेणारा धोका दारातून किंवा हिरवळीवर उघडणाऱ्या खिडकीतून आलेला नव्हता, तर तो, ती छोटी खिडकी व पलंगाशी पोचणारी घंटीची दोरी, इथून आलेला होता. घंटीचा आवाज येत नसल्याने मग तिचे काय प्रयोजन असावे, असा विचार करताना कळले, की ती दोरी छोट्या खिडकीपासून पलंगापर्यंत, पूल म्हणून काम करत असावी. डॉक्टरला भारतातून विचित्र प्राणी आणायचे वेड होते, हे लक्षात आल्यावर मग मला तू म्हटलेले आठवले की ‘या इतक्या छोट्या खिडकीतून तर उंदीरही जाऊ शकणार नाही.’ मग दोन्हीची सांगड घालून मला सापाची कल्पना सुचली. आणि मग मला समजले की माझी विचारपद्धती बरोबर आहे. कुठल्याही रासायनिक परीक्षेने, ओळखू येणार नाही, असे विष असलेला साप वापरण्याची कल्पना, त्या दुष्ट पण हुशार डॉकटरचा डोक्यातून आली, कारण तो बरीच वर्षे भारतात होता. माणसाचा झटपट निकाल लावायचे सापाचे सामर्थ्य बघता, ते डॉक्टरच्या पथ्यावरच पडले. सापाने त्या महिलेला जिथे दंश केला, तेथील दोन सूक्ष्म भोके, गावातील तपास करणाऱ्याने बघितली असती, तर त्याच्या देखील लक्षात आले असते, की विषप्रयोग झालेला आहे. मग मी शिट्टीसंबंधी विचार केला. अर्थात सकाळी उजाडण्यापूर्वी सापाला परत बंदिस्त केले पाहिजे हे जाणवून, डॉक्टरने त्या सापाला असे प्रशिक्षण दिले, की दूध पिण्यासाठी त्याने बोलावले की, त्याच्याकडे परत यायचे. रात्रीतील त्याला सोयीस्कर वेळी तो छोट्या खिडकीतून सापाला सोडत असे. मग तो साप दोरीवरून पलंगावरील व्यक्तीला चावत असे आणि मग परत डॉक्टरकडे जात असे. आठवडाभर रोज असे केले, की केव्हा ना केव्हातरी ती महिला, सापाच्या चाव्याला बळी पडणारच.

त्याच्या खोलीत शिरण्यापूर्वीच मी या निष्कर्षाप्रत आलो होतो. त्याच्या खोलीतील खुर्ची बघून मला कळले की त्याला खुर्चीवर उभे रहायची, सवय आहे. छोटी खिडकी उंचावर असल्याने तसे करणे गरजेचे होते. तुला माहिती आहे की एकदा ठरवल्यावर, तो प्रकार सिध्द होण्यासाठी मी एकेक पायऱ्या घेत गेलो. मला सापाचा हिस्स असा आवाज आल्याबरोबर, दिवा लाऊन मी त्याच्यावर हल्ला केला.”

“त्यामुळे तो छोट्या खिडकीतून परत गेला.”

“आणि त्याने त्याच्या मालकावर हल्ला केला. मी सापाला मारलेले काही फटके कामी येऊन त्याचे रक्त उसळले. त्यामुळे दिसलेल्या पहिल्या माणसावर त्याने हल्ला केला. अशा तऱ्हेने डॉक्टर ग्रीम्सबाय रॉयलॉटच्या मरणाला, मी पर्यायाने कारणीभूत ठरलो. पण त्यामुळे माझ्या सद्सदविवेकबुद्धीला टोचणी लागली आहे, असे अजिबात नाही.”



# The Adventure of Second Stain

## दुसरा डाग



अॅबे शेतघरातील साहसाची गोष्ट लिहून झाल्यावर, मला वाटले, माझा मित्र शेरलॉक होम्स याच्या, मी लोकाना त्यांच्या उपयोगासाठी माहिती करून दिलेल्या गोष्टी, संपल्या. खरे तर माझ्याकडे मजकुराची, काहीच कमी नव्हती. मी अजून लक्ष न दिलेली, शेकडो केसेसची टाचणे, पडून होती. त्यातून त्या उल्लेखनीय माणसाची, रहस्य उकलण्याची एकमेवाद्वितीय पद्धत व वेगळेच, उच्च प्रकारचे व्यक्तिमत्व, अजूनही चांगले दृगोचर झाले असते. खरे तर मी, त्या गोष्टी न लिहिण्याचे कारण म्हणजे, होम्सने असे करायला दाखवलेला विरोध होय. त्याच्या व्यवसायिक कारकिर्दीचे व यशाचे दस्तऐवज, याचा खरे तर, त्याला प्रत्यक्ष उपयोग होता. पण आता तो निवृत्त होऊन, लंडन सोडून, खेडेगावातील निवांत आयुष्य जगायला, मधुमाशीपालनाचा छंद जोपासायला गेल्यामुळे, त्याला इतकी प्रसिद्धी नको होती. त्याने ठामपणे, तशी विनंती केली

होती व ती पाळली जावी, अशी कडक सूचनाही केली होती. दुसरा डाग ही त्याने पार पाडलेली साह्समालिका! ही महत्वाची आंतरदेशीय केस असल्याने, शेवटी मी त्याची परवानगी मिळवण्यात, यशस्वी ठरलो. त्यामुळे आता ती, लोकांसमोर येते आहे. ही गोष्ट सांगताना, मी जर थोडे मोघम बोललो, तर तसेच कारण असल्याने मी तसे केल्याचे, लोक समजून घेतील, अशी मी आशा करतो.

हिवाळ्यातील एका मंगळवारी सकाळी, आमच्याकडे बेकर रस्त्यावरील घरी, युरोपमधील दोन प्रसिध्द व्यक्ती आल्या. त्यापैकी एकजण कडक शिस्तीचा, नाकेला, गरुडासारख्या डोळ्यांचा व हुकुमशाही वृत्तीचा, प्रसिध्द उमराव बेलींजर होता. तो दोनदा, ब्रिटनचा पंतप्रधान होता. दुसरा थोडा काळसर, डौलदार, फॅशनेबल, समजून घेण्यास सोपा, क्वचितच मध्यमवयीन वाटणारा व मनाने तसेच शरीराने सुंदर असा माननीय, ट्रेलॅवने होप होता. तो युरोपिअन परराष्ट्रव्यवहार मंत्रालयात सचिव व राज्यातील सर्वात मुत्सद्दी राजकारण्यांपैकी एक होता. आमच्या वर्तमानपत्रे व कागद इत्यादी पसारा पडलेल्या बैठकीवर ते शेजारीशेजारी बसले. त्यांच्या पडलेल्या व उत्सुक चेहऱ्यावरून कळत होते, की खूप महत्वाच्या व त्यांच्यावर दबाव आणणाऱ्या अशा कामासाठी ते आले होते. पहिल्याचे बारीक, निळ्या शिरांचे हात, त्याने त्याच्या छत्रीच्या हस्तिदंती मुठीवर घट्ट दाबून ठेवले होते. त्याचा दमलेला काळजीयुक्त पडेल चेहरा, होम्सकडून माझ्याकडे वळत होता. युरोपिअन सचिव, उदासीने, त्याच्या मिशा ओढत होता व घड्याळाच्या साखळीशी, उगीचच काहीतरी चाळा करत होता.

मिस्टर होम्स, मला जेव्हा सकाळी आठ वाजता, नुकसान होणार असल्याचे लक्षात आले, तेव्हा मी ताबडतोब, पंतप्रधानाना कळवले. त्यांच्या सूचनेवरून आम्ही तुमच्याकडे आलो आहोत."

"तुम्ही पोलिसाना कळवले का?"

त्याबद्दल प्रसिध्द असलेल्या, झटपट फसव्या पद्धतीने, माजी पंतप्रधान म्हणाले, "आपण असे केलेले नाही. आपण असे करू, अशीही शक्यताही नाही. पोलीसाना कळवायचे, म्हणजे पर्यायाने हे जगजाहीर केल्यासारखेच आहे. हे आम्हाला, शक्यतोवर टाळायचे आहे."

"आणि, का सर?"

“कारण, याच्याशी निगडीत, कागदपत्रे इतकी महत्वाची आहेत, की ती जाहीर करणे, कदाचित कुठल्याही क्षणी युरोपिअन गुंतागुंत निर्माण करेल. या मुद्द्यावरून, युध्द किंवा शांतता काहीही सुरु होऊ शकते. याची कारवाई अत्यंत गुप्तता पाळून करणे, गरजेचे आहे. तसे केले नाही, तर कदाचित ते न मिळविण्यासारखेच होईल. कारण ज्यांनी ते चोरले आहे त्यांचा उद्देश, त्यात काय लिहिले आहे ते माहिती करून घेणे हाच असणार.”

“माझ्या लक्षात आले. मिस्टर ट्रेलॅवने होप, हे कागदपत्र कुठल्या परिस्थितीत व नक्की कसे नाहीसे झाले, हे तुम्ही मला सांगितलेत, तर बरे होईल.”

“मिस्टर होम्स, ते अगदी थोड्या शब्दात सांगता येईल. ते एका हुकुमशाही राजवटीतील एकाधिकारशाहीकडून आलेले पत्र होते -- सहा दिवसापूर्वी आलेले. ते इतके महत्वाचे होते, की मी ते कधीच माझ्या लॉकरमध्ये ठेवले नाही. व्हाइट हॉल येथील माझ्या निवासस्थानी, रोज संध्याकाळी मी ते घेऊन जात असे व एका पेटीत कुलुपबंद करून ठेवत असे. काल रात्री ते तिथे होते, याची मला खात्री आहे. मी रात्रीच्या जेवणासाठी कपडे करत असताना, मी ती पेटी उघडली, तेव्हा ते तिथे होते. आज सकाळी मात्र ते गायब झाले होते. माझ्या टेबलावरील काचेशेजारी ते रात्रभर होते. मी व माझी पत्नी दोघेही, तसे फार गाढ झोप लागणाऱ्यातले नाही. आम्ही शपथेवर सांगू शकतो, की रात्री खोलीत कोणीही आले नव्हते. आणि तरीही मी परत सांगतो, की तरीही कागदपत्र नाहीसे झाले.”

“तुम्ही किती वाजता जेवता?”

“साडेसात वाजता.”

“त्यानंतर झोपायला जाण्यापूर्वी, किती वेळ मध्ये गेला?”

“माझी बायको सिनेमाला गेली होती. मी तिची वाट बघत थांबलो होतो. आम्ही झोपायला जाण्यापूर्वी साडेअकरा वाजले होते.”

“म्हणजे चार तास ती पेटी, कुणाचे लक्ष नसलेल्या स्थितीत पडली होती?”

“पण त्या खोलीत कुणीही जात नाही. सकाळी नोकराणी तिथे जाते. मग दिवसभर माझा व्यक्तिगत नोकर व ती नोकराणी इथेच असतात. काही वर्षे आमच्याकडे असणारी ही माणसे विश्वासू आहेत. माझ्या या पेटीत काही नेहमीपेक्षा जास्त महत्वाचे आहे, याची त्याना काहीच कल्पना नव्हती.”

“कोणाला त्याची कल्पना होती?”

“घरात कोणालाच नाही.”

“तुमच्या बायकोला, नक्की माहिती असेल ना?”

नाही सर, माझे ते कागद हरवेपर्यंत, मी माझ्या बायकोला त्याबद्दल, काही सांगितले नव्हते.”

त्या माजी पंतप्रधानाने, पटल्यासारखी मान डोलावली.

तो म्हणाला, “सर, मी तुमची समाजाबद्दलची कर्तव्यभावना किती जागरूक आहे, हे चांगले जाणतो. मला खात्री आहे की या महत्वाच्या गुप्त प्रकरणाला, तुम्ही घरगुती जिवाभावाच्या नात्यांपेक्षा जास्त वरचे समजत असणार.”

युरोपिअन सचिवाने खाली झुकून ते मान्य केले.

“तुम्ही मला फक्त न्याय द्या, त्याहून जास्त काही नको. आज सकाळपर्यंत, याबद्दल मी माझ्या बायकोशी एक शब्दही बोललेलो नाही.”

“तरी तिने अंदाज केला असेल का?”

नाही. मिस्टर होम्स, ती अंदाज करू शकली नसेल -- कोणीच अंदाज करू शकला नसेल.”

“यापूर्वी कधी, तुमची काही कागदपत्रे हरवली होती का?”

“नाही, सर.”

“असे कागदपत्र अस्तित्वात आहेत, हे इंग्लंडमध्ये कोणाला माहिती आहे?”

“काल मंत्रीमंडळातील प्रत्येक सभासदाला, याबद्दल कळवण्यात आले होते. पण गुप्ततेची शपथ, प्रत्येक सभेत घेतली जाते, ती काल खुद्द पंतप्रधानांनी दिली आणि तरीही तेव्हापासून, काही तासात, मी ती हरवून बसलो.” त्याचा देखणा चेहरा, विषादाच्या छटांनी ओढला गेला होता. त्याचे हात, केस ओढत होते. क्षणभर आम्हाला त्या माणसाचा खराखुरा, भावनामय, रागावलेला, नैसर्गिक चेहरा दिसला. नंतर तो एका उमरावाच्या चेहऱ्यात व हळूवार आवाजात बदलला. “मंत्रीमंडळातील सभासदांशिवाय दोन किंवा तीन, त्या विभागाचे ऑफिसर असतात. त्यांनाही त्या कागदपत्रांबद्दल माहिती आहे. मिस्टर होम्स, मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो, की याव्यतिरिक्त इंग्लंडमध्ये कुणालाही माहिती नाही.”

"पण परदेशात?"

"ज्या माणसाने ते लिहिले, त्याच्याशिवाय ते कुणालाच माहिती नसावे, असा माझा विश्वास आहे. माझी खात्री आहे की त्यांचे मंत्री -- नेहमीचे कार्यालयाचे विभाग, असे काही नाहीतच."

होम्सने थोडा वेळ, काळजीपूर्वक विचार केला.

"सर, आता मला तुम्हाला विचारायला हवे, की हे कागदपत्र कशाबद्दल आहेत आणि ते नाहीसे होण्यामुळे, इतका गहजब का होणार आहे?"

त्या दोन मुत्सद्यांनी, एकमेकांकडे एक झटपट दृष्टीक्षेप टाकला. माजी पंतप्रधानांच्या दाट भुवया आक्रसून, नापसंतीदर्शक भाव उमटले.

"मिस्टर होम्स, ते पाकीट लांबट व फिकट निळया रंगाचे होते. त्यावर झेप घेणाऱ्या सिंहांचे लाल तिकीट चिकटवलेले होते. त्यावर मोठ्या हस्ताक्षरात -- चा पत्ता लिहिलेला होता."

होम्स बोलला, "हे सर्व रुचीपूर्ण व महत्वाचे आहे. पण माझी पद्धत, गोष्टींच्या अगदी मुळापर्यंत जाण्याची आहे. ते पत्र काय होते?"

"ते राज्याचे अतिशय महत्वाचे गुप्त पत्र होते. माझा नाईलाज आहे. याहून जास्त मी काही सांगू शकत नाही. आणि ते सांगणे जरुरीचे आहे, असे मला वाटत नाही. तुम्हाला मी अशा प्रकारे वर्णन केलेले पाकीट, जर तुमच्याकडे मी ऐकतो, त्याप्रमाणे असलेल्या शक्तीने वा चतुराईने मिळाले, तर तुम्ही तुमच्या देशाचे भले केल्यासारखे होईल आणि आमच्या अखत्यारीत असेल, तेवढे बक्षिस तुम्हाला प्रदान करण्यात येईल."

शेरलॉक होम्स हसत उठला.

तो म्हणाला, "तुम्ही देशातील सर्वात जास्त कामाचा भार असलेल्या, दोन व्यक्ती आहात. माझ्या लहानशा जगात, मीदेखील भरपूर काम करत असतो. मला खूप खेदपूर्वक सांगावेसे वाटते, की मी तुम्हाला या बाबतीत, मदत करू शकत नाही. आणि अजून काही वेळ या विषयावर बोलत रहाणे, हे वेळ फुकट घालवल्यासारखे होईल."

क्षणार्धात, ज्याचापुढे सारे मंत्रीमंडळ भीतीने कापते, अशा त्याच्या खोल चकाकणाऱ्या डोळयांनी भयंकरपणे बघत, तो माजी पंतप्रधान त्याच्या पायावर उभा राहिला. "सर, असले ऐकून घ्यायची मला सवय नाही." अशी त्याने सुरवात केली. पण स्वतःचा राग आवरून, तो

खाली बसला. एक मिनिटभर किंवा जास्तच, आम्ही सर्वजण स्तब्ध राहिलो. मग त्या वयस्क मुत्सद्यांने, त्याचे खांदे उडवले.

"मिस्टर होम्स, आम्हाला तुमच्या अटी, मान्य केल्या पाहिजेत. निःसंशय, तुमचे खरे आहे. तुम्हाला पूर्णपणे विश्वासात घेतल्याशिवाय, तुमच्याकडून काम होण्याची अपेक्षा करणे, अतार्किक आहे."

वयाने लहान मुत्सद्दी म्हणाला, "मी तुमच्याशी सहमत आहे."

"तुम्ही मला जो मान देत आहात, त्याला स्मरून, डॉ वॉटसन, मी तुझ्या देशभक्तीला आवाहन करतो, कारण हे प्रकरण बाहेर फुटण्याच्या देशाच्या दुर्दैवाची, मी कल्पना करू शकत नाही."

"तुम्ही बिनदिक्कत, आमच्यावर विश्वास टाकू शकता."

"ते एका हुकुमशाही राजवटीतील एकाधिकारशाही असलेल्याचे, पत्र होते. या देशातील काही वसाहतवादी संघटनांच्या कारवाया, त्याला पद्च्युत करण्याचे, प्रयत्न करत आहेत. ते पूर्णपणे त्याच्या जबाबदारीवर, घाईघाईने खरडले गेले आहे. चौकशीअंती असे समजले आहे, की त्याच्या मंत्रीमंडळातील कोणालाही, याबद्दल काही माहिती नाही. त्याशिवाय ते इतक्या दुर्दैवी पद्धतीने, लिहिले आहे व त्यातील काही भाग, इतका रागाला आमंत्रण देणारा आहे, तो प्रसिध्द केला गेला तर, संशयातीतपणे या देशात, धोक्याचे वातावरण निर्माण करेल. सर, इथे इतका गहजब होईल की, मी असे म्हणायला मागेपुढे बघणार नाही, की तो जाहीर केल्यापासून एक आठवड्यात, हा देश एका युद्धामध्ये ओढला जाईल."

होम्सने कागदावर एक नाव लिहून, तो कागद माजी पंतप्रधानांना दिला.

"बरोबर. तोच तो आहे. आणि त्याने ते पत्र लिहिले आहे – तेच ते पत्र, ज्यामुळे, दहा लाख पौंडांचा व हजारो लोकांचा चुराडा होईल -- आणि तेच अजब पद्धतीने, गायब झाले आहे."

"तुम्ही ते पाठवणाऱ्याला, तसे कळवले का?"

"हो सर. एक गुप्त तार, पाठवली आहे."

"कदाचित त्याला, ते प्रसिध्द व्हायला हवे असेल."

“नाही सर. त्याने ते आततायीपणे व भडक डोक्याने लिहिले असल्याने, आपण असा ठाम विश्वास ठेऊ शकतो, की त्याला आधीच कळले आहे, जर ते लोकांसमोर आले तर, हा त्याला व त्याच्या देशाला एक जबरदस्त ठोसा बसणार आहे.”

“जर असे असेल तर, मग ते प्रसिध्द व्हावे, असे कुणाला वाटते आहे?” कोणी

ते चोरायची वा प्रसिध्द करायची इच्छा का बाळगावी?”

“मिस्टर होम्स, आता तुम्ही मला उच्चस्तरीय, आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे घेऊन चालला आहात. पण जर तुम्ही युरोपिअन परिस्थिती समजाऊन घेतली तर, तुम्हाला हेतूचे आकलन होण्यास काही अडचण येणार नाही. सबंध युरोप म्हणजे, सुसज्ज सैन्याचा तळ आहे. जवळजवळ दुप्पट लोकांचा जमाव, सैन्याची शक्ती तोलून धरतो आहे. ब्रिटनचे, स्वतःचे असे काही नियम आहेत. जर ब्रिटन कुठल्या गटाबरोबर युद्धात ओढले गेले, तर ते दुसऱ्या गटावर नक्की वर्चस्व प्रस्थापित करतील, मग तो दुसरा गट, युद्धात उतरलेला असो वा नसो. समजले का?”

“अगदी चांगले. तर मग हे कागदपत्र हस्तगत करून, जाहीर करण्यात, शत्रूला रस आहे. म्हणजे त्याच्या देशात व आपल्यात भांडणाची ठिणगी पडेल?”

“हो सर.”

शत्रूच्या हातात पडण्यासाठी, हे कागदपत्र कुणाला पाठवावे लागतील?’

“युरोपमधील कुठल्याही सरकार प्रमुखाला. बहुधा, आत्ता ते त्या दिशेने वेगाने निघालेले असेल.”

मिस्टर ट्रेलॅवने होप यांनी, दुःखातिरेकाने त्याचे डोके छातीवर वाकवून, शोक करायला सुरवात केली.

माजी पंतप्रधानांनी दयाळूपणे त्यांचा हात, होप यांच्या खांद्यावर ठेवला.

“माझ्या प्रिय मित्रा, हे तुझे दुर्दैव आहे. तुला कोणी, दोष देणार नाही. तू काही मुद्दाम, दुर्लक्ष केले नाहीस. मिस्टर होम्स, आता तुम्हाला कायकाय झाले, ते सर्व समजले आहे. आता, तुम्ही काय सुचवाल?”

होम्सने विषण्णतेने, त्याचे डोके हलवले.

“सर, तुम्हाला असे वाटते का, की हे कागदपत्र मिळाले नाहीत, तर युध्द होईल?”

“हो”

“मला वाटते, की तशी खूप शक्यता आहे.”

“मग सर, युद्धाची तयारी करा.”

“मिस्टर होम्स, असे म्हणणे बरोबर नाही.”

“पण सर्व बाबींचा विचार करता, हे रात्री साडेअकरा नंतर चोरले गेले हे पटत नाही. माझ्या समजुतीप्रमाणे, मिस्टर होप व त्यांची पत्नी, दोघेही त्या वेळेपासून, चोरी झाल्याचे कळेपर्यंत, खोलीतच होते. तर मग ते काल संध्याकाळी साडेसात ते साडेअकरा या दरम्यान नाहीसे झाले असावेत. ते चोरणाऱ्याला ते तिथे आहेत, हे नक्की माहिती असणार. त्यामुळे त्याने ते लवकरात लवकर, चोरले असणार. सर, आता असे महत्वाचे कागदपत्र, जर त्यावेळी चोरले गेले असतील, तर आत्ता ते कुठे असतील? कुणालाच ते स्वतःजवळ ठेऊन, काही फायदा नाही. ज्याना त्याची गरज आहे, त्याना ते घाईने पोचवले गेले असणार. ते आपल्याला कुठे सापडण्याचा संभव आहे?”

“पण आपण तिथे पोचणे, असंभव असावे.”

माजी पंतप्रधान त्यांच्या जागेवरून उठले.

“मिस्टर होम्स, तुम्ही म्हणता आहात, ते पूर्णपणे तर्कसंगत वाटते. मला असेच वाटते, की हे प्रकरण आपल्या हाताबाहेर आहे.”

“आपण वादविवादासाठी, असे धरून चालू की ते नोकर मंडळींनी चोरले -- “

“ते दोघेही म्हातारे व काही वर्षे जुने, नोकर आहेत.”

माझ्या माहितीप्रमाणे, तुमची खोली दुसऱ्या मजल्यावर आहे. त्याला एकच दार आहे आणि तेथे कोणी न दिसता, जाऊ शकत नाही. त्यामुळे घरातल्याच कुणीतरी, ते घेतले असणार व त्याच्या कडून ते, चोराने घेतले असणार. तर घरातली ती व्यक्ती कोण? मला माहिती असलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय हेरांपैकी व गुप्त दलालांपैकी एक कोणीतरी, त्यात रुची असणारे असणार. त्या व्यवसायातील तीन बरी नावे, मला माहिती आहेत. मी त्यापैकी एकेकाची, चाचपणी करायला सुरवात करतो. त्यापैकी एखादा गायब असेल, विशेषतः काल रात्रीपासून -- तर आपल्याला कागदपत्र कुठे गेले असतोल, याचा काही छडा लागू शकेल.”

युरोपिअन सचिवाने विचारले, “तो गायब का झाला असेल?’

तो ते घेऊन लंडनच्या राजदूताकडे जायची शक्यता, वाटते व नाहीही."

"मला वाटते, नाही. हे दलाल स्वतंत्रपणे काम करतात. आणि त्यांचे परराष्ट्र खात्याशी संबंध, फारसे चांगले नसतात."

पंतप्रधानानी मान हलवून, विरोध दर्शवला.

"मला वाटते तुम्ही बरोबर आहात, मिस्टर होम्स. इतके किंमती बक्षिस तो त्याच्या मुख्य कार्यालयात, स्वतःच घेऊन जाईल. मला वाटते तुम्ही सुचवलेली कृती, चांगली आहे. होप, मध्यंतरीच्या काळात, या धक्क्यामुळे आपण, आपली इतर कामे, विसरता कामा नयेत. दिवसाभरात काही नवीन घडले, तर आम्ही तुमच्याशी संपर्क साधू. तुम्ही आम्हाला तुमच्या चौकशीचे अहवाल देत रहा."

ते दोघे मुत्सद्दी कंबरेत वाकत, काळजीने खोलीतून बाहेर पडले.

जेव्हा आमचे प्रसिध्द पाहुणे गेले, तेव्हा होम्सने त्याचा पाईप पेटवला व शांतपणे, विचारात हरवून गेला. मी सकाळचे वर्तमानपत्र उघडले आणि काल रात्री, लंडनमध्ये घडलेल्या, एका रुची वाटेल अशा गुन्ह्याच्या बातमीत बुडून गेलो. माझा मित्र, अचानक उडी मारून उठला व काही ओरडला. पाईप शेकोटीच्या वर ठेवला व म्हणाला, "हो, याकडे बघायची अजून चांगली रीत, असू शकत नाही. परिस्थिती कठीण आहे. पण तरीही, थोडी तरी आशा आहे. मी म्हटलेल्या त्या तिघांपैकी कुणी ते घेतले असेल, तर त्याच्याकडेच ते अजून असण्याची, शक्यता आहे. शेवटी या लोकांना काय महत्वाचे असते तर पैसे आणि माझ्यामागे पूर्ण ब्रिटीश खजिना आहे. जर ते विकाऊ असेल, तर मी ते विकत घेईन -- जरी आयकरावर अजून काही पैसे वाढणार असले तरी.

असाही विचार करणे शक्य आहे, की तो ते परत आणून देईल कारण, या बाजूने किती पैसे मिळू शकतील, हे त्याला त्याबाजूने मिळणाऱ्या पैशांबरोबर, तुलना करून बघायचे असेल. इतका धोकादायक खेळ खेळायला, फक्त हे तिघेच तयार गडी आहेत. ओबेरस्टेन, ला रोथिर व एड्युरडो लुकास. मी या तिघांकडे बघतो."

मी वर्तमानपत्राकडे दृष्टीक्षेप टाकला.

"तो गोडोलफिन रस्त्याचा एड्युरडो लुकास का?"

"हो."

"तू त्याला भेटू नकोस.'

"का?"

"त्याचा त्याच्या राहत्या घरी, काल खून झाला."

आमच्या साहसयात्रांमध्ये माझ्या मित्राने, मला इतके वेळा आश्चर्यचकित केले होते, की आज मी त्याला तसे केल्यामुळे, मला माझा विजय झाल्यासारखे वाटले. तो माझ्याकडे मनोरंजन झाल्यासारखे, टक लाऊन बघत राहिला. मग त्याने माझ्या हातातून, वर्तमानपत्र हिसकावून घेतले. तो त्याच्या खुर्चीतून उठला, तेव्हा मी तो परिच्छेद वाचत होतो.

***वेस्टमिन्स्टरमध्ये खून***

*काल रात्री १६, गोडोलफिन रस्ता, या अठराव्या शतकातील जुन्या वस्तीच्या घरांच्या ओळीत, एक चमत्कारिक प्रकारचा गुन्हा घडला. हे घर नदी व चर्चसंबंधित लोकांच्या रहाण्याच्या ठिकाणाच्या मध्ये असून, लोकसभेच्या मिनाराच्या सावलीत येते. या छोट्याशा पण उठून दिसणाऱ्या घरात काही वर्षे, एड्युरडो लुकास रहात होता. तो सामाजिक वर्तुळात, त्याच्या मोहक व्यक्तिमत्वामुळे व उत्तम मानद खेळाडू म्हणून, प्रसिध्द होता. मिस्टर लुकासने लग्न केले नव्हते. तो चौतीस वर्षांचा होता. तो मिसेस प्रिंगल या मालकिणीच्या घरात, त्याचा नोकर, मिटन बरोबर रहायचा. ती मालकीण, लवकर कामातून निवृत्त झाली होती. ती वरच्या मजल्यावर झोपत असे. नोकर संध्याकाळी हॅमरस्मिथ येथे, त्याच्या मित्राला भेटायला जात असे. दहा वाजल्यापासून, मिस्टर लुकास घरात एकटाच असे. त्याचा खून झाला तेव्हा नेमके काय झाले ते काही कळले नाही. पण पावणेबारा वाजता, गोडोलफिन रस्त्याने चाललेल्या पोलीस इन्स्पेक्टर बॅरेटला असे दिसले, की १६ नंबरचे दार थोडेसे उघडे आहे. त्याने दारावर टकटक केले पण काही उत्तर आले नाही. तो थोडा आत गेला व परत टकटक केले. पण काहीच हालचाल नव्हती. मग तो आत शिरला. खोलीमध्ये कसाही पसारा पडला होता. सगळे फर्निचर एका बाजूला केले होते. एक खुर्ची पाठीवर खोलीच्या मध्यभागी पडली होती. खुर्चीशेजारी, अजून एका पायाची थोडी हालचाल करत, तो दुर्दैवी भाडेकरू पडला होता. त्याला हृदयात भोसकले गेले होते. आणि तो तत्काळ मेला असावा. भोसकला गेलेला सुरा, थोडा वाकडा असून, भारतीय दिसत होता. भिंत सजवणाऱ्या बक्षिस मिळालेल्या वस्तूच्या हातावरून, तो खेचून काढला गेला होता. गुन्ह्याचा उद्देश चोरी वाटत नव्हता. कारण खोलीतून किंमती सामान गेले नव्हते. एड्युरडो लुकास इतका*

*प्रसिध्द व सगळयाना माहिती असलेला होता, की त्याच्या क्रूर व चमत्कारिक नशीबाने, मित्रांच्या मोठ्या जमावात, खोलवर सहानुभूती आणि दुःखद रुची जागवली होती.*

खूप वेळ गप्प राहून होम्सने विचारले, “तर मग वॉटसन, आता काय करायचे?”

“आपण आपला शोध सुरु करण्यापूर्वीच, याचा क्रूर पद्धतीने खून करण्यात आला आहे. हा निव्वळ योगायोग नसून, अडथळा आहे. तो किती मोठा आहे ते, सांगता येणार नाही माझ्या प्रिय वॉटसन, दोन घटना एकमेकांशी संबंधित आहेत -- अगदी ठामपणे. आपण तो संबंध शोधून काढला पाहिजे.”

“पण आता पोलिसाना, सगळे समजणार.”

“मुळीच नाही. त्याना गोडोलफिन रस्त्यावर काय झाले, तेवढेच दिसेल. तेवढेच त्याना माहिती आहे -- आणि माहिती होईल -- व्हाईटहॉल टेरेसबद्दल काहीच नाही. फक्त आपल्याला दोन्ही घटना माहिती आहेत. आणि आपण त्यातील संबंध, शोधून काढू शकतो. लुकासवर माझा संशय पक्का होण्यास, अजून एक कारण आहे. ते म्हणजे, गोडोलफिन रस्ता वेस्टमिन्स्टरपासून चालत, फक्त काही मिनिटांच्या अंतरावर आहे. मी घेतलेली इतर दोन नावे, ते गुप्त दलाल, पश्चिमेच्या टोकाला रहातात. त्यामुळे त्या दोघांपेक्षा, लुकासला युरोपिअन सचिवाच्या कार्यालयाशी संपर्क साधणे किंवा निरोप मिळवणे, सोपे होते -- छोटी गोष्ट, पण काही तासातील या घटना बघता, ते महत्वाचे ठरू शकते. अरेच्या! आपण इकडे कुठे आलो?”

एका ट्रेमध्ये एका बाईचे कार्ड घेऊन मिसेस हडसन अवतीर्ण झाली. होम्सने त्याकडे एक नजर टाकली व भुवई चढवून, ते माझ्याकडे दिले.

तो म्हणाला, “हिल्डा ट्रेलॅवने होप बाईसाहेबाना, आत यायला सांगा.”

क्षणभराने आमची आधीच वेगळी ओळखली गेलेली नम्र खोली, त्या लंडनमधील सुंदर बाईच्या येण्याने अजून उजळून निघाली. बेलमिन्स्टरच्या ड्युकच्या धाकट्या मुलीच्या सौदर्याबद्दल, मी नेहमी ऐकले होते व फोटो बघितले होते, तरी इतका अवर्णनीय, नाजूक, गोड व सुंदर चेहरा पाहून, मी थक्क झालो. हिवाळयातील त्या सकाळी आम्ही तो चेहरा पाहिला तेव्हा, आम्ही त्या सौदर्याने भारावून गेलो. गाल उत्फुल्ल होते पण उदास भावनांमुळे फिके पडले होते. डोळे तेजस्वी होते पण ताप आल्यासारखे मलूल दिसत होते. चेहरा उतरलेला दिसत होता. उघड्या दारात, ती एखाद्या चित्रासारखी उभी राहिली, तेव्हा पहिल्या प्रथम तिच्या चेहऱ्यावरून सौदर्य नव्हे, तर भीती ओसंडून वाहताना नजरेस पडत होती.

“मिस्टर होम्स, माझा नवरा इथे आला होता का?”

“हो, बाईसाहेब. तो इथे आला होता.”

“मिस्टर होम्स, मी तुम्हाला विनवणी करते, की मी इथे आले होते, ते त्याला सांगू नका.”

होम्स थंडपणे अभिवादनपर, झुकला आणि तिला खुर्चीकडे नेले.

“तुम्ही मला नाजूक अवस्थेत टाकले आहे. तुम्ही प्रथम बसा व मग मला सांगा तुमची काय इच्छा आहे. पण मी काही ऐकून घेतल्याशिवाय, तुमच्या म्हणण्याला आंधळेपणाने दुजोरा देईन, असे समजू नका.”

ती खोलीभर फिरली आणि मग खिडकीकडे पाठ करून, खुर्चीत बसली. तिचा रुबाब एखाद्या राणीचा होता -- उंच, डौलदार आणि नखशिखांत स्त्री! ती बोलली, “मिस्टर होम्स,” -- तिचे पांढरे हातमोजे घातलेले हात, ती बोलताना एकसारखे हलवत होती. “मी तुम्हाला अशी आशा धरून, मोकळेपणे सांगते, की तुम्ही पण माझ्याशी तसेच बोलाल. माझा नवरा व मी, आमच्या दोघांच्यात एक बाब सोडून सर्व बाबतीत, एकमेकांवर पूर्ण विश्वास आहे. ती म्हणजे राजकारण. तो मला त्याबद्दल, काहीही सांगत नाही. आता मला माहिती आहे, की काल रात्री आमच्या घरात, काहीतरी नको ते घडले. एक कागद नाहीसा झाला. पण तो विषय राजकारणाशी संबंधित असल्याने, माझा नवरा मला विश्वासात घेत नाही. आता हे महत्वाचे आहे -- मी म्हणते आहे, ते इतके महत्वाचे आहे, की मला त्याबद्दल कळलेच पाहिजे. ते राजकारणी लोक सोडून, सगळे खरे माहिती असलेली, अशी तुम्हीच एक, वेगळी व्यक्ती आहात. मिस्टर होम्स, मी तुम्हाला विनंती करते, की नक्की काय झाले आहे व त्याचे काय परिणाम होणार आहेत, ते तुम्ही मला सांगा. मिस्टर होम्स, सगळे सांगा. तुमच्या अशीलाची गुप्तता पाळायची मागणी, त्याने भंग होणार नाही. उलट मला ते सांगण्याने, ती वाढेल. तो चोरला गेलेला कागद, कसला होता?”

“बाईसाहेब, तुम्ही मला जे करायला सांगत आहात, ते केवळ अशक्य आहे.”

तिने एक निःश्वास टाकला व हातात तिचा चेहरा लपवला.

“तुम्हाला हे समजून घेतले पाहिजे, की आहे हे असे आहे. जर तुमच्या नवऱ्याला तुम्हाला अंधारात ठेवणे योग्य वाटत असेल तर, तर मग माझ्यासारख्या व्यावसायिक गुप्ततेची शपथ घेऊन सर्व जाणून घेतलेल्या माणसाने, ते सांगणे इष्ट ठरेल का? तुम्ही मला असे करायला सांगणे, बरोबर नाही. तुम्ही ते त्यांनाच, विचारले पाहिजे.”

“मी त्याला विचारले. मी तुमच्याकडे शेवटचा उपाय, म्हणून आले आहे. पण तुम्ही मला नेमके काय ते, सांगणार नसाल तरी, मला एका बाबतीत तरी, तुम्ही काही सांगू शकता का?”

“ते काय आहे?”

“माझ्या नवऱ्याची राजकीय कारकीर्द, यामुळे पणाला लागली आहे का?”

“हो. जर योग्य तऱ्हेने हा प्रश्न सोडवला गेला नाही तर, नक्कीच त्याचा दुर्दैवी परिणाम होईल.”

“ओहो!” तिचा संशय फिटल्याच्या थाटात, खोल उसासा टाकून ती म्हणाली, ““मिस्टर होम्स, अजून एक प्रश्न. हा कागद हरवल्यामुळे, भयंकर सामाजिक परिणाम होतील, असे मला माझ्या नवऱ्याच्या धक्का बसण्याच्या, प्रथम प्रक्रियेतून जाणवले, ते खरे आहे का?”

“जर तो तसे म्हणाला असेल, तर मी ते नाकारू शकत नाही.”

“असे काय परिणाम, होतील?’

“नाही. बाईसाहेब, पुन्हा तुम्ही मला मी उत्तर देऊ शकणार नाही, असे प्रश्न विचारत आहात.”

“मग मी तुमचा अजून वेळ घेत नाही. तुम्ही मोकळेपणे बोलला नाहीत, म्हणून मी तुम्हाला दोष देत नाही. आणि तुमच्या बाजूने तुम्ही, माझ्या नवऱ्याच्या काळजीपोटी मी तुम्हाला त्याच्या मर्जीविरुद्ध जे विचारले, त्याबद्दल गैरसमज करून घेणार नाही, अशी आशा करते. मी इथे येऊन तुम्हाला भेटले, हे कृपया कोणाला सांगू नका.”

ती आमच्याकडे पाठ करून दाराबाहेर पडली आणि मी तो घाबरलेला सुंदर चेहरा, शेवटचा पाहिला. भयचकित डोळे व उतरलेले तोंड! मग ती गेली.

दार बंद झाल्यावर, जेव्हा त्या बाईचे गारुड उतरले तेव्हा होम्स हसून म्हणाला, “वॉटसन, सुंदर बाई हा तुझा प्रांत आहे. पण त्या देखण्या बाईचा, डाव काय होता? तिला खरे, काय हवे होते?”

“तिने ते स्पष्टपणे सांगितले. तिला काळजी वाटणे, सहज शक्य आहे.”

“हं. वॉटसन, तिचा आविर्भाव, दाबलेली अधीरता, बेचैनी, प्रश्न विचारण्यातील तिचा ठामपणा, याचा विचार कर. ती ज्या सामाजिक स्तरातून आली आहे, त्यात असे भावनेचे प्रदर्शन जरासुद्धा करत नाहीत.”

“ती फारच अस्वस्थ, झाली असणार.”

‘तिला सर्व माहिती असणे, हे तिच्या नवऱ्याच्या दृष्टीनेही कसे उत्तम असल्याचे, ती ज्या चौकस अदबीने सांगत होती, ते आठव. तिला नक्की काय म्हणायचे होते? आणि एक गोष्ट, तुझ्या लक्षात आली असेल, की तिने जाणूनबुजून खिडकीकडे पाठ केली होती. तिच्या चेहऱ्यावरचे भाव आपल्याला वाचता येऊ नयेत, म्हणून हा खटाटोप होता.”

“हो. तिने खोलीतील अशीच खुर्ची निवडली.”

“बायकांचे छुपे हेतू समजायला अवघड असतात हेच खरे. मागे एका केसमध्ये, जिच्याबद्दल मी याच कारणासाठी संशय व्यक्त केला होता, ती मार्गेट नावाची बाई तुला आठवते का? तिच्या नाकावर पावडर नव्हती -- त्यामुळे बरोबर उकल करता आली. वास्तविक भुसभुशीत वाळूवर तुम्ही काय उभारू शकणार? बायकांची कमी महत्वाची कृती, मोठी असू शकते. किंवा त्यांचे विचित्र वर्तन, एका केसाच्या पिनेवर वा चिमट्यावर अवलंबून असू शकते. बरं आहे, वॉटसन, शुभ सकाळ.”

“तू बाहेर चालला आहेस का?’

“हो. मी सकाळी आपल्या नेहमीच्या मित्रांबरोबर, गोडोलफिन रस्त्यावर फिरत असेन. जरी मला हे माहिती नसले, की ही समस्या काय आकार घेणार आहे, तरीही एड्युरडो लुकासंबंधीची आपल्या समस्येची उकल, आपल्याला तिथेच सापडेल. आधीच त्याबद्दल आडाखे बांधणे, ही मोठी चूक ठरेल. माझ्या चांगल्या वॉटसन, जर अजून कोणी पाहुणे आले, तर त्यासाठी तू तयार राहशील का? मला शक्य असेल तर मी तुला जेवायच्या वेळी भेटतो.”

दिवसभर त्या दिवशी, त्यानंतरच्या दिवशी व त्याहीनंतरच्या दिवशी, होम्स एका तंद्रीत व वाईट मनोवस्थेत होता. तो जातयेत होता. सतत पाईप ओढत होता. व्हायोलीनवर भन्नाट धून वाजवत होता. हरवल्यासारखा, वागत होता. घाईघाईने, अवेळी सँडविच कोंबत होता. आणि मी विचारलेल्या साध्यासाध्या प्रश्नांची, क्वचितच उत्तरे देत होता मला हे कळत होते, की तो जे शोधतो आहे, त्याबद्दलच्या गोष्टी सुरळीत चाललेल्या नाहीत. तो केसबद्दल, काही बोलत नव्हता. आणि वर्तमानपत्रातील मजकुरावरुन, मी घटनेच्या कायदेशीर बाबीसंबंधीच्या, गोष्टी ताडल्या.

जॉन मिटनला, म्हणजे लुकासच्या नोकराला, पकडून परत सोडून दिले. 'अचानक मृत्यूच्या' तपासणी अधिकाऱ्याच्या ज्युरीने, झालेल्या बेकायदेशीर खुनाची केस पुढे आणली. पण त्याचे पुढे काहीच झाले नाही. खुनाचा हेतू, समजू शकला नाही. खोली महाग वस्तूंनी भरून गेली होती. पण कुठ्लीही वस्तू घेतली गेली नाही. मेलेल्या माणसाच्या कागदपत्राना, धक्का लावला गेला नाही. त्यांची कसून छाननी करण्यात आली. आणि त्यावरून समजले की तो, आंतरराष्ट्रीय राजकारणात रस असलेला विद्यार्थी होता व त्याचा तो अथकपणे पाठपुरावा करत असल्याच्या, गावगप्पा होत्या. शिवाय तो, उल्लेखनीय भाषातज्ञ व सुलेखनकारही होता. अनेक देशांच्या अग्रगण्य राजकारण्यांपैकी, परिचयाचे असे त्याचे नाव होते. पण त्याच्या खणात सापडलेल्या कागदपत्रात, स्फोटक असे काही सापडले नाही. बायकांबरोबर असलेले त्याचे संबंध, अनेक पण वरवरचे होते. त्याच्या ओळखीच्या खूपजणी होत्या. त्यांतील काही मैत्रिणी होत्या. पण प्रेम असलेली, कुणीच नव्हती. त्याच्या सवयी नेमस्त होत्या. त्याची वर्तणूक, कुणाला दुखवणारी नव्हती. त्याचा खून हे एक गूढ होते व ते तसेच रहाणार होते.

जॉन मिटनला पकडून, सोडून दिले होते. खुनाचा छडा लावण्याचे कसून प्रयत्न न झाल्याने, कुणाला तरी पकडायचे म्हणून, त्याला पकडले होते. पण त्याच्या विरुद्ध खटला चालवण्यासारखे, काहीच सापडले नाही. त्या रात्री तो हॅमरस्मिथ येथे, त्याच्या मित्राला भेटायला गेला होता, त्याची खात्री करण्यात आली. त्या रात्री हवा चांगली असल्यामुळे, तो चालत निघाला. वेस्टमिन्स्टरला खून झालेला कळण्यापूर्वी, तो पोचला आणि तिथून घरी आला, हे त्याचे स्पष्टीकरण पटण्यासारखे होते. तो खरे तर, बाराला घरी पोचला आणि अचानक झालेल्या दुःखद घटनेने, हादरून गेला. त्याचे त्याच्या मालकाशी, चांगले संबंध होते. खूपशा मृत माणसाच्या गोष्टी, जसे की रेझर्स – वगैरे त्याच्याकडे सापडल्या. पण त्याने असे स्पष्टीकरण दिले, की त्या त्याला त्याच्या मालकाकडून बक्षिस मिळाल्या होत्या व घरमालकीणीने ती गोष्ट, खरी असल्याचे सांगितले. मिटन हा, लुकासकडे तीन वर्षे कामाला होता. लुकास जर कुठे प्रवासाला गेला, तर तो त्याला नेत नसे. कधीकधी लुकास, तीनतीन महिने पॅरीसला जात असे. पण मिटन, गोडोलफिन रस्त्याच्या घरीच रहायचा. घरमालकिणीने त्या गुन्ह्याच्या रात्री, काहीही आवाज ऐकले नाहीत. जर तिच्या नवऱ्याकडे कुणी पाहुणा आला, तर तोच त्याला दार उघडत असे. तर मग अशा तऱ्हेने, मी वर्तमानपत्रात वाचल्याप्रमाणे, तीन रात्री गूढ तसेच राहिले. जर होम्सला अजून काही माहिती असले तर, ते त्याने त्याच्याजवळच ठेवले. पण त्याने मला सांगितल्याप्रमाणे, इनस्पेक्टर लेस्ट्रेड याने त्याला या केसमध्ये, विश्वासात घेतले होते. मला माहिती होते की तो प्रत्येक बाबतीत नवीन

काय घडले, ते जाणून होता. चौथ्या दिवशी, पॅरीसहून एक लांबलचक तार आली. ज्यामुळे केसचे सर्व गूढ सोडवले गेल्यासारखे वाटले.

पॅरीसच्या पोलिसांनी अलीकडेच शोध लावला ( डेली टेलेग्राफमध्ये म्हटल्याप्रमाणे ) मागील सोमवारी वेस्टमिन्स्टरला गोडोलफिन रस्ता, येथे प्राणघातक हल्ला झाल्यामुळे दुःखांत झालेल्या एड्युरडो लुकास, याच्या गूढ मृत्युवरील पडदा, त्यामुळे फाडला गेला. आमच्या वाचकाना आठवत असेल, की मृत्यू पावलेला सभ्य गृहस्थ, त्याच्या खोलीत भोसकलेल्या अवस्थेत सापडला. त्याचा नोकर, मिटन याच्यावर आरोप ठेवण्यात आला. पण पुराव्याअभावी त्याला सोडून देण्यात आले. काल ममे हेन्री फोर्नाये नावाच्या पॅरीसमधील एका रु ऑस्टरलीट्झ येथे लहानशा बंगल्यात रहाणाऱ्या बाईने अधिकाऱ्यांना कळवले की तिच्या नोकरांची मानसिक स्थिती ठीक नाही. तपासणी केल्यावर असे लक्षात आले, की खरे तर तिला, कायम स्वरूपी, धोकादायक, मानसिक आजार, झालेला आहे. चौकशीअंती पोलिसाना असे आढळले, की ममे हेन्री फोर्नाये नुकतीच मागील मंगळवारी गावाहून लंडनला आली. आणि वेस्टमिन्स्टर येथे झालेल्या गुन्ह्याशी तिचा संबंध असल्याचा, पुरावा सापडला आहे. मृत माणूस काही कारणाने, लंडन व पॅरीस येथे, समांतर आयुष्य जगत होता. क्रेओले वंशाच्या ममे हेन्री फोर्नाये, ही टोकाच्या उद्दीपित स्वभावाची आहे. आणि यापूर्वीच्या काळात, हेवा वाटण्याच्या, आवरण्यास कठीण अशा धक्क्यातून तिला, उद्दीपित रानटी अवस्थेत पोचण्याचा विकार जडला आहे. अपुऱ्या माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे, की ज्यामुळे लंडनमध्ये खळबळ उडाली आहे, असे भयंकर प्रकारचे गुन्हे तिने केले आहेत. सोमवारी रात्रीच्या तिच्या हालचालींचा, अद्याप मागोवा घेतला गेला नाही. पण संशयातीतपणे त्या बाईने मंगळवारी सकाळी चेरिंग क्रॉस स्टेशनवर, उत्तर देताना केलेल्या वर्णनावरून, तिच्या रानटी अवतारावरून व शारीरक इजा करणाऱ्या हावभावांवरून, बऱ्याच लोकांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे अशी शक्यता आहे, की ती तशा मनोवस्थेत असताना, गुन्हा घडलेला आहे. किंवा त्याच्या लगेचच्या परिणामामुळे, ती दुःखी बाई स्वतःला आवरण्यापलीकडे, गेली असावी. सध्या ती पूर्वी काय घडले, त्याचे सुसंगत वर्णन करायच्या मनस्थितीत नाही. आणि डॉक्टराना ती पुन्हा पूर्ववत सामान्य मनस्थितीत जाण्याची, शक्यता वाटत नाही. ती बाई, ममे हेन्री फोर्नाये, सोमवारी रात्री गोडोलफिन रस्त्यावरील घरांची, काही तास पहाणी करताना, दिसली होती.

होम्स त्याची न्याहारी संपवेपर्यंत, मी त्याला तो मजकूर वाचून दाखवला व विचारले, ‘तुला याबद्दल काय वाटते?”

तो खालीवर फेऱ्या मारत, म्हणाला, “प्रिय वॉटसन, तू खूप त्रास सहन केला आहेस. जर गेल्या तीन दिवसात मी तुला काही सांगितले नसेल तर, त्याचे कारण काही सांगण्यासारखे नव्हतेच. आता हा पॅरीसहून आलेला अहवाल पण, आम्हाला फार मदतीचा ठरत नाही आहे.”

“पण त्या माणसाच्या मृत्यूचे ते कारण आहे, एवढे नक्की ना?”

“आमच्या खऱ्या कामाशी तुलना करता, त्या माणसाचा मृत्यू ही निव्वळ एक घटना होती – फार महत्वाची नसलेली -- खरे काम होते कागदपत्र मिळवून, युरोपिअन नुकसान टाळणे. गेल्या तीन दिवसात, फक्त एकच गोष्ट झाली. ती म्हणजे, नवीन काही घडले नाही. मला सरकारकडून जवळजवळ दर तासांनी अहवाल येतात आणि युरोपमध्ये कुठे काही गडबड नाही. आता हे पत्र जर सुटे असते तर -- नाही. ते सुटे असणे शक्य नाही -- पण ते जर सुटे नसेल, तर मग ते कुठे असेल? कोणी ते घेतले असेल? ते पत्र, अजून का मिळत नाही? हे प्रश्न, माझे डोके खात आहेत. डोक्यात, घणासारखे घाव पडत आहेत. पत्र ज्या रात्री हरवले, त्याच रात्री लुकास मेला, हा निव्वळ योगायोग होता? ते पत्र कधी त्याच्यापर्यंत पोचले तरी का? त्याच्या वेड्या बायकोने ते तिच्याबरोबर नेले का? असे असेल तर मग ते, तिच्या पॅरीसमधील घरी आहे का? फ्रेंच पोलिसांनी संशय व्यक्त केल्याशिवाय, मी ते कसे शोधू शकेन? वॉटसन, या केसमध्ये गुन्हेगाराला जितके कायद्याचे भय असते, तितकेच भय आम्हालाही आहे. प्रत्येक माणूस आमच्या विरुद्ध आहे. तरीही या केसमधील आमचा रस टिकून आहे. मी यशस्वीपणे ही केस सोडवली तर माझ्या शिरपेचात, मानाचा तुरा खोवला जाईल. ओहो, आघाडीवरून माझ्यासाठी दर तासाने येणारी चिठ्ठी आली आहे. त्याने घाईघाईने ती वाचली. “लेस्ट्रेडने काही उपयोगी पाहिले आहे. वॉटसन, तुझी टोपी घाल. आपण रमतगमत वेस्टमिन्स्टरला जाऊ.”

गुन्ह्याच्या ठिकाणी, ती माझी पहिली भेट होती. उंचावर असलेले, अंधारी, अरुंद घर, सर्व सामान्यपणे भक्कम, पण अयोग्य वाटणारे, त्या शतकासारखे असणारे!

पुढच्या खिडकीतून, लेस्ट्रेडच्या दांडगट कुत्र्याने, आम्हाला बघितले. एका कॉन्स्टेबलने दार उघडून, आम्हाला आत घेतले. तिथे गुन्हा घडला होता. पण आता तेथील गालिच्यावर एक कुरूप, वेडावाकडा डाग सोडला तर, गुन्ह्याचा मागमूस नव्हता. हा गालिचा खोलीच्या मध्यभागी घातलेला होता. त्याच्या कडांना चांगले रुंद, जुन्या पद्धतीचे, सुंदर चकचकीत लाकडाचे, चौकोनी तुकडे बसवले होते. शेकोटीच्या वर शस्त्रासारखी मोठी बक्षिसे ठेवली होती. त्यापैकी एक त्या दुर्दैवी खुनाच्या रात्री, वापरले गेले होते. खिडकीत महाग वाटणारे, लिहिण्याचे टेबल होते. त्या

घरातील प्रत्येक गोष्ट, चित्रे, गालीचे व शोभेच्या वस्तू, एक खानदानी अभिरुची दाखवत होते. त्या घरातील बाईची, चैनीची सवय दाखवत होते.

लेस्ट्रेडने विचारले, "'पॅरीसच्या बातम्या' वर्तमानपत्र वाचले का?"

होम्सने नकारात्मक मान हलवली.

"या वेळेस आपले फ्रेंच मित्र इथे येऊन गेलेले दिसतात. ते म्हणतात, त्याप्रमाणेच झाले असेल, यात काही संशय नाही. तिने दार वाजवले -- अचानक भेट, मला वाटते त्याने त्याचे आयुष्य, आखीव रेखीव कप्प्यात विभागले होते -- त्याने तिला, आत घेतले. तिला तो रस्त्यावर, उभे करू शकत नव्हता. तिने नाराजीने सांगितले, की ती कशी त्याचा मागोवा घेत होती. तिने नापसंतीदर्शक कटाक्ष टाकला. एकातून दुसरी गोष्ट निघत गेली. तो सुरा इतका सहजप्राप्य होता, की त्याचा शेवट जवळ आला. हे काही, क्षणार्धात घडले नाही. तरीही जणू तिला दूर ठेवण्यासाठी, सर्व खुर्च्या एका ठराविक अंतरावर ठेवलेल्या होत्या. फक्त एक त्याने, हातात धरली होती, आम्ही जणू तिथे हजर असल्याप्रमाणे, आम्हाला हे सर्व लक्षात आले."

होम्सने, त्याच्या भुवया उंचावल्या. "आणि तरीही तुम्ही, मला बोलावले?"

"हो. ती वेगळी गोष्ट आहे. फक्त एक क्षुल्लक गोष्ट. पण तू ज्यात रस घेतोस, अशी, विचित्र. तुला माहिती आहे, कदाचित तू त्याला असामान्य म्हणशील. पण मुख्य गोष्टीबरोबर, त्याचा काही संबंध नाही. असे एकंदर घटनेवरून वाटते आहे."

'मग ते काय आहे?"

"तसे तर तुला माहिती आहे. अशा गुन्ह्यानंतर आपण वस्तू जिथल्या तिथे ठेवण्याची काळजी घेतो. काहीही हलवले नाही. इथे कॉन्स्टेबलचा रात्रंदिवस पहारा असतो. आज सकाळी दफन केले गेले व तपास संपला -- निदान या खोलीपुरता -- आम्हाला वाटले आता ही खोली थोडी आवरू. हा गालीचा. असे बघा. तो काही खाली चिकटवलेला नाही. फक्त अंथरला आहे. आपल्याला तो उचलून हलवायची संधी आहे. आणि आम्हाला सापडले -- "

"ओहो, तुम्हाला काय सापडले?"

होम्सचा चेहरा काळजीने ताणला गेला.

“गेल्या शंभर वर्षात देखील तुम्ही, आम्हाला काय सापडले याची कल्पना केली नसेल. तुम्हाला तो गालीच्यावरील डाग दिसतो आहे? तरीही बराचसा शोषला गेला असला पाहिजे. नाही का?’

‘अगदी खरे.”

“पण तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल की खालच्या पांढऱ्या लाकूडकामावर तसा डाग नाही.

“”डाग नाही! पण तिथे तर तो असलाच पाहिजे -- “

“हो. तुम्ही असेच म्हणाल. पण तिथे तो नाही.”

त्या प्रसिध्द गुप्तहेराला कोड्यात टाकल्याने, लेस्ट्रेड गालातल्या गालात आनंदाने ह्सला.

“आता मी तुम्हाला स्पष्टीकरण देतो. तिथे दुसरा डाग आहे. पण तो पहिल्याशी जुळत नाही. तुम्ही स्वतः बघा. बोलताबोलता त्याने गालिच्याचा दुसरा भाग दुमडला आणि तिथे खरंच जांभळट लाल रंगाचा डाग जमिनीवर होता. “मिस्टर होम्स, त्याचे तू काय करणार?”

“का? ते अगदी सरळ आहे. दोन डागांचा संबंध आहे. पण गालिचा गोल फिरवला गेला आहे. तो चौकोनी व सुटा असल्याने ते शक्य झाले.”

“मिस्टर होम्स, गालिचा गोल फिरवला गेला हे सांगायला, पोलिसाना तुमची गरज नाही. हे स्पष्ट आहे. कारण जर तुम्ही गालिचा असा हलवलात, तर ते डाग एकमेकांवर असणार -- पण मला असे हवे आहे, की गालिचा कुणी व का हलवला?”

होम्सच्या कठोर चेहऱ्यावरून, तो आतल्या आत उद्दीपित झाल्याचे कळत होते. तो म्हणाला, “लेस्ट्रेड, इकडे बघ. या जागेवर तो कॉन्स्टेबल पहारा देत होता का?”

“हो.”

“छान मग माझा उपदेश ऐक. त्याची नीट तपासणी कर. आम्ही इथे थांबतो. तू त्याला मागील खोलीत घेऊन जा. तो एकटा असेल, तर कबुलीजबाब देईल. त्याला खडसावून विचार, की त्याने लोकाना, त्या खोलीत सोडले कसे? आणि तेही एकट्याने? तू हे केलेस का, असे त्याला विचारू नकोस. ते गृहीत धर, त्याला सांग, की कुणीतरी इथे आलेले तुला कळले. त्याच्यावर दबाव आण. त्याला सांग सर्व खरेखरे सांगितलेस, तरच फक्त त्याला, क्षमा मिळेल. बरोबर, मी सांगितले तसेच कर.”

लेस्ट्रेड ओरडला, “अरे देवा, त्याला जे माहिती असेल, ते मी चांगले बाहेर काढतो.” तो झटक्यात खोलीबाहेर पडला. आणि थोड्या वेळाने, त्याचा कर्कश आवाज मागील खोलीतून ऐकू येऊ लागला.

रानटीपणे उद्दीपित होऊन, होम्स ओरडला, “आत्ता वॉटसन, आत्ता. माणसातील ताकद संपली तरीही, त्यामागे असलेल्या, राखीव राक्षसी ताकदीच्या  जोराने, अचानक हल्ला केल्यासारखा, तो ओरडला. त्याने जमिनीवरील गालिचा बाजूला केला आणि झटक्यात गुडघ्यावर बसत हाताने जोरात लाकडाचा प्रत्येक चौकोन काढायला सुरवात केली. त्याच्या नखाने तो ते काम जोरजोरात करू लागला. त्याच्या मागे ते पेटीच्या बिजागरीसारखे झाकण उघडले गेले. त्यातून एक लहानसे काळे विवर, दिसू लागले. होम्सने त्याचे उत्सुक हात त्यात घालून, कडवट आरोळी मारत ते रागाने व निराशेने बाहेर काढले. त्यात काही नव्हते.

“लवकर वॉटसन, लवकर. ते परत होते तसे ठेऊन दे.” लाकडी चौकोन परत ठेवले गेले. त्यावर गालिचा परत होता तसा घातला गेला. तेव्हा लेस्ट्रेडचा आवाज ऐकू आला. त्याला होम्स शेकोटीच्या वरील बाजूवर ओणवलेला दिसला. हताशपणे काहीतरी नको ते घडले असल्याचा, भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. तरीही शांत राहून, तो त्याच्या जांभया थोपवायचा प्रयत्न करत होता.

“मिस्टर होम्स, तुला वाट बघायला लावल्याबद्दल, दिलगीर आहे. या प्रकरणात तू मरणांतिक त्रासला आहेस. तर, त्याने कबुली दिली आहे. ठीक आहे. मॅकफेरसन, इकडे ये. या भल्या माणसाला, तुझ्या अक्षम्य वर्तनाबद्दल सांग.”

तो रागावलेला व चुकीचे वागल्याबद्दल खंत वाटणारा महाकाय कॉन्स्टेबल, खोलीत अवतीर्ण झाला.

“मी खात्रीने सांगतो सर, मला त्रास द्यायचा नव्हता. काल संध्याकाळी घर चुकल्यामुळे एक तरुण स्त्री दाराशी आली -- ती खरेच चुकली होती. आणि आम्ही बोलत बसलो. इथे दिवसभर पहाऱ्याचे कर्तव्य पार पाडताना, फार एकाकी वाटते.”

“ठीक आहे. पुढे काय झाले?”

“तिला गुन्हा कुठे घडला, ते बघायचे होते -- ती म्हणाली, तिने वर्तमानपत्रात त्याबद्दल वाचले होते. ती मान द्यावा अशी, चांगले बोलणारी अशी, तरुण स्त्री होती. आणि सर, तिला आत डोकावू देण्यात, मला काही चुकीचे वाटले नाही. जेव्हा तिने गालिच्यावर खूण पाहिली, तेव्हा ती

जमिनीवर मृतवत पडली. मी मागे धावत जाऊन पाणी आणले. पण मी तिला शुद्धीवर आणू शकलो नाही. आणि मग मी कोपऱ्यावरील सदाहरित झुडूपाजवळ, ब्रँडी आणण्यासाठी गेलो. आणि मी ती आणेपर्यंत, ती तरुण स्त्री शुद्धीवर येऊन गायब झाली. मी खात्रीने सांगतो, नक्कीच तिला, शरम वाटली असली पाहिजे. तिला मला तोंड दाखवायचे नसावे."

"जमिनीवरील तो गालीचा हलवण्याबद्दल काय?"

"सांगतो सर. तो गालिचा खात्रीने, थोडा चुरगळला गेला होता. जेव्हा मी पाणी घेऊन परत आलो, तेव्हा ती त्यावर पडलेली होती. आणि तो एकही सुरकुती नसलेला गालिचा चकचकीत लाकडी फरशीवर होता. ब्रँडी आणल्यावर, गालिचा विस्कटलेला होता. तो मी सरळ केला."

"कॉन्स्टेबल मॅकफेरसन, यावरून तू धडा शिकला असशील, की तू मला फसवू शकत नाहीस." लेस्ट्रेड मानभावीपणे म्हणाला. "तुला नक्कीच असे वाटले की तुझ्या कर्तव्यातील कसूर, कधीच कुणाला कळणार नाही. नुसती गालीच्याकडे एक नजर टाकून, मला समजले की कोणीतरी खोलीत आले होते. अरे, तू नशीबवान आहेस, की काही गायब झालेले नाही. नाहीतर तू तुला, भलत्याच ठिकाणी पाहिले असतेस. मिस्टर होम्स, इतक्या क्षुल्लक कामासाठी, मी तुम्हाला बोलावले, त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. पण मला वाटते, पहिल्याशी काही संबंध नसलेल्या दुसऱ्या डागात तुम्हाला रुची असेल."

"नक्कीच. ते फार दिलचस्प होते. कॉन्स्टेबल, नंतर कधी ती बाई, इथे आली नाही का?"

"आली होती. एकदाच."

"ती कोण होती?"

"सर, मला नाव माहिती नाही. ती टंकलेखनासाठीच्या जाहिरातीला उत्तर द्यायला, आली होती, पण पत्ता चुकली -- दिसायला चांगली, नम्र अशी तरुण मुलगी, सर."

"उंच व देखणी?"

"हो सर. पूर्ण वाढ झालेली तरुण बाई. मला वाटते, तुम्ही तिला सुंदर म्हणू शकला असता. कुणी तिला अति सुंदरही, म्हटले असते. 'ओहो, ऑफिसर, मला डोकावून बघूद्या की' असे ती म्हणाली. आणि मला वाटले, की तिला डोकावू देण्यात, काही, अडचण नाही."

“तिचे कपडे कसे होते?”

“सर, फिकट होते. पायापर्यंत घातलेला झगा.”

“तेव्हा किती वाजले होते?”

“नुकताच अंधार पडू लागला होता. मी ब्रँडी घेऊन परत आलो, तेव्हा दिवे लावले जात होते.”

होम्स म्हणाला, “छान. वॉटसन, मला वाटते आपल्याला अजून महत्वाचे काम, दुसरीकडे आहे.”

आम्ही बाहेर पडल्यावर, लेस्ट्रेड पुढच्या खोलीत होता. पश्चात्ताप करणाऱ्या कॉन्स्टेबलने, आम्हाला जाण्यासाठी दार उघडले. होम्स बाहेर पडला, तेव्हा त्याच्या हातात काहीतरी होते. कॉन्स्टेबलने नीट लक्ष देऊन बघितले.

तो आश्चर्याने ओरडला, “अरे बापरे सर,” होम्सने त्याच्या ओठांवर त्याचे बोट ठेऊन, त्याचा हात छातीवरील खिशात घातला आणि रस्त्याकडे वळून हसत सुटला. तो म्हणाला, “उत्तम! मित्रा वॉटसन, चल शेवटच्या अंकाचा पडदा, उघडला आहे. तू हे ऐकून निःश्वास सोडशील, की आता युध्द होणार नाही. माननीय मिस्टर ट्रेलॅवने होप, त्यांच्या नावाजलेल्या कारकिर्दीला, ग्रहण लागणार नाही. गुप्त गोष्टी उघड्या करण्याबद्दल, सरकारी उच्च अधिकाऱ्यांना, शिक्षा होणार नाही. पंतप्रधानांना युरोपिअन राजकारणाच्या गुंतागुंतीला, तोंड द्यावे लागणार नाही. एका कुरूप घटनेतून थोडीशी युक्ती व व्यवस्थापन कौशल्याने आपण वाचलो आहोत. आपल्या बाजूने आता कोणालाही धोका नाही.”

या असामान्य माणसासाठी, माझे मन स्तुतीने भरून गेले.

मी ओरडलो, “तू ते कोडे सोडवलेस.”

“कसेबसे सोडवले वॉटसन. पण काही बाबी अजूनही, अंधारातच आहेत. पण आता आपण थोडा विसावा घेतला नाही, तर ती आपली चूक ठरेल. आपण सरळ व्हाईटहॉल टेरेसला जाऊ आणि या प्रकरणाची, तड लाऊन टाकू.”

जेव्हा आम्ही युरोपिअन सचिवाच्या घरापाशी आलो, तेव्हा हिल्डा बाईसाहेबांसाठी, होम्सने विचारले. आम्हाला आत नेण्यात आले.

रागाने चेहरा गुलाबी झालेल्या बाईसाहेब म्हणाल्या, “मिस्टर होम्स, तुमच्या बाजूने हे फारच चुकीचे व निष्ठुरपणाचे आहे. मी स्पष्ट केल्याप्रमाणे, मी माझे तुम्हाला भेटणे, गुप्त ठेवायला सांगितले होते. माझ्या नवऱ्याला वाटेल, की मी त्याच्या नको त्या गोष्टीत, नाक खुपसले आहे. आणि तरीही तुम्ही इथे येऊन मला बदनाम करत आहात आणि त्यामुळे, आपल्यातील व्यावसायिक संबंध, उघड करत आहात.”

“बाईसाहेब, दुर्दैवाने, मला दुसरा काही इलाज नव्हता. तो खूप महत्वाचा कागद शोधण्यासाठी, मला काम दिले गेले होते. त्यामुळे मला तुम्हाला सांगितले पाहिजे, की ते काय ते माझ्या हातात सोपवा.”

ती बाई तावातावाने उठली. तिच्या सुंदर चेहऱ्याचा रंग पार उडाला होता. तिचे डोळे चमकत होते -- ती थरथरत होती -- मला वाटले, ती आता चक्कर येऊन पडणार. नंतर ती मोठ्या प्रयत्नाने, धक्क्यातून सावरली. अति आश्चर्याचे व खूप रागाचे भाव, तिच्या चेहऱ्यावर दृगोचर झाले.

“मिस्टर होम्स, तुम्ही माझा अपमान केला आहे.”

“सबुरीने, बाईसाहेब. याचा काही उपयोग नाही. पत्र द्या.”

तिने घंटी वाजवायला तिथे हात नेला.

“स्वयंपाकी तुम्हाला, बाहेरचा रस्ता दाखवेल.”

“हिल्डा बाईसाहेब, घंटी वाजवू नका. नाहीतर मोठे प्रकरण टाळायचे, माझे सर्व नम्र बेत धुळीस मिळतील. पत्र द्या, म्हणजे मग सर्व काही, ठाकठीक होईल. जर तुम्ही माझ्याबरोबर काम केलेत, तर मी सर्व काही व्यवस्थित मार्गी लावीन. तुम्ही माझ्याविरुद्ध उभ्या राहिलात, तर मग मला तुमचे बिंग फोडावे लागेल.”

ती स्वतःचा बचाव करत ताठ उभी राहिली. एक डौलदार व्यक्ती, होम्सचे मन वाचत असल्यासारखी, तिचे डोळे होम्सवर रोखून उभी होती. तिचा हात घंटीवर होता. पण ती वाजवावी की नाही, अशा विचारात पडली होती.

“तुम्ही मला घाबरवायचा प्रयत्न करत आहात. इथे येऊन एका बाईला धमकावणे, यात काही मोठा पुरुषार्थ नाही. मिस्टर होम्स, तुम्ही म्हणता की तुम्हाला काहीतरी माहिती आहे. ते काय आहे?”

“बाईसाहेब, कृपया खाली बसा. तुम्ही पडलात तर तुम्हाला लागेल. तुम्ही बसत नाही, तोपर्यंत मी काही बोलणार नाही. आभारी आहे.”

“मिस्टर होम्स, मी तुम्हाला पाच मिनिटे देते.”

हिल्डा बाईसाहेब, एक मिनिट पुरेसे आहे. एड्युरडो लुकासला कागदपत्र देण्यासाठी, तुम्ही त्याच्या घरी गेला होतात, हे मला माहिती आहे. काल रात्री घरी परत येण्याची, तुमची हुशारीची खेळी देखील, मला माहिती आहे. आणि ज्या पद्धतीने तुम्ही गालीच्याखाली लपवलेल्या जागेवरून, ते पत्र मिळवलेत, ते पण मला माहिती आहे.”

तिने पडलेल्या चेहेऱ्याने, त्याच्याकडे बघितले व काही बोलण्यापूर्वी दोनदा आवंढा गिळला. शेवटी ती ओरडली, “तुम्ही वेडे झाला आहात मिस्टर होम्स, तुम्ही वेडे झाला आहात.”

त्याने त्याच्या खिशातून कार्डबोर्डचा एक तुकडा काढला. तो एका चित्रावरून कापलेला बाईचा चेहरा होता.

“मी हे आणले आहे, कारण मला वाटले की ते, उपयोगी ठरेल. पोलिसांनी ते ओळखले आहे.”

तिने जोरात श्वास घेऊन तोंड उघडे टाकले व खुर्चीत मान मागे टाकली.

“हिल्डा बाईसाहेब, पत्र द्या. तुमच्याकडे पत्र आहे. अजूनही अडचण नाही.”

"काही तडजोड करता येईल. मला तुम्हाला त्रास द्यायची, इच्छा नाही. मी तुमच्या नवऱ्याला हरवलेले पत्र दिले, की माझी जबाबदारी संपली. माझे ऐका आणि मोकळेपणे मला कायकाय झाले, ते सांगा. ही एवढीच संधी तुमच्याकडे आहे.”

तिचे धैर्य, वाखाणण्यासारखे होते. अजूनही ती हार मानायला तयार नव्हती.

“मिस्टर होम्स, मी तुम्हाला परत सांगते. तुम्ही कुठल्यातरी भलत्याच फसव्या कल्पनेत आहात.”

होम्स त्याच्या खुर्चीतून उठला.

“हिल्डा बाईसाहेब, मी दिलगीर आहे. मी तुमच्यासाठी शक्य असलेले सर्व केले. पण ते सर्व फुकट गेले.”

त्याने घंटी वाजवली. स्वयंपाकी आला.

“मिस्टर ट्रेलॅवने होप घरी आहेत का?”

“सर, ते पाऊण वाजता घरी येतील.’

होम्सने त्याचा घड्याळाकडे बघितले.

“अजून पाऊण तास आहे. फार छान. मी थांबतो.”

स्वयंपाक्याने जाताना दार लावले न लावले तोच, हिल्डा बाईसाहेब, होम्सच्या पाया पडू लागली. तिचे हात पसरलेले होते. चेहरा वर केलेला होता व अश्रूंनी भिजला होता.

ती रानटीपणे ओरडून, विनवणी करू लागली, “ओहो, मला वाचवा. मिस्टर होम्स, मला वाचवा. कृपा करून, त्याला सांगू नका. मी त्याच्यावर इतके प्रेम करते. यामुळे त्याचे उदार हृदय भंग पावेल. मी त्याच्या आयुष्यावर, सावट आणणार नाही.”

होम्सने त्या बाईला उठवले, “बाईसाहेब, शेवटच्या क्षणी का होईना, पण तुम्ही शुद्धीवर आल्याबद्दल, मी आभारी आहे. आता एक मिनिटही, वाया घालवायला नको. पत्र कुठे आहे?”

ती झटक्यात लिहायच्या टेबलाशी गेली. कुलूप उघडले व लांबट, निळे पाकीट बाहेर काढले. “हे घ्या, मिस्टर होम्स. अरे देवा, मी हे बघितलेच नसते, तर किती बरे झाले असते.”

“होम्स कुजबुजला, “हे पत्र कसे परत करता येईल? लवकर. घाई केली पाहिजे. काही मार्ग आपण शोधून काढू. बाहेर पाठवायच्या पत्रांची पेटी कुठे आहे?”

“अजून झोपायच्या खोलीतच आहे.”

“काय नशिबाचा फटका आहे! लवकर बाईसाहेब, इकडे आणा.” क्षणभराने ती हातात लाल चपटी पेटी घेऊन आली.

“तुम्ही पूर्वी ती कशी उघडली? तुमच्याकडे याची दुसरी किल्ली आहे का? अर्थात आहेच. ती पेटी उघडा.”

हिल्डाने तिच्या छातीच्या इथून एक लहानशी किल्ली काढली. झटक्यात, पेटी उघडली. त्यात कागद भरले होते. त्यामधून खोलवर हात घालून, इतर कागदपत्रांमध्ये होम्सने निळे पाकीट ठेवले. पेटी मिटवून परत कुलुपबंद करुन, झोपायच्या खोलीत ठेवली गेली.

होम्स म्हणाला, “आता तो कधीही येउ दे. अजून आपल्याकडे दहा मिनिटे आहेत. हिल्डा बाईसाहेब, मी तुम्हाला वाचवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करतो आहे. त्याबदल्यात तुम्ही मला मोकळेपणे, ही काय वेगळीच भानगड आहे, ते मला सांगायला हवे.”

ती बाई ओरडली, “मिस्टर होम्स, मी तुम्हाला सर्व काही सांगते. मी त्याला दुःख देण्यापूर्वी, माझा उजवा हात कापून घेईन. पूर्ण लंडनमध्ये, नवऱ्यावर माझ्याइतके प्रेम करणारी बाई नसेल. आणि तरीही मी अशी वागले, हे त्याला कळले तर -- असे वागायला मला भाग पडले -- तर तो मला, कधीही क्षमा करणार नाही. त्याचा स्वतःचा मान इतक्या उंचावर आहे, की दुसरा इतक्या नीच थराला गेला आहे, हे तो सहन करू शकणार नाही. मिस्टर होम्स, मला मदत करा. माझा आनंद, त्याचा आनंद, आमची आयुष्ये, सगळे जणू एखाद्या कड्याच्या टोकावर उभे आहे.”

“बाईसाहेब, लवकर. थोडा वेळ उरला आहे.”

“ते माझे पत्र होते. मिस्टर होम्स, आमच्या लग्नापूर्वी मी लिहिलेले, -- गुप्त गोष्टी उघड करणारे मूर्ख पत्र! पुढचा मागचा विचार न करता, प्रेमात पडलेल्या मुलीने लिहिलेले पत्र. त्यात मला काही धोका वाटला नाही. आणि तरीही ते त्याला गुन्हा केल्यासारखे, वाटले असते. त्याने ते पत्र वाचले असते, तर त्याचा आत्मविश्वास, नाहीसा झाला असता. अनेक वर्षांपूर्वी, मी ते लिहिले होते. मला वाटले, ते सर्व आता विसरले गेले असेल. शेवटी मला लुकासकडून कळले की ते त्याच्या हाताला लागले आहे. तो म्हणाला, तो सांगेल ते माझ्या नवऱ्याच्या कामाचे पत्र, मी त्याला दिले तरच तो माझे पत्र, मला देईल. त्याच्या कार्यालयातील हेराने, त्याला त्या कागदपत्राबद्दल सांगितले होते. त्याने मला असे सांगून आश्वस्त केले होते, की माझ्या नवऱ्याला काही त्रास होणार नाही. मिस्टर होम्स, तुम्ही माझ्या जागी स्वतःची कल्पना करून बघा. मी दुसरे, काय करू शकत होते?”

“तुम्ही तुमच्या नवऱ्याला, विश्वासात घ्यायला हवे होते.”

“ते शक्य नव्हते. मिस्टर होम्स, ते शक्य नव्हते. एका बाजूने माझा नाश, अटळ होता तर दुसरीकडून माझ्या नवऱ्याचे कागद पळवणे, हेदेखील भयानक होते. तरी मला राजकारणाच्या बाबतीत काय परिणाम होतील ते काही कळत नाही. पण प्रेम आणि विश्वास याबद्दल मला एकदम

चांगले कळते. मी ते केले मिस्टर होम्स, मी त्याच्या किल्लीवरून लुकासकडून दुसरी किल्ली बनवून घेतली. मी त्याची पत्रपेटी उघडली व ते पत्र लुकासकडे पोचते केले.”

“बाईसाहेब, तिथे कायकाय झाले?”

“मी ठरल्याप्रमाणे जाऊन दार वाजवले. लुकासने ते उघडले. मी त्याच्या मागोमाग खोलीत गेले. माझ्यामागे हॉलचे दार उघडेच ठेवले कारण त्या माणसाबरोबर एकटे रहाण्यास, मी घाबरत होते. मला आठवते आहे, की मी आत शिरताना, बाहेर एक बाई होती. आमचे काम लगेच झाले. मी त्याला माझ्याकडील पत्र दिले. ते त्याने त्याच्या टेबलावर ठेवले व माझे त्याच्याकडील पत्र त्याने मला दिले. त्याच क्षणी बाहेर दाराशी काही आवाज आला. मला पदरव ऐकू आला. लुकासने घाईघाईने जमिनीवरील गालिचा बाजूला करून, त्याखाली तो कागद लपवला व परत गालिचा होता तसा करून ठेवला.

त्यानंतर जे झाले ते एखाद्या दुःस्वप्नासारखे होते. मला काळा, भीतीदायक चेहरा दिसला व एका बाईचा आवाज  ऐकू आला. ती फ्रेंचमध्ये किंचाळली. ‘मी वाट बघितलेली शेवटी फुकट नाही गेली. मी शेवटी तुला तिच्याबरोबर पकडले.’ तिथे रानटी मारामारी झाली. मी त्याला हातात खुर्ची घेतलेले पाहिले. तिच्या हातात चाकू चकाकत होता. मी त्या भयानक दृष्यापासून पळ काढला. त्या घरातून पळाले. दुसऱ्या दिवशी सकाळी, वर्तमानपत्रात मी काय भयानक प्रकार घडला ते वाचले. मला माझे पत्र मिळाल्याने, त्या रात्री मी खूष होते. अजून पुढे काय बला ओढवणार आहे हे मला माहिती नव्हते.

दुसऱ्या दिवशी माझ्या लक्षात आले की, एका त्रासाच्या बदल्यात, मी दुसरा त्रास ओढवून घेतला होता. माझ्या नवऱ्याचा महत्वाचा कागद हरवल्याने, त्याचा जो रागाचा थयथयाट चालला होता, तो पाहून मला वाईट वाटले. त्याच्या पायाशी लोळण घेऊन, मी काय केले ते त्याला सांगावे, अशी माझी उर्मी, मी कशीबशी दाबली. ही पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती झाली असती. माझ्या बेकायदेशीर कृत्याची भीषणता समजण्यासाठी, त्या सकाळी मी तुमच्याकडे आले. त्या क्षणापासून माझे मन एकाच गोष्टीचा विचार करू लागले की माझ्या नवऱ्याचा कागद, मला परत कसा मिळवता येईल. लुकासने तो जिथे ठेवला, तिथेच तो असणार, कारण ती क्रूर बाई आत शिरण्याआधीच त्याने, तो त्या गुप्त जागी ठेवला होता. जर ती बाई आली नसती, तर ती गुप्त जागा मला कळली नसती. आता मला त्या खोलीत कसे जाता येईल, असा विचार मी करू लागले. दोन दिवस मी, त्या जागेचे निरीक्षण केले. पण मला कधीच दार उघडे सापडले नाही. कालच्या रात्री मी शेवटचा प्रयत्न केला. मी काय केले व कशी त्यात यशस्वी झाले, हे तुम्हाला माहिती आहे.

मी तो कागद, माझ्याबरोबर परत आणला. आणि तो नाहीसा करण्याचा विचार केला. कारण माझ्या गुन्ह्याची कबुली दिल्याशिवाय, मला तो माझ्या नवऱ्याला देता आला नसता. बापरे, मी जिन्यावर त्याच्या पाऊलांचा आवाज ऐकते आहे."

युरोपिअन सचिव जोराने हसत खोलीत आला. त्याने ओरडून विचारले, "काही बातमी, मिस्टर होम्स, काही बातमी?"

"मला आशा आहे."

त्याचा चेहरा उजळला. "ओहो, मी देवाचे आभार मानतो. पंतप्रधान माझ्याबरोबर जेवण घेणार आहेत. तुम्हाला आशा वाटते आहे, हे त्याना सांगू का? ते खूप धीराचे आहेत. तरी या भयंकर घटनेपासून, त्यांची झोप उडाली आहे. जेकब, तू पंतप्रधानाना, आत यायला सांगतोस का? आणि प्रिये, हे राजकारणाशी संबंधित असल्याने, तू आत जावेस. आम्ही पाच मिनिटात आतमध्ये जेवायला येतो."

पंतप्रधान जरा उदासच वाटले. परंतु मला त्यांच्या डोळयात चकाकी दिसत होती आणि त्यांच्या बारीक हातांच्या झटपट हालचाली, त्यांच्या तरुण सहकाऱ्याप्रमाणेच, अधीर व उत्साही होत्या.

"मिस्टर होम्स, मला असे समजले, की तुम्हाला काही सांगायचे आहे?"

माझा मित्र म्हणाला, 'पण अजून तरी, तो कागद कुठे असेल व तो आपल्याला सापडेल, याबद्दल मी फारसा आशादायक नाही. मी जागोजागी चौकशी केली आहे आणि माझी खात्री आहे, की गुन्हेगाराला अटक करण्यात, काही धोका नाही."

मिस्टर होम्स, पण तेवढे पुरेसे नाही. आपण कायम ज्वालामुखीच्या तोंडावर राहू शकत नाही. आपल्याकडे नेमक्या स्वरूपाचे काहीतरी हवे."

"मी ते मिळण्याची आशा करतो आहे. म्हणूनच मी इथे आहे. मी त्याबद्दल जितका जास्त विचार करतो, तितकी मला खात्री वाटत रहाते की पत्र, या घरातून कधी बाहेर गेलेच नाही."

"मिस्टर होम्स!"

"जर बाहेर गेले असते, तर एव्हाना ते कळले असते."

"पण घरात ठेवण्याकरता, ते कोण कशाला घेईल?"

"कोणी ते घेतले आहे याबद्दल माझी खात्री नाही."

"पण मग ते त्या पेटीतून, गेले कसे?

"ते पेटीतून गेले, यावर देखील माझा विश्वास नाही."

"मिस्टर होम्स, हे भलत्या वेळी विनोद करणे थांबवा. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगितले आहे, की ते पेटीत नाही."

"तुम्ही मंगळवार सकाळपासून, ती पेटी तपासली आहे का?"

"नाही. त्याची काही गरज नव्हती."

"तुम्ही कदाचित, घाईघाईने बघितले असेल."

"छे. छे. असे होणे शक्यच नाही."

"पण माझी, तशी खात्री नाही. अशा गोष्टी होतात. मला वाटते, त्यात इतर कागदही होते. असे असेल, की कदाचित ते पत्र, त्या कागदांबरोबर मिसळले गेले असेल."

"ते सर्वात वरती होते."

"कोणीतरी पेटी हलवल्यामुळे ते कागद, खालीवर झाले असतील."

"नाही. नाही. मी नीट बघितले होते."

माजी पंतप्रधान बोलले, "ते सहज, तपासून बघता येईल. आपण ती पेटी इथे आणू."

सचिवाने घंटी वाजवली.

"जेकब, माझी पत्रे असलेली पेटी आण. हे विचित्रपणे वेळ घालवणे, चालले आहे. पण तरीही तुमचा आग्रह असेल, तर आपण ते करू. जेकब, आभारी आहे. ती इथे ठेव. त्याची किल्ली नेहमी माझ्या घड्याळाच्या साखळीत असते. हे बघा, ही सर्व कागदपत्रे. उमराव मेरोकडून आलेले पत्र, चार्ल्स हार्डी कडून आलेला अहवाल, बेलग्रेडची टीप, रशिया-जर्मनी धान्य कराबद्दलच्या बाबी, मद्रीदकडून आलेले पत्र, उमराव फ्लावरकडून आलेले पत्र -- किती पत्रे! पण हे काय? उमराव बेलींजर! उमराव बेलींजर!"

माजी पंतप्रधानाने, त्याच्या हातातून निळे पाकीट ओढून घेतले.

“हो. हेच ते आहे .पत्र सुरक्षित आहे. होप, मी तुझे अभिनंदन करतो.”

“आभारी आहे. आभारी आहे. माझ्या डोक्यावरचे ओझे उतरले. पण हे शक्य नाही. मिस्टर होम्स, तुम्ही जादुगार आहात. नक्कीच जादुगार आहात. तुम्हाला कसे माहीत, की ते इथे आहे?”

“कारण मला माहित होते, की ते दुसरीकडे कुठेच असू शकत नाही.”

“माझा माझ्या डोळयांवर, विश्वास बसत नाही.” तो रानटीपणे, दाराशी धावत गेला. “माझी बायको कुठे आहे? सर्व काही ठाकठीक झाल्याचे, तिला सांगितले पाहिजे. हिल्डा! हिल्डा!” आम्हाला त्याचा आवाज जिन्यावर ऐकू आला.

माजी पंतप्रधानाने, होम्सकडे चमकत्या डोळयांनी पाहिले. तो म्हणाला, “इकडे या, सर. डोळयांनी दिसते आहे, त्यापेक्षा जास्त काहीतरी इथे घडले आहे. पत्र परत पेटीत, कसे आले?”

त्या आश्चर्यकारक डोळयांच्या खोलात जाऊन, शहानिशा करण्याच्या प्रयत्नापासून दूर जाऊन, होम्स हसतहसत वळला.

“आमच्या व्यवसायाची पण काही, धूर्त गुपिते असतात.” असे म्हणत, त्याची टोपी घेऊन, होम्स दाराकडे गेला.

# The Adventure vi The Man With The Twisted Lip

# वाकड्या ओठाचा माणूस



FOOT OF THE STAIRS SHE MET THIS LASCAR SCOUNDREL."

सेंट जॉर्जमधील थिऑलॉजिकल कॉलेजचे प्राचार्य कै इलीअस व्हिटने, यांचा भाऊ इसा व्हिटने, याला ओपिअम या अंमली पदार्थाचे व्यसन होते. माझ्या माहितीप्रमाणे, कॉलेजमध्ये असताना, एका वेगळया, अचानक उद्भवलेल्या घटनेमुळे, त्याला हे व्यसन लागले. डे क्विन्सेच्या स्वप्नांच्या व भावनांच्या वर्णनात लिहिल्याप्रमाणे, तो परिणाम साधण्यासाठी, त्याने तंबाखू, मॉर्फिनयुक्त द्रवात बुडवून घ्यायला, सुरवात केली. इतर अनेकांप्रमाणे, त्याला असे आढळून आले, ही सवय सोडण्यापेक्षा, लाऊन घेणे सोपे आहे. मग अनेक वर्षे, तो त्या गोष्टीचा व्यसनाधीन राहिला. नातेवाईक व मित्रांच्या, दयेचा व भीतीचा एक विषय होऊन बसला. मला आता तो नजरेसमोर, पिवळ्या सुरकुतलेल्या चेहऱ्याचा, धारदार नजरेचा पण पापण्या खाली पडलेला, खुर्चीत मुटकुळे करून बसलेला, असा उमदा माणूस, नाश होऊन मोडून गेलेला दिसतो.

जून १९८९ मधील एका रात्री, जेव्हा माणूस पहिली जांभई देऊन, घड्याळात वेळ बघतो, तेव्हा माझ्या घराची घंटी वाजली. मी माझ्या खुर्चीत उठून बसलो. माझ्या बायकोने तिचे विणकामाचे साहित्य मांडीवर ठेवले व तोंड वाकडे केले.

ती म्हणाली, “रुग्ण. तुम्हाला बाहेर जावे लागेल.”

मी “अरे, अरे!” असे दुःखद उद्गार काढले, कारण मी दिवसाभराच्या कामाने दमून आलो होतो.

आम्ही दार उघडून, काही घाईघाईत उच्चारलेले शब्द आणि मग गालिच्यावर, भरभर पडलेल्या  पाऊलांचा आवाज ऐकला. सताड उघडलेल्या दारातून, काळ्या बुरख्याने तोंड झाकलेली एक बाई आत आली.

तिने सुरवात केली, “मी इतक्या उशिरा आल्याबद्दल माफी मागते.” मग अचानक स्वसंयम सुटून, ती पुढे धावली व माझ्या बायकोच्या गळयात, हात टाकले. तिच्या खांद्यावर, डोके ठेऊन रडू लागली. “मी इतक्या संकटात आहे. मला थोडी मदत हवी आहे.”

तिचा बुरखा काढत माझी बायको म्हणाली, “काय झाले? ही काटे व्हिटने आहे. काटे, तू मला एकदम धक्का दिला आहेस. तू आत आलीस, तेव्हा तू कोण आहेस, ते मला कळले नव्हते.”

“मला काय करावे, ते कळेना, म्हणून मी तडक इथे आले.” असे नेहमीच चाले. पक्षी दीपगृहाकडे जावेत, तसे दुःखी लोक माझ्या बायकोकडे, येत असत.

“बरे झाले आलीस. आता थोडी वाईन व पाणी घे. आणि इथे आरामात बस. मग काय झाले, ते सांग. की मी जेम्सला, आत झोपायला पाठवू?”

“नाही. नको. मला डॉक्टरांचा सल्ला व मदत हवी आहे. ते इसाबद्दल आहे. दोन दिवसात तो, घरी आालेला नाही. मला, फार भीती वाटते आहे.”

हे तिच्या नवऱ्याबद्दलचे गाऱ्हाणे, ती काही पहिल्यांदाच, सांगत नव्हती. मी एक डॉक्टर म्हणून व माझी बायको मैत्रीण व शाळासोबती म्हणून, आम्ही काही ना काही शब्दांनी, तिचे

सांत्वन केले. तिचा नवरा कुठे आहे, ते तिला माहिती होते का? ती त्याला परत आणू शकत होती का?”

असे दिसत होते की, हो. त्याला उशीर का झाला, याबद्दलची माहिती तिच्याकडे होती. जेव्हा तो एक चांगला मनुष्य होता, तेव्हा लांब पूर्वेकडील शहरात त्याने, ओपिअममध्ये स्वतःला बुडवून घेतले होते. हिथेरोला नेहमी एक ठराविक दिवस, दारू व कामक्रीडेची मेजवानी असे. आणि तेथून तो संध्याकाळी झोकांड्या खात, घरी येत असे. पण आता अठ्ठेचाळीस तास झाले, तरी त्याची धुंदी उतरत नव्हती. तो तिथे दारुच्या नशेत बुडून, विषारी श्वासाने गुंगीत, पडलेला होता. तो तिथे सापडला असता व ते तिला माहिती होते. स्वांडम गल्लीच्या वरील बाजूस, गोल्ड बारमध्ये, तो नक्की सापडेल, याची तिला खात्री होती. पण ती काय करणार? ती तरुण, डरपोक बाई अशा ठिकाणी जाऊन, तिच्या नवऱ्याच्या भोवती असलेल्या बेकार लोकांमधून, त्याला कशी घेऊन येणार?

अर्थात या समस्येवर एक उपाय होता. मी तिला त्या जागी, सोबत करू शकत होतो की!

आणि मग मला असे वाटले, तिने, तरी कशाला यायला पाहिजे? मी इसाचा, वैद्यकीय सल्लागार होतो. आणि त्यामुळे माझा, त्याच्यावर अधिकार होता. मी एकटा असतो, तर त्याला जास्त चांगले वठणीवर आणू शकलो असतो. मी तिला शब्द दिला, की जर तो खरेच, त्या जागी असेल तर त्याला मी दोन तासात, गाडीतून घरी पाठवतो. तिने तो पत्ता मला दिला. मी दहा मिनिटात, आरामखुर्चीतून उठून, माझी आनंदी खोली सोडून, टांग्यातून जोरात पूर्व दिशेने, माझ्या विचित्र कामगिरीवर चालू पडलो. ते काम किती विचित्र होते, ते फक्त भविष्यकाळच, दाखवू शकत होता.

पण माझ्या साहसाच्या सुरवातीला तरी, काही अडचण आली नाही. स्वांडम गल्लीच्या वरील बाजूस, लंडन पुलाच्या पूर्वेस, नदीच्या उत्तर बाजूला, उंच जेट्टीच्या मागे, ती घाणेरडी जागा होती. तिथे सतत दारू वाहणाऱ्या दुकानाच्या पुढे, थोड्या पायऱ्या असलेला चढ होता. तिथून पुढे एका गुहेचे तोंड असल्यासारखी, काळी फट होती. तिथे थोड्या खोल जागी मला जायचे होते. माझ्या टांगा थांबवून मी पायऱ्या उतरलो. दारुड्याच्या पायाचे बेसुमार ठसे उमटलेल्या ओबडधोबड खोलगट जागी, दारावरील मिणमिणत्या तेलाच्या दिव्याच्या प्रकाशात, मला आत जायची वाट सापडली. थोडे चालल्यावर, एक चॉकलेटी ओपिअमच्या दाट धुराने भरुन जड झालेली, खोली लागली. उघड्या जागेत परदेशी चाललेल्या प्रवाशासाठी असलेया जहाजांवर असावी, तशी बाकडी टाकलेली होती. काहीशा अंधारात, विचित्र वेड्यावाकड्या पद्धतीने

पडलेली, माणसांची शरीरे दिसत होती. झुकलेले खांदे, वाकलेले गुडघे, डोके मागे टाकलेली आणि हनुवटी वर केलेली अशी ती शरीरे होती. भोवतालच्या अंधारात, मलूल डोळे नवागताकडे वळले. काळ्या सावल्यांमध्ये लहानशी लाल प्रकाशाची वर्तुळे, धातूच्या पाइपच्या खोलगट भागात पडून, मध्येच चमकत व मध्येच पुसट होत, कमी जास्त उजेड पाडत होती. बहुतेकजण शांत होते. तर काहीजण, स्वतःशीच पुटपुटत होते. बाकीची मंडळी, विचित्र, एकसुरी व खर्जातील आवाजात, आपापसात गडबड करत बोलत होती आणि मग स्तब्ध होत होती. प्रत्येकजण, स्वतःच्या विचारात गुंग होता व दुसऱ्याकडे अगदी कमी लक्ष देत होता. दुसऱ्या टोकाला धगधगत्या कोळशांची शेगडी होती. त्याशेजारील तीन पायाच्या स्टुलावर एक उंच, बारीक म्हातारा मनुष्य बसला होता. तो त्याच्या दोन बंद मुठींवर जबडा टेकवून व गुडघ्यांवर कोपरे टेकवून, आगीकडे बघत बसला होता.

मी आत शिरल्याबरोबर, मला रिकाम्या बाकावर कोंबत, अशक्त, पिवळसर चेहऱ्याचा मलेशियन इसम घाईघाईने माझ्यासाठी, पाईप व अंमली पदार्थ घेऊन आला.

मी बोललो, “आभारी आहे. पण मी इथे, त्यासाठी आलेलो नाही. माझा एक इसा व्हिटने नावाचा मित्र, इथे आहे. मला त्याच्याशी बोलायचे आहे. माझ्या उजवीकडून, थोडी हालचाल झाली व अंधारातून मला अशक्त, आजारी व अवतारात असलेला, व्हिटने डोकावताना दिसला.

तो उद्गारला, “अरे बापरे, हा वॉटसन आहे. मी काय म्हणतो वॉटसन, किती वाजले?” तो काहीही करण्यास असमर्थ, अशा दयनीय स्थितीत, होता.

“अकरा वाजत आले.”

“आज दिवस कुठला आहे?”

“शुक्रवार, १९ जून.”

“देवा रे, मला वाटले, आज बुधवार आहे. आज बुधवारच आहे. तू मला उगीच का घाबरवतो आहेस?” त्याने त्याचा चेहरा, हातात लपवला व तो उच्च रवात, हुंदके देत रडू लागला.

“अरे बाबा, आज शुक्रवार आहे, असे मी तुला सांगितले ना? तुझी बायको, दोन दिवस तुझी वाट बघते आहे. तुला लाज वाटायला पाहिजे.”

“मी असाच आहे. पण वॉटसन, तू सगळयाची, गल्लत करतो आहेस. मी इथे फक्त, काही तास आहे. तीन पाईप्स, चार पाईप्स -- किती, ते मी विसरलो. पण मी तुझ्याबरोबर घरी येतो. मी काटेला घाबरवणार नाही. -- गरीब बिचारी काटे. तुझा हात दे. तुझी गाडी आहे का?”

“हो. बाहेर थांबली आहे.”

"मग मी त्यात जातो. मला तुझे ऋण मानले पाहिजे. वॉटसन, काय ऋण बरं? मी कामातून गेलो आहे. मी माझ्यासाठी, काही करू शकत नाही.”

झोपलेल्यांच्या दुहेरी अरुंद ओळीतून, माझा श्वास रोधून, मी चालत गेलो. ओपिअमच्या अशक्य वाईट दरवळातून मला श्वास रोधल्याशिवाय चालणे शक्य नव्हते. तेथील व्यवस्थापकाला मी शोधत होतो. शेगडीजवळ बसलेल्या एका उंच माणसाच्या जवळून जाताना, मला माझा शर्ट कुणीतरी अचानक हळूच ओढल्यासारखे वाटले. एक खर्जातील आवाज कुजबुजला, “माझ्या अंगावरून पुढे जा व मग मागे वळून बघ.” हे शब्द मी स्पष्टपणे ऐकले. मी खाली नजर टाकली. ते नक्कीच माझ्या शेजारील म्हाताऱ्याने, उच्चारले होते. आणि तरीही तो, जणू आपण त्या गावचे नाही, असा बसला होता. तो खूप बारीक, सुरकुतलेला व वयाने वाकलेला, दिसत होता. त्याच्या गुडघ्यांमधून ओपिअमचा पाईप लोंबकळत होता. जणू काही शक्तीहिनतेमुळे, तो त्याचा बोटांतून, गळून पडला होता. मी दोन पाऊले पुढे झालो व मागे वळून बघितले. मी आश्चर्यचकित झाल्याने, जोरात ओरडणारच होतो, पण स्वतःला आवरले. कोणी बघू नये, म्हणून त्याने पाठ फिरवली. त्याच्या सुरकुत्या गेल्या. त्याचा आकार बदलला, मलूल डोळयात अंगार पेटला. आणि शेगडीशेजारी बसून, मला आश्चर्य वाटलेले बघून हसणारा, दुसरा तिसरा कोणी नसून शेरलॉक होम्स होता. त्याने हळूच खूण करून, मला जवळ बोलावले. आणि लगेच गरकन वळून, त्याचे तोंड पुन्हा अर्धवट रीतीने सर्वांसमोर केले. पुन्हा थरथरणाऱ्या, ओठ लोंबणाऱ्या, गलितगात्र म्हाताऱ्याचे सोंग आणले.

मी कुजबुजलो, “होम्स, तू या गुहेत, काय करतो आहेस?”

तो उत्तरला, “तुला जेवढे शक्य आहे तेवढ्या हळू आवाजात बोल. माझे कान तीक्ष्ण आहेत. जर तू तुझ्या त्या स्कॉटीश मित्राला बाहेर काढलेस, तर मी मोठ्या आनंदाने, तुझ्याशी थोडे बोलतो.”

“माझ्यासाठी, बाहेर टांगा थांबला आहे.”

मग त्याला, घरी पाठवून दे. त्याच्यावर, तेवढा विश्वास टाक. कारण तो आधीच, इतका लंगडत चालतो आहे, की तो काही जादापणा करून, कुठे निघून जाईल, असे वाटत नाही. तू टांगेवाल्याबरोबर तुझ्या बायकोसाठी चिठ्ठी पाठवून सांग, की तू माझ्याबरोबर आहेस. जर तू बाहेर थांबलास तर, मी पाच मिनिटात तिथे येतो."

शेरलॉक होम्सची विनंती, अमान्य करणे अवघड होते. कारण त्या इतक्या नेमक्या स्वरूपाच्या असत आणि इतक्या शांत हुकमतीने, केलेल्या असत. व्हिटनेला एकदा टांग्यात बसवून दिले, की खरे पहाता, माझे काम संपलेले होते. आणि मग माझ्या मित्राबरोबर काम करण्यासारखे, चांगले काही नव्हते. नेहमीप्रमाणे तो कुठल्यातरी धाडसाच्या कामात गुंतलेला असणार, कारण त्याच्यासाठी, ते नेहमीचेच होते. मी काही मिनिटात एक चिठ्ठी लिहून, टांगेवाल्याला दिली. त्याला पैसे देऊन टाकले, व्हिटनेला टांग्यात बसवून दिले आणि मग टांगा अंधारात दूर जाताना पाहिला. लगेचच एक म्हातारा, मी ओपिअमच्या गुहेतून, बाहेर येताना पाहिला. मी शेरलॉक होम्सच्या बरोबर, रस्त्यातून चालू लागलो. दोन रस्ते तो पाय घसपटत व पाठीत वाकत लटपटत्या पाऊलांनी चालला. मग आजूबाजूला झटपट नजर टाकून, त्याने स्वतःला ताठ केले आणि जोरजोरात हसत सुटला.

तो म्हणाला, वॉटसन, मला अंदाज आहे, की मी ओपिअम ओढायला व कोकेनचे इंजेक्शन घ्यायला सुरवात केली आहे, असे तुला वाटले असणार. एक वैद्यकीय तज्ञ म्हणून, तू बंदी केलेली इतर छोटीमोठी व्यसने, पण मला लागली आहेत की काय, अशी शंका तुला आली असणार."

"तुला तिथे बघून, मी नक्कीच आश्चर्यचकित झालो."

'पण तुला तिथे पाहून मी झालो, तेवढा नक्कीच, झाला नसशील.'

"मी एका मित्राला, शोधायला आलो होतो."

"आणि मी, एका शत्रूला शोधायला."

"शत्रूला?"

'हो. माझा एक नैसर्गिक शत्रू. किंवा माझे नैसर्गिक भक्ष्य, असे मी म्हणू शकतो. वॉटसन, थोडक्यात, मी एक महत्वाची अशी, चौकशी करतो आहे. मला या गोंधळाच्या गुत्त्यात, काही सुगावा सापडण्याची, आशा होती. मी इथे पूर्वी पण आलेलो आहे आणि जर कोणी मला इथे ओळखले, तर माझे आयुष्य तासाभराचेच उरेल. कारण मी माझ्या कामासाठी या जागेचा उपयोग करून घेतलेला आहे. हा गुत्ता चालवणाऱ्या लास्करने, माझ्यावर गुन्हा शाबित करायची, शपथ

घेतली आहे. या इमारतीच्या मागील बाजूस, पाउलच्या जेट्टीजवळ, एक सापळा रचून पकडायचे दार आहे. अमावस्येच्या रात्री, तिथे कायकाय घडून गेले, त्याच्या विचित्र गोष्टी, लास्कर सांगू शकतो."

"काय! म्हणजे तुला प्रेते असे म्हणायचे आहे का?"

"अरे वॉटसन, हो. प्रेते! गुहेत मारल्या गेलेल्या प्रत्येक गरीब हलकटामागे आपल्याला १००० डॉलर्स मिळून, आपण श्रीमंत झालो असतो. हा नदीकाठचा फार क्रूर खुनाचा, सापळा आहे. मला वाटते, नेव्हिल सेंट क्लेअर इथून कधीही बाहेर न पडण्यासाठी, आत शिरला आहे. तेव्हा आपण इथे, दबा धरून बसले पाहिजे." त्याने त्याची दोन बोटे तोंडात घालून जोरात शिट्टी वाजवली. -- ही खुणेची शिट्टी असल्याने, काही अंतरावरून तशीच शिट्टी वाजली. मग चाकांचा व घोड्याच्या टापांचा, आवाज येऊ लागला.

अंधारातून कुत्र्यांची गाडी, दोन पिवळया कंदिलांचा उजेड पाडत, जोरात आली, तेव्हा होम्स म्हणाला, "वॉटसन, आता तू माझ्याबरोबर ये, येशील ना?"

"जर, माझा काही उपयोग असेल, तर."

'ओहो, विश्वासू मित्र, नेहमीच उपयोगी असतो. आणि तो लिहिणारा असेल तर, अगदी नक्कीच. माझी सेडारमधील खोली, दोन खाटा असलेली आहे."

"सेडार?"

"हो. म्हणजे मिस्टर सेंट क्लेअरचे घर. मी इथे चौकशीसाठी आलेलो असताना, तिथे रहातो.'

"ते कुठे आहे?"

"केंटजवळ लीमध्ये. आपल्याला, सात मैल किनाऱ्याच्या रस्त्याने, जावे लागेल."

"पण मला, याबद्दल काहीच माहिती नाही."

"अर्थात तसे आहे खरे! पण आता तुला याबद्दल सर्व माहिती होईल. इकडे उडी मार. ठीक आहे. जॉन, आता तू गेलास तरी चालेल. इथे या जागी, उद्या अकरा वाजता, माझी वाट बघ. त्या घोड्याला वाव दे. अच्छा तर मग."

अचानक त्याने घोड्याला चाबकाने फटकारले. आणि आम्ही अंधारमयी, सुनसान, लांबलचक रस्त्यांमागून रस्ते ओलांडत चाललो. पुढे ते थोडे रुंद झाले. आम्ही पुलावरून सुसाट चाललो होतो. खाली मर्की नदी संथपणे वहात होती. पलीकडे विटा व डबर पडले होते. तेथील शांतपणा, फक्त पोलिसांच्या गस्त घालण्याने, किंवा उशिरापर्यंत चाललेल्या मेजवान्यांतील, गाण्यांच्या मोठ्या आवाजाने, भंग पावत होता. आकाशात उंच असणारे ढग, हळूहळू सरकत होते. इकडे तिकडे दोनचार तारे, ढगांमधून मंदपणे चमकत होते. होम्स शांतपणे घोडा हाकत होता. त्याचे डोके त्याच्या छातीत बुडाले होते. तो विचारात गुंग झाला होता. मी त्याच्या शेजारी बसून, चौकसपणे विचार करत होतो, की त्याचे एवढे डोके खाणारे प्रकरण, काय आहे?" पण त्याची तंद्री, भंग करावीशी वाटत नव्हती. आम्ही, खूप मैल आलो होतो. आम्हाला उपनगरीय घरांची वसाहत सुरु झालेली, दिसत होती. त्याने त्याचे खांदे घुसळले, डोके हलवले व त्याचा पाईप पेटवला. त्याने उत्तम नाटक वठवल्याचे समाधान, त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते.

तो म्हणाला, “वॉटसन, तुला शांतपणाची देणगी लाभली आहे. त्यामुळे एक सहकारी म्हणून तू फार मूल्यवान ठरतोस. खरेच सांगतो, तुझ्यासारखा कोणीतरी बोलायला असणे, हे फार छान आहे. कारण माझे स्वतःचे विचार, तितके आनंदी नसतात. काय म्हणावे, ते मला कळत नाही. या दारात मला भेटणाऱ्या, छोट्याशा बाईला काय म्हणावे?

“मला यातले काहीच माहिती नाही, हे तू विसरलास.”

“आपण लीला जाण्यापूर्वी, या केसबद्दल मी लवकरच, तुला सांगतो. तसे पाहिले, तर ही केस अगदी साधी दिसते आहे. पण तरीही मला काही उकल, करता येत नाही आहे. मला सापडलेले पुष्कळ धागेदोरे आहेत, पण त्याचा शेवट काही, हातात येत नाही. आता मी ही सर्व केस, तुला स्पष्टपणे व समजेल अशा तऱ्हेने सांगतो. आणि वॉटसन, माझ्यापुढे पसरलेल्या अंधारात, तुला कदाचित उजेडाची तिरीप दिसू शकेल.”

“सांग तर मग.”

“काही वर्षांपूर्वी, म्हणजे मे १८८४ मध्ये -- लीमध्ये एक नेव्हिल सेंट क्लेअर नावाचा, त्याच्याकडे भरपूर पैसे आहेत असे वाटणारा, सभ्य गृहस्थ आला. त्याने एक मोठा बंगला घेतला. कडेच्या जागेत छान बाग केली व सुखवस्तू पद्धतीने, राहू लागला. शेजारी पाजारी त्याला मित्र मिळाले. १८८७ मध्ये, त्याने स्थानिक बिअर बनवणाऱ्या माणसाच्या मुलीशी, लग्न केले. आता त्याला दोन मुले आहेत. त्याचा काही व्यवसाय नव्हता. पण तो रोज सकाळी गावातील बऱ्याच कंपन्यांमध्ये जाई. त्याला त्यात रुची होती. संध्याकाळी ५.१४ पर्यंत, कॅनॉन रस्त्याने घरी येई.

आता तो सदतीस वर्षांचा आहे. तो नेमस्त सवयींचा, चांगला नवरा, खूप प्रेमळ वडील व त्याच्या ओळखीच्या लोकांमध्ये लोकप्रिय आहे. अजून मी असे सांगेन, की या क्षणी, आम्ही खात्री केल्याप्रमाणे, त्याच्यावर ८८ पौंड १० शिलिंगचे, कर्ज आहे व २२० पौंड, एवढे मुद्दल असलेल्या ठेवी त्याच्या बँकेत आहेत. त्यामुळे त्याला पैशांची चिंता आहे, असे म्हणायचे, काही कारण नाही.

मागील सोमवारी, नेव्हिल सेंट क्लेअर, नेहमीपेक्षा थोडे लवकर गावात गेला. त्याला दोन कामे होती. त्यांच्या लहान मुलासाठी त्याला, खेळातील विटांचे खोके, आणायचे होते. परंतु सहज असे घडले, की त्याच दिवशी तो गेल्यावर थोड्या वेळाने, त्यांची बायको वाट बघत असलेले, एक बऱ्याच किमतीचे पार्सल, ॲबरडीन शिपिंग कंपनीच्या कार्यालयात आल्याचे, कळले. आता तुम्ही लंडनमध्ये असाल तर तुम्हाला माहिती असते की कंपनीचे कार्यालय, फ्रेस्नो रस्त्यावर आहे. स्वांडम गल्लीच्या वरील बाजूस ते येते, जिथे तू मला रात्री पाहिलेस. मिसेस सेंट क्लेअरने जेवण केले व गावात निघाली. काही वस्तू विकत घेतल्या व पुढे कंपनीच्या कार्यालयाकडे निघाली. तिचे पार्सल घेतले आणि परत स्टेशनला जाण्यासाठी, बरोबर ४.३५ ला स्वांडम गल्लीतून चालली होती. इथपर्यंत तुझ्या लक्षात आले का?”

“हो. स्पष्टपणे.”

“तुला आठवत असेल तर, सोमवार फारच गरम दिवस होता. मिसेसे सेंट क्लेअर सावकाश चालली होती. एखादी गाडी मिळेल, अशा आशेने इकडेतिकडे बघत होती. कारण तो भाग, तिला रुचत नव्हता. ती चालत असताना तिला अचानक, रडणे ऐकू आले. आणि तिच्या नवऱ्याला तिच्याकडे बघताना पाहून चमकली. दुसऱ्या मजल्यावरील खिडकीतून, तो तिला खुणा करून बोलावत होता. खिडकी उघडी होती व तिने ठळकपणे, त्याचा चेहरा पाहिला होता. तो खूप घाबरलेला व रागावलेला, तिला वाटला. तो घाबरून, तिला हात हलवत होता. नंतर तो खिडकीतून, अचानक नाहीसा झाला. मागून कुणीतरी त्याला, विरोध करता येणार नाही इतक्या जोराने ओढून नेल्याचे, तिला वाटले. त्याने घरातून निघताना, गडद कोट घातला होता. पण आता तर त्याच्या अंगावर, कॉलर व टाय दोन्ही नव्हते. हे तिच्या चाणाक्ष स्त्री नजरेला, लगेच जाणवले. तिची खात्री झाली, की त्याच्या बाबतीत, काहीतरी नको ते घडले आहे. म्हणून ती, त्या ओपिअन गुहेत धावली, कारण तीच ती, इमारत होती. तिथेच आपण आज एकमेकाना पाहिले होते. पुढील खोलीतून धावत जाऊन, तिने जिना चढायचा प्रयत्न केला, म्हणजे ती पहिल्या मजल्यावर पोचली असती. परंतु जिन्याचा पायरीवर, मी तुला ज्याच्याबद्दल बोललो, तो हलकट लास्कर भेटला. त्याने तिथे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या एका डॅनिश माणसाच्या मदतीने, तिला मागे ढकलले व ढकलत, रस्त्यावर आणले. वेड्यासारखा संशय व भीती वाटून, ती गल्लीत धावली. नशिबाने

तिला फ्रेस्नो रस्त्यावर, एका इन्स्पेक्टर बरोबर बरेच पोलीस, त्यांची काठी घेऊन, कामगिरीवर निघालेले दिसले. इन्स्पेक्टर व दोन माणसे तिच्याबरोबर, तिच्या मागे आले. आणि मालकाचा, विरोध पत्करून, मिस्टर सेंट क्लेअर ज्या खोलीत दिसला होता, तिथपर्यंत आले. पण तिथे, तो नव्हता. तसेही त्या मजल्यावर, एक दुःखी, भेसूर पांगळा सोडून, कुणीही नव्हते. त्याने तेथे त्याचे, घर केले होते. तो व लास्कर जोराने शपथ घेऊन सांगत राहिले, की दुपारी त्या खोलीत, कुणीही नव्हते. त्यांचे सांगणे इतके ठासून होते, की इन्स्पेक्टरचे अवसान डळमळीत झाले. मिसेस सेंट क्लेअर काहीतरी चुकीचे सांगते आहे, अशी त्याची खात्री पटू लागली. तिने रडत उडी मारून, टेबलावरील छोट्या पेटीचे झाकण फाडले. त्यातून, मुलांचा खेळातला, विटानी बनवलेला धबधबा, खाली पडला. हाच धबधबा घरी घेऊन येण्याचे वचन, त्याने त्याच्या मुलाला दिले होते.

हा शोध व त्यावेळी पांगळ्याने घातलेला गोंधळ, यामुळे हे काही गंभीर प्रकरण असल्याचे, इन्स्पेक्टरच्या लक्षात आले. खोल्या काळजीपूर्वक तपासल्या गेल्या. त्यावरून असे सिध्द झाले, की इथे काहीतरी उबग आणणारा, नैतिक गुन्हा घडलेला आहे. पुढची खोली उठण्याबसण्याची खोली म्हणून, थोडेफार फर्निचर असलेली होती. तिथून लहानशा झोपायच्या खोलीत, जाता येत होते. या खोलीच्यापुढे जेट्टी होत्या. जेट्टी व झोपायच्या खोलीची खिडकी, यात अरुंद पट्टी होती. ती ओहोटीच्या वेळी कोरडी असे व पण भरतीच्यावेळी, निदान साडेचार फुट पाण्याने भरलेली असे. त्या खोलीची खिडकी रुंद होती व खालून उघडी होती. तपासणीनंतर खिडकीच्या कडांवर रक्ताचे अंश आढळले. आणि लाकडी जमिनीवर रक्ताचे बरेच थेंब उडालेले दिसत होते. पडद्यामागे, खोलीसमोर, मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअरचे, कोट सोडून बाकी कपडे सापडले. त्याचे बूट, मोजे, टोपी, घड्याळ -- सर्व काही तिथे होते. या कपड्यांवर, झटापटीच्या काही खुणा नव्हत्या. मिस्टर क्लेअरचा अजून काही मागमूस, सापडला नाही. दुसरा कुठला मार्ग न सापडल्याने, तो बहुधा त्या पाण्याच्या मार्गाने गेला असावा. तेथील रक्त, तिथे नको ते काहीतरी घडल्याचे, सुचवत होते. या दुःखद घटनेच्या वेळी, पूर्ण भरतीची वेळ होती, त्यामुळे फक्त पोहूनच, तो स्वतःचा जीव वाचवू शकत होता.

आणि आता याप्रकरणात, गोवले गेलेल्या खलनायकांबद्दल! लास्कर अत्यंत वाईट असे काही, घडवण्याबद्दल प्रसिध्द होता. पण मिसेस सेंट क्लेअरच्या सांगण्याप्रमाणे, तिचा नवरा खिडकीत दिसल्यापासून, काही सेकंदात, लास्कर जिन्याच्या तळाशी उभा होता. त्यामुळे गुन्ह्यात, त्याचा सहभाग असण्याची शक्यता, कमी वाटत होती. त्याचे दुर्लक्ष, हा त्याचा बचाव असल्याचे, तो म्हणत होता. हरवलेल्या माणसाच्या कपड्यांबद्दल, हग बून या मालकाने काय केले, त्याबद्दल त्याला काहीही माहिती नाही, असे म्हणून तो स्वसंरक्षण, करू बघत होता.

हे एवढे व्यवस्थापक लास्करबद्दल! ओपिअम गुहेच्या दुसऱ्या मजल्यावर रहाणारा, वाईट वर्तनाचा वाटणारा हा पांगळा, मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअरला बघणारा, शेवटचा माणूस होता. तो कुरूप चेहऱ्याचा ह्ग बून होता. आणि तो गावातील प्रत्येकाला माहिती होता. तो व्यवसायिक भिकारी होता. पण पोलिसांच्या नजरेपासून बचाव करण्यासाठी तो, मेणाच्या व्यवसायात असल्याचे, नाटक करत असे. काही अंतरावर, थ्रेडनीडल रस्त्यावर, डाव्या बाजूला, कदाचित तुम्ही भिंतीतले एक  भगदाड पाहिले असेल. तिथे तो, रोज दिवसा बसायचा. पायांची फुल्ली करून, मांडीवर छोट्या काडेपेट्या घेऊन, तो तिथे येणाऱ्याजाणाऱ्याला दयनीय वाटेल अशा तऱ्हेचे, सोंग वठवीत असे. तेलकट चामड्याची टोपी त्याच्यापुढे ठेवलेली असे, ज्यात लोक काही नाणी टाकत. मी याला अनेक वेळा पाहिले होते. या व्यवसायातून त्यांनी थोड्या काळात भरपूर पैसे साठवले, हे बघून मी  आश्चर्यचकित झालो होतो. त्याचे दिसणे इतके उल्लेखनीय असे, की त्याच्याकडे बघितल्याशिवाय कोणी पुढे जात नसे. पिवळसर झाक असलेले पांढरे केस, भयानक ओरखडे असलेला फिकट चेहरा, वाकडा असलेला वरचा ओठ आणि केसांविरुद्ध रंग असलेले, बघणाऱ्याचा ठाव घेणारे काळे डोळे असलेला असा तो, भिकाऱ्यांच्या गर्दीत उठून दिसत असे. लोकांच्या बोलण्यावर, तो हुशारीने उत्तरे देई. हाच तो मनुष्य, ज्याला आपण आत्ता ओपिंअम गुहेचा मालक म्हणून बघितले. आणि तो आपण शोधत असलेल्या माणसाला, शेवटचे बघणारा असल्याचे, पण आपण बोललो.

मी म्हणालो, ‘पण एक एकटा पांगळा माणूस, चांगल्या धट्ट्याकट्ट्या सभ्य माणसाला, काय करू शकणार?”

“तो कुबड्या घेऊन चालतो, म्हणून त्याला पांगळा म्हणायचे. पण इतर बाबतीत तो दणकट व चांगला माणूस आहे. वॉटसन, तुझा वैद्यकीय अनुभव तुला सांगत असेल, की एका बाबतीत, असलेले न्यून, दुसऱ्या कशात तरी असलेल्या जास्त शक्तीने, भरून काढले जाते.”

“तुझे सांगणे चालू ठेव.”

“खिडकीमधील रक्त पाहून मिसेस सेंट क्लेअरला चक्कर आली. आणि तिला एका गाडीत घालून पोलिसांमार्फत घरी नेण्यात आले. कारण त्यांच्या तपासात तिचा काही उपयोग नव्हता. या केसचा मुख्य, इन्स्पेक्टर बार्टन याने, त्या सर्व परिसराचे सूक्ष्म निरीक्षण केले. पण त्याला विशेष काही, सापडले नाही. बूनला ताबडतोब न पकडून, मोठी चूक झाली. मधल्या काही मिनिटांच्या काळात, तो त्याचा मित्र, लास्कर याच्याबरोबर काही वार्तालाप करू शकला असणार, पण लवकरच चुकीची दुरुस्ती केली गेली. त्याला पकडून त्याची तपासणी केली गेली.

पण त्याचा गुन्हा शाबित होईल असे काही सापडले नाही. त्याच्या शर्टाच्या उजव्या बाहीवर रक्ताचे डाग होते, हे खरे होते पण पण त्याने, त्याच्या करंगळीजवळील बोटाच्या नखाजवळ झालेलीं जखम दाखवून, स्पष्टीकरण दिले की तिथून रक्त आले असेल. त्याने अजून असा खुलासा केला, की खिडकीशी तो फार वेळापासून नव्हता व तिथे जे डाग दिसले ते, निःसंशय त्याच्या जखमेतून पडलेल्या रक्ताचेच असणार. मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअरला, त्याने कधीच बघितले नसल्याचे, तो अगदी जोर देऊन सांगत होता व त्याच्या खोलीत सापडलेले त्या माणसाचे कपडे, तिथे कसे आले त्याचे त्याला पोलीसांइतकेच नवल वाटत होते. मिसेस सेंट क्लेअरने, तिच्या नवऱ्याला खिडकीत उभे असलेले पाहिले असल्याबद्दल तो म्हणाला, की ती स्वप्न बघत असेल किंवा वेडी झाली असेल. मोठ्याने आरडाओरडा करणाऱ्या त्याला, पोलीस स्टेशनमधून बाहेर काढण्यात आले. इन्स्पेक्टर मात्र तिथेच राहून समुद्राच्या पण्याच्या इथून काही नवीन पुरावा सापडतो आहे का, त्याची वाट बघत होता.

आणि खरंच तसा पुरावा मिळाला. तेथील चिखलात, ते ज्याला घाबरत होते, तेच सापडले. तो मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअरचा, कोट होता. तो स्वतः नव्हे. भरतीनंतर पाणी ओसरल्यावर, तो कोट तिथे पडलेला दिसला. आणि कोटाच्या खिशात त्याना काय मिळाले असेल असे तुला वाटते? प्रत्येक खिसा पेनी व अर्ध्या पेनीच्या नाण्यांनी भरलेला होता. ४२१ पेनी व २७० अर्ध्या पेनी! .पाण्याबरोबर तो कोट वाहून गेला नाही, यात काही आश्चर्य नव्हते. पण मनुष्याच्या शरीराची गोष्ट वेगळी आहे. जेट्टी व घराच्यामध्ये भीतीदायक भोवरा होता. असे होणे शक्य होते, की जरी कोट वजनामुळे जिथल्या तिथे राहिला तरी, शरीर पाण्याने ओढून नेले असणे, शक्य होते.

"पण मला असे समजले, की इतर सगळे कपडे खोलीत सापडले. मग शरीर काय फक्त कोट घातलेले होते?

"नाही सर, कदाचित तथ्ये, वरवर तपासली गेली असतील. समजा या बूनने नेव्हिल सेंट क्लेअरला खिडकीतून बाहेर फेकले असेल तर, तर तिथे ते कृत्य बघायला कोणी माणूस नव्हता. मग त्याने काय केले असेल? लगेच त्याच्या लक्षात आले असेल की फेकलेल्या माणसाचे इथे पडलेले कपडे, पण फेकून द्यायला पाहिजेत. त्याने कोट घेऊन फेकून दिला असेल. त्याला वाटले असेल, की तो वाहून जाईल. तो रुतून बसेल, याची त्याने कल्पना केली नसणार. त्याच्याकडे वेळ थोडा होता. त्याला खालून, गलका ऐकू येत होता. त्या माणसाची बायको, वर यायचा प्रयत्न करत होती. त्याच्या लास्कर या मित्राने, पोलीस इथे यायला निघाले असल्याचे, सांगितले असेल. आता एक क्षणही वाया घालवून चालणार नव्हते. तो गुप्त महत्वाच्या वस्तू ताब्यात घेतो. त्याचे भीक

मागून मिळालेले पैसे, घेतो व हाताला लागलेल्या कोटाच्या खिशात कोंबतो. कारण त्याला वाटत असते की कोट बुडणारच आहे. तो कोट फेकून देतो. जिन्यातून पदरव ऐकू आल्याने त्याच्याकडून इतर कपडे फेकायचे राहून जातात. फक्त खिडकी बंद करायला, जेमतेम वेळ मिळाला असेल. तेवढ्यात पोलीस येतातच."

"असे घडलेले, असू शकेल."

आपण क्षणभर असे घडले, असे धरून चालू. पण अजून यापेक्षा चांगले देखील, घडलेले असू शकेल. तुला मी सांगितल्याप्रमाणे, बूनला बेड्या घालून, पोलीस चौकीत नेले. पण त्याच्या विरुद्ध काही ठोस पुरावा सापडला नाही. बरीच वर्षे तो एक भिकारी असल्याचे व त्याचे आयुष्य खूप शांत व निरागस असल्याचे, सर्वांना माहिती होते. आता ते प्रकरण इथपर्यंत आले आहे. आणि हा प्रश्न अजून सुटलाच नाही आहे, की नेव्हिल सेंट क्लेअर ओपिअमच्या गुहेत काय करत होता? तिथे असताना त्याला काय झाले? आता तो कुठे आहे? हग बूनचा त्याच्या नाहीसे होण्याशी, काय संबंध आहे? -- हे सर्व प्रश्न अनुत्तरीतच आहेत. मला माझ्या अनुभवातील, अशी एकही केस आठवत नाही की पहिल्यांदा अगदी साधी वाटते, पण ती खूप समस्या उभ्या करते."

जेव्हा शेरलॉक होम्स, हे घडलेले सर्व सांगत होता, तेव्हा शेवटची घरे मागे पडेपर्यंत, आम्ही त्या शहराच्या बाहेरील भागात फिरत होतो. आम्ही दोन्ही बाजूनी कुंपणामध्ये अडकलो. त्याचे सांगून संपले, तेव्हा आम्ही दोन पसरलेल्या गावांमधून, चाललो होतो. तिथे खिडक्यांमधून अजून उजेड दिसत होता. माझा मित्र बोलला, "आपण ली गावाच्या, सीमेबाहेर फिरत आहोत. आपण आपल्या या छोट्या चक्कर मारण्यात, तीन इंग्लिश गावाना छेदले आहे. आपण मिडलसेक्सपासून, सुरवात केली. सुरेचे एक टोक ओलांडले व आता केंटमध्ये, आहोत. झाडांमधील तो सूर्यप्रकाश पहा. ते सेडार आहे. त्या दिव्याशेजारी, तिखट कानांची एक बाई, उभी आहे. घोड्यांचे खूर वाजल्याचा आवाज, तिला नक्की ऐकू आला आहे."

"पण तू बेकर रस्त्याच्या कार्यालयात बसून, या केसचा शोध, का घेत नाहीस?" मी विचारले.

"कारण इथे बऱ्याच चौकशा करायच्या आहेत. मिसेस सेंट क्लेअरने दयाळूपणे दोन खोल्या, माझ्यासाठी राखून ठेवल्या आहेत. तिथे तू, विश्रांती घेऊ शकतोस. ती, माझ्या मित्राचे नक्की स्वागत करेल. वॉटसन, मला तिला भेटायला नको वाटते, कारण माझ्याकडे तिच्या नवऱ्याबद्दलची काहीच बातमी नाही. आपण इथे आलो. ओहो! ओहो!"

आम्ही एका मोठ्या बंगल्यासमोर आलो. एक मुलगा न पडता घोडयावर चढत व उतरत होता. होम्सच्या मागोमाग, दगडांच्या लहानशा वळणदार वाटेने वरखाली होत, आम्ही घरात गेलो. दार उघडे होते. एक हात दारावर, दुसरा अधीरपणे अर्धवट वर उचललेला, शरीर थोडे वाकलेले व चेहरा उंचावलेला, अशी ती छोटी, सोनेरी केसांची, बाई समोरच उभी राहिली. सॅटीनचे कपडे घातलेली, मानेवर व मनगटावर गुबगुबीत गुलाबी शिफॉन पांघरलेली अशी ती बाई, उत्सुक डोळे व उघडे तोंड घेऊन प्रश्नार्थक नजरेने, उभी होती.

ती ओरडली, “या. या.” मग आम्हाला दोघाना बघून, तिने उत्साही आरोळी दिली. पण माझ्या मित्राने मान व डोके हलवल्यावर व खांदे उडवल्यावर तिने एक खोल उसासा टाकला.

“काही चांगली बातमी नाही?”

“नाही.”

“वाईटही नाही?”

“नाही.”

“त्यासाठी मी देवाची आभारी आहे. या. आत या. दिवसभर काम करून, तुम्ही थकला असाल.”

“हा माझा मित्र, डॉ वॉटसन. त्याचा मला अनेक केसेसमध्ये, फारच उपयोग होतो. योगायोगाने तो मला भेटला व आता या केसच्या शोधमोहिमेत, तो मला मदत करणार आहे.”

माझ्याशी हस्तांदोलन करत ती म्हणाली, “तुम्हाला भेटून आनंद झाला. इतक्या अचानक आम्हाला बसलेल्या धक्क्यानंतर, तुमची काही गैरसोय झाल्यास मला माफ करा.”

“बाईसाहेब, मी फक्त काम करायला, आलो आहे त्यामुळे, असे बोलायची काही आवश्यकता नाही. मी जर तुमच्या किंवा माझ्या मित्राच्या उपयोगी पडलो, तर मला खरंच बरे वाटेल.” आम्ही छान उजेडाच्या जेवायच्या खोलीत प्रवेश केल्यावर, तिथे टेबलावर थंड जेवण मांडून ठेवलेले होते. ती म्हणाली, “शेरलॉक होम्स, आता मला तुम्हाला दोन साधे प्रश्न विचारायला आवडतील. त्याला तुम्ही साधे सरळ उत्तर द्याल, अशी माझी अपेक्षा आहे.”

“नक्कीच, बाईसाहेब.”

“माझ्या भावनांबद्दल, काही काळजी करू नका. मी चक्कर येऊन पडणार नाही. किंवा अतिरेकी आकाडतांडवदेखील, करणार नाही. मला फक्त तुमचे, खरेखुरे मत हवे आहे.”

“कुठल्या विषयावर?’

“अगदी तुमच्या मनात खोलवर, तुम्हाला काय वाटते, नेव्हिल जिवंत असेल की नाही?”

शेरलॉक होम्स या प्रश्नाने, थोडा बावरला. तो खुर्चीत, थोडा मागे झुकला. तिने त्याच्याकडे रोखून बघत परत विचारले, “मोकळेपणे सांगा.”

“तर मग बाईसाहेब, मला वाटत नाही.”

“तुम्हाला तो जिवंत नाही, असे वाटते?

“हो.”

“त्याचा खून, झाला असेल का?’

“असे मी म्हणणार नाही. पण कदाचित.”

आणि कुठल्या दिवशी, तो मेला असेल?”

“सोमवारी.”

“तर मग मिस्टर होम्स, आज मला त्याचे, पत्र कसे काय आले आहे, याचे स्पष्टीकरण तुम्ही देऊ शकाल का?”

शेरलॉक होम्सला इतका धक्का बसला, की तो त्याच्या खुर्चीवरून, उडी मारून उठला. त्याने ओरडून विचारले, “काय?’

ती हातात एक कागदाचा तुकडा फडफडवत, हसत उभी राहून म्हणाली, “हो. आज.”

“मी ते, बघू शकतो का?”

“नक्कीच.”

त्याने अधीरतेने तिच्या हातातून ते घेतले व टेबलावर ते सरळ करून ठेवत, ते नीट तपासले. मी माझ्या खुर्चीतून उठून, त्याच्या खांद्यावरून ते पहात होतो. पाकीट तसे अगदी साधे होते. आणि त्यावर ग्रॅव्हसेंडच्या पोस्टाचा त्याच विशिष्ट दिवसाचा, म्हणजे आदल्या दिवसाचा शिक्का होता व उल्लेखनीय, म्हणजे तो मध्यरात्रीनंतरचा होता.

“हे खडबडीत अक्षर! हे नक्की तुमच्या नवऱ्याचे नाही, बाईसाहेब.” होम्स पुटपुटला.

“नाही. पण पाकीटावर तरी, त्यानेच लिहिलेले आहे.”

“मला वाटते, पाकिटावर ज्या कोणी पत्ता लिहिला आहे, तोदेखील त्याला चौकशी करून, लिहावा लागला असेल.”

“असे तुम्ही कशावरून म्हणता?”

“असे बघा, नाव तर काळया शाईत आहे. ते थोडे सुकले आहे. इतर मजकूर करड्या रंगात आहे. त्यासाठी टीपकागद वापरल्याचे, दिसते आहे. जर ते एकदम लिहिले गेले असते व नंतर टीपकागद वापरला गेला असता, तर फक्त काही भागच गडद काळया रंगात दिसला नसता.

ह्या माणसाने नाव लिहिले व मग थांबून, पत्ता लिहिला आहे. त्यावरून असे कळते, की तो या पत्त्याशी, परीचित नाही. अर्थात हे काही, फार महत्वाचे नाही. पण कमी महत्वाच्या गोष्टीसुद्धा कधीकधी महत्वाच्या ठरतात. आता पत्र बघू. ओहो, त्यात एक पाकीट आहे.”

“हो, त्यात अंगठी आहे. त्याची खुणेची अंगठी.”

“आणि हे तुमच्या नवऱ्याने लिहिले असल्याची, तुम्हाला खात्री आहे?”

“त्याच्या दोनपैकी, एका हाताने.”

“एका?’

‘तो भरभर लिहितो, तेव्हाच्या हाताने. हे त्याच्या नेहमीच्या अक्षरापेक्षा, खूप वेगळे आहे. पण मला, ते चांगले माहिती आहे.”

“लाडके, घाबरू नकोस. सगळे काही ठीक होईल. एक फार मोठी चूक झालेली आहे. ती दुरुस्त व्हायला थोडा वेळ लागेल. धीर धर. -- नेव्हिल’. लहान कागदावर पेन्सिलने लिहिले आहे. पाण्याची खूण नाही. हं! घाणेरडा अंगठा असलेल्या माणसाकरवी, ग्रॅव्हसेंडच्या पोस्टातून आज ते पाठवले आहे. ओहो, आणि पत्राची कडा, गोंदाने चिकटवली आहे. हे पाठवणारा माणूस, तंबाखू चघळणारा आहे, असा माझा अंदाज आहे. तुम्हाला खात्री आहे ना बाईसाहेब, की हे तुमच्या नवऱ्याचे अक्षर आहे?”

“नक्की. नेव्हिलनेच हे पत्र लिहिले आहे.”

“आणि ते आज ग्रॅव्हसेंडच्या पोस्टातून, पाठवले आहे. ठीक आहे मिसेस सेंट क्लेअर, आभ्राच्छादित ढग बाजूला झाले आहेत. पण मी असे म्हणायचे धाडस, करणार नाही, की संकट टळले आहे.”

“पण मिस्टर होम्स, तो जिवंत असला पाहिजे.”

आपल्याला फसवण्यासाठी केलेला, हा गुन्हा नसेल तर! अंगठीमुळे तसे काहीच, सिध्द होत नाही. ती त्याच्याकडून, घेतलेली असेल.”

“नाही. नाही. ते त्याचे, स्वतःचे हस्ताक्षर आहे. -- स्वतःचे.”

ठीक आहे. तरीही ते, सोमवारी लिहिलेले व आज पोस्टात टाकलेले, असू शकेल.’

“तसे असू शकेल.”

“तसे असेल, तर मध्ये बरेच काही, घडून गेले आहे.”

“ओहो, मिस्टर होम्स, तुम्ही मला, नाउमेद करू नका. मला माहिती आहे, की त्याचे सर्व कुशल आहे. त्याच्यावर संकट आले असेल तर, मला खोटी सहानुभूती दाखवू नका. मी ज्या दिवशी त्याला शेवटचे पाहिले, त्यादिवशी झोपायच्या खोलीत, त्याला थोडेसे लागले, तेव्हा मी ताबडतोब, जेवायच्या खोलीतून धावत वर गेले, कारण मला वाटले, नक्की काहीतरी नको ते झाले. अशा एवढ्यातेवढ्या गोष्टीनी, मी नाराज होईन का आणि तरीही मरणासारख्या गोष्टीकडे, दुर्लक्ष करेन?”

“माझ्यासारख्या खूप काही पाहिलेल्या माणसाचे, याबद्दल काही दुमत नाही, की विश्लेषणात्मक तर्कबुद्धी वापरणाऱ्यापेक्षा, जवळच्या बाईचे मत, जास्त किमती असते. आणि या पत्रात तुमच्या दृष्टीकोनाला पाठींबा देणारा, अगदी सबळ पुरावा नक्की आहे. पण जर तुमचा नवरा जिवंत आहे व पत्र लिहू शकतो, तर तो तुमच्यापासून लांब का आहे?”

“मी कल्पना करू शकत नाही. ते विचार करण्यापलीकडील, आहे.”

“आणि सोमवारी निघण्यापूर्वी, तो तुम्हाला काही बोलला नाही?”

“नाही.”

“आणि तुम्ही त्याला, स्वांडम गल्लीत बघून, आश्चर्यचकित झालात?”

“अगदी खरे आहे.”

‘खिडकी उघडी होती?’

“हो.’

“मग त्याने, तुम्हाला बोलावले असते.”

“शक्य आहे.”

माझ्या माहितीप्रमाणे, त्याने तुम्हाला फक्त, खाणाखुणा केल्या.”

“हो.”

“तुम्हाला वाटले, मदतीसाठी ती हाक होती?”

“हो. त्याने त्याचा, हात हलवला.”

पण ती कदाचित, आश्चर्य वाटल्याची खूण पण असेल. तुम्ही अचानक तिथे दिसल्याने, त्याने हात केला असेल का?’

“शक्य आहे.”

“आणि तुम्हाला वाटले, की त्याला मागे खेचण्यात आले?”

‘तो एकदम, अचानक नाहीसा झाला.”

“त्याने स्वतः मागे उडी मारली असेल. तुम्हाला खोलीत, अजून कोणी दिसले नव्हते ना?”

“नाही. पण या भयानक माणसाने, तो तेव्हा तिथे असल्याचे कबूल केले आहे आणि जिन्याच्या तळाशी लास्कर होता.”

‘असेल. तुम्ही तुमच्या नवऱ्याला पाहिले, तेव्हा त्याच्या अंगावर, नेहमीचे कपडे होते?’

“पण कॉलर किंवा टाय नव्हता. आणि खात्रीने मी, त्याचा उघडा गळा पाहिला होता.”

‘तो कधी स्वांडम गल्लीबद्दल, बोलला होता का?”

“कधीच नाही.”

“त्याने कधी ओपिअम घेतल्याची, काही लक्षणे दाखवली होती का?”

‘कधीच नाही.”

“मिसेस सेंट क्लेअर, आभारी आहे. हे महत्वाचे मुद्दे आहेत व त्या बाबतीत मला पूर्ण खात्री करायची होती. आता आम्ही जेऊन विश्रांती घेतो, कारण उद्याचा दिवस, फार धावपळीचा असणार आहे.”

एक मोठी, आरामशीर, दोन खाटा असलेली खोली, आम्हाला देण्यात आली. मी लगेच स्वतःला पांघरुणात गुरफटून घेतले, कारण मी माझ्या साहसाच्या रात्रीने, दमलो होतो. होम्स मात्र असा माणूस होता, की त्याच्यासमोर जेव्हा न सुटलेला प्रश्न असेल, तेव्हा तो अनेक दिवसचे दिवस किंवा आठवडाभरदेखील, विश्रांती न घेता जागा राहू शके. मनाशी विचार करत, गोष्टी उलटसुलट करून बघत, वेगवेगळ्या दृष्टीकोनातून त्याच त्या गोष्टी परतपरत बघत, त्या त्याला पटेपर्यंत किंवा माहिती अपुरी आहे असे वाटेपर्यंत, तो त्यात गुंतून राही. आता तो रात्रभर जागा रहाणार, असे मला दिसत होते. त्याने त्याचा कोट काढून ठेवला. सैलसर गाऊन घातला व नंतर खोलीभर त्याच्या अंथरुणावरील, सोफ्यावरील व खुर्च्यांवरील, उशा गोळा करत फिरू लागला. मग त्याने स्वतःसाठी पूर्वेकडील देशांसारखा दिवाण तयार केला. त्याचा तंबाखूचा पाईप व काडेपेटी जवळ घेऊन, पाय एकमेकांवर ठेऊन, त्याने स्वतःला त्या आरामशीर जागी, झोकून दिले. मंद प्रकाशात त्याला मी तिथे ओठात पाईप ठेवून बसलेले पाहिले. त्याचे डोळे शून्यपणे छताच्या कोपऱ्यात रोखलेले होते. मी झोपलो पण तो बसलेलाच होता. मध्ये बराच वेळ गेला असावा. मी काहीतरी आवाजाने जागा झालो. मला उन्हाळ्यातील सूर्य उगवताना दिसला. अजून त्याच्या ओठात पाईप होता. त्यातून धूर निघत होता. खोलीत धूर व तंबाखूचा वास भरून राहिला होता.

त्याने विचारले, “वॉटसन, जागा आहेस?”

“हो.”

“प्रभातफेरीसाठी येणार का?”

“नक्की.”

“मग कपडे घाल. अजून बाहेर फारशी जाग नसेल. तबेल्यातील मुलगा कुठे झोपतो, ते मला माहिती आहे. त्याला उठवून, घोड्याला टाच मारून, आपण निघू. आणि लगेच आपल्याला प्रश्नाचे उत्तर सापडेल.” बोलताना तो स्वतःशीच हसत होता, डोळे चकाकत होते आणि कालच्या धुरकट रात्रीतून तयार झालेला तो, कुणी वेगळाच माणूस वाटत होता.

मी कपडे करून, घड्याळाकडे नजर टाकली. कोणाची काही चाहूल नव्हती यात काही नवल नव्हते. कारण फक्त साडेचार वाजले होते. मी माझे आवरतो आहे तोच, होम्स बातमी घेऊन परतला की मुलगा त्याचा घोडा, तयार करतो आहे.

त्याचे बूट पुढे ओढत तो म्हणाला, "माझी एक लहानशी कल्पना, मला तपासून बघायची आहे. मला वाटते वॉटसन, तू युरोपमधील एका मूर्ख माणसासमोर, उभा आहेस. मला इथून चेरिंग क्रॉसला लाथ मारून ढकलून देण्याची, माझी लायकी आहे. पण मला वाटते, मला या प्रकरणामधील गोम, सापडली आहे."

आणि ती कुठे आहे?"

तो उत्तरला, "बाथरुममध्ये. हो खरंच. मी विनोद करत नाही आहे." माझी अविश्वासपूर्ण नजर बघून, त्याने पुढे चालू ठेवले, "मी आत्ताच तिथे गेलो होतो. आणि मी ती बाहेर काढली. या ग्लॅडस्टोनच्या पिशवीतून मी ती आणली आहे. चल लवकर. आपण बघू की ती घोड्यावरून न्यायला, कुलुपात बरोबर बसते आहे का."

आम्ही जितक्या शांतपणे जाता येईल, तितक्या शांतपणे जिना उतरलो आणि बाहेर सकाळच्या सूर्यप्रकाशात गेलो. रस्त्यावर घोडा आणि त्याचा लगाम होता. रात्रीच्या अर्धवट कपड्यात, तबेल्यातील मुलगा थांबला होता. घोड्यावर मांड टाकून आम्ही बसलो व लंडनच्या रस्त्यांवरून, जोरात फिरू लागलो. गावातील काही गाड्या, रस्त्यावर फिरत होत्या. त्या भाजीपाला, शहरात नेत होत्या. पण दोन्ही बाजूंची घरे, स्वप्नातील शहरासारखी शांत होती.

घोडा जोरात धावडवत, होम्स बोलला, "काही बाबतीत, ही केस एकमेवाद्वितीय आहे. मी कबूल करतो, की मी एखाद्या चिचुंद्रीसारखा, आंधळा होतो. पण उशिरा का होईना, पण मला शहाणपण आले."

शहरात लोक नुकतेच उठून, झोपाळूपणे खिडकीत उभे होते. रस्त्याच्या कडेने, आमची घोडदौड चालू होती. वॉटरलू पुलावरुन, आम्ही नदी ओलांडली. आणि विलीग्टन रस्ता ओलांडून जोरात उजवीकडे गेलो. मग आम्ही बो रस्त्याला लागलो. शेरलॉक होम्स, पोलिसाना चांगला माहिती होता. दारातील दोन कॉन्स्टेबलनी, त्याला सलाम ठोकला. एकाने घोड्याला धरले तर दुसऱ्याने आम्हाला आत नेले.

होम्सने विचारले, "इथे आत्ता, कामावर कोण आहे?"

"इन्स्पेक्टर ब्रॅडस्ट्रीट, सर."

“ओहो, ब्रॅडस्ट्रीट, तू कसा आहेस?

एकूणच मजबूत, उंच, घट्ट जाकीट घातलेला व डोक्यावर टोपी असलेला, ब्रॅडस्ट्रीट आला. “मला तुझ्या एकट्याशी, काही बोलायचे आहे.”

“हो. हो. आपण, माझ्या आतल्या खोलीत जाऊया.” ती एक लहानशी, कार्यालयासारखी खोली होती. टेबलावर मोठे रजिस्टर होते. भिंतीत फोन बसवलेला होता. इन्स्पेक्टर त्याच्या, जागेवर बसला.

“मी तुमच्याकरता काय करू शकतो, मिस्टर होम्स?”

“मला त्या भिकाऱ्याला, बूनला, भेटायचे आहे. मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअर, नाहीसे झाले आहेत त्यासंबंधी, ज्याला अटक केली होती तो.”

“हो. आम्ही त्याला इथे आणून, पुढील चौकशीसाठी, ताब्यात घेतले आहे.”

“मी असे ऐकले. तो इथे आहे का?”

“तुरुंगात आहे.’

“तो शांत आहे का?’

“तो काही त्रास देत नाही. पण तो फार घाणेरडा आहे.”

“घाणेरडा?’

‘हो. आम्ही त्याचे हात व चेहरा धुऊन, त्याला स्वच्छ करायचा प्रयत्न केला. पण त्याचा चेहरा भांडी दुरुस्त करणाऱ्यासारखा, काळा कुट्ट आहे. एकदा त्याच्या केसचा निकाल लागला, की त्याला तुरुंगातील, नेहमीची अंघोळ घातली जाईल. तुम्ही त्याला पाहिले, तर माझ्याशी सहमती दर्शवाल, की त्याला अंघोळीची गरज आहे.”

“मला, त्याला भेटायचे आहे.”

“खरे की काय? ते सहज जमेल. इकडून या. तुमचे सामान इथेच राहू द्या.”

“नको. मी ते माझ्याबरोबर घेतो.”

“ठीक आहे कृपया, इकडे या.” त्याने आम्हाला खाली, एका पॅसेजमध्ये नेले. एक बंदिस्त दार उघडले. गोल जिन्याने आम्हाला, पांढरा रंग दिलेल्या सज्जामध्ये आणले. त्याच्या प्रत्येक कडेला दारे होती.

“उजवीकडचे तिसरे दार त्याचे आहे. हे पहा.” तो म्हणाला. त्याने शांतपणे दाराच्या वरच्या भागाचे पत्र्याचे आवरण उघडले व आत डोकावून पाहिले.

तो म्हणाला, “कैदी झोपला आहे. तुम्ही त्याला भेटू शकता.”

आम्ही दोघांनी आत पाहिले. आमच्याकडे तोंड करून तो गाढ झोपला होता. त्याचा श्वासोच्छवास हळू, पण जडपणे होत होता. तो मध्यम चणीचा, मनुष्य होता. त्याने कैद्यांचा गणवेष, म्हणजे रंगीत शर्ट व कोट घातला होता. इन्स्पेक्टर म्हणाल्याप्रमाणे, तो खूपच घाणेरडा दिसत होता. त्याचा चेहरा झाकणारे कापड, इतके कळकट होते की ते, त्याच्यापासून लांब जायला प्रवृत्त करत होते. डोळ्यापासून हनुवटीपर्यंत त्याच्या चेहऱ्यावर एक ओरखडा दिसत होता. त्यामुळे ओठाच्या वरील एक बाजू, वर ताणली गेली होती व दंताड वेंगाडल्यासारखे तीन दात उघडे पडले होते. त्याच्या डोळ्यांवर व कपाळावर आलेले, चकाकित लाल केस बघून, धक्का बसत होता.

इन्स्पेक्टर म्हणाला, “तो फार सुंदर आहे, नाही का? होम्सने शेरा मारला, “नक्कीच, त्याला अंघोळीची गरज आहे. याची मला कल्पना होती. आणि त्यासाठी मी माझ्याबरोबर काही साहित्य आणले आहे. त्याने बोलताना ग्लॅडस्टोनची पिशवी उघडली. आणि मला नवल वाटेल असा, मोठा बाथ स्पंज काढला.

इन्स्पेक्टर हसत म्हणाला, “तुम्ही विनोदी आहात.”

“आता जर तुम्ही कृपा करून दार उघडलेत तर, आम्ही त्याला थोडा स्वच्छ मनुष्य बनवू.” झोपलेला माणूस, अर्धा वळला व परत गाढ झोपला.

इन्स्पेक्टर म्हणाला, “का कुणास ठाऊक, तो बो रस्त्यावरील तुरुंगाचे भूषण वाटत नाही, वाटतो का?’

“त्याने त्याच्याकडील किल्ली कुलुपात घालून दार उघडले व आम्ही सगळे शांतपणे, आत गेलो. झोपलेला माणूस कुशीवर वळून, परत गाढ झोपला. होम्सने तो स्पंज पाण्यात भिजवून, कैद्याचा चेहरा, दोनदा खसखस पुसून काढला.

तो ओरडला, “लीच्या मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअरची, मी तुम्हाला केंटमध्ये, ओळख करून देतो.”

“माझ्या आयुष्यात, मी असे दृष्य पाहिले नव्हते. झाडाचे साल सोलावे तसा त्या माणसाचा खरा चेहरा, नजरेसमोर आला. त्यावरील चॉकलेटी रंगाचे वांग, नाहीसे झाले. तो मोठा ओरखडा व वाकडा ओठ, पण नाहीसा झाला. त्यामुळे आता त्याच्या चेहऱ्याची, शिसारी येत नव्हती. एका धक्क्याने, विस्कटलेल्या लाल केसांचा टोप खाली पडला. तो एक दुःखी, अशक्त, काळे केस असलेला व नितळ कांतीचा माणूस, दिसू लागला. तो डोळे चोळत, अंथरुणावर उठून बसला व झोपाळूपणे, घाबरट डोळे विस्फारून, बघू लागला. नंतर एकदम त्याचे बिंग फुटल्याने, तो किंचाळला व झटक्याने उशीत तोंड लपवले.

इन्स्पेक्टर ओरडला, “अरे देवा! हा खरंच, हरवलेला मनुष्य दिसतो आहे. मी त्याला फोटोवरून ओळखले.”

त्या कैद्याने, नशिबावर स्वतःला झोकून दिलेल्या माणसाचे बेपर्वा सोंग, झटकून टाकले व बोलला, “मी असाच आहे. मला सांगा या माझ्या वेषांतराबद्दल मला काय शिक्षा होईल?”

इन्स्पेक्टर मोठ्याने हसत म्हणाला, “मिस्टर नेव्हिल सेंट, वेषांतर केल्याबद्दल -- ओहो! तो काही गुन्हा नाही. पण जर तुम्ही, आत्महत्येचा प्रयत्न केला असतात, तर मात्र! -- मी सत्तावीस वर्षे पोलिसात आहे. पण हे जे घडले, ते केवळ अद्भुतरम्य आहे.”

“जर मी मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअर असेन, तर हे सरळ आहे, की माझ्या हातून, काही गुन्हा घडलेला नाही. त्यामुळे तुम्ही मला, बेकायदेशीरपणे तुरुंगात टाकले आहे.”

होम्स म्हणाला, “गुन्हा नाही, पण तुम्ही, मोठी चूक केली आहे. तुम्ही तुमच्या बायकोवर, विश्वास ठेवायला हवा होता.”

कैदी दुःखाने बोलला, “हे बायकोमुळे नव्हे, तर मुलामुळे झाले. देवा, मला मदत कर. माझ्या मुलाना, त्यांच्या वडीलांबद्दल लाज वाटायला नको रे देवा. मी असा कसा उघडा पडलो? आता मी काय करू?”

शेरलॉक होम्स, कोचावर त्याच्या शेजारी बसला व त्याच्या खांद्यावर दयाळूपणे थोपटले.

“तू जर कोर्टाकडे सर्व प्रकरण सुपूर्द केलेस, तर काही गवगवा न होणे, अवघड आहे. याउलट तू जर पोलीस अधिकाऱ्याना पटवू शकलास, तर कदाचित तुझ्याविरुद्ध केस उभी रहाणार नाही.

वर्तमानपत्रात याबद्दल काही छापून येण्याचे कारण आहे, असे मला वाटत नाही. माझी खात्री आहे, की तू आम्हाला जे जे सांगशील त्यावर, इन्स्पेक्टर ब्रॅडस्ट्रीट, टिपणे तयार करेल. आणि पुढे ते त्याच्या वरिष्ठांकडे पाठवेल .मग केस कोर्टात कधीच जाणार नाही."

"कैदी भावनातिरेकाने ओरडला, "देव तुमचे भले करो. मी तुरुंगवास किंवा फाशीदेखील सहन केली  असती, पण माझ्या विचित्र गुपितामुळे, मी माझ्या कुटुंबावर व मुलांवर आच येणे कदापि सहन करु शकणार नाही."

"माझी गोष्ट ऐकणारे, तुम्ही पहीले आहात. चेस्टरफिल्डमध्ये माझे वडील, शाळामास्तर होते. तिथे मला, उत्तम शिक्षण मिळाले. तरुणपणी मी प्रवास करून, रंगमंच हे माझे कार्यक्षेत्र निवडले. आणि नंतर, लंडनमधील एका संध्याकाळच्या वर्तमानपत्राचा, वार्ताहर झालो. एक दिवस माझ्या  संपादकाने मला शहरातील भिकाऱ्यांवर, लेखमाला लिहायला सांगितली. मी तयार झालो. एका ठराविक बिंदुपासून, माझे साहस सुरु झाले. तो बिंदू म्हणजे स्वतः भीक मागून बघणे. त्यामुळे मला लिहिण्यासाठी, खराखुरा अनुभव मिळाला असता, असे मला वाटले. जेव्हा मी अभिनय करत होतो, तेव्हा मी मेकप करण्याच्या कलेत, पारंगत झालो होतो. त्याचा फायदा घ्यायचे, मी ठरवले. मी माझे तोंड रंगवले व माझा चेहरा जितका दयनीय बनवता येईल, तेवढा बनवला. ओरखडा काढून, ओठ वाकडा केला. त्यासाठी त्वचेच्या रंगाची, भुकटी वापरली. नंतर टोप लाऊन केस लाल केले व त्या सोंगाला शोभेसे, कपडे घातले. गावातील गजबजलेल्या भागात, मी माझा डेरा टाकला. काडेपेट्या विकणाऱ्याचे, सोंग घेतले. पण मी खराखुरा, भिकारीच झालो होतो. सात तास मी भीक मागितली आणि जेव्हा संध्याकाळी, घरी परतलो तेव्हा मला २६ सेंट व ४ डाइम मिळालेले बघून, मी आश्चर्यचकित झालो.

मी माझी लेखमाला लिहिली. माझ्या भिकाऱ्याच्या सोंगाबद्दल मी विचार करू लागलो. एका मित्राला मी दिलेला चेक न वटल्यामुळे, शिक्षा म्हणून, २५ पौंड भरण्याबद्दल, मला कोर्टाचा आदेश आला. आता हे पैसे कुठून मिळवावे, याबद्दल माझी मती चालेना. पण तेवढ्यात मला एक कल्पना सुचली. मी ज्याला पैसे द्यायचे होते, त्याच्याकडून पंधरवड्याची मुदत, मागून घेतली, कामाच्या ठिकाणाहून, रजा घेतली व शहरात वेष बदलून, भीक मागितली व मिळालेल्या पैशातून, दहा दिवसात, कर्ज फेडून टाकले. अनेक तास मान मोडून काम केल्यावर, आठवडयाला २ पौंड  मिळवण्यापेक्षा, मला एक सोपा मंत्र, माहिती झाला होता. तो म्हणजे, माझा चेहरा रंगवून व माझी टोपी समोर ठेऊन, नुसते बसून रहायचे व तेवढेच पैसे मिळवायचे. माझा अभिमान व पैसा, यात लांबलचक लढाई झाली. शेवटी मी वार्ताहर म्हणून काम करणे, सोडून दिले. दिवसामागून दिवस, मी पहिल्यांदा शोधून काढलेल्या कोपऱ्यात बसून, भीक मागू लागलो.

माझा भयानक भीतीदायक चेहरा बघून, माझी दया येऊन, लोकांच्या पैशांनी माझे खिसे भरू लागले. एकाच माणसाला, माझे गुपित माहिती होते. तो माणूस म्हणजे, स्वांडम गल्लीतील ओपिअम गुहेतील माझा साथीदार, लास्कर. तिथून मी रोज सकाळी घाणेरडा भिकारी बनून, बाहेर पडायचो व संध्याकाळी माझे बेमालूम रुपांतर करून, मी सभ्य माणसासारखा घरी परतत असे. हा माणूस, लास्कर, याला त्याची जागा वापरल्याबद्दल, मी चांगले पैसे देत होतो. त्याच्या जवळ माझे गुपित सुरक्षित असल्याचे, मला माहिती होते.

थोडेच दिवसात माझ्या लक्षात आले, की माझे खूप पैसे शिल्लक पडत आहेत. लंडनच्या रस्त्यावरील कुणीही भिकारी वर्षाला ७०० पौंड मिळवत असेल, असे मला म्हणायचे नाही. -- पण माझी सर्वसाधारण प्राप्ती, याहून जास्त होती. – माझ्याकडे मेकप करण्याचा आगळावेगळा गुण होता. शिवाय माझ्याजवळ, गिऱ्हाईकांना चातुर्यपूर्ण उत्तरे देण्याचा, हजरजबाबीपणा होता. हे गुण सरावाने, आणखी वाढीस लागले आणि लवकरच मी शहरातील, एक ओळखली जाणारी व्यक्ती बनलो. दिवसभर पेनींचा प्रवाह व कधीमधी चांदीची नाणी, माझ्याकडे टाकली जात. एखाद्या दिवशी मला दोन पौंड मिळाले नाहीत, तर तो वाईट दिवस, असे मी समजे.

मी जितका पैसेवाला बनत चाललो, तितका जास्त महत्वाकांक्षी बनत चाललो. कुणालाही माझा खरा व्यवसाय काय आहे हे न कळता, मी गावात घर घेतले. यथावकाश लग्नही केले. माझ्या प्रिय बायकोला शहरात माझा व्यवसाय आहे, एवढेच माहिती होते. पण कसला काय, याबद्दल तिला विशेष माहिती नव्हते.

मागील सोमवारी, माझे दिवसाभराचे काम झाले. नंतर मी ओपिअम गुहेतील माझ्या खोलीत, कपडे बदलून तयार होत होतो, तेव्हा मी खिडकीतून डोकावून पाहिले आणि मला भयंकर आश्चर्य वाटणारे दृष्य, पुढे उभे ठाकले. माझी बायको, रस्त्यात उभी होती. मी नवल वाटल्याने, ओरडलो आणि माझा चेहरा, हातांनी झाकून घेतला. मी धावत माझा विश्वासू असलेल्या, लास्करकडे गेलो. त्याला मला भेटायला कोणालाही वर येऊ न देण्याची, विनंती केली. मी खाली, तिचा आवाज ऐकला. पण मला माहिती होते, की ती वर येऊ शकणार नाही. मी हळूच माझे कपडे काढून, भिकाऱ्याचे घातले. माझा रंग व केसांचा टोप लावला. त्या वेषात माझी बायकोसुद्धा, मला ओळखू शकली नसती. पण माझे कपडे खोलीत पडले होते व खोलीची तपासणी झाल्यास, मी मूर्ख ठरणार होतो. मी खिडकी उघडली आणि असे जोराने करताना, मला थोडी जखम होऊन रक्त माझ्या अंगावर उडाले. मग मी माझा नाण्यांनी भरलेला कोट घेऊन माझ्या चामड्याच्या पिशवीत रिकामा केला, ज्यात मी माझी भीक जमा करायचो. मग मी तो जोराने

खिडकीबाहेर फेकला. तो थेम्स नदीत अदृश्य झाला. पण घाईत असे करताना, बरीच नाणी त्यातच राहिली. तेवढ्यात मला जवळून, इन्स्पेक्टरचा आवाज ऐकू आला. त्यामुळे इतर कपडे, बाहेर फेकायचे राहून गेले. काही मिनिटात, मला मिस्टर नेव्हिल सेंट क्लेअर म्हणून ओळखले जाण्याऐवजी, त्याचा खुनी म्हणून, पकडण्यात आले.

“अजून काही स्पष्टीकरण द्यायचे राहिले आहे, असे मला वाटत नाही. मी माझे वेषांतर जमेल तितके ताणून धरायचे ठरवले. आणि म्हणून मग हे घाणेरड्या चेहऱ्याचे सोंग! माझी बायको खूपच घाबरली असणार, असे वाटून मी माझी अंगठी काढून, इन्स्पेक्टर बघत नसताना, एका घाईने खरडलेल्या चिठ्ठीबरोबर लास्करला दिली. त्यात मी तिला असे लिहिले, की घाबरायचे काही कारण नाही.”

होम्स म्हणाला, “ती चिठ्ठी तिला, काल मिळाली.”

“अरे बापरे, गेला आठवडा, तिने कसा काढला असेल?”

इन्स्पेक्टर ब्रॅडस्ट्रीट म्हणाला, “पोलिसांनी, या लास्करवर नजर ठेवली होती. आणि त्याला कुणी न बघता ते पत्र पोस्टात टाकणे अवघड होते. त्याने ते त्याच्या कुणातरी गिऱ्हाईकाकडे दिले असणार व तो काही दिवस, ते पोस्टात टाकायला विसरला असणार.”

मान डोलवत, होम्स बोलला, “बरोबर. असेच झाले असणार. मला याबद्दल काही संशय नाही. पण तुला भीक मागण्याबद्दल, कधी अटक झाली नाही?”

“खूप वेळा, पण किरकोळ दंडाचे मला काय मोठेसे होते?”

ब्रॅडस्ट्रीट म्हणाला, “परंतु आता हे सर्व, इथेच थांबले पाहिजे. जर पोलिसाना यात पडू द्यायचे नसेल तर, अजून हग बून होणे, बास झाले.”

“मनुष्य जितक्या खरेपणानी शपथ घेऊन सांगेल, तितके मी सांगतो, की आजपासून मी हे सोंग घ्यायचे सोडले.”

"तर मग आता बहुधा, अजून काही पोलिसी कारवाई केली जाणार नाही, असे मी सांगतो. पण जर तू पुन्हा सापडलास, तर मग आम्ही, तुझी सगळी अंडीपिल्ली बाहेर काढू. मिस्टर होम्स, या प्रकरणाची उकल केल्याबद्दल, आम्ही अगदी खात्रीने, तुमचे फार ऋणी आहोत. तुम्ही इथपर्यंत कसे पोचलात, हे जाणून घेण्याची, माझी इच्छा आहे.”

माझा मित्र म्हणाला, “पाच उशा घेऊन, आरामात रात्री पाईप ओढत बसून, मला हा शोध लागला. मला वाटते वॉटसन, जर आपण आत्ता बेकर रस्त्याला गेलो, तर आपण न्याहारीच्या वेळी पोचू.”



## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

### एक प्रसन्न अनुभव